Peer reviewed Journal Impact Factor: 7.265 ISSN-2230-9578

# Journal of Research and Development

*A Multidisciplinary International Level Referred Journal*

**30 October 2021 Volume-12 Issue-15**

## *Agriculture and Rural Development: Strategic Issues and Reform Options*











**Chief Editor**
**Dr. R. V. Bhole**
**'Ravichandram' Survey No-101/1, Plot No-23, Mundada Nagar, Jalgaon (M.S.)**

**Guest Editor**
**Dr. R K Pardeshi.**
Principal
Sant Ramdas Arts, Commerce and Science College, Ghansawangi Dist. Jalna

**Guest Editor**
**Dr. Y. M. Chavan**
I/CPrincipal
Sahakarbhushan S. K. Patil College, Kurundwad.

**Executive Editors**
**Dr. Tathe S.V.** **Dr. A. D. Jadhav** **Mr. Santosh P. Mane**




**Address**
'Ravichandram' Survey No-101/1, Plot, No-23, Mundada Nagar, Jalgaon (M.S.) 425102



# Journal of Research and Development

***A Multidisciplinary International Level Referred and Peer Reviewed Journal***

***30 October 2021 Volume-12 Issue-15***

*On*

# *Agriculture and Rural Development: Strategic Issues and Reform Options*

**Chief Editor**
Dr. R. V. Bhole
'Ravichandram' Survey No-101/1, Plot, No-23,
Mundada Nagar, Jalgaon (M.S.) 425102

| Guest Editor<br>Dr. R K Pardeshi.<br>Principal<br>Sant Ramdas Arts, Commerce and Science College, Ghansawangi Dist. Jalna | **Guest Editor**<br>**Dr. Y. M. Chavan**<br>I/CPrincipal<br>Sahakarbhushan S. K. Patil College, Kurundwad. |
|---|---|
| Executive Editors<br>Dr. Tathe S.V.<br>Dr. A. D. Jadhav<br>Mr. Santosh P. Mane | |

Editorial Board

| Prof. R. S. Kadam | Mr. K.D. Dhaygude | Prof. R.D. Shinge |
|---|---|---|
| Dr. Dhaye R.S | Dr. B. S. Devkar | Mrs. S. V. Patil |
| Dr. Mrs. S.V. Kothavale | Dr. V.S.Moon | Dr. S. S. Shinde |
| Prof.P.P.Kamble | Dr. S.D. Chavan | Prof. Dr. D.V. Suryawanshi |
| Dr. V.V.Minchekar | Dr. M.S. Dabade | Prof. Dr. S.A. Tambade |

**Published by- Dr. R K Pardeshi**, Principal, Sant Ramdas Arts, Commerce and Science College, Ghansawangi Dist. Jalna &
**Dr. Y. M. Chavan,** I/CPrincipal, Sahakarbhushan S. K. Patil College, Kurundwad

**The Editors shall not be responsible for originality and thought expressed in the papers. The author shall be solely held responsible for the originality and thoughts expressed in their papers.**

**© All rights reserved with the Editors**

# CONTENTS


| Sr. No. | Paper Title | Page |
|---|---|---|
| **1** | ग्रामीण विकासात आर्थिक समावेशाचे महत्त्व<br>**प्रा. डॉ. आर. ए. फुलकर** | 1-4 |
| 2 | भंडारा जिल्ह्यातील कृषी व बदलते पीक प्रारूप<br>**डॉ. अरुणा बावनकर** | 5-8 |
| 3 | मराठी साहित्यातील कृषिनिष्ठ जीवन<br>**डॉ.माधव मारुती भोसले** | 9-12 |
| 4 | नांदेड जिल्ह्यातील तेलबिया पीकाचा भौगोलिक अभ्यास<br>**प्रा.डॉ.यु.एस.कानवटे** | 13-19 |
| 5 | रा.रं बोराडे यांच्या कथेतील शेतकरी जीवन { विषेश संदर्भ :- हुंदका,पेरणी कथा संग्रह }<br>**प्रा.डॉ.रमाकांत गजलवार** | 20-22 |
| 6 | इंद्रजित भालेराव यांच्या कवितेतील शेतकरी<br>**डॉ. प्रिया जामकर** | 23-26 |
| 7 | शेतकरी उत्पादक कंपनी/संघटन आणि शेती विकास<br>**डॉ. विजय शंकर शिंदे** | 27-31 |
| 8 | बारोमास' कादंबरीतून चित्रित झालेले कृषिआधारित ग्रामजीवन : एक अभ्यास<br>**डॉ. राहुल भालेराव पाटील** | 32-35 |
| 9 | वाशिम जिल्ह्यातील लोकसंख्येची घनता व जलसिंचनाची तीव्रता –भौगोलिक विश्लेषण<br>**डॉ. विजय ब. खराते** | 36-41 |
| 10 | **नवीन तंत्रज्ञानाचा शाश्वत कृषी विकासातील योगदान**<br>**प्रा मनोज किसन जाधव** | 42-44 |
| 11 | समकालीन कृषी जीवनाचे ग्रामीण कवितेतील प्रतिबिंब<br>**प्रा. नारायण बाबुराव पाटील** | 45-49 |
| 12 | औरंगाबाद जिल्ह्याच्या सामाजिक व आर्थिक विकासात नाबार्ड बँकेची भूमिका<br>**केदार सुदामराव गरड, डॉ.डी.एन.जिगे** | 50-54 |
| 13 | शेती आणि ग्रामीण विकास कार्यक्रमांत क्षेत्रीय ग्रामीण बँकांची भूमिका.<br>**प्रा.निनाद विजय जाधव** | 55-59 |
| 14 | छत्रपती शिवाजी महाराजांचे आर्थिक धोरण :एक चिकित्सक अभ्यास<br>**डॉ. दिपक वामनराव सुर्यवंशी** | 60-63 |
| 15 | जागतिकीकरणाचा भारतीय कृषीवर झालेला परिणाम<br>**डॉ. गायकवाड डी.एस** | 64-68 |
| 16 | **वर्तमान शिक्षा में पर्यावरण शिक्षा**<br>**बृजेश सिंह** | 69-71 |
| 17 | **भारतीय कृशी आणि डिजिटल क्रांती – समस्या आणि उपाय**<br>प्रतिक गोकुलदास ठाकरे | 72-76 |
| 18 | ग्रामीण साहित्यातील कृषी सन्मुखता<br>**डॉ.चांदोजी सोपान गायकवाड** | 77-81 |
| 19 | मराठवाड्यातील कापूस लागवडीचे अर्थशास्त्र<br>**उगले गीता दिलीप, डॉ. डी.एन. जिगे** | 82-85 |

| | | |
|---|---|---|
| 20 | भारतातील ग्रामीण विकासात सरकारी योजना<br>**डॉ. ताठे एस. व्ही ,सौ. छाया भगवान बोर्डे** | 86-89 |
| 21 | कृषी पर्यटन व ग्रामीण विकासा करिता उपयुक्त जलव्यवस्थापन<br>**डॉ बालासाहेब शिवाजी पवार** | 90-95 |
| 22 | शिवरायांचे रायगडावरील जलव्यवस्थापन एक अभ्यास<br>**योगिता कल्याणराव खापरे** | 96-100 |
| 23 | "मल्टीस्टेट श्येडूल्ड को-ऑपरेटीव्ह बँकांची ग्रामीण विकासातील भूमिका"<br>**डॉ.रविंद्र अशोक आहिरे** | 101-108 |
| 24 | कृषि क्षेत्रातील यशस्वी उपक्रमांचे सार्वत्रिकीकरण काळाची गरज<br>**अंकुश तुकाराम करपे** | 109-113 |
| 25 | "जालना जिल्ह्यातील शेती व्यवसायावर झालेला आतिवृष्टीचा परिणाम - एक भौगोलिक अभ्यास"<br>**प्रा. डॉ. भाऊसाहेब सोनाजी देवकर, प्रा. डॉ. सर्जेराव ताठे** | 114-122 |
| 26 | संजीव के ''फाँस' उपन्यास में किसान विमर्श<br>**डॉ.शिवाजी रामकिशन सांगोळे** | 123-126 |
| 27 | डॉ. बाबासाहेब आंबडेकर यांच्या कृषीविषयक विचारांची समकालीन उपयोगीता<br>**प्रा. विजय डी. वाकोडे** | 127-130 |
| 28 | भारत में कृषि फसलों के लिए जल की आवश्यकता और प्रबंधन : एक भौगोलिक अध्ययन<br>**Dr. Dinesh Kumar** | 131-138 |
| 29 | शेतमजुरांचा तुटवडा : भारतीय शेती पुढील ज्वलंत आव्हान.<br>**डॉ. रावसाहेब पिराजी इंगळे** | 139-143 |
| 30 | विकास पत्रकारितेचे स्वरूप आणि महत्त्व : एक चिकित्सक अभ्यास<br>**डॉ. बाळासाहेब दत्तात्रय मागाडे** | 144-147 |
| 31 | ग्रामीण जीवनातील शेतीचे महत्व<br>**प्रा. नंदकिशोर आत्माराम पाटील , डॉ. भाऊसाहेब सोनाजी देवकर** | 148-152 |
| 32 | उपाय कोरोना-19 विरुद्धचा - आरोग्य चिंतन" - एक सामाजिक अभ्यास<br>**प्रा.सामग सुनिल व्यंकटेश** | 153-157 |
| 33 | २०१४ नंतर काँग्रेस पक्षाच्या वाटचालीचा चिकित्सक अभ्यास<br>**प्रा. मारुती चांगदेव हजारे, प्राचार्य डॉ. सुनीलकुमार कुरणे** | 158-162 |
| 34 | जालना तालुक्यातील लिंग रचनेचे अभिक्षेत्रीय वितरण एक अभ्यास<br>**प्रा.डॉ.सोमीनाथ सारंगधर खाडे, श्री. मनोज मधुराज डोईफोडे** | 163-165 |
| 35 | जालना जिल्ह्यातील अंबड आणि घनसावंगी तालुक्यातील आर्थिक आणि सामाजिक विकासात कर्मयोगी अंकुशराव टोपे समर्थ सहकारी साखर कारखान्याची भूमिका एक भौगोलिक अभ्यास (2001-2011)<br>**डॉ. एस. व्ही. ताठे, श्री. अभिजीत बी. गुजर** | 166-169 |
| 36 | ग्रामीण जीवनातील शेतीचे महत्त्व<br>**डॉ. दीपक गायकवाड** | 170-172 |
| 37 | कोविड – १९ चा भारतीय कृषी व ग्रामीण विकासावर झालेला परिणाम<br>**प्रा.डॉ.संतोष दळवी** | 173-176 |
| 38 | पश्चिम विदर्भातील मुख्य रस्ते मार्गांची संपर्कतेची पातळी : भौगोलिक अध्ययन<br>**डॉ विशाल एस मून** | 177-180 |

| | | |
|---|---|---|
| 39 | ग्रामीण व कृषी विकासात येणाऱ्या समस्या व त्यावरील उपाययोजना यांचा - एक भौगोलिक अभ्यास<br>**प्रा. डॉ. सर्जेराव ताठे, प्रा.डॉ. देवकर भाऊसाहेब सोनाजी** | 181-186 |
| 40 | उपन्यास में चित्रित किसान विमर्श<br>**डॉ. संतोष रामचंद्र आड़े** | 187-189 |
| 41 | गोंदिया जिल्ह्यातील कृषी आणि अर्थशास्त्र<br>**डॉ. मनीषा कृष्णराव देशपांडे** | 190-192 |
| 42 | उपन्यासकारसंजीव कृत लिखित 'फाँस' उपन्यास मेंचित्रितकिसान जीवन<br>**प्रा. शोभा नानाभाऊ कोकाटे, डॉ .राजेंद्र खैरनार** | 193-195 |
| 43 | संपूर्ण ग्रामीण वास्तव : 'मायलेकरं '<br>**डॉ. मारोती माधवराव घुगे** | 196-199 |
| 44 | कवी मनातील शेतकरी : विशेष संदर्भ 'कुणब्याषच्या पोरा'<br>**प्रा.डॉ. डिगोळे बालाजी विठ्ठलराव** | 200-205 |
| 45 | भाऊराव पाटील यांचे शेतीविषयक विचार व कार्य<br>**प्रा. विजयश्री गवळी** | 206-208 |

'Journal of Research & Development' A Multidisciplinary International Level Referred and Peer Reviewed Journal, Impact Factor-7.265, ISSN: 2230-9578, 30 October2021, Volume-12, Issue-15
Agriculture and Rural Development: Strategic Issues and Reform Options

# ग्रामीण विकासात आर्थिक समावेशाचे महत्त्व

**प्रा. डॉ. आर. ए. फुलकर**

सहायक प्राध्यापक महात्मा ज्योतिबा फुले महाविद्यालय, बल्लारपूर

इ-मेल – roshanv2@gmail.com

**गोषवारा:**

अर्थव्यवस्थेकरिता अत्यंत महत्त्वाचा घटकवित्त असल्याकारनाने प्रत्येक क्षेत्राला पुरेसे वित्त मूलभूततत्त्वावर अत्यावश्यक असते. भारतातील ग्रामीण भागाची प्रगती करायची असल्यास तेथील गरजेनुसार वित्तपुरवठा करणे आवश्यक असते.ग्रामीण भागाचा विकास साधायचा असल्यास गरजेपुरता निधी उपलब्ध झाल्याशिवाय होऊ शकत नाही. जागतिक अर्थव्यवस्थेत भारताचा ७ वा क्रमांक असून सर्वात मोठ्या अर्थव्यवस्थेत मोडते आणिभारत अर्थव्यवस्था विकसित होण्याच्या दिशेने वाटचाल करीत आहे. ग्रामीण क्षेत्र भारताची अर्थव्यवस्था मजबूत करण्याकरिता महत्वाची भूमिका बजावत असते. भारतातील शहरीभाग आणि ग्रामीणभाग यांच्यातील अंतर कमी करण्याची गरज आहे. साक्षरता, रोजगार, उत्पन्नाची पातळी, दारिद्र्यता, दर्जा यासारख्या विविध समस्या ग्रामीण क्षेत्रात मोठ्या प्रमाणात दिसून येत असल्यातरी शहरी भागात याचे प्रमाण कमी दिसून येते, जर ही दरी भरून काढायची असल्यास सरकारद्वारे जबाबदारीघेऊन ग्रामीण भागाचा विकास सुनिश्चित करण्यासाठी आर्थिक समावेश सर्वात प्रभावी मार्ग ठरू शकते. आर्थिक समावेशनद्वारे ग्रामीण भागातील लोकांना आर्थिक उत्पादने, सदोष सेवा, सक्षमिकरण,उत्पन्नाची पातळी व व्यवसायाचा आकार या सर्व घटकांकरीता सर्वसमावेशक दिशेने महत्त्वपूर्ण कार्य करून त्यामध्ये सुनिश्चितता आणून प्रत्येकांना आर्थिक क्षेत्रात जास्तीत जास्त सहभागआणि मोठ्या प्रमाणात सेवांचा वापर करुन त्यांचे जीवन योग्य दिशेने नेऊन लाभ न घेतलेल्या लोकसंख्येच्या सर्वांगीण विकासास मदत करता येते.मागास व गरीब लोकसंख्येचे उत्थान करण्यासाठी प्रभावी आर्थिक समावेशाची गरज असते. आर्थिक उत्पादने आणि सेवा प्रदान करण्याच्या दृष्टीकोणातून सदर शोध निबंधाद्वारे महत्त्व समजून घेण्याचा प्रयत्न केलेला आहे. ग्रामीण विकासात आर्थिक समावेशन आणि अधिकाऱ्यांनी याची खात्री करण्यासाठी घेतलेला पुढाकारआर्थिक समावेशनास नवी दिशा व चालना देण्याचे कार्य करते.

**बीज शब्द:**वित्त, अर्थव्यवस्था, विकास, ग्रामीणभाग.

**प्रस्तावना:**

भारत मोठ्या वेगाने विकासाच्या दिशेने वाटचाल करीत असला तरी प्रत्येक क्षेत्राचे योगदानतेथील असलेल्या गरजेनुसार भारतातील ग्रामीण भागाची वाढ परिस्थितीनुसारखूप महत्वाची असते. बँकिंग क्षेत्रअर्थव्यवस्थेचे महत्त्वाचे क्षेत्र म्हणून संबोधल्या जाते. बँकिंग क्षेत्र अर्थव्यवस्थेच्या सर्व आर्थिक गरजांची काळजी घेते आणिअर्थव्यवस्थेच्या प्रत्येक क्षेत्रात पैशाचा योग्य प्रवाह सुनिश्चित करते. बँकांच्या कार्यप्रणाली विस्तृत स्वरुपात असून योग्य सुनियोजित दिशेने काम करते. ग्रामीण भागातील बहुतांश नागरिकांकडे आर्थिक अभाव असल्यामुळे भारतातिल ग्रामीण भागाविषयीविस्तृत स्वरुप व सुनियोजितपणा आहेअसे म्हणता येणार नाही. याच कारणामुळे ग्रामीण भागातील लोकांना बँकिंग क्षेत्रातील उत्पादने आणि सेवा-सुविधा घेण्याच्या दृष्टीने सहजरित्या प्रवेश मिळविता येतो. याच कारणाने मोठ्या प्रमाणात बँकांची निर्मिती करण्यात आली आहे. अधिकाऱ्यांची भूमिकाभारतातील ग्रामीणआणि शहरी भाग यांच्यातील अंतर कमी करण्यासाठी महत्त्वपूर्ण असून त्यांनी जर ही जबाबदारी योग्य रित्या पार पाडली तर आर्थिक समावेशन सुनिश्चित करण्याचे साधन उपलब्ध करून देणे हे महत्त्वाचे कार्य सहज शक्य होऊ शकते.आर्थिक समावेशन प्रत्येक नागरिकाला आर्थिक उत्पादने

आणि सेवा प्रदान करणे,स्वस्त खर्चात व्यवसाय उभारणे,किंवा यासर्वांची उपलब्धता आणि समानता म्हणून देखील परिभाषित केले जाते. बँकिंग, इक्विटी आणि वेळेवर आर्थिक उत्पादने मिळवण्याच्या संधी,कर्ज आणि विमा उत्पादने यांचा सुद्धा समावेश आर्थिक समावेशनात केला जातो. भारतातील सहकारी चळवळीच्या प्रारंभी१९०४ मध्ये आर्थिक समावेशनाची संकल्पना विकसित करण्यात आली. याच दरम्यानप्राथमिक क्षेत्राच्या विकास कामावर लक्ष केंद्रित केले गेले होते. आर्थिक समावेशनास१९६९ मध्येगती मिळाली जेव्हा १४ प्रमुखव्यावसायिक बँकांचे राष्ट्रीयीकरण करण्यात आले आणि लीड बँक योजना१९७० च्या मध्यात सुरू करण्यात आली होती.नवीन अर्थव्यवस्थिय धोरण पहिल्या आणि दुसऱ्या पिढीच्या बँकिंग सुधारणांसहबँकिंग क्षेत्र अधिक मजबूत करण्यात आले होते. त्यामुळे भारतातील शहरी भागाची बँकिंग प्रणाली अधिक गतिशील व सामर्थ्यशील झालेली आहे. अलीकडेच सरकारने ग्रामीण भागात याची खात्री करण्यासाठी अधिकाधिक उपाय केले गेले आहेत.

**उद्दीष्ट:** शोध निबंध प्रस्तुत करण्याकरिता खालील प्रमाणे उद्दिष्ट्ये डोळयासमोर ठेऊन लिखाण कार्य करण्यात आलेले आहे.

१. भारतीय संदर्भात आर्थिक समावेश समजून घेणे.
२. ग्रामीण विकासात आर्थिक समावेशाचे महत्त्व जाणून घेणे.
३. आर्थिक समावेशन अंतर्गत उपक्रमांचे विहंगावलोकन करणे.

**व्याप्ती:** सदर शोध निबंधात केवळ आर्थिक समावेश आणि त्यांच्या विविध उपक्रमांना समजून घेण्याच्या पैलूंचा समावेश आहे. भारतातील ग्रामीण भागातीलदारिद्र्य रेषेखालील नागरिकांची वाढ सुनिश्चित करण्यासाठी अधिकाऱ्यांनी घेतलेले आर्थिक समावेश योजना यांचा समावेश केला गेलेला आहे.

**कार्यपद्धती:**

अभ्यास सैद्धांतिक आणि वैचारिक स्वरूपाचा आहे जेथे महत्त्व समजून घेण्याचा प्रयत्न केला जातोआर्थिक समावेशन आणि ते सुनिश्चित करण्याचे दृष्टीने शोध निबंध पुर्नत्वास केलेला आहे. सदर शोध निबंध वृत्तपत्रे, लेख आणि शोधनिबंधांसारख्या प्राप्त दुय्यम स्त्रोताच्या आधारित आहे. वरील स्त्रोतांद्वारे माहिती संकलित करून शोध निबंधात समावेश केला गेलेला आहे.

**पुढाकार:**

**१. प्रधानमंत्री जन धन योजना:**भारतीय नागरिकांसाठी खुले (१० वयोगटातील किंवा त्यापेक्षा जास्त वयाचे देखील खाते उघडू शकतात), हा भारत सरकारचा आर्थिक समावेशन कार्यक्रम आहेज्याचा उद्देश बँक खात्यांसारख्या वित्तीय (पैसे, पत, विमा आणि पेन्शन) सेवांमध्ये प्रवेश वाढवणे होय. २८ ऑगस्ट २०१४ रोजी भारताचे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी द्वारे ही आर्थिक समावेशन मोहीम सुरू करण्यात आली होती.

**२. सुकन्या समृद्धी योजना:**मुलींच्या उज्ज्वल भविष्याला लक्ष केन्द्रित करून ही बचत योजना भारत सरकारद्वारे तयार करण्यात आली. ही योजना मुलींच्या भविष्यातील शिक्षण खर्च आणि लग्नासाठी निधी उभारण्यासाठी तयार करण्यात आली. २२ जानेवारी २०१५ पासून प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी ही योजना सुरू केली. बेटी बचाओ, बेटी पढाओ धोरणाचा एक भाग म्हणून ह्या योजनेची सुरूवात करण्यात आली. या योजनेत समावेशीत होण्याकरिता इंडिया पोस्ट ऑफिस किंवा अधिकृत व्यावसायिक बँकांची शाखा याठिकाणी खाते कोणत्याही वेळी उघडता येतात. सुकन्या समृद्धी योजना सुरू करण्याचे उद्दीष्ट ग्रामीण विकास सुनिश्चित करने, भारतातील ग्रामीण भागात बचत आणि विमा

सवयींचा प्रचार करून त्यांच्यामध्ये योजनेविषयी जागरूकता निर्माण करणे,तसेच विविध माध्यमातून अनेक प्रकारचे प्रशिक्षण कार्यक्रम खालीलप्रमाणे राबविण्यात येतात.

**अ.**ग्रामीण भागातील लोकसंख्येना एनजीओ आणि बचत गटांद्वारे परवानगी देऊन ग्रामीण लोकसंख्येपर्यंत थेट भेटीद्वारे पोहोचविणे व ग्रामीण जनतेला शिक्षित करणे.

**ब.**बँकिंग उत्पादने आणि सेवांमध्ये नवीन तंत्रज्ञानाच्या वापर करून विविध प्रकारची जागरूकता निर्माण करणारे कार्यक्रम आयोजित करणे.

**क.**रोजगाराच्या संधी वाढवण्यासाठी भारतीय ग्रामीण भागातील संसाधनांचा उत्पादक पद्धतीने वापर करन. व्यवस्थित रित्या जीवन जगण्यासाठी पर्यायी साधने शोधण्याच्या दृष्टीने, पीक लागवडीव्यतिरिक्त उत्पादन क्रियाकलापांमध्ये विविधता आणणे.

**ड.**ग्रामीण भागातील लोकसंख्या महिला शिक्षणावर लक्ष देत नाहीत म्हणून महिला सक्षमीकरण ही काळाची गरज समजून महिलांना शिक्षण व रोजगार उपलब्ध करून देणे.

**३. प्रधानमंत्री सुरक्षा विमा योजना:**भारत सरकार समर्थित अपघात विमा योजना तयार करण्यात आली.दिवंगत अर्थमंत्री अरुण जेटली यांनी फेब्रुवारी २०१५ च्या अर्थसंकल्पीय भाषणात याचा उल्लेख केला होता. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी ०८ मे रोजी कलकत्ता येथे याचे औपचारिक उद्घाटन केले. १८ ते ७० वर्षे वयोगटातील लोकांना (भारतीय रहिवासी किंवाएनआरआय)बँक खात्यांसहही योजना लागू आहे. फक्त रु. १२ वार्षिक भरणा करून या योजनेत समावेश केल्या जातो आणि ही रक्कम खात्यातून आपोआप घेतली जाते. सदर योजनेला०१ जून ते ३१ मे पर्यंत एक वर्षाचे विमा संरक्षण बँका आणि सार्वजनिक क्षेत्रातील सामान्य विमा कंपन्यांमार्फत असू शकते. अनपेक्षित बाबतीतमृत्यू किंवा पूर्ण अपंगत्व, आल्यास नामनिर्देशित व्यक्तीला ०२ लाख रुपये आणि आंशिक कायमस्वरूपी अपंगत्व असेल तर ०१ लाख देय असेल. (पूर्ण अपंगत्वाची व्याख्या दोन्ही डोळे, हात किंवा पाय निकामी होणे.)(अर्धवटकायमचे अपंगत्व म्हणजे एक डोळा, हात किंवा पायाचा वापर कमी होणे.) आत्महत्या, अल्कोहोल, मादकपदार्थांचे सेवनामुळे झालेल्या मृत्यु इत्यादींचा समावेश या योजनेत केलेला नाही.

**४. प्रधानमंत्री जीवन ज्योती विमा योजना:**दिवंगत अर्थमंत्री अरुण जेटली यांनी फेब्रुवारी २०१५ च्या अर्थसंकल्पीय भाषणात याचा उल्लेख केला होता की ही योजना भारत सरकार समर्थित जीवन विमा योजना आहे.. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी ०९ मे रोजी कलकत्ता येथे या योजनेचे औपचारिक उद्घाटन केले. सदर योजनाबँक खात्यांसह १८ ते ५० वयोगटातील लोकांना उपलब्ध आहे. याचा वार्षिक भरणा रु. ३३० आहे. भरणाची ची रक्कम खात्यातून आपोआप जमा केली जाते. कोणत्याही कारणामुळे मृत्यू झाल्यास,नामनिर्देशित व्यक्तीला ०२ लाख रुपये देय असेल.

**५. अटल पेन्शन योजना:** असंघटित क्षेत्रासाठी या पेन्शन योजनेचा मोठ्या प्रमाणात फायदा आहे. पूर्वीच्या स्वावलंबन योजनेने यायोजनेची जागा घेतली आहे. कोणत्याही भारतीय नागरिकाला कोणताही आजार, अपघात किंवा वृद्धापकाळातील आजारांबद्दल काळजी करणे, सुरक्षिततेची भावना देणे होय. खाजगी क्षेत्रअशा संस्थेसह काम करणारे कर्मचारी किंवा जे कर्मचारी त्यांना पेन्शन नाही हे सर्व सदर योजनेसाठी देखील अर्ज करू शकतात. वयाची ६० वर्षे पूर्ण झाल्यावर एकस्तर पेन्शन मिळवण्याचा पर्याय या योजनेत आहे. व्यक्तीचे वय आणि योगदानाची रक्कम निवृत्तीवेतन कायदा आधारित ठरवीले जाते. योगदानकर्त्याचा जोडीदार पेन्शनवर दावा करू शकतोयोगदानकर्त्याच्या मृत्यूवर आणि योगदानकर्ता आणि त्याच्या/तिच्या जोडीदाराच्या मृत्यूनंतर,नामनिर्देशित व्यक्तीला संचित निधी दिला जातो. तसेच, जर योगदानकर्ता वयाची ६० वर्षे पूर्ण करण्यापूर्वी मरण पावला, तर

त्याच्या जोडीदाराला एकतर योजनेतून बाहेर पडण्याचा आणि दावा करण्याचा पर्याय दिला जातो किंवा शिल्लक कालावधीसाठी योजना सुरू ठेवता येते.

**निष्कर्ष:**

भारताचा विकास सुनिश्चित करण्यासाठी व देशाला प्रगतिपथावर पोहचण्याकरिता आणि भविष्यात विकासात्मक बदल आणण्याची अधिकाऱ्यांनीमागील दोन दशकांपासून महत्वाची जबाबदारी पार पाडली आहे. जागतिक मानकांशी जुळण्याचा प्रयत्न करनारे क्षेत्र जसे किरकोळ, माहिती तंत्रज्ञान, शिक्षण, बँकिंग, पर्यटन आणि इतर क्षेत्र जसे भारतातील शहरी भागात प्रत्येकात विकास सुनिश्चित करून बदलणे आणि नेहमी प्रवाहात आणणे आवश्यक आहे,परंतु भारतातिल ग्रामीण भागाबद्दल असे म्हणता येणार नाही. परंतु ही योजना आणण्याची आणि अंमलबजावणी करण्याची अधिकारी याबद्दल अतिशय सावधगिरीने योजना आखत आहेत. भारतातिल ग्रामीण भागाचे उत्थान करने,शिक्षण, पायाभूत सुविधा, बँकिंग, महिलांना सक्षम बनविणे,इत्यादी. बाबींवर जर अधिकाऱ्यांनी ग्रामीण भारतावर अधिक लक्ष केंद्रित केले आणि ते उन्नत करण्याचा प्रयत्न केला तर ग्रामीणअर्थव्यवस्थेच्या एकूण वाढीत व विकासात भारत निश्चितपणे जागतिक पातळीवर आपली भूमिका बजावू शकतो.

**संदर्भ:**

१. ए. अग्रवाल, द निड ऑफ ,फायनानशियल इंक्लुजन विथ अॅन इंडियन परस्पेक्टीव. इकनॉमिक रिसर्च (२००८) पान क्रं. ०१-१०.
२. ए. व्ही. ब्यनर्जी, कॉंट्रॅक्टिंग कोन्स्ट्रैंट्स, क्रेडिट मार्केट अँड इकनॉमिक डेवलपमेंट (२००१).
३. एन. छाब्रा, फायनानशियल इंक्लुजन इन इंडिया, महर्षि दयानंद यूनिवर्सिटी, (२०१५)
४. गोमथी एम., जरनल ऑफ बिसनेस अँड मॅनेजमेंट, आयएसएसएन २३१९-७६६८, खंड १७ पान क्रं ०६-११.
५. एस. महेंद्र देव,फायनानशियल इंक्लुजन: इश्यूज अँड चालेंजेस, इकनॉमिक अँड पोलिटिकल विकली, खंड ४१ पान क्रं ४३१०-४३१३.
६. भूमिका गर्ग, फायनानशियल इंक्लुजन अँड रूरल डेवलपमेंट, रिसर्च जर्नल जर्नल ऑफ कॉमर्स आयएसएसएन २३४८-०९५५ खंड ०२, २०१४.
७. टीना सचदेव,फायनानशियल इंक्लुजन: अ डिटरमिनंट फॉर विलेज डेवलपमेंट, इंटरनॅशनल जर्नल ऑफ मॅनेजमेंट स्टडीज, आयएसएसएन २२४९-०३०२, खंड ०५, जानेवारी २०१५.

'Journal of Research & Development' A Multidisciplinary International Level Referred and Peer Reviewed Journal, Impact Factor-7.265, ISSN: 2230-9578, 30 October2021, Volume-12, Issue-15
Agriculture and Rural Development: Strategic Issues and Reform Options

# भंडारा जिल्ह्यातील कृषी व बदलते पीक प्रारूप

**डॉ. अरुणा बावनकर**
भूगोल विभाग प्रमुख एस. एन. मोर महाविद्यालय, तुमसर
Email :- abawankar1980@gmail.com

**प्रस्तावना :**

भारत हा कृषिप्रधान देश असून बहुतांश लोक ग्रामीण भागात राहून शेती करतात. त्यामुळे ग्रामीण भागाचा विकास म्हणजे संपूर्ण देशाचा विकास होय. याकरिता शेती व्यवसायातील पिकांकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. भारतात शेतीकडे केवळ उदरनिर्वाहाचे साधन म्हणून बघितले जाते. पण मानवाला सर्वांगीण विकास साधायचा असेल तर केवळ उदरनिर्वाहाची शेती हा आपला मुख्य उद्देश न बाळगता वाढत्या लोकसंख्येच्या तुलनेने त्यांना पुरेल एवढे अन्न व पीक उत्पन्न देणारी पिके घेणे अत्यावश्यक आहे. त्यामुळेच शेतीत होणारे बदल अभ्यासणे अत्यंत महत्त्वाचे आहे. आजच्या आधुनिक जगात मानवाने अनेक नवनवीन शोध लावले. आज शेतकरी आपल्या शेतातही वेगवेगळे प्रयोग करू लागला आहे. पूर्वीच्या पीक प्रारूपामध्ये अनेक बदल झालेले आहे.

**अभ्यासक्षेत्र :**

प्रस्तुत शोधनिबंध महाराष्ट्रातील भंडारा जिल्ह्याशी संबंधित आहे. महाराष्ट्र राज्याच्या पूर्व भागात, सातपुडा पर्वताच्या पायथ्याशी, वैनगंगा नदीच्या खो-यात वसलेला भंडारा जिल्हा सामाजिक व आर्थिक विविधतेने नटलेला आहे.भंडारा जिल्ह्याचा अक्षवृत्तीय विस्तार २०° ३९' ते २१° ३६' उत्तर व रेखावृत्तीय विस्तार ७९° ४५' पूर्व ते ८०° ३०° पूर्व असून जिल्ह्याचे क्षेत्रफळ ४,०८७ चौ.कि.मी. आहे. जिल्ह्याची उत्तर-दक्षिण लांबी १०३ कि.मी. व पूर्व-पश्चिम लांबी ४५ कि.मी. आहे.भंडारा जिल्ह्याच्या उत्तर सीमेला लागून मध्यप्रदेशातील शिवणी जिल्हा, दक्षिणेस चंद्रपूर जिल्हा, पूर्वेस गोंदिया व पश्चिमेस नागपूर जिल्हा आहे. अभ्यास क्षेत्रात काळी, कन्यार, सिहार, मोराड व भराडी प्रकारची मुद्रा आढळते. वैनगंगा नदी ही प्रमुख नदी असून तिच्या प्रवाहाची जिल्ह्यातील लांबी २०० कि.मी. आहे. जिल्ह्यातील २०११ च्या जनगणनेनुसार १२,००,३३४ एवढी लोकसंख्या आहे. हा जिल्हा तलावांचा जिल्हा म्हणून ओळखला जातो.

**अभ्यासाच्या उद्देश :**

प्रस्तुत संशोधनात भंडारा जिल्ह्यातील आधुनिक काळातील भूमी उपयोजन, जलसिंचन व कृषी पीक प्रारूपात झालेला बदल कशा स्वरूपाचा आहे, हे पडताळून पाहणे या अभ्यासाचा मुख्य उद्देश आहे.

**संशोधन पद्धती व माहिती संकलन :**

प्रस्तुत शोध निबंधाकरीता आवश्यक असणारी सांख्यिकीय माहिती सामाजिक व आर्थिक समालोचन मधून घेतलेली आहे. द्वितीयक स्वरूपाच्या आकडेवारीचा वापर केलेला आहे.

**एकूण लागवडीखालील क्षेत्र भूमी :**

भंडारा जिल्ह्यातील भूमी उपयोजनामध्ये निव्वळ लागवडीखालील क्षेत्रामध्ये कसे बदल होत गेले ते खालील तक्त्यावरून स्पष्ट होते. पवनी तालुक्यात १९९१ नुसार सर्वात अधिक जमिन नवीन पिकांखाली होती. कारण या तालुक्यांमध्ये चौरस क्षेत्राची सुपिकता महत्त्वपूर्ण आहे. त्यानंतर गोसेखुर्द प्रकल्पामध्ये बरेच मोठे क्षेत्र गेलेले आहे. वर्ष २०१३ मध्ये लागवडीखालील क्षेत्रात कमी वाढ झालेली आढळते. निव्वळ पिकांखालील क्षेत्रांमध्ये लाखांदूर तहसील मध्ये वर्ष २०१३ ला सर्वाधिक क्षेत्र १७.२५ टक्के त्याखालोखाल पवनी तालुक्यात १६.९० असून सर्वात कमी क्षेत्र साकोली तालुक्यामध्ये फक्त ९.२२ आढळते. याचे कारण जंगलव्याप्त क्षेत्र व आधुनिक तंत्रज्ञानाचा अभाव हे होय. १९९१ च्या तुलनेत जिल्ह्यातील लागवडीखालील क्षेत्र हे २००१ पर्यंत कमी झाले व २०१३ पर्यंत या क्षेत्रात वाढ झालेली आढळते. कारण जलसिंचनाच्या सोयी व आधुनिक तंत्रज्ञानाचा दिवसेंदिवस झालेला विकास हा होय.

सारणी क्र. १

एकूण लागवडीखालील क्षेत्र (हेक्टरमध्ये)

| अ. | वर्ष | १९९१ | २००१ | २००८ | २०१३-१४ |
|---|---|---|---|---|---|

| क्र. | तालुका | क्षेत्रफळ | टक्केवारी | क्षेत्रफळ | टक्केवारी | क्षेत्रफळ | टक्केवारी | क्षेत्रफळ | टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | तुमसर | ३६७०० | १४.१५ | ३०१०० | १३.१८ | ३२३८७ | १३.७३ | ४१७२४ | १५.३८ |
| २ | मोहाडी | ३९८०० | १५.३४ | ४४२०० | १९.३६ | ४६२५३ | १८.१८ | ४४५१९ | १६.४१ |
| ३ | भंडारा | ३७९०० | १४.६१ | ३९७०० | १७.३८ | ३९१९७ | १५.१४ | ३९७०३ | १४.६३ |
| ४ | साकोली | ४७१०० | १८.१६ | २८२०० | १२.३४ | २७०८७ | १०.६५ | २५०२१ | ९.२२ |
| ५ | लाखनी | - | - | - | - | २९२५३ | ११.५० | २७५७० | १०.१६ |
| ६ | पवनी | ५१४०० | १९.८२ | ४१००० | १७.९५ | ३८२२७ | १५.०३ | ४५८६० | १६.९० |
| ७ | लाखांदूर | ४६४०० | १७.७९ | ४५१०० | १९.७५ | ४१९१३ | १६.४८ | ४६८०८ | १७.२५ |
| | जिल्हा | २५९३०० | - | २२८३०० | - | २५४३१७ | - | २७१२०६ | - |

आधार : भंडारा जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन वर्ष १९९१, २००१, २०११ व २०१३-१४

**भंडारा जिल्ह्यातील जलसिंचन स्त्रोत :**

भंडारा जिल्ह्यातील जलसिंचनाच्या स्त्रोतामध्ये सर्वात मोठा प्रकल्प पवनी तालुक्यात गोसेखुर्द व तुमसर तालुक्यातील बावनथडी येथे आढळून येते. मध्यम प्रकारचे प्रकल्प जिल्ह्यात तुमसर तालुक्यात चांदपुर व बघेडा, मोहाडी तालुक्यात सोरणा, बेटेकर येथे आढळून येते. तर जिल्ह्यात बंधा-यांची संख्या २५८ असून सर्वाधिक साकोली तालुक्यात ४८ तर सर्वात कमी लाखांदूर तालुक्यात आढळतात. जिल्ह्यात उपसा सिंचन प्रकल्प फक्त भंडारा तालुक्यात टेकेपार येथे एकमेव आढळून येते. तर जिल्ह्यात तलावांची संख्या २१४ असून सर्वाधिक पवनी तालुक्यात ४३ एवढे तर सर्वात कमी लाखांदूर तालुक्यात १० एवढे दिसून येते. जिल्ह्यात सिंचन विहिरी संख्या सर्वात जास्त आढळते. भंडारा जिल्ह्याच्या ओलिताखालील क्षेत्रात झालेली वाढ लक्षात घेण्यासाठी सन २००१ ते २०११ या दशकातील शेतजमिनीचा विचार केला आहे. २००१ मध्ये ओलिताखालील क्षेत्र १,०६,२६८ हेक्टर आर. एवढे होते. ते २०११ यावर्षी १६,६६० हेक्टर आर. ने वाढून १,२२,९२८ हेक्टर आर. एवढे झाले. म्हणजे जिल्ह्यात ओलिताखालील क्षेत्रात वाढ झालेली दिसून येते.

सारणी क्र. २

भंडारा जिल्ह्यातील जलसिंचन स्त्रोत २००१ ते २०११

| अ. क्र. | तालुके | सिंचनाचे स्त्रोत | | | | | | ओलिताखालील क्षेत्र (हे.आर.) | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | मोठे प्रकल्प | मध्यम प्रकल्प | तलाव | बंधारे | उपसा सिंचन | सिंचन विहिरी २००१ | संचन विहिरी २०११ | ओलीता चे क्षेत्र २००१ | ओलीता चे क्षेत्र २०११ | मागील १० वर्षात सिंचन क्षेत्रात झालेली वाढ टक्केवारी |
| १ | तुमसर | बाव-नथडी | चांदपूर बघेडा | २७ | ४७ | - | २४८५ | ३२८५ | १७२७० | १७२५० | ०.१२ |
| २ | मोहाडी | - | सोरणा बेटेकर | ३१ | ४२ | - | २६७८ | २४६२ | २१९५१ | २५२०६ | १४.८२ |
| ३ | भंडारा | - | - | ३६ | ४५ | टेकेपार | १५६५ | १६५१ | १५७२४ | १८७२७ | १९.०९ |
| ४ | साकोली | - | - | ३१ | ४८ | - | ११६१ | १९८३ | १३१३३ | १४३७७ | ९.४७ |
| ५ | लाखनी | - | - | ३६ | ३३ | - | १८४० | २०६८ | १०२७८ | ११५७७ | १२.६४ |
| ६ | पवनी | गोसेखुर्द | - | ४३ | ३१ | - | ३१८२ | ४५६३ | १६४१० | १५४९० | -५.६० |
| ७ | लाखांदूर | - | - | १० | १२ | - | ३१४० | ३३०७ | ११५०२ | २०३०१ | ७६.४९ |

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | जिल्हा | ०२ | ०४ | २१४ | २५८ | ०१ | १५०५१ | १९२९९ | १०६२६८ | १२२९२८ | १५.६८ |

आधार – भंडारा जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन वर्ष २००१ व २०११

**भंडारा जिल्ह्यातील पिक प्रारूपात झालेला बदल :**

भंडारा जिल्ह्यातील विविध पिकांखालील क्षेत्रास २०००-०१ मध्ये जलसिंचना मुळे जिल्ह्याच्या कृषी पीक प्रारूपात झालेला बदल पुढील सारणीत दिलेला आहे.

सारणी क्र. ३.१

भंडारा जिल्ह्यातील विविध पिकांखालील क्षेत्र २०००-०१ (हेक्टरमध्ये)

| अ. क्र. | तालुका | तांदूळ | गहू | ज्वारी | मका | हरभरा | तूर | जवस | इतर | एकूण | ओलीताखालील क्षेत्र (हे.आर. मध्ये) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | तुमसर | २१४१२ | १८२५ | ३७ | ८७ | ८८८ | ८४५ | ८१५ | ३९९८ | २९९०७ | १७२७० |
| २ | मोहाडी | २०८१५ | ३५३५ | १५९ | - | १३६५ | ६४५ | १२७५ | १५४०८ | ४३२०२ | २१९५१ |
| ३ | भंडारा | २२८५० | ४९५० | ३३५ | - | १५१८ | १२१५ | ८१० | ८००७ | ३९६८५ | १५७२४ |
| ४ | साकोली | २०९०० | १३४७ | - | - | ४७४ | ४७५ | १६४५ | १३३४१ | ३८१८२ | १३१३३ |
| ५ | लाखनी | ५५९० | २३४० | - | - | २६० | ४३० | - | १३७२० | २२३४० | १०२७८ |
| ६ | पवनी | १६४०४ | २५३२ | ११४ | - | १११० | ९२३ | १३७८ | १८५४८ | ४१००९ | १६४१० |
| ७ | लाखांदूर | ३७३३९ | १८८७ | ४१७ | - | ७९३ | ६९० | ८२५ | ३१२४ | ४५०७० | ११५०२ |
| | जिल्हा | १४५३०५ | १८४१६ | १०६२ | ८७ | ६४०८ | ५२२३ | ६७४८ | ७६१४६ | २५९३९५ | १०६२६८ |

आधार – भंडारा जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन वर्ष २०००-२००१ भंडारा जिल्हा सांख्यिकी विभाग वर्ष २०००-२००१

इसवी सन २००१ नुसार जिल्ह्यात एकूण लागवडीखालील क्षेत्र २,५९,३९५ हेक्टर आर. एवढे होते. त्यापैकी १,०६,२६८ हेक्टर आर. क्षेत्र ओलिताखाली होते. यावर्षी मोहाडी तालुक्यात जलसिंचनाच्या सुविधा सर्वाधिक २१,९५१ हेक्टर आर. क्षेत्र ओलिताखाली होते. तर सर्वात कमी क्षेत्र लाखनी तालुक्यात १०,२७८ हेक्टर आर. एवढे होते.जिल्ह्यातील लागवडीखालील पिकांचा विचार केल्यास तांदूळ पिकांखालील क्षेत्र १,४५,३०५, हेक्टर आर., गहू १८,४१६ हेक्टर आर., ज्वारी १,०६२ हेक्टर आर., मका ८७ हेक्टर आर., हरभरा ६,४०८ हेक्टर आर., तूर ५,२२३ हेक्टर आर., जवस ६,७४७ हेक्टर आर. व इतर पिके यात भाजीपाला पिकांचा समावेश होऊन ते ७६,१४६ हेक्टर आर. लागवडीखाली होते. इतर पिकांमध्ये उडीद, मूंग, वटाणा, सोयाबीन, लाखोरी इत्यादी पिकांचा समावेश केलेला आहे. (सारणी क्र. ३.२)

सारणी क्र. ३.२

निरनिराळ्या पिकांखालील क्षेत्र २०१३-१४

| अ. क्र. | तालुका | खरीप तांदूळ | रब्बी विविध प्रकारची पिके | | | | | | | लागवडीखालील एकूण क्षेत्र | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | गहू | ज्वारी | मका | हरभरा | तूर | उस | इतर पिके | एकूण पिकांखालील क्षेत्र | ओलीताचे क्षेत्र |
| १ | तुमसर | ३३६८६ | १८४० | ०० | ५१ | ९९१ | ९२६ | ८३३ | ४४४ | ४०८८६ | १७५५० |
| २ | मोहाडी | ३१०८८ | २५२७ | ०० | ०० | १०४८ | ७५३ | ६५५ | १७७४ | ४३९४८ | २८६४७ |
| ३ | भंडारा | २५५७० | ३७३७ | ०० | ०० | १५२९ | ८८८ | २४३ | २०९ | ३७२४२ | २४४७५ |
| ४ | साकोली | १९०९४ | ४२२ | ०० | ०० | ५५४ | ०० | ११३० | १२८ | २४०३९ | १६८१० |
| ५ | लाखनी | १९०६९ | ६४५ | ०० | ०० | ५७४ | ७०० | १९७ | १४ | २६३०६ | १३०४५ |

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ६ | पवनी | २८०१० | २६८४ | २० | ३९४ | १५९० | १००० | ८८५ | ९८५ | ४२८८४ | १७८९९ |
| ७ | लाखांदूर | ३२२५२ | ८९७ | ०० | ०० | ८२९ | ७०२ | ८३९ | ८३९ | ४६३१८ | २२४१५ |
| | जिल्हा | १८८७७१ | १२७५४ | २० | ४४५ | ७११७ | ४९७० | ४७८३ | ३९७३ | २६१६२६ | १४०८४३ |

आधार – भंडारा जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन वर्ष २०००-२००१

भंडारा जिल्हा सांखिकी विभाग वर्ष २०००-२००१

२०१३-१४ नुसार जिल्ह्यात एकूण लागवडीखालील क्षेत्र २,६१,६२६ हेक्टर आर. एवढे होते. हे क्षेत्र २००१ च्या तुलनेत वाढलेले आढळून येते. यापैकी १,४०,८४३ हेक्टर आर. क्षेत्र ओलिताखाली आहे. म्हणजेच या २००१ च्या तुलनेत सिंचन क्षेत्रात वाढ झालेली दिसून येते. २०१३-१४ या वर्षात जिल्ह्यात मोहाडी तालुक्यात सिंचनाचे क्षेत्र २८,६४७ हेक्टर आर. सर्वाधिक आढळून येते तर सर्वात कमी ओलिताचे क्षेत्र लाखनी तालुक्यात १३,०४५ हेक्टर आर. एवढे दिसून येते.जिल्ह्यातील लागवडीखालील पिकांचा विचार केल्यास तांदूळ पिकाखालील क्षेत्र १,८८,७७१ हेक्टर आर., गहू पिकांखालील क्षेत्र १२,७५४ हेक्टर आर., ज्वारी पिकांखालील क्षेत्र २० हेक्टर आर., मका पिकांखालील क्षेत्र हेक्टर ४४५ हेक्टर आर., हरभरा पिकांखालील क्षेत्र ७,११७ हेक्टर आर., तूर पिकांखालील क्षेत्र ४,९७० हेक्टर आर., ऊस पिकांखालील क्षेत्र ४७८ हेक्टर आर. व इतर पिकांखालील क्षेत्र ३३,९७३ हेक्टर आर. क्षेत्र विविध पिकांच्या लागवडीखालील होते.या वर्षात जिल्ह्यात सिंचनाच्या सुविधा वाढल्याने कोरडवाहू पारंपरिक पिके कमी होऊन त्याऐवजी सिंचनावर होणार आहे नगदी पिके घेतली जाऊ लागली. यात जुनी पिके, जवस, बाजरी, ज्वारी, नाचनी, मूग, उडीद या सारखी पिके लोप पावून सिंचनावर येणारी दोबार पिके धान, उस, भाजीपाला, मसाल्याची पिके, हळद, मिरची, गळिताची पिके, फळबागा, सोयाबीन यासारख्या नवनवीन रोखीच्या पिकांच्या लागवड क्षेत्रात वाढ झालेली दिसून येते.

**निष्कर्ष व उपाययोजना :**

जिल्ह्यातील लागवडीखालील पीक क्षेत्रात वाढ दिसून येते. तसेच जलसिंचित क्षेत्रातदेखील वृद्धी झालेली आहे. वाढत्या लोकसंख्येच्या अन्नाची मागणी पूर्ण करण्याकरिता मर्यादीत क्षेत्रातून जलसिंचनाच्या सुविधा व आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून मर्यादित क्षेत्रातून जास्तीत जास्त उत्पादन काढणे सहज शक्य आहे. त्यामुळे जलसिंचनाच्या विविध स्त्रोतांमध्ये सातत्याने वाढ होत आहे व पीक प्रारूपांमध्ये आधुनिक तंत्रज्ञानामुळे दिवसेंदिवस बदल होत आहे.

**उपाययोजना :**

१) पडीत असलेल्या क्षेत्राचा वापर करून ते क्षेत्र कृषी खाली आणण्याचा प्रयत्न केला गेला पाहिजे.

२) कृषी क्षमता वाढविण्यासाठी जलसिंचनाच्या सोयीचा योग्य वापर केला पाहिजे.

३) शेतीविषयक माहिती व शासकीय शेती विषयक योजना सर्व नागरिकांपर्यंत पोहोचविणे.

४) वाढते जलसिंचनामुळे शेतीत नगदी उत्पन्न देणारी पिके घेतली जातील. त्यामुळे कृषी पीक प्रारूपात बदल घडून येईल. तसेच शेतक-यांची आर्थिक स्थिती सुधारून शेतक-यांचा राहणीमानाचा दर्जा उंचावण्यास मदत होईल.

**संदर्भग्रंथ :**

१) जिल्हा आर्थिक व सामाजिक समालोचन, भंडारा १९९१, २००१, २०११, २०१८.

२) प्रा. के. ए. खतीब, "भारताचा कृषी भूगोल".

३) प्रा. दिनेश नखाते, "भंडारा जिल्हा गौरव".

४) राजेश शुक्ल, "कृषी भूगोल"

५) https://bhandara.gov.in

# मराठी साहित्यातील कृषिनिष्ठ जीवन

**डॉ.माधव मारुती भोसले**

तुकाराम कृष्णाजी कोलेकर कला आणि वाणिज्य महाविद्यालय नेसरी

भारतीय खेड्यांची रचना समाज; समाजव्यवस्था बघितली की या जगण्याचे वेगळेपण लक्षात येते. ती पुष्कळशी स्वतंत्र स्वयंपूर्ण आणि वैशिष्ट्यपूर्ण अशी आहे. युगा युगा पासून चालत आलेल्या रचनेमुळे माणसाच्या जगण्याची एक विशिष्ट रीत येथे साकार होत असलेली दिसते. ग्रामीण भागामध्ये काळी आणि पांढरी असे दोन शब्द जुन्या काळापासून प्रचलित असलेले दिसतात. काळी म्हणजे काळी भूमी आणि या भूमीच्या दृष्टीने शेतीच्या दृष्टीने पांढरी ची उभारणी होत असते. या पांढरी मधील कोणते घर कोठे असावे ? मंदिर कोठे असावे ? पाटलाचे घर कुठे असावे? हेही ठरवलेले असते. अशा प्रकारचे ग्राम रचनेचे आठ प्रकार असल्याची नोंद सापडते. आपला देश खेड्यांचा आहे म्हणून या देशातील बहुसंख्य जनता ही खेड्यातून राहणारी आहे.या खेड्यातील लोकांचा मुख्य व्यवसाय शेती आहे आणि शेतीला पूरक असे व्यवसाय तेथे चालतात.कृषीनिष्ट जीवनाशी अस्तित्वात येणारी आणि गाव गाड्यांमध्ये जमीन कसणारा कारू नारू हे घटक महत्त्वाचे होते. ग्रामीण तिची संकल्पना समजून घेण्यासाठी ग्रामसंस्कृती अस्तित्वात आली. बुद्धिनिष्ठ दृष्टी आणि प्रत्यक्ष अनुभवांचा आधार इथल्या गद्याला लाभल्याने ते अधिकच परिणामकारक झाले आहे. शेतकऱ्याला समजून घेण्यासाठी अधिका अधिक प्रयत्न असला तरी ग्रामीण विभागातील इतर घटकांनाही लेखकाने सामावून घेतलेले दिसते. शेती हे जर ग्रामीण विभागाचे प्रमुख वैशिष्ट्य असेल तर शेतीला पूरक होईल खंडणे म्हणजे जमीन कसणे हे सूत्र आपल्याला दिसते.

ग्रामीण समाजातील एकात्मतेचा अभाव, सामाजिक प्रेरणेचा अभाव ही ग्रामीण साहित्याची प्रमुख अडचण होय. अस्सल ग्रामीण समाज म्हणजे कृषिनिष्ठ समाज होय. सामुदायिक उत्पादन समाज उपभोग या तत्त्वावर चालणाऱ्या प्राचीन गणराज याप्रमाणे या समाजाच्या मूळ मानसिक प्रकृत्तीची जडणघडण झालेली या समाजात आज दिसून येते. कृषिनिष्ठ माणसे म्हणजे केवळ काळया आईची लेकरे असतात. मातृऋण आत्मसात करून ती आपल्या धरणी मातेची सेवा करतात. पृथ्वीची रूपे अनेक फुलपाखरांच्या मुक्त मोहक रुपासून ते अथांग महासागरा पर्यन्त अनेक रूपामध्ये वावरते.पृथ्वी म्हणजे क्षमाशीलता विशालहृदयी.धारक व पोषक आदिमाता हे धरातत्त्व म्हणजे कृषीतत्व होय.कृषीशी संबंधित इतर सर्व उपक्रमाशी व एकूण कृषक समाजाच्या सामाजिक अंगाशी जैव पद्धतीने जोडले गेलेले सुतार लोहार कुंभार बुरुड महार मांग चांभार दहावी शिंपी सोनार या सारखे समाज विभाग हे सुद्धा कृषिनिष्ठ समाज होत. ही सर्व मंडळी बिकटकृषीची कामे करतात. आपापल्या व्यवसायाबरोबर शेतीची सुद्धा कामे करताना आढळतात म्हणून हीसुद्धा कृषिनिष्ठ होय

अगदी सुरुवातीच्या काळामध्ये महात्मा फुले यांच्या साहित्यातून सुद्धा कृषिनिष्ठ जीवन आपल्याला पाहावयास मिळते. या दृष्टीने महात्मा फुले यांच्या 'गुलामगिरी' व 'शेतकऱ्याचा आसूड' या ग्रंथाचा विशेष उल्लेख करावासा वाटतो. त्यांनी या आपल्या महत्त्वाच्या ग्रंथातून शेतकऱ्यासंबंधी काही एक मूलगामी विचार मांडण्याचा प्रयत्न केला आहे. महात्मा फुले यांनी आपल्या 'तृतीय रत्न' या नाटकातून शेतकऱ्या संबंधी अत्यंत महत्त्वाचे विचार मांडले आहेत. महात्मा फुले यांचे लेखन म्हणजे ग्रामीण साहित्याचा पहिलावहिला सशक्त आविष्कार होय. महात्मा फुले यांची या लेखनातून शेतकऱ्या विषयीची तळमळ दिसून येते शेतकऱ्याची पत्नी, शेतात राबणारी स्त्री किती अपरिमित कष्ट करते त्याचे त्यांनी अत्यंत सोप्या सरळ भाषेत अत्यंत

परिणामकारक चित्र रेखाटलेले आहे. महात्मा फुले यांनी ही जाणीव जागृती केली आहे जी जीवनदृष्टी दिली आहे त्याचे परिणाम नंतरच्या काळात मराठी साहित्यामध्ये उमटलेले दिसतात. एकोणिसाव्या शतकात होऊन गेलेल्या मराठी प्रबोधनकारामध्ये महात्मा फुले यांचे स्थान अनेक कारणांनी अनन्य साधारण आहे. ते फक्त प्रबोधनकार नव्हते तर त्यांनी समाजक्रांती करण्याचे फार मोठे धाडस त्याकाळी केले होते. आपली वाणी लेखणी आणि कृती याद्वारे त्यांनी शेतकरी, शूद्रातिशूद्रांच्या दास्य विमोचनासाठी अविरतपणे कार्य केले. 'गुलामगिरी' या ग्रंथात महात्मा फुले लिहितात, आमचे दयाळू इंग्रज सरकार आज शूद्रातिशूद्रांना लोका पासून काय काय जुलूम सहन करावे लागले आहेत व हल्ली ही सहन करावे लागत आहेत याच विषयी मुळीच माहिती नाही ते जर या विषयी चौकशी करून आपणास माहीत करून घेतील तर त्यास असे कळेल की आम्ही जे जे हिंदुस्थानचा इतिहास लिहिले त्यातील हा एक मोठा अतिमहत्वाचा भाग गाळला त्यांना अभिप्रेत असलेला हा इतिहास कोणता आहे? आर्य आक्रमकांनी येथील बळीराजाला व त्याच्या प्रजेला छळल्याचा व व त्याच्यावर लादलेल्या शारीरिक व मानसिक गुलामगिरीचा इतिहास त्यांना अभिप्रेत आहे. म्हणूनच प्रत्येक वेळी समाजाला आपल्या देशाचा हा इतिहास ध्यानात घ्या म्हणून आवाहन करताना दिसतात.आणि या प्रेरणेतूनच पुढील वांडमंय निर्मिती झाल्याचे दिसून येते.कृष्णराव भालेकर यांची बळीबा पाटील ही कादंबरी त्याचाच भाग म्हणून येते. या कादंबरीला एक प्रकारे रूपक कथेची चौकट आहे. यातील प्रत्येक घटक आणि व्यक्ती प्रतीकात्मक स्वरूपाची असून त्या सर्वांना प्रत्येक घटक व व्यक्तीला विशिष्ट असा अर्थ आहे. बळीबा त्याचे गाव कुटाळ आहे तालुका उदास जिल्हा कष्टपूर इलाखा अज्ञान याचा असा वैशिष्ट्यपूर्ण अर्थ आहे. भालेकरनी ही कादंबरी लिहिली त्या काळात अशाप्रकारे संवादात्मक स्वरूपाच्या ग्रंथ लेखनाची पद्धत रूढ होती अशा पद्धतीमुळे वाचकांना अधिक विश्वासात घेता येते व प्रतिपाद्य विषयाचे नीट विश्लेषण करता येते. या कादंबरीतील तात्विक चर्चा हा महत्त्वाचा भाग आहे. खेडे खेड्यातील लोक त्यांची वेशभूषा धंदा व्यवसाय त्यांचे रीतीरिवाज सणवार मानपान विषयक समज त्यांची घरे खेड्याचा परिसर यांचे दर्शन या कादंबरीत घडवले आहे व खेडे व शहर यात असणारा फरक ही येथे स्पष्ट होताना दिसतो.

अव्वल इंग्रजी काळापासून विचार केला तर मराठी साहित्याच्या समाजाभिमुखतेला अनुकूल पार्श्वभूमी सापडते. कृष्णराव भालेकर यांची 'बळीबा पाटील' ह. ना. आपटे यांची 'काळ तर मोठा कठीण आला' ,'सह्याद्रीच्या पायथ्याशी', र. वा. दिघे 'पानकळा' ,'रथचक्र' 'पाचोळा' 'गोतावळा' अशा अनेक कादंबऱ्या मधून मराठी साहित्यातील कृषिनिष्ठ जीवन चित्रित झालेले दिसून येते.

1945 नंतरचा काळ ग्रामीण साहित्याच्या दृष्टीने प्रयोगशीलतेचा आणि संक्रमणाचा काळ आहे. तत्कालीन नवकथा व नवकविता मराठी साहित्याला वास्तवाभिमुख बनविते. व्यंकटेश माडगूळकर, द .मा. मिरासदार, रणजित देसाई, शंकर पाटील यासारखे नवोदित लेखक यांनी कृषिकर्म व ग्रामीण जीवनाचे चित्रण केले. आपल्या साहित्यातून ते रेखाटलेले आहे. प्रयोगशीलता व मनोविश्लेषण इत्यादी बाबीने नव कादंबरीकार वास्तवाचा खूप जवळ पोहोचले. मराठी साहित्यातील कृषीनिष्ठा आणि ग्रामनिष्टता अधिक वास्तववादी रूप साकारू लागली. 'फकीरा', ' इंधन', 'टारफुला' आणि 'माणूस' या महत्त्वाच्या कादंबऱ्या पुढे आलेल्या दिसतात. या कादंबऱ्यांतून ग्रामव्यवस्थेची एकूण रचना त्यातून निर्माण झालेले ताणतणाव आणि बदलत्या अर्थव्यवस्थेने विसरून गेलेले ग्रामजीवन यांचे अतिशय मार्मिकपणे चित्रण होताना दिसते. आधुनिकीकरण व नव्याने आलेले राजकारण ग्रामीण जीवनाची घडी कशी विस्कटून टाकते परिणामी त्यातून दुःख

कसे निर्माण होते याचे चांगले चित्रण कादंबरीतून होताना दिसते. उद्धव शेळके, मनोहर तल्हार, यानंतर लिहू लागले त्यामध्ये आनंद यादव, बोराडे, बाजीराव पाटील यांचा उल्लेख करावा लागतो. स्वातंत्रोत्तर ग्रामीण भाग बदलू लागला या बदलाचा पायरव माडगूळकर, शंकर पाटील, आनंद यादव, बोराडे यांच्या कादंबरीत प्रकर्षाने जाणवताना दिसतो प्रत्यक्ष शेतात राबणारा आणि ग्रामीण जीवनातील ताण-तणावांचा नित्य अनुभव घेणारा नवीन कवी वर्ग या काळात उदयाला आला. या कवींनी देखील आपल्या काव्यातून कृषिनिष्ठ जाणिवा मांडायला सुरुवात केली. ग्रामीण लेखक या दृष्टिकोनातून निरीक्षण करून बदलत्या जीवनाचे चित्र त्यांनी आपल्या साहित्यामध्ये उमटवले.

ट्रॅक्टर, कापणी यंत्रे, फवारणी यंत्र, पेरणी यंत्र आता खेड्यापाड्यात येऊन पोहोचली आहेत. संगणक आणि इंटरनेट शेतात शेताच्या बांधावर आले आहे. संगणकावरून आणि इंटरनेटवरून काय करायचे कधी करायचे कोणती पिके घ्यायची कोणती पिके घ्यायची नाहीत कोणती खते वापरायची इत्यादी माहिती शेतकऱ्यांना दिली जाईल. त्यामुळे शेतकऱ्यांचे काम उत्पादन वाढेल असे सगळे असले तरी शेती शेतकरी यांचे नाते कसे राहील याचेही चित्रण तुरळक पद्धतीने साहित्यामध्ये आलेले दिसते. आजपर्यंत शेतकरी आपल्या शेतीकडे आई म्हणून पाहत होता लक्ष्मी म्हणून पाहत होता. उद्या शेतीशी असणारे भावबंध संपतील काय? निसर्गाशी असणारे त्याचे भाव कोणत्या स्वरूपातील असतील? हे खरोखर चिंतनीय प्रश्न आहे. आनंद यादव यांची गोतावळा कादंबरी ट्रॅक्टरच्या प्रवेशामुळे द्ध्वस्त होणाऱ्या नारबाची जीवन चित्रित करते. आता ट्रॅक्टर नव्या युगाचा प्रतिनिधी म्हणून त्याच्याकडे पाहायचे की बळी जाणाऱ्या बाबीचा संदर्भात विचार करायचा हा खरा प्रश्न आहे. आनंद यादव या प्रश्नांच्या संदर्भात एक निर्णय घेतला आहे. आपल्याला मान्य असो की नसो हळहळ व्यक्त होणे हे स्वाभाविक आहे असे म्हणता येत नाही नारबाचे जीवन नव्या आधुनिकीकरणाने उध्वस्त होते नारबाला ट्रॅक्टर येणे नको वाटते हे वास्तव आहे. त्याच प्रमाणे पाचोळा या कादंबरी मधून आणखीन एक वास्तव प्रकट झालेली दिसते. गंगाराम नव्या फॅशनच्या शिवणकाम शिकण्याचा ध्यास ध्यास घेतो आणि संपतो म्हणून ट्रॅक्टरला विरोध केला तरी दुःख टळत नाही आणि नव्या सुधारणांना सामोरे गेले तरी दुःख संपत नाही अशी परिस्थिती आहे. याचा अर्थ याचा अर्थ असा की, या येणाऱ्या नव्या गोष्टी स्वीकाराव्या लागणार आणि काळाच्या रेट्यामुळे स्वीकारल्या जातील परंतु आपल्या भुमीकडे पाहण्याचा पारंपारिक दृष्टिकोण जो हजारो वर्षे या देशातल्या शेतकऱ्याला आधार देणारा होता तो नष्ट होणार आहे.

स्वातंत्र्योत्तर काळात औद्योगिकरणामुळे शेतीकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलला आधुनिक सुधारणांचा व विचारांचा प्रसार सहकार क्षेत्र उद्योगधंदे या विषयीचे प्रश्न इत्यादी नवनवीन प्रश्न साहित्यातून उमटवू लागले. पाण्याचा प्रश्न, धरणग्रस्तांचा प्रश्न, विश्व वाढत्या शहरीकरणामुळे शेत जमिनीचा होत चाललेला ऱ्हास, ऊसतोड कामगारांची दुरावस्था इत्यादी प्रश्न मराठी साहित्यातून प्रकर्षाने येऊ लागले. आणि यातूनच उसवलेला 'माणूस' 'आलेख', 'कुस्ती', 'गर्भ', 'गणगोत', 'कावड', 'मातीचे पाय', 'गोसावी', 'कोंडी', 'आभाळ' इत्यादी कादंबरीचा जन्म झालेला दिसतो. सदानंद देशमुख यांच्या 'तहान' व 'बारोमास' या कादंबरी मधून तरी ग्रामीण वास्तव जीवनाच्या अनेक बाजूणा स्पर्श केला आहे. शिकूनही दारिद्र्य आणि बेकारी यामुळे अगतिक झालेल्या तरुण पिढीची दिशाहीनता शहरीकरणाच्या संपर्क यामुळे निर्माण झालेला वाढता चंगळवाद, जागतिकीकरणाचे शेतीवर झालेले दुष्परिणाम, बेभरवशाची शेती, सतत भेडसावणारी उद्याची चिंता अशा अनेक गोष्टींमुळे मानवी जीवन उद्ध्वस्त होताना दिसते. आणि म्हणूनच खेड्यापाड्यातील तरुणांचा भुमीकडे बघण्याचा शेतीकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलेला, भुमीकडे तो

एखाद्या कारखान्यासारखा पाहिल. उत्पादन देणारी एक वस्तू म्हणून पाहिल. त्यामुळे त्याचे मातीशी किंबहुना भूमीशी असलेले भाव जातील निसर्गाशी असलेले नाते तुटत जाईल अशी एक चिंता मनात राहून जाते.

**संदर्भ ग्रंथ** :

1. यादव,आनंद:ग्रामीण साहित्य:स्वरूप आणि समस्या,मेहता पब्लिशिंग हाऊस पुणे,आवृत्ती पहिली १९७९
2. कोत्तापल्ले,नागनाथ:ग्रामीण साहित्य:स्वरूप आणि शोध, मेहता पब्लिशिंग हाऊस पुणे,आवृत्ती पहिली १९८५
3. वडेर,प्रल्हाद:आशय आणि अविष्कार, मेहता पब्लिशिंग हाऊस पुणे,आवृत्ती पहिली १९८८
4. कोत्तापल्ले,नागनाथ: गेल्या अर्धशतकातील मराठी कादंबरी [संपा.विलास खोले]लोकावाङ्मय गृह मुंबई,आवृत्ती पहिली ,२००२
5. कुलकर्णी,मधु: महाराष्ट्र साहित्य पत्रिका [ग्रामीण साहित्य विशेषांक जुलै-डिसेंबर१९८०
6. ठाकूर रवींद्र:चर्चा आणि चिकीत्सा, गोदा प्रकाशन, ओरंगाबाद, आवृत्ती पहिली ,२०११
7. मुलाटे वासुदेव : साहित्य: रूप आणि स्वरूप, कैलास पब्लिकेशन, ओरंगाबाद, आवृत्ती पहिली ,२००९

# नांदेड जिल्ह्यातील तेलबिया पीकाचा भौगोलिक अभ्यास

**प्रा.डॉ.यु.एस.कानवटे**

संशोधक व मार्गदर्शक वसंतराव नाईक महाविद्यालय, नांदेड.

**प्रस्तावना :**

भारत हा कृषी प्रधान देश आहे. या देशाची अर्थव्यवस्था सर्वस्वी कृषी क्षेत्राशी निगडीत आहे. परंतु अद्यापही भारतीय अर्थव्यवस्था ही विकसित नसून विकसनशील आहे. कृषी व्यवसाय हा भारतीय अर्थव्यवस्थेचा मुख्य कणा आहे. आजही भारतातील ६७ टक्के लोकांचे उपजिविकेचे साधन शेती आणि शेतीशी निगडीत व्यवसाय आहे. एकूण राष्ट्रीय उत्पन्नात कृषीक्षेत्राचा २३ टक्के वाटा आहे. त्यामुळे भारतात विकासाचा प्रमुख घटक शेती आणि शेतीशी निगडीत उद्योगच आहेत.

जगातील मानवसमुहाची शेती ही महत्वाची अर्थव्यवस्था आहे. सरासरी जगातील ५० टक्के लोक शेती व्यवसायात गुंतलेले आहेत. देशपरत्वे हे प्रमाण बदलते आहे. काही निवडक देशांत उदा.संयुक्त संस्थाने ९%, इंग्लंड ६%, रशिया ५०%, जपान ३६%, प.जर्मनी १०%, फ्रान्स २०%, चीन ७०%, सुदान ८७%, न्युझलँड ९२% तर तुर्कस्थान ७०% शेती करणाऱ्याचे प्रमाण आहे.[१]राष्ट्रकुटांची प्रारंभीक काळातील राजधानी असलेले नांदेड जिल्ह्यातील "कंधार" हे नगर महाराष्ट्रातील प्राचीन नगरांपैकी एक आहे. शेती हाच या काळातील लोकांचा प्रमूख व्यवसाय होय. शेती हेच त्यांच्या उपजिवीकेचे साधन होय. शेती निसर्गावर अवलंबून असली तरी विहीरी, तलाव बांधून शेतीला पाणी पूरवठा केला जाई.[२] राष्ट्रकुट कालखंडात विभिन्न प्रकारची पिके घेतली जात असत. ज्वारी, बाजरी, एरंडी, कापूस, हरभरा, गहु, जवस, तीळ, भूईमुग, हळद पिकांचे उत्पादन घेतले जाई. शेतकऱ्यांना आपल्या शेतातील उत्पन्नाचा दहावा हिस्सा शेतसारा राज्याच्या तिजोरीत भरावा लागे. कंधार येथून नांदेड येथील विद्यार्थ्यांना तेल, मिठ, दुधाचा पुरवठा केला जाई.[३]

प्रस्तुत शोध निबंधात "नांदेड जिल्ह्यातील तेलबिया पिकांचा अभ्यास" यासाठी सन १९९१ ते १९९५ या पाच वर्षाचा कालावधी अभ्यासासाठी निवडलेला आहे. या संशोधन काळात तालुकानिहाय पीक क्षेत्रात व उत्पादनात बदल झालेला असून सन १९९१ ते १९९५ या पाच वर्षात सर्वात जास्त तेलबिया पिकाखालील क्षेत्र सुर्यफुलाचे २७७३ हे. नांदेड तालुक्यात असून त्याखालोखाल सुर्यफुल पिकाचे क्षेत्र २७४७ हे. बिलोली तालुक्यात आढळते. तर भुईमूग पिकाखालील सर्वात जास्त क्षेत्र बिलोली तालुक्यात २४९० हे. व त्याखालोखाल नांदेड तालुक्यात २४६९ हे. असलेले आढळते. गळित तेलबिया उत्पादनाच्या बाबतीत करडाई तेलबियाचे उत्पादन सर्वात जास्त असून ते मुखेड तालुक्यात ५७.२२% आढळते तर त्याखालोखाल देगलूर तालुक्यात ४५.९२% क्रमांक लागतो. उत्पादनाच्या बाबतीत दुसरा क्रमांक भूईमुग पिकाचा असून सर्वात जास्त उत्पादन नांदेड जिल्ह्यात नांदेड तालुक्यात ४०.६% असून त्याखालोखाल सुर्यफुल पिकाचे उत्पादन देगलूर तालुक्यात ३६.३६% आढळते. यावरून असे लक्षात येते की, तालुकानिहाय क्षेत्र व उत्पादनात फरक असलेला दिसून येतो.

**बीज संज्ञा :** क्षेत्र, उत्पादन, गळितधान्य, तेलबिया इत्यादी.

**उद्दिष्टे:**

१) नांदेड जिल्ह्यातील तेलबिया पिकांचा अभ्यास करणे.

२) नांदेड जिल्ह्यातील तालुकानिहाय तेलबियां पिकांचे क्षेत्र व उत्पादनाचा अभ्यास करणे.

३) नांदेड जिल्ह्याच्या विकासात तेलबिया पिकांचे योगदान अभ्यासणे.

**माहिती स्तोत व संशोधन पध्दती :**

प्रस्तुत शोध निबंधासाठी आवश्यक असणारी आकडेवारी ही व्दितीय स्वरूपाची असून ती माहिती नांदेड जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन वर्ष १९९१ ते १९९५ यामधून संकलीत केलेली आहे. प्राप्त माहितीचे सांख्यिकीय पनन करून कोष्टक दर्शविलेले आहे. सदर संशोधनात प्राप्त झालेल्या माहितीची टक्केवारी काढण्यासाठी खालील सुत्राचा वापर करण्यात आलेला आहे.

**विशिष्ट घटकाची आकडेवारी**

**सुत्र : घटकाची टक्केवारी =** ———————————— **x १००**

**एकुण घटकाची बेरीज**

या पध्दतीने सर्व तेलबियाच्या पिकाचे उत्पादन विचारात घेवून टक्केवारी काढण्यात आलेली आहे.

**अभ्यासक्षेत्र :**

नांदेड जिल्हा हा मराठवाड्यातील एकुण ८ जिल्ह्यापैकी एक असून महाराष्ट्राच्या दक्षिण पूर्व दिशेला दक्षिणोत्तर पसरलेला आहे. नांदेड जिल्ह्याचा अक्षवृत्तीय विस्तार १८°१५ ते १९°५५ उत्तर अक्षांस व रेखावृत्तीय विस्तार ७६°५६ पूर्व ते ७८°१९ पुर्व रेखांश मध्ये स्थित आहे.[४] नांदेड शहर गोदावरी नदीच्या काठावर वसलेले आहे. नांदेड जिल्ह्याच्या उत्तरेस महाराष्ट्राचा यवतमाळ जिल्हा, दक्षिणेस परभणी जिल्हा, दक्षिण-पश्चिमेस लातूर जिल्हा आहे. जिल्ह्याच्या दक्षिण पूर्व दिशेला आंध्रप्रदेशातील आदिलाबाद व निजामाबाद हे जिल्हे आहेत. दक्षिण कर्नाटक राज्यातील बिदर जिल्ह्याचे संतापुर तहसिल आहे. प्राकृतिक रचनेच्या बाबतीत उत्तरेकडील डोंगराळ प्रदेश, गोदावरी खोऱ्याचा प्रदेश व बालघाट डोंगर रांगाचा प्रदेश असे एकूण तीन स्वाभाविक विभाग पडतात. तर नांदेड जिल्ह्यातून वाहणाऱ्या महत्वाचा नद्या - गोदावरी, मांजरा, मन्याड, सरस्वती, पैनगंगा, आसना, सिता व लेंडी ह्या आहेत. नांदेड जिल्ह्याचे हवामान उन्हाळयात ४२° कमाल से. तर हिवाळयात १८°से. इतके किमान तापमान असते. यामुळे येथील हवामान थोडे विषम आहे.[५]

नांदेड जिल्ह्यात नांदेड, अर्धापूर, मुदखेड, लोहा, कंधार, हदगाव, भोकर, हिमायतनगर या तालुक्यात ७६ से.मी. ते १०० से.मी. दरम्यान पावसाचे वार्षिक प्रमाण आहे. माहूर, किनवट, धर्माबाद, बिलोली, देगलूर, मुखेड, नायगाव व उमरी या तालुक्यात १०० से.मी. ते १५० से.मी. दरम्यान पावसाचे वार्षिक प्रमाण आहे.[६] नांदेड जिल्ह्यात खोल काळी, मध्यम काळी व उथळ काळी तीन प्रकारच्या मृदा आहेत.[७] सर्वसाधारणपणे काळी सुपिक व कसदार, मध्यम काळी, जंगलव्याप्त, मुरमाड, रेतीयुक्त इ.प्रकारच्या मृदा आढळतात.

## नांदेड जिल्ह्यातील तालुकानिहाय सुर्यफुल तेलबियाचे क्षेत्र उत्पादन

### कोष्टक. ०१

(क्षेत्र = हेक्टरमध्ये) (उत्पादन = टक्केवारीमध्ये)

| तालुके | भूईमुग | | करडाई | | सुर्यफुल | | जवस | | तीळ | | सोयाबीन | | इतर गळितधान्ये | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | क्षेत्र हे. | उत्पादन | क्षेत्र हे. | क्षेत्र हे. | क्षेत्र हे. | उत्पादन | उत्पादन | क्षेत्र हे. | उत्पादन | उत्पादन | क्षेत्र हे. | उत्पादन | क्षेत्र हे. | उत्पादन |
| नांदेड | २४६९ | ४०.६५ | ६७८ | ३२.३९ | २७७३ | २४.०९ | ४४ | ०.३६ | ०० | ०० | ०० | ०० | ४२८ | २.५१ |
| हदगाव | ८५२ | १६.५५ | ५५७ | ३३.७२ | २२५४ | ३०.९६ | २० | ०.०८ | ४४६ | ३.३० | ०० | ०० | १४०८ | १५.३९ |

| | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| किनवट | ७४९ | ३०.४३ | ५२ | ८.९२ | १०८६ | ३४.२४ | ०० | ०० | ७८२ | ९.५२ | ०० | ०० | १५०४ | १९.८९ |
| भोकर | ६२० | ३१.६८ | ८११ | २८.१२ | ७५६ | २२.९० | २५ | ०.३९ | २१६ | ३.३५ | ०० | ०० | ५२७ | १३.५६ |
| बिलोली | २४९० | ३०.१४ | १३५५ | २१.६० | २७४७ | २१.६८ | १७८१ | १०.८९ | २९७ | ३.१४ | ०० | ०० | ३९९५ | १२.५५ |
| देगलूर | ९९ | १.८७ | १७४९ | ४५.९२ | २४२५ | ३६.३६ | १२५ | ०.५६ | ६५२ | ४.१८ | ०० | ०० | १८७६ | ११.११ |
| मुखेड | १९३ | ५.०४ | ८८६ | ५७.२२ | ०० | ०० | ०० | ०० | ६६८ | ३०.३४ | ०० | ०० | ३३६६ | ७.४ |

| | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| कंधार | ८२० | १७.७० | ४७६ | ७.८८ | ४०३८ | २.२६ | २ | ०० | ८९ | १४.२९ | ०० | ०० | ३५०१ | ५७.८७ |
| **एकुण** | **८२९२** | **-** | **६५६४** | **-** | **१६०७९** | **-** | **१९९७** | **-** | **३१५०** | **-** | **००** | **००** | **१६५८३** | **-** |

स्त्रोत : संशोधन, एप्रिल-२०१२

सन १९९१-९५ या पाच वर्षाचे नांदेड जिल्ह्यातील तालुकानिहाय भूईमुग पिकाच्या क्षेत्राचा अभ्यास केल्यास असे स्पष्ट होते की, कोष्टक क्र.०१ नुसार अनुक्रमे नांदेड तालुक्यात २४६९ हे., हदगाव ८५२ हे., किनवट ७४९ हे., भोकर ६२० हे., बिलोली २४९० हे., देगलूर ९९ हे., मुखेड १९३ हे. व कंधार ८२० हे. असलेले आढळते. यावरून असे लक्षात येते की, नांदेड जिल्ह्यात सर्वात जास्त क्षेत्र बिलोली तालुक्यात असून सर्वात कमी भुईमुगाचे क्षेत्र देगलूर तालुक्यात आढळते. नांदेड जिल्ह्यात एकुण भुईमुग पिकाखालील क्षेत्र ८२९२ हे. आहे.नांदेड जिल्ह्यातील तालुकानिहाय तेलबियांचे उत्पादन सन १९९१-९५ या पाच वर्षाचा अभ्यास केल्यास असे स्पष्ट होते की, कोष्टक क्र.०१ नुसार नांदेड तालुक्यात ४०.६५%, हदगाव १६.५५%, किनवट ३०.४३%, भोकर ३१.६८%, बिलोली ३०.१४%, देगलूर १.८७%, मुखेड ५.०४% व कंधार १७.७०% असलेले आढळते. नांदेड जिल्ह्यात सर्वात जास्त भुईमुग पिकाचे उत्पादन नांदेड तालुक्यात ४०.६५% आहे.सन १९९१-९५ या पाच वर्षाचे नांदेड जिल्ह्यातील तालुकानिहाय करडाई पिकाच्या क्षेत्राचा अभ्यास केल्यास असे स्पष्ट होते की, कोष्टक क्र.०१ नुसार अनुक्रमे नांदेड तालुक्यात ६७८ हे., हदगाव ५५७ हे., किनवट ५२ हे., भोकर ८११ हे., बिलोली १३५५ हे., देगलूर १७४९ हे., मुखेड ८८६ हे. व कंधार ४७६ हे. क्षेत्र असलेले आढळते. यावरून असे लक्षात येते की, नांदेड जिल्ह्यात सर्वात जास्त करडाई पिकाचे क्षेत्र देगलूर तालुक्यात आढळते. नांदेड जिल्ह्यात एकुण करडाई पिकाखालील क्षेत्र ६५६४ हे. आढळते.

नांदेड जिल्ह्यातील तालुकानिहाय करडाई पिकाचे उत्पादन सन १९९१-९५ या पाच वर्षाचा अभ्यास केल्यास असे स्पष्ट होते की, कोष्टक क्र.०१ नुसार नांदेड तालुक्यात ३२.३६%, हदगाव ३३.७२%, किनवट ८.९२%, भोकर २८.१२%, बिलोली २१.६०%, देगलूर ४५.९२%, मुखेड ५७.२२% व कंधार ७.८८% असलेले आढळते. तर नांदेड जिल्ह्यात सर्वात जास्त करडाई पिकाचे उत्पादन मुखेड तालुक्यात असून त्याखालोखाल देगलूर तालुक्याचा क्रमांक लागतो. सन १९९१-९५ या पाच वर्षाचे नांदेड जिल्ह्यातील तालुकानिहाय सुर्यफुल पिकाच्या क्षेत्राचा अभ्यास केल्यास असे स्पष्ट होते की, कोष्टक क्र.०१ नुसार अनुक्रमे नांदेड तालुक्यात २७७३ हे., हदगाव २२५४ हे., किनवट १०८६ हे., भोकर ७५६ हे., बिलोली २७४७ हे., देगलूर २४२५ हे., मुखेड ०० हे. व कंधार ४०३८ हे. क्षेत्र असलेले आढळते. यावरून असे लक्षात येते की, नांदेड जिल्ह्यात सर्वात जास्त सुर्यफुल पिकाचे क्षेत्र कंधार तालुक्यात आढळते. नांदेड जिल्ह्यात एकुण सुर्यफुल पिकाखालील क्षेत्र १६०७९ हे. आढळते. नांदेड जिल्ह्यातील तालुकानिहाय सुर्यफुल पिकाचे उत्पादन सन १९९१-९५ या पाच वर्षाचा अभ्यास केल्यास असे स्पष्ट होते की, कोष्टक क्र.०१ नुसार नांदेड तालुक्यात २४.०९%, हदगाव ३०.९६%, किनवट ३४.२४%, भोकर २०.९०%, बिलोली २१.६८%, देगलूर ३६.३६%, व कंधार २.२६% असलेले आढळते. तर नांदेड जिल्ह्यात सर्वात जास्त सुर्यफुल पिकाचे उत्पादन देगलूर तालुक्यात ३६.३६% असलेले आढळून येते.

वरील प्रमुख तोलबिया पिकांच्या उत्पादनाशिवाय नांदेड जिल्ह्यात दुय्यम तेलबिया म्हणून जवस, तीळ, व इतर तेलबिया पिकांचा समावेश होतो. इरत तेलबिया पिकात कारळ, एरंडी व महूरी या पिकांचा

समावेश होतो. नांदेड जिल्ह्यात तालुकानिहाय जवस, तीळ, इतर तेलबियांच्या पिकाचे क्षेत्र व उत्पादन कमी जास्त प्रमाणात सर्वच तालुक्यात असलेले आढळून येते.

**निष्कर्ष :**

१) सन १९९१-९५ या पाच वर्षात संशोधन क्षेत्रात सुर्यफुल तेलबिया पिकाचे क्षेत्र सर्वात जास्त असलेले दिसून येते.

२) नांदेड जिल्ह्यात सर्वात जास्त भुईमूग पिकाचे क्षेत्र बिलोली तालुक्यात आढळते पण उत्पादनात नांदेड तालुक्याचा पहिला क्रमांक दिसून येतो.

३) संशोधन क्षेत्रात सर्वात जास्त करडाईचे क्षेत्र देगलूर तालुक्यात असून उत्पादनात मुखेड तालुक्याचा पहिला क्रमांक लागतो.

४) नांदेड जिल्ह्यातील तालुकानिहाय सुर्यफुल पिकांच्या क्षेत्राचा अभ्यास केल्यास असे दिसून येते की, सर्वात जास्त क्षेत्र कंधार तालुक्यात असून उत्पादनात देगलूर तालुक्याचा पहिला क्रमांक लागतो.

**उपाय :**

१) संशोधन क्षेत्रात तेलबिया पिकाच्या क्षेत्रात तालुकानिहाय विषमता आढळून येते. सर्वात जास्त सुर्यफुल पिकाचे क्षेत्र आढळते. सर्व पिकास समान संधी देण्याच्या दृष्टीकोणातून शेतकऱ्यांना लाभदायी योजना लागू कराव्यात.

२) संशोध क्षेत्रातील नामशेष होणाऱ्या खरी सुर्यफुल, तीळ व भुईमुग यांच्या लागवड क्षेत्रात वाढ होण्यासाठी शासकिय पातळीवरून प्रयत्न करावेत.

**संदर्भ सूची :**

१) डॉ.विठ्ठल घारापूरे, "कृषी भूगोल" पिंपळापूरे ॲण्ड कं. पब्लिशर्स नागपूर, प्र.आ.२००० जून, पा.न.३२.

२) अनिल कठारे, अरुण दळवे, "राष्ट्रकुटाची राजधानी कंधार" कल्पना प्रकाशन, नांदेड, प्र.आ.२००५, पा.नं.११

३) अनिल कठारे, अरुण दळवे, "राष्ट्रकुटाची राजधानी कंधार" कल्पना प्रकाशन, नांदेड, प्र.आ.२००५, पा.नं.२२१

४) जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन, जिल्हा नांदेड, २००४-०५, पृ.क्र.०३

५) के.ए.खतिब, "महाराष्ट्राचा भूगोल" सागर प्रकाशन पुणे, द्वितीय आवृत्ती २००७, पृ.क्र.२३३.

६) सु.प्र.दाते, करमरकर, "सुगम भूविज्ञान" विद्या प्रकाशन नागपूर, २००२, पृ.क्र.१०२.

७) ए.बी.सवदी, "द मेगा स्टेट महाराष्ट्र", निराली प्रकाशन पुणे, नववी आवृत्ती - २००५, पृ.क्र.५३.

# रा.रं बोराडे यांच्या कथेतील शेतकरी जीवन

{ विषेश संदर्भ :- हुंदका,पेरणी कथा संग्रह }

**प्रा.डॉ.रमाकांत गजलवार**

कै.शंकरराव गुट्टे ग्रामीण कला,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयधर्मापुरी
ता.परळी (वै.) जि.बीड

**प्रस्तावना:**

स्वातंत्र्यानंतर महाराष्ट्राच्या ग्रामीण भागात झपाट्याने बदल होऊ लागला. मात्र या बदलाबद्दल ची असमाधानाची भावना ग्रामीण समाजात होती. या तत्कालीन सामाजिक वास्तवता ग्रामीण साहित्य चळवळीने सृजनशील साहित्यिजनोचे लक्ष वेधले. नव्या पिढीतील ग्रामीण लेखकालाही आता वास्तवाचे भान ठेवून लेखन करायला पाहिजे.खेडयात स्थित्यंतरे होत आहेत. लेखना संदर्भात नवनवीन समस्या निर्माण होत आहेत. नवे ताण निर्माण होत आहेत. या नव्या समस्यांच्या, या नव्या ताणांच्या संदर्भात माणसा - माणसांमधील संदर्भ बदलत आहेत.या समस्या, हे ताण आथिक स्वरुपाचे आहेत, सामाजक स्वरुपाचे आहेत तसेच कौटूबिक स्वरुपाचेही आहेत. सभोवतालच्या परिस्थितीमध्ये वेळोवेळी बदल जे होतात त्यातूनच समाजाचीजडणघडण होत असते.समाजाची जी विशिष्ट धारणा बनते.त्याचा लोकजीवनावर परिणाम होतो. साहित्य हा समाजाचाच एक घटक असल्यामुळे या परिवर्तनाची नोंद त्याच्या संवेदनाशील मनाकडून सहजतेने घेतली जाते. त्याचे प्रतिबिंब साहित्यात उमटते म्हणूनच साहित्याची वाटचाल समजून घेताना हा बदलही लक्षात घेणे आवश्यक ठरते. ग्रामीण भागात हा बदल होत गेला आणि त्याचा साहित्याचा साहित्यनिर्मितीवर जो परिणाम झाला याचा अभ्यास करणे म्हणूनच महत्त्वाचे आहे.1960 नंतरच्या कालखंडात विभिन्न कारांनी मराठी साहित्यात नवे वाङमयीन प्रवाह व चळवळी निर्माण झालेल्या दिसून येतात, ग्रामीण, दलीत आदिवासी अषा सर्व प्रकारच्या षोषितांविरूदधचे आवाज मुखर करणारे लेखन या काळात होऊ लागले.

शिक्षणाचा प्रसार झाल्याने खेड्यापाड्यात देखील शिक्षण पोहचले.तळागाळातील जनसामान्य शिक्षण घेऊ लागले.खेड्यापाड्यातून ग्रामीण जीवनाचे अनुभव घेऊन शिक्षीत झालेली पिढी बाहेर पडू लागली.व शहराकडे धाव घेऊ लागली. कल्पकतेने लिहीलेले ग्रामीण साहित्य या पिढीच्या हाती पडले.त्यांनी ते मुळातून वाचले तेव्हा त्यांच्या लक्षात आले की ग्रामीण भागातील समाजजीवनाचे वास्तव चित्रण या साहित्यात आलेले नाही.जे काही आले ते अगदी ओझरते आणि वरकरणी स्वरूपाचे आहे. हे लेखन आत्मीय अनुभवातून किंवा स्वानुभवातून न येता ते रंजनात्मक व अत्यंत वरपांगी स्वरूपाचे असल्याचे या नवशिक्षीतांना जाणवले.त्यामुळे नव्याने शिकलेल्या या ग्रामीण जीवन जगलेल्या,अनुभवलेल्या पिढीने आपले अनुभव,दु:ख , वेदना व्यक्त करण्यासाठी लेखनी हाती घेतली. आणि ग्रामीण जीवनाचे, ग्राम संस्कृतीचे अस्सल जीवनदर्शन घडविणाऱ्या ग्रामीण साहित्याचा १९६० नंतर उदय झाला.

शहरी संस्कृती विविधता,संपन्नता आणि व्यापार उद्योगांनी नटलेली आपणास पहायला मिळते.पण ग्रामीण जीवनाची यथार्थता यापेक्षा निराळी आहे.आपल्याकडे ग्रामीण संस्कृती किंवा ग्रामव्यवस्था अगदी फार पूर्वीपासूनच एका विशिष्ट स्वरूपाची असल्याचे दिसते तसेच ग्रामीण संस्कृतीचे वैशिष्ट्य असे सांगता येईल की पूर्वी खेडी ही आर्थिक आणि व्यावहारिक दृष्ट्या स्वंयपुर्ण होती.तसेच ग्रामसंस्कृती आपला स्वतंत्रपणा जपणारी होती.गावचा पाटील हा गावचा महाराजा असे,तोच कायदा आणि तोच न्याय असे. चावडी म्हणजे ग्रामीण भागाचे न्यायालय किंवा राजदरबार होता ग्रामीण संस्कृती ही प्रामुख्याने कृषीकेंद्रीत आहे.

**रा. रं. बोराडे यांच्या कथावाङ्मयातील शेतकरी जीवन:-**

रा.रं.बोराडे हे मराठवाड्याच्या मातीतून समर्थपणे उदयास आलेले १९६० नंतरच्या कालखंडातील एक महत्त्वाचे मान्यताप्राप्त लेखक आहेत. मराठी ग्रामीण कथेच्या क्षेत्रामध्ये ज्यांनी ज्यांनी आपले स्वतंत्र आणि अढळ स्थान निर्माण केले आणि मराठी कथेच्या समृध्दीला ज्यांनी हातभार लावला त्यामध्ये रा.रं.बोराडे यांचा आवर्जून उल्लेख करावा लागेल.मराठमोळ्या कुटुंबाच्या कथा लिहून नाते संबंधांवर प्रकाश टाकला.ग्रामीण जीवन चित्रीत करणारे अनेक कथाकार साठोत्तरी दशकात पुढे आलेले आहेत.पैकी रा.रं. बोराडे हे महत्त्वाचे ठरतात.त्यानी कथा , कादंबरी,नाटक,वगनाट्य, पथनाट्य,नभोनाट्य,इ. वेगवेगळे साहित्य प्रकार हाताळले असले तरी कथाकार म्हणूनच संबंध महाराष्ट्रात आणि मराठी साहित्यात त्यांची ख्याती आहे. ग्रामजीवन,ग्रामसमाज व गावगाड्यातील दैनंदिन

जीवन हेच त्यांच्या कथेचे अनुभवविश्व असल्याने त्यांची कथा ग्रामीण कथा ठरते.पेरणी, ताळमेळ,मळणी,वरात,नातीगोती, बोळवण,वाळवण, माळरान, फजितवाडा, राखण, गोंधळ, बुरूज,कणसं आणि कडबा अशा कथासंग्रहात मधून मराठवाड्यातील ग्रामजीवन मोठ्या तळमळीने रेखाटण्याचा प्रयत्न केला.

वरील संग्रहातून जवळपास २००-२५० कथा त्यांनी लिहीलेल्या असून हुरडा, हुंदका व पेरणी यांसारख्या कथा विशेष उल्लेखनीय आहेत.

ग्रामव्यवस्थेत भावनांना फार महत्व आहे.हुरडा या कथेत शेती हाच कुटुंबाचा आणि वासनेचा जागृतीघटक आहे.याचे कारण हुरड्यात आलेली शेते,पाखरांचा किलबिलाट ही जशी कृषी उत्पन्नतेच्या परिपक्वतेची साक्ष आहे. त्याचप्रमाणें ह्या मोसमात बाजीची बायको वयात येते.ती शहाणी होते.ह्या शहाणे होण्याला खूप वेगळा संदर्भ रा.रं.बोराडे येथे जोडतात.हे विसरून चालणार नाही. बेहोश आनंदात बाजी शेताकडे धावत सुटतो.वाटेत सखा कातळे ह्याच्या हाकेला आवाज देताना '"आमच्या बी शेतात झाला की आता हुरडा" असे बेफाम पळत सूटतो.येथे बाजींचे हे उदगार शेतीशी अधिक जवळीक तर प्रस्थापित करतातच,पण वासनेचा तुंबलेला बांध तूटू न देता ओढून धरण्यात आणि योग्य वेळी बाजीने बेफाम पळत सुटण्यात वेगळीच बेहोशी निर्माण करण्यात बोराडे प्रचंड यशस्वी ठरतात.शेती संलग्न ग्रामजीवनाचे चित्रण करणारी हुंदका ही बोराडे यांची कथा हुरडा कथेमधील बेहोश आनंदाप्रमाणेच पुढे-पुढे सरकत राहते.मात्र पितृसत्ताक कुटुंबपद्धती व कृषिप्रधान संस्कृती मधील पित्याचे महत्त्वाचे स्थान,व्याही-व्याह्यामध्ये त्यांचे मानपान त्याला असणारे अनन्यसाधारण महत्त्व, त्यामुळे पणाला लागलेली त्यांची प्रतिष्ठा, खोट्या प्रतिष्ठेसाठी रानबा ह्या नवविवाहित तरूण शेतकरी मुलाची झालेली मुस्कटदाबी अशा अनुभवविश्वाचा तळ ही कथा धुंडाळत राहते.या कथेचा विषयच मुळ हुंडा हा असून , हुंड्याच्या पैशामुळे ग्रामव्यवहारात आपापसात पडलेला तिढा आहे. नुकतेच लग्न झालेल्या रानबाची पत्नी माहेरी पाठवून दिल्याने तो तळमळतो तिच्या माहेरचे लोक तिला सासरी पाठवण्यास तयार असतात.परनतू हुंड्याच्या पैशामुळे व्याह्याशी झालेली वादावादी आड येते. रानबाला मात्र बायको हवीहवीशी वाटते.त्यामुळे तो आबाला (बापाला) 'हुंड्याच्या पैशाचं द्या सोडून पण तिला घेऊन या ' असे लाडेलाडे सांगायला जातो.तर 'भडव्या 'काई वाटतंय का असे बोलायला ? म्हणून सोडून द्या, तो काय फुकटचे पैसे हायती ' असे संवाद कथेतील भावानुवाद वाचकांसमोर दृष्टीकोन करतात. थांबायचा झालेला भावनिक कोंडमारा व त्यास फुटलेला उमाळा,शेतावर कापणी करताकरता बरोबरीच्यांना दोन-दोन मुलं झाली'असं तो गळयातल्लागळयत आवंढा गिळून अनावर झालेले हुंदके धोतराच्या सोग्यात तोंड खुपसून राहतो.

'पेरणी' ही कथा सुद्धा अशाच कृषी जीवनातून साकारलेली स्फुरलेली ,सजलेली व बहरलेली कथा असून हुरडा व हुंदका पेक्षा थोडासा वेगळा अनुभव वाचकाला देऊन जाते.कथेत बक्कळ मेहनत करून पिकास योग्य बनवलेलं मेव्हणी घ्या वाटणीचे शेत हे प्रतिकात्मक रुप घेऊन संचारते.मेव्हणीच्या वाटणीच्या शेतात.आपण केलेली मेहनत वाया जाऊ नये असे कथानायकाला वाटते.म्हणून त्याने बिनकामी लहान मेव्हणी सांभाळलेली असते.ती आता मोठी होऊन वयात आल्याने बोराडे यांच्या शब्दांत ती शहाणी (उपवर ) झाल्याने शेतीसह दुसऱ्या कोणाच्या हातात जाईल तेव्हा तिलाच दुसरी बायको करून घेण्याची 'पेरणी' बळी मनातल्या मनात या कथेत करतो. बळीला एक बायको असताना दुसरी करण्याची हौस नसते.परंतू त्याला वंशाचा दिवा पहिल्या बायको कडून मिळालेला नसतो. शेतीच्या प्रेमातून निर्माण झालेली बळींची ही भावना शेवटी शेतीपाशीच येऊन थांबते.बळीची बायको पऱ्याग मात्र नवऱ्याच्या मनातील हे पाप ओळखून नवऱ्याला 'खबरदार ,असलं पाप मनात आणलं तर , मातीनं जेवढं तिच्या नावावर केल्या तेवढं सारं तिचं तिला द्या, त्यातल्या एका पसुडीवर बी नजर फिरवू नका. माजी आशा हाय तुम्हाला आमकी आमकीनं आपल्या बहिणींचं खाल्लं असलं आक्रीत शकू माझ्यावर अन् काही बी करून मिरगापतूर घेवून टाका तिला, लगीन लांबाया लागलं तर लोकं म्हणतील, भयनीचं खायला मिळतया म्हणून मुद्दाम लांबणीवर टाकाया लागलीया' असे ठणकावून सांगते,तेव्हा संबंध कथाच एक नवे रूप घेऊन समोर येऊ लागते.बळीच्या मेव्हणीच्या शेतात केलेली पेरणी शेवटी धुळपेरणी ठरते. ग्रामीण जीवन आणि ग्रामीण माणूस चित्रीत करताना बोराडे यांनी खेडेगावातील जीवनाला सर्वस्पर्शी असलेल्या शेतीचा, पिकांचा व उनवाऱ्यचा आपल्या करांची पार्श्वभूमी

म्हणूनवापरकेलाआहे,हुरडा,पेरणी,हुंदका,खानदान,वारसा,या कथांमधून गाव पांढरीलगत असणारी शेते,शेतात काम करणारी मंडळी व शेतीची राखण असे घटक जसे द.ष्टीगोचर होतात.तसे पावसावर अवलंबून असणारे ग्रामजीवनही प्रकट होते. ग्रामजीवनातील शेतकऱ्यांच्या दारिद्याचे, दुष्काळाचे कारण ठरलेल्या अस्मानी संकटाचे रूप उन्हाळा या कथेतून साकार होते. उत्तरा नक्षत्र कोरडेच गेल्याने आणि संस्थांचा देखील काही नेम दिसेना गेल्याने हवालदिल झालेल्या संतूनानाच्या मनाचे रानातली ओल निघून गेली तर पेरणी करणं शक्य होणार नाही आणि पेरणी झाली नाही तर औंदाचं अख्खं साल अन्नधान्यचा तुटवडा भासणार आहे.घरातील खाणारी तोंडे कुणाकडे बघतील आणि काय खातील,ती उपाशी मरतील असं चित्रण चिंता करणाऱ्या शेतकऱ्यांचे पावसाने ओढ धरल्याने ,शेत जमीन पंडीत पडल्याने ती जमीन व त्या निमित्ताने शुष्क व होरपळलेल्या मनाचे चित्र वापरा मधून चित्रीत होते.

बोराडे यांच्या कथाविश्वामध्ये पावसाच्या उताविळपणाचे चित्रण करण्याऱ्या कथा अभावानेच येतात.कायण बोराड्यांचा जन्म ज्या लातूर,औसा,उदगिर, निलंगा, अशा पंचक्रोशीत झाला.त्या ठिकाणी येणारी चित्रणे अधिक प्ररमाणात पावसाच्या ऐवजी उन्हाळयांचीच येतात.त्याचे कारण त्यांच्या कथांचा गाभा होऊन राहिलेला परिसरच मुळात दुष्काळी आहे. त्यांच्या कथांमधून येणारी व्यक्ती चित्रे सुद्धा शुष्क,ओसाड व दारिद्याने ग्रासलेली,गाजलेली अशीच चित्रीत झालेली दिसतात. त्यामुळे बोराड्यांच्या एकूणच कथांमधून येणारे कषिजीवन दारिद्र्याला सामोरे जाताना अधिक हवालदिल होऊन गुदमरलेले,दमछाक झालेले दिसते..

**संदर्भ :-**

1 यादव आनंद -ग्रामीण साहित्य आणि स्वरूप

2 मेदककर प्रकाश - रा.रं. बोराडे यांची कथा

3 बोराडे रा.रं. - हुंदका

4 बोराडे रा. रं. - पेरणी

# इंद्रजित भालेराव यांच्या कवितेतील शेतकरी

**डॉ. प्रिया जामकर**
एसएनडीटी कला आणि वाणिज्य महाविद्यालय, पुणे

आपल्या समाजाचे नागर आणि ग्रामीण असे दोन भाग जरी पडत असले तरी आपली संस्कृती कृषिप्रधान मानली जाते. १९२० त्या आसपास महात्मा गांधी य़ांनी खेड्याकडे चला ही घोषणा केली आणि त्यांच्यासकट तत्कालीन भारतीय नेत्यांनी भारतीय शेतीकडे डोळसपणे पाह्यला सुरूवात केली. ह्याचा परिणाम साहित्.वरही झाला आणि ग्रामीण गीते ,किसान गीते किंवा जानपद रचना मोठ्याप्रमाणावर मराठीमधे लिहिली जाऊ लागली. थोडक्यात १९२० नंतर मराठी ग्रामीण साहित्याचा प्रारंभ झाला. आणि कथा कादंबरी, कविता,नाटक, ललितलेख इत्यादी साहित्यप्रकारांमधे ग्रामीण जीवनाच्या चित्रणाला सुरूवात झाली. र.वा. दिघे, ग.ल. ठोकळ, सोपानदेव चौधरी, वि.वि. हडप,अशी काही नावे सुरूवातीच्या काळातील सांगता येतील. १९२० च्या आसपास सुरू झालेले ग्रामीण साहित्य पुढील काळात ताकदीने वाढत गेले.

आज ग्रामीण साहित्य ही संकल्पना कालबाह्य झाली आहे का या प्रश्नाचे उत्तर काहीसे होकारात्मक आहे. कारण खेडी झपाट्याने बदलत चालली आहेत. विशेषत: जागतिकीकरणानंतर तर हा बदल अतिशय लक्षणीय होतो आहे. निरनिराळया वाहिन्या, इंटरनेट ह्यांचा परिणाम खेड्यांवर होऊनखेड्याचे पूर्वीचे रूप आता बदलले आहे. त्यामुळे ग्रामीण साहित्य ही संकल्पनाच आता डळमळीत होऊ लागली आहे. मुळात साहित्याचे वर्गीकरण सोयीसाठी केलेले असते. कोणतीही साहित्यकृती ती ग्रामीण आहे किंवा नागर आहे म्हणून श्रेष्ठ ठरत नसते तर तिच्यामधून तिच्या भवतालाचे, जीवनाचे जे दर्शन घडत असते त्यामधून तिचे श्रेष्ठत्व ठरत असते. ग्रामीण साहित्याचे वेगळेपण तिच्यामधून जीवनाचे दर्शन कसे घडते, आजूबाजूच्या वास्तवाचे दर्शन कसे घडते, नि मुख्य म्हणजे तो लेखक त्या अनुभवाला कसा सामोरा जातो, कोणती मूल्ये तो रूजवू पाहतो, कोणत्या प्रश्नांना भिडतो, रचनाबंध कसे वापरतो, शैली कशी निर्माण करतो यामधून घडत असते. या पार्श्वभूमीवर इंद्रजित भालेराव यांच्या कवितेचा विचार करावयाचा आहे. इंद्रजित भालेराव यांच्या कवितेचा विचार करण्यापूर्वी ग्रामीण कविता म्हणजे काय ह्याचा विचार करायला हवी. ग्रामीण कविता म्हणजे ग्रामीण संवेदनशीलतेने घडविलेली कविता होय. बाह्य वास्तवाला ,सभोवती घडणा-या घटनांना कवी कशी प्रतिक्रिया देतो, त्या विशिष्ट अनुभवाचे रूपांतरण करीत असताना तो कोणत्या प्रतिमा वापरतो, त्याच्या आजूबाजूचा प्रदेश, तिथला निसर्ग ,तिथले जीवन, त्या जीवनातील प्रश्न त्याच्या कवितेमधे कसे उमटतात हे पाहणे महत्वाचे असते. ज्याला आपण ग्रामीण कविता म्हणतो ती या सा-यातून जन्माला येत असते. मराठीपुरते बोलायचे झाल्यास मराठी ग्रामीण जीवनाचे असे चित्रण प्राचीन लोकसाहित्यात आणि वेगवेगळया कवींनी लिहिलेल्या गाथा सप्तशतीमधे आलेले दिसते. गाथासप्तशतीमधे मधे दोन हजार वर्षांपूर्वीचा ग्रामीण माणूस, त्याचे प्रश्न, तो जगत असलेले जीवन या सगळयाचे प्रतिबिंब गाथासप्तशतीमधे दिसते. पुढे १९३० मधे सुगी या प्रातिनिधिक कवितासंग्रहामधे तत्कालीन जीवनाचे दर्शन घडते.कवी य़शवंत आणि गिरीश यांनीही अनेक जानपद गीते लिहिली.ग.ह. पाटील, ग.ल. ठोकळ, बहिणाबाई चौधरी,ही नावे सुरूवातीच्या काळात महत्वाची आहेत. आनंद यादव यांचे नाव १९६० नंतरच्या काळातील ग्रामीण कवितेतील महत्वाचे नाव आहे. ना.घ. देशपांडे, ना.धो.महानोर,विठ्ठल वाघ, नारायण कुलकर्णी कवठेकर,उत्तम कोळगावकर, राजन गवस यांनी १९६० नंतर ग्रामीण कविता जोमाने लिहिली. १९९० नंतर ग्रामीण मराठी कविता दमदार पणे लिहिली गेली. त्यामधे प्रामुख्याने इंद्रजित भालेराव,श्रीकांत देशमुख, सदानंद देशमुख,प्रकाश होळकर,एकनाथ पाटील, अजय कांडर इत्यादी कवींची कविता महत्वाची आहे.

**इंद्रजित भालेराव यांच्या कवितेतील आशय**

इंद्रजित भालेराव यांचे जवळपास अकरा कवितासंग्रह प्रसिध्द आहेत.शेतकरी आणि शेतीविषयक जीवन हे त्यांच्या कवितेचे केंद्र आहे. '' माझे संस्कारक्षम वय खेड्यात आणि शेतीत राबण्यातच गेल्यामुळे माझ्याही नकळत कवितेचा विषय ठरून गेलेला असतो. शेती हे माझ्या आयुष्यातील आणि कवितेतलेही नंदनवन आहे. '' असे त्यांनी एका मुलाखतीमधे नमूद केले आहे. आजूबाजूच्या बदलत जाणा-या ग्रामीण वास्तवाला त्यांनी आपल्या कवितेतून चित्रित केले आहे. आणि हे करीत असताना त्यांनी विविध रचनाबंध वापरले आहेत. भालेरावांच्या कवितेमधे शेतकरी, त्यांचे शेतीशी निगडीत जगणे, त्यातले प्रश्न, भावभावना, नाती, या सगळयाचे विलोभनीय दर्शन घडते. मुळात कविता हा साहित्यप्रकार तुमच्या रोजच्या जगण्याशी संबंधित असतो. तुम्हा काय जगता, कसे जगता, कोणत्या परिसराशी निगडीत आहात ते सारे काही त्या कवीच्या कवितेचा विषय ठरत असतो. थोडक्यात कोणत्याही कवीला त्याचे जगणे, त्याचा भोवताल आशयद्रव्य पुरवित असतो. 'प्रत्यक्ष भोगलेलं आणि पाहिलेलं शेतकरी जीवनाचं

वास्तव, हीच माझ्या कवितेची मुख्य भूमिका आहे.' असं त्यांनी म्हटलं आहे. त्यांच्या कविते मधे मराठवाड्यातील भाग दिसतो. हिंगोली जिल्ह्यातले रिधोरे हे त्यांचे जन्मगाव. त्यांचा कविपिंड याच भागामधे जोपासला गेला. कवी म्हणून आपली जडणघडण कशी कशी होत गेली हे सांगताना ते पीकपाणी या त्यांच्या कवितासंग्रहाच्या मनोगतामधे म्हणतात,"माझं बालपण ज्या खेड्यात गेलें ते रिधोरा नावाचं गाव परभणी जिल्ह्यात वसमत तालुक्यातलं आहे. १९८० पर्यंत या गावात वीज, रस्ता वगैरे कुठलीच आधुनिक साधने नव्हती. तेव्हा पाचकशे लोकवस्ती भरेल इतकं हे गाव लहान होतं. त्रि. ना. अत्र्यांच्या गावगाड्यातल्यासारखं पूर्णपणे पारंपरिक पध्दतीनं चालणारं गाव. मागच्या पुढच्या वर्गातल्या मुलांची मराठीची पुस्तकं आणि दुकानकारांनी आणलेला पेपरांची रद्दी एवढंच इथे वाचनाचं साधन. सोकसाहित्याची परंपरा मात्र भलतीच समृध्द होती. आरत्या , भजनं आणि सणावाराची गाणी खूप खूप ऐकायला मिळायची.मी खूप खूप ऐकायचो. पाठ करायचो आणि लिहूनही ठेवायचो...... हे सगळं गावाचच संचित आहे. जात्यावरची ओवी तर माझ्या ओठातच बललेली. म्हणूनच कदाचित माज्या बहुतेक कविता ओवीतच आहेत." ( पीकपाणी, मनोगत) कुठलाही कवी ज्या परिसरामधे वाढतो तो परिसर , त्या परिसराला चिकटून येणारा जावनानुभव कवितेला आशयद्रव्य पुरवित असतो. आपली कविता कशी असावी ह्या बाबत कुठल्याही कवीची एक धारणा असते. इंद्रजित भालेराव यांनीही स्वत:ची कविता कशी असावी याबाबतची आपली इच्छा एका कवितेत बोलून दाखवली आहे. ते लिहितात--

माझ्या कवितेतला यावा
शेनामातीचा दर्वळ
तिने करावी जतन
काट्याकुट्यात हिर्वळ
माज्या कवितेने बोल
कालजातला बोलावा
उन्हाळ्यात खापराला
जसा असतो ओलावा
पुढे ते लिहितात
खारी आंबड तुरट
माज्या कवितेची चव
ऊर फोडूनिया माझा

तिनं पोटातून यावं

इंद्रजित भालेराव यांच्या कवितेमधे शेती आणि शेतीविषयक जाणीवा केंद्रस्थानी आहेत हेच यातून सूचित होते. कृषीजीवनातील कितीतरी चित्रे त्यांनी त्यांच्या चित्रमय शैलींमधे रेखाटली आहेत. शेतक-याच्या जीवनामधे जमिनीला अपरंपार महत्व असते. कवी एकेठिकाणी म्हणतो, मला हवी आहे जमीन काळी काळी, रोज सकाळी माझा बाप जिला लावतो भाळी..." शेतक-यासाठी जमीन हेच त्याचे सर्वस्व असते. कवी म्हणतो माझे मायबाप या जमिनीची पूजा करतात. तिला धन मानतात. पुढे कवी असंही म्हणतो की , मला जमिनीचे डोहाळे लागलेत, जमीन माज्या कुशीत आहे, माझी कूस फाटते आहे. तरीही मी खुशीत आहे. ''असं जमिनीवरचं प्रेम वाढत वाढत जाऊन पृथ्वीसाठी मी काहीच करत नाही अशी एक अपराधी पणाची भावना देखील कवी सुंदररितीने व्यक्त करतो. ती कविता अशी

*ही पृथ्वी*
*पावसानं न्हाऊ घातल्यावर*
*बापानं*
*नांगरानं विंचरली आहे*
*माईनं तेलतीट लावून*
*ओव्या म्हणून*
*जोजवली आहे*
*मी मात्र निकरट*
*भाऊ म्हणून*
*तिच्यासाठी काहीच करत नाही*

*अशी तिची तक्रार आहे.''*

ही एक उत्तम कविता आहे.यामधे पृथ्वीविषयीचा जिव्हाळा तर व्यक्त झाला आहेच पण त्याच बरोबर आधुनिक काळात कवीचे जमिनीशी नाते तुटत चालल्याची खंत देखील यामधून व्यक्त झाली आहे. या कवीच्या कितीतरी कवितांमधून असे दिसून येते की शेत त्याच्यासाठी जीव की प्राण आहे. या शेताचे अस्तित्व जर धोक्यात आले तर जगावे कसे, ते संकट दूर करायला कोण येईल या प्रश्नांने कवी कासावीस होतो. शेतच इमान या कवितेमधे कवी शेत आपले सर्वस्व आहे असे सांगून पुढे म्हणतो,---

डोळयाने पाहतो, जळणारे शेत
मनातला हेत, मनातच
जळालेली माती. करायला लोणी
येईल का कोणी, भूमिपुत्र ''

आपल्या जगण्याचा आधार असलेलं हे शेत जर जळून गेलं तर आपलं जगणंच धोक्यात येईल याची विदारक जाणीव या कवितेमधून होते. कवीच्या मनामधे गाव इतका जिवंत आहे की तो आपल्या दोस्तांनाही गावाकडं चल म्हणतो. कवी अभिमानानं सांगतो की माज्या काळया बापाचं हे हिरवं रान आहे. ज्यात माझ्या काळया माईनं घाम गाळून सोनं पिकवलं आहे पण कवीला खंत आहे की आपल्या मायबापाच्या घामाचा भाव खूप सस्ता आहे. या पिकाचा मूळ अधिकारी माझा बापच आहे पण तो मात्र भिकारी झाला आहे. १९९० नंतर शेतीमधे आणि शेतक-यांच्या आयुष्यांमधे मोठे स्थित्यंतर होत गेलेले दिसते. शेतक-यांच्या आत्महत्या हे तर १९९० नंतर चे भयाण सामाजिक वास्तव आहे. त्याचे पडसाद भालेरावांच्या कवितेत दिसतात.

झाडाझाडाला विचारा
आत्महत्येच्या कहाण्या
या पहाडाला विचारा
माझ्या बापाच्या विराण्या

या कवितेमधे हे दुःख व्यक्त झालेले आहे. या कवितेचा शेवट तर खूपच विदारक आणि अस्वस्थ करणारा हे. कवी म्हणतो—

गेला विदेही होऊन
बाप देवाच्या दारात
देव होता झोपलेला
गाढ गहन घोरत

शेतक-याच्या या परिस्थितीला कोण जबाबदार?किंवा ही परिस्थिती बदलणार कोण ह्याचे उत्तर नाही. कोणताही पक्ष सत्तेवर आला सगळे जण मिळून माझ्या बापाच्या हत्येची कहाणी लिहितात असे कवी म्हणतो. इंद्रजित भालेराव यांच्या कवितेतील बापाची प्रतिमा अशी शोकात्म आहे. या बापाचं मातीवर अतोनात प्रेम आहे. पोटच्या पोरापेक्षाही तो मातीवर अधिक प्रेम करतो.''माझं ओलांडून प्रेत, आधी रूजविलं शेत, मग आला स्मशानात, काळयाईचं गाणं गात.''यामधे जीवनाचा एक मोठा पेरा आहे. अशी लार्जर देन लाईफ प्रतिमा बापाची रंगवली आहे. बाप ही कविता या दृष्टीने पाहण्यासारखी आहे. यामधे एक जिवंत असे संवेदनाचित्र कवीने रेखाटले आहे. शेतकरी बापाचं चित्र रेखाटताना प्रतिमा देखील शेतकी जावनातीलच वापरल्यामुळे त्या सगळया चित्रणाला एक प्रकारची विश्वासार्हकता आली आहे. हा शेतकरी बाप उभ्या जगाचा पोशिंदा आहे पण त्याच्या भाळी मात्र रातंदिस कष्ट लिहिलेले आहेत अशी खंत कवी व्यक्त करतो. या संपूर्ण कवितेत शेतकरी त्याचं कुटुंब आणि आख्खं जग यांच्या मधे असलेला एक ताण आहे. हा ताण असह्य आहे, नि दुर्दैव असे की तो ताण कधीच मिटणार नाही. कवी म्हणतो,

बाप फोडितो लाकडं माय पेटविते चुल्हा
घामामागल्या पिठाची काय चव सांगू तुला
आम्ही कष्टाचंच खातो जग करी हापाहाप

शेतक-याचं जगणं त्यातले हे ताण आणि समाजाची मानसिकता असा हा अनेकपदरी ताण आहे. जागतिकीकरणानंतर खेडी ओस पडू लागली, खेड्याचे पुर्वीचे ते आल्हाददायक रूप लोप पावून भयाण ओसाड अशी अवकळा खेड्यांवर पसरली. गावपांढरी ओस झालीय या कवितेमधे या ओस पडत चाललेल्या गावाचे चित्रण आले आहे.

गावपांढरी ओस झालीय

गावावरून फिरताहेत गाढवांचे नांगर
आतडी गोळा करून कुंधा काढणारे बैल
पाय खोरताहेत होऊन डंगर

असे मनाला सुन्न करणारे चित्रण कवी करतो आणि शेवटी प्रश्न विचारतो हे चित्र बदलणार नाही. कोणाचेही राज्य आले तरी लांडगेच माजत जाणार आहेत.कधी कवी कवितेमधून एकाद्या प्रसंगाचे चित्रण करतो, आणि कवितेमधे हळूच कथेला गुंफून टाकतो. मीया मनलं या कवितेमधे अशाच एका भावूक प्रसंगाचे चित्रण उमटले आहे ज्यामधून शेतक-याच्या गरीबीचे चित्रण आले आहे. इंद्रजित बालेराव आपल्या कवितेमधे ज्या प्रतिमा वापरतात त्या सेतकरी जीवनातीलच असतात. शेतक-यांच्या जीवनातील प्रतिके मिथके त्यांनी वापरली आहेत. रम्य अशा रानाचे चित्रण असो किंवा प्रेमाचे असो किंवा वेदनेचे असो त्या काव्यशैली कधीही शेतकी अनुभवाशी अप्रामाणिक होत नाही.

आभाळ दऊत, पावसाची शाई
सज्ज झाली भूई उफाणून
वावरात उभी तिफन लेखणी
रासन आखणी ,कागदाची

या कवितेमधे कविता लेखणी आणि शेतीशी संबंधित प्रतिमा यांचा सुरेख संगम झाला आहे. याचा कहर म्हणजे पुढल्या ओळी—

आशयाची दाटी, झाली कणसात
खळयामधे रास, खंडी खंडी

कवी आपल्या जीवनाभूवाशी कसा एकरूप झाला आहे ह्याचे हे उदाहरण आहे.

इंद्रजित भालेराव यांनी अनेक प्रकारचे रचनाबंध वापरले आहेत. मुक्तछंद त्यांनी लिहिला आहेच पण ओवी अभंग आणि छांदस रचनाही त्यांनी केल्या आहेत. मौकिक परंपरेशी मातं सांगणारा अष्टाक्षरी हा रचनाबंध देखील त्यांनी मोठ्याप्रमाणावर हाताळला आहे. त्यांच्या काही कविता तर लोकगीताची आठवण करून देणा-या आहेत.त्यांचे सगळे काव्यविश्व पाहिले की वाटते हा कवी आपल्या अनुभवाशी, पल्या परंपरेशी, कवितेशी प्रामाणिकपणे एकरूप जाला आहे. मराठी कवितेमधे इतकी देखणी अस्सल ,शेतक-यांचे जगणे शब्दबध्द करणारी कविता विरळा आहे.

# शेतकरी उत्पादक कंपनी/संघटन आणि शेती विकास

**डॉ. विजय शंकर शिंदे**

सहाय्यक प्राध्यापक,अर्थशास्त्र विभाग प्रमुख,गोखले एजुकेशन सोसायटीचे, कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय

जव्हार,जि. पालघर.-४०१६०३

Email: shindeviju76@gmail.com

**प्रस्तावना:**

**शेतकरी उत्पादक कंपनी (एफपीओ) म्हणजे काय?**

हे कंपनीचे कायदेशीर स्वरूप असून तिची कंपनी कायदा १९५६ व २०१३ नुसार नोंदणी होते. शेतकरी उत्पादक कंपनी ही अशी एक संस्था आहे ज्यामध्ये कायद्यानुसार केवळ शेतकरी हेच या कंपनीचे सभासद असू शकतात आणि शेतकरी सभासद स्वत:च या कंपनीचे व्यवस्थापन करतात. शेतकरी उत्पादक कंपनीच्या संकल्पनेमध्ये विविध प्रकारचे शेतकरी, उत्पादक, लहान आणि किरकोळ शेतक-यांचे गट, समूह एकत्रीत आणले जातात. परिणामी अनेक आव्हाने एकत्रितपणे सोडवले जाऊ शकतात तसेच सदर शेतकरी उत्पादक कंपनी मार्फत एक प्रभावी संघटन तयार करणे, जसे की गुंतवणूक करणे, नवीन तंत्रज्ञान अद्यावत करणे, नवीन बाजारपेठ निर्माण करून तयार असलेल्या बाजारपेठेत प्रवेश करणे, विविध पिकांचे उत्पादन घेणे व उत्पादित मालावर प्रक्रिया करून विविध प्रकारचे बाय-प्रोडक्ट बनविणे, कंपनी मार्फत खरेदी-विक्री केंद्र उभारणे, मालाची प्रतवारी करून वर्गीकरण करणे, मालाचे बाजारपेठेमध्ये मार्केटिंग करणे, कंपनी सदस्यांनी उत्पादित केलेला माल कंपनीच्या नावाने ब्राडींग करणे, सदस्यांचे प्राथमिक उत्पादन निर्यात करणे किंवा वस्तू किंवा सेवा आयात करणे.

**सहकारी संस्था आणि शेतकरी उत्पादक कंपनीतील फरक**

१. शेतकरी उत्पादक कंपनीही कंपनीकायद्यांतर्गतनोंदणी होते तर सहकारी संस्था ही सहकार कायद्यानुसार नोंदनीकृत असते.

२. शेतकरी उत्पादक कंपनी अनेक उद्दिष्ट ठरवू शकते. परंतुसहकारी  संस्था ठरलेल्या उद्देशावरच चालते.

३. शेतकरी उत्पादक कंपनीचे कार्यक्षेत्र संपूर्ण देशभर असू शकतेपण, सहकारी संस्थेचे कार्यक्षेत्र मर्यादित असते.

४. शेतकरी उत्पादक कंपनीमध्ये वैयक्तिक समभाग (शेअर) विकता येत नाही. परंतुजो इतर सदस्यांना त्यांच्या मुल्यानुसार हस्तांतरित करता येतो.सहकारी संस्थामध्येसमभाग विक्री करता येत नाहीत.

५. शेतकरी उत्पादक कंपनीमध्ये शेतकरी गट, संघटना, सेवा व उत्पादन संस्था इत्यादीना सदस्य बनविता येते. पण सहकारी संस्थामध्ये व्यक्ती हा सदस्य असतो. असे काही ठळक फरक शेतकरीउत्पादक कंपनी व सहकारी संस्था यामध्ये आहेत.

६. शेतकरी उत्पादक कंपनीमध्ये प्रत्येक सदस्याला मतदान करण्याचा अधिकार असतो. कंपनी त्याला मनाई करू शकत नाही. परंतु सहकारी संस्थामध्ये एक सभासद एक मत असते.

७. शेतकरी उत्पादक कंपनीमध्ये कर्ज घेण्याविषयी स्वातंत्र आहे. त्याला मर्यादा नाहीत तसेच कर्जासाठी अनेक पर्याय उपलब्ध आहेत. सहकारी संस्थांमध्ये कर्ज घेण्यास मर्यादा आहेत. विविध तज्ञांची आवश्यकता असते.

**कंपनी नोंदणी:**

शेतकरी उत्पादक कंपनीची नोंदणी ही कंपनी सेक्रेटरी करून देतात. कंपनी सचिव नोंदणी प्रक्रिया व कायदेशीर बार्बीची प्रक्रिया करतात. कंपनी सचिवांनी मागितलेल्या कागदपत्रांची पूर्तता करणे सदस्यांची जबाबदारी आहे.

**शेतकरी उत्पादक कंपनीची (FPO) नोंदणी करण्यासाठी लागणारी आवश्यक कागदपत्रे**

१. प्रत्येक संचालक आणि सभासदाचे स्वतः प्रमाणित केलेले पॅन कार्डआणि आधार कार्ड.

२. प्रत्येक संचालक आणि सभासदाचे स्वतः प्रमाणित केलेले मतदार ओळखपत्र किंवा ड्राईविंग लायसन्स किंवा पासपोर्ट ओळखपत्र.

३. प्रत्येक संचालक आणि सभासदाचा स्वतः प्रमाणित केलेले बँक स्टेटमेंट (First and last page) किंवा स्वतःच्या नावावरअसलेले चालू वीज बील (रहिवासी पुराव्यासाठी) .

४. प्रत्येक संचालक आणि सभासदाचा शेतकरी असल्याचापुराव्यासाठी तलाठ्याच्या सही शिक्क्यासह७/१२ उतारा आणितहसीलदाराच्या सही शिक्क्यासह शेतकरी असल्याचा दाखला.

५. ७/१२ उतारा सभासदाच्या स्वतःच्या नावावर नसेल तरनातेवाईकाचा ७/१२ उतारा आणि तलाठ्याच्या सही शिक्क्यासह Farmer Certificate (सोबत जोडल्याप्रमाणे) आणि तहसीलदाराच्या सही शिक्क्यासह शेतकरी असल्याचा दाखला.(दोन्ही पण)

६. सर्व संचालक आणि सभासदांचे शेतकरी असल्याने तालुका कृषीअधिका-याच्या सही शिक्क्यासह सर्वांने मिळून एकत्रित प्रमाणपत्र.

७. प्रत्येक संचालक आणि सभासदांचा पासपोर्ट आकाराचा फोटो.

८. प्रस्तावित कंपनीसाठी योग्य नावे. (कमीतकमी ३)

९. कंपनीच्या प्रस्तावित कार्यालयाचे चालू वीज बिल आणि ऑफीसमालकाचे ना हरकत प्रमाण पत्र (सोबत जोडल्याप्रमाणे)

१०. प्रत्येक संचालक आणि सभासदांचामोबाईल नंबर, ई-मेल आयडी, शैक्षणिक पात्रता, जन्माचे ठिकाण आणि शेअर्स रक्कम सोबत जोडलेल्या रकान्यात)

**कंपनीचे व्यवस्थापन**

1. कोणतीही कंपनी स्थापन करण्यासाठी कमीत कमी ५आणि जास्तीत जास्त १५ संचालकांची नोंदणी
2. आवश्यक आहे.
3. •किमान ५ संचालक व ५ प्रवर्तक एकत्र येऊन १० व्यक्ती नोंदणी कंपनीची नोंदणी करू शकतात.
4. संचालक मंडळाद्वारे कामकाजाकारिता पूर्णवेळ व्यवस्थापक नियुक्त करावा लागतो.
5. संचालक मंडळ अशा व्यवस्थापकाला विशेष अधिकार देते त्याद्वारे संचालक मंडळाच्या निर्णयानुसार सुयोग्य व्यवस्थापन व्यवस्थापक करतो. कंपनीच्या जमापुंजीतून या व्यवस्थापकाला मानधन दिले जाते.

**कंपनी नोंदणीच्या पायऱ्या**

**संचालक ओळख क्रमांक**

उत्पादक कंपनी ५ संचालक आणि ५ प्रवर्तक नेमून नोंदता येते. प्रत्येक संचालकाकडे संचालक ओळख क्रमांक भारतीय वाणिज्य मंत्रालयं यांचेकडे ई-अर्ज करून काढावा लागतो. त्यासाठी नियुक्त संचालकांची पुढील कागदपत्रे आवश्यक आहेत.

१.निवासी पुरावा (विज बिल/टेलिफोन बिल/ बँक स्टेटमेंट/पासपोर्ट/ शाळा सोडल्याचा दाखला /मतदान नोंदणी कार्ड) किमान दोन पुरावे द्यावे लागतात. यामध्ये पिन कोड नमूद असणे आवश्यक आहे.

२.पासपोर्ट आकाराचा फोटो

३. पॅन कार्ड

**डिजिटल स्वाक्षरी प्रमाणपत्र**

संचालकांची डिजिटल स्वाक्षरी लागते यासाठी एमसीए किंवा खाजगी कंपनी देखीत ई अर्ज केल्यास डिजिटल स्वाक्षरी प्रमाणपत्र मिळेल.

**३.कंपनीच्या नावाकरिता अर्ज**

कंपनीच्या नावाकरिता ई फॉर्म १ अ मध्ये अर्ज सादर करावा लागतो. किमान सहा नावेसुचवावी लागतात. ही नावेइतर ट्रेड मार्क किंवा कंपनीच्या नावाशी मिळतीजुळती नसावी थोडक्यात वेगळेपण असलेली असावी.

**४.कंपनीची नोंदणी**

एकदा आर ओ. सीकडून. अजून नाव मंजूर झाले तिथे नाव ६० दिवस पर्यत राखीव असते. त्यामुळे ६० दिवसात कंपनीची नोंदणीकरण्याकरिता आवश्यक त्या बाबी पूर्ण करणे गरजेचे असते.यामध्ये मेमोरॅडमऑफ असोसिएशन आणि आर्टिकल ऑफ असोसिएशनचा आरखडा तयार करावा लागतो. उत्पादक, हे शेती अंतर्गत पूरक व्यवसायातून असावाजसे कि पशुधन,फळबाग, भाजीपाला उत्पादक, मसाले उत्पादन,वनउत्पादन, मधुमाशीपालन आणि हस्तउद्योग व कृषी विषयक उत्पादने.मेमोरॅडमऑफ असोसिएशन आणि आर्टिकल ऑफ असोसिएशनच्या आराखडा संचालकांनी इंग्लिशभाषेतस्वाक्षरी करून घ्यावी. स्वाक्षरी मराठी असल्यास प्रतिज्ञापत्र घ्यावे लागते.

**५. संस्था नोंदणी करता अर्ज सादर करणे**

**फॉर्म १**: कंपनीइ कॉर्पोरेशन एस ओ ए., ए. एफ. ए. आणि आ ओ. सी. कडे अर्ज आणि फाईल सादर करावी लागतो.

**फॉर्म १८**: कंपनीच्या पत्त्याची नोटीस

**फॉर्म३२**: संचालकांच्या नियुक्तया आणि त्याचे सहमती पत्र जे त्यांनीस्वाक्षरी केलेले आहे.

हे स्व: अर्ज फॉर्म आर.ओ.सी. कडे हे अर्ज सादर करावे लागतात.

**६.नोंदणी प्रमाणपत्र**

जर सादर केलेल्या कागदपत्राबाबत रजिस्टर ऑफ कंपनी (आर ओ सी) चे समाधान झाले तर कंपनी नोंदणीचे प्रमाणपत्र जारी करतात अन्यथा समाधान होई पर्यंत वेगवेगळे आवश्यक कागदपत्र पुरावे सादर करण्याचा सूचना देतात.

**७. संचालकांची बैठक**

कंपनीनोंदणी झाल्यानंतर ३० दिवसाच्या आत संचालक मंडळाची बैठक आयोजित करवी लागते.

या बैठकीचे विषय स्थानिक भाषेत तयार करावे किंवा इंग्लिश मध्येही चालेल त्यावर व्यवस्थापकाने स्वाक्षरी करावी. हा अजेंडा कंपनीच्या संचालकांना सात दिवस आधी पाठविण्यात यावा.

**बैठकीचे विषयः**

• कंपनी नोंदणी दास्ताऐवज बाबत माहिती, बँक खाते बाबत.अधिकृत स्वाक्षरीला अंतिम रूप देणे, अंतिम एम.ओ.ए. आणि ए.ओ.ए. सादर करणे, व्यवसाय आराखड्याला मंजुरी देणे.

अध्यक्षाच्या परवानगीने इतिवृत्त लेखन करने. बैठक रजिस्टरवर सर्वाच्या स्वाक्षरीनी आदी कामे करावीत.

**८.वार्षिक साधारण सभा**

कंपनी नोंदणीनंतर ९० दिवसांच्या आत वार्षिक सर्वसाधारण सभेचे आयोजन करावे लागते.

पर्व भागधारकना १५ दिवस अगोदर बैठकीचा अजेंटा कळविण्यात यावा.

**बैठकीचे विषय :** अध्यक्षाची निवड,नोदणीखर्चालासंमती, संचालकांची नियुक्ती,व्यवस्थापकाची नियुक्ती, व्यवसाय आराखडयाला संमती बजेट आणि कार्यकृती. ऑडीटरची नियुक्ती आणि कार्यकारी अधिकारी नियुक्ती हे सर्व निर्णय आर ओ सी. ला कळवावे लागतात.

दर वर्षी ३० जून पर्यंतकंपनीने ऑडीट रिपोर्ट आर ओ सी कडे सादर करावे लागतात.

मेमोरॅडमऑफ असोसिएशन आणि आर्टिकल ऑफ असोसिएशन हे दोन्ही दास्ताऐवज कंपनीला कायदाची चौकाट प्राप्तकरून देण्याकरिता मार्गदर्शक आणि महत्वाचे दस्तऐवज आहे. या दोन दस्तऐवजमुख्य फरक पुढीलप्रमाणे,

शेतकरी उत्पादक कंपनीमधील सदस्यांनी निवडलेले दिग्दर्शक कमीतकमी कमी एक वर्षासाठी जास्तीत जास्त पाच वर्ष दिग्दर्शक या पदावर राहू शकतो.

**एम.ओ.ए.: मेमोरॅडमऑफ असोसिएशन**

1. यात प्रामुख्याने उद्योगाचेउद्देश स्पष्ट केले जातात.
2. कार्यकृतीची व्याख्या
3. भविष्यकालिन कृती कार्यक्रम
4. वरील कृतिकार्यातून उत्पादकांना लाभ ई. बाबी स्पष्ट केल्या जातात.

**ए.ओ.ए. (आर्टिकल ऑफ असोसिएशन)**

यात कंपनीच्या नियमांचा उल्लेख असतो. जे कंपनीचे उद्देशापूर्ती करताना मदत करतात. त्या बाबी पुढीलप्रमाणे भौगोलिक कार्यक्षेत्र, कंपनीचा पत्ता, सदस्यत्वाचे नियम, सदस्याकरिता नियम, संचालक, सदस्याकरिता फायदे, संचालकाकरिता नियम, संचालकांच्या बैठका आणि वार्षिक सर्वसाधारण बैठकाकरिता चौकट, वार्षिक सर्वसाधारण बैठकाकरिता कार्यप्रणाली, मूळ लाभाचे वितरण, फिरते संचालक पद.

**अशी आहेत नवी मार्गदर्शक तत्त्वे**

1. शेतकरी उत्पादक कंपनीत किमान ३०० शेतकऱ्यांचा समावेश असावा.
2. निम्मे सभासद हे अल्प, अत्यल्प भूधारक किंवा भुमिहीन असावेत.
3. महिला शेतकरी सहभागाला प्राधान्य द्यावे.
4. डोंगराळ भागात आणिईशान्य भारतात किमान १०० शेतकरीअसावेत.
5. कंपनीच्या समभागात एका सभासदाचा कमाल शेअर१० टक्क्यापेक्षा अधिक नसावा.
6. कंपनीला एका वर्षात १८ लाखापेक्षा अधिक निधी देण्यात येणारनाही.
7. कंपनीला कमाल १५ लाख रुपये प्रशाससकिय खर्चासाठी देण्यात येतील.

8. वेगळया पिकांच्या क्लस्टरमध्ये शेतक-याला एकापेक्षा अधिक कंपनीचा सभासद होता येणार.

**शेतकरी उत्पादक कंपनी (एफपीओ) महत्त्व**

1. सामूहिक आदानांची खरेदी
2. सामूहिक विपणन
3. प्रक्रिया
4. अधिक चांगल्या प्रकारच्या बाबींचा माध्यमातून उत्पादकता वाढविण्यासाठी
5. शेतकऱ्यांचे ज्ञान वाढण्याकरिता
6. खात्री गुणवत्ता
7. विपणन मदत
8. तांत्रिक सेवा
9. बचत आणि क्रेडिट
10. स्थानिक विकास

**शेतकरी उत्पादक कंपनी (एफपीओ) कोण समर्थन पुरविते**

अशा अनेक संस्था आहेत जे एफपीओ चे समर्थन करतात. एफपीओच्या पदोन्नती आणि हाताळणीसाठी ते एफपीओला आर्थिक आणि तांत्रिकदृष्ट्या सहाय्य करतात. नाबार्ड,एसएफएसी,सरकारी विभाग,कॉर्पोरेट्स , घरगुती आणि आंतरराष्ट्रीय मदत संस्था ,स्वयंसेवी संस्था.

**शेतकऱ्यांसाठी उपलब्ध सुविधा -**

१) निर्यात (एक्स्पोर्ट) विशेष शेतकरी उत्पादक कंपनीची स्थापना.
२) प्रशिक्षण व मार्गदर्शन.
३) निर्यातीसाठी परदेशातील खरेदीदार (व्यापारी) मार्केटप्लेस.
४) फॉरेन बायर्स व योग्य डील इंग्लिश - मराठी मध्ये फायनल करणे.
५) प्रोजेक्ट निवडीसाठी मार्गदर्शन.
६) पैसे कसे उभारावे यासाठी मार्गदर्शन.
७) बँक कर्ज सपोर्ट.
८) शासकीय योजना व सबसिडी सपोर्ट.
९) आंतरराष्ट्रीय मार्केटिंग व विक्री साठी मार्गदर्शन.
१०) ५०% पर्यंत माफक दरात मार्गदर्शन,
११) आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय व विविध शासकीय संस्थांचे मार्गदर्शन एकाच छताखाली
१२) आंतरराष्ट्रीय ट्रान्सपोर्ट व कागदपत्रांची सहाय्यता.
१३) मोफत निर्यात मार्गदर्शन,
१४) सुरक्षित पैश्यांची हमी.
१५) अपेडा, ई-नाम व इतर स्तरीय मार्गदर्शन,
१६)फूड प्रोसेसिंग प्रोजेक्ट व योजना सपोर्ट,
१७)व्यावहारिक पैशाची ग्यारंटी व विश्वासु ग्राहक ची निवड.
१६)या सारख्या इतर सर्व्हिसेस.

**या कंपनीच्या माध्यमातून तुम्ही खालील व्यवसाय करू शकता**

पोल्ट्री फार्मिंग, गोट फार्मिंग, डेअरी फार्मिंग,मिल्क प्रोजेक्ट, फिश प्रोजेक्ट,मशरूम प्रोजेक्ट, अंडी प्रोडक्शन, Fmcg प्रोडक्ट प्रोडक्शन,आयुर्वेदिक मेडिसीन प्लांट,बायोफ्युल डेवलपमेंट प्लांट, अॅग्री आणि रिटेल मार्ट, ऑरगॅनिक फार्मिंग, व इतर आग्री प्रोडक्ट मॅन्युफॅक्चरिंग, कोल्ड स्टोरेज, सीएस फार्मिंग,किसान सेवा केंद्र,किसान कॉल सेंटर,सेल्स आणि मार्केटिंग, महिला व पुरुष गटांना प्रशिक्षण देणे,पापड उद्योग, फुलाची शेती,शेतकऱ्यांना प्रशिक्षण देणे,करार पद्धतीने शेती करणे, शेतकऱ्यांना पिकासाठी मोफत मार्गदर्शन करणे,शेतकऱ्यांना क्रेडीटवर रोपे अवजारे बी-बियाणे ,खत-बियाणे देणे,स्वच्छ भारत अभियान राबवणे.

**संदर्भ ग्रंथ**

१. एफ.पी .ओ . सहाय्यता केंद्र, सातारा

२.कृषी विज्ञान केंद्र  कोल्हापूर

3.www.marathi.fposahayatakrndra.com

4. https://www.nabard.org

5.http://sfacindia.com

# 'बारोमास' कादंबरीतून चित्रित झालेले कृषिआधारित ग्रामजीवन : एक अभ्यास

**डॉ. राहुल भालेराव पाटील**
सहाय्यक प्राध्यापक,मराठी विभाग, गोखले एज्युकेशन सोसायटीचे कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय,जव्हार, जि. पालघर.
ईमेल –patilrahulb14@gmail.com

**प्रस्तावना :**

मराठी साहित्यात वास्तववादी अशा ग्रामीण कादंबऱ्यांची अतिशय दीर्घ अशी परंपरा आहे. मराठीतील पहिली ग्रामीण कादंबरी कृष्णराव भालेकर लिखित 'बळीबा पाटील'ही १८७७ साली 'दीनमित्र'मधून प्रकाशित झाली. त्यानंतर १९०२ साली धनुर्धारी यांची 'पिराजी पाटील' लिहिली गेली. या कादंबऱ्या वास्तववादी स्वरूपाच्या व ग्रामीण प्रश्नांना सर्वप्रथम वाचकासमोर मांडणाऱ्या होत्या. मधल्या काळात ही परंपरा खंडित झाली. त्यानंतर १९६० नंतर पुन्हा अशा वास्तव व ग्रामीण जीवनाला केंद्रस्थानी ठेवून लिहिल्या जाणाऱ्याकादंबऱ्यांची एक सलग अशी परंपरा मराठी सुरू झाली. त्यात 'धग', 'इंधन', 'टारफुला', 'लिगाड', 'पांगिरा', 'विषवृक्षाच्यामुळया', 'तहान', 'झाडाझडती', 'हाल्या हाल्या दुधू दे' अशा अनेककादंबऱ्या आहेत. 'बारोमास' ही या परंपरेतील एक महत्त्वाची कादंबरी मानली जाते.

'बारोमास' ही सदानंद देशमुख यांची ग्रामीण जीवनाचा सर्वांगीण वेध घेणारी कादंबरी २००२ साली प्रकाशित झाली. या कादंबरीला २००४ साली भारत सरकारचा साहित्य अकादमी पुरस्कार मिळालेला आहे.

**'बारोमास' कादंबरीचे आशयसूत्र :**

'बारोमास' ही कादंबरी विदर्भातील मोहाडी तालुक्यातील सांजोळ गाव व त्या भोवतालच्या ग्रामीण परिवेश यावर आधारलेली आहे. या कादंबरीत तीन पिढ्यांचे चित्रण आलेले आहे. नानूआजा, वडील सुभानराव-आई शेवंता, त्यांची मुलं एकनाथ, मधू, सून अलका अशा या तीन पिढ्या आहेत. नानूआजा पारंपरिक पद्धतीने शेती करायचे, सुभानराव पुढे काळासोबत हायब्रीड बियाणे, रासायनिक खते, कीटकनाशके यांच्या सहाय्याने आधुनिक शेती करू लागतात. ते अशिक्षित असतात. तिसऱ्या पिढीतील एकनाथ हा प्रथम श्रेणीत एम. ए., बी. एड. झालेला असून मधूचे शेतकीचे शिक्षण झालेले आहे. एकनाथचे शिक्षक किंवा प्राध्यापक बनण्याचे तर मधूचे तलाठी किंवा ग्रामसेवक बनण्याचे स्वप्न होते. दोघेही शिक्षणात हुशार होते. एकनाथचे शिक्षण व उज्ज्वल भविष्याचा विचार करून मोहाडी तालुक्यातील श्रीमंत इंजिनियर आपल्या बी.एस्सी. झालेल्या मुलीचे लग्न एकनाथशी लावून देतो. परंतु एकनाथ व मधु यांच्याकडे डोनेशनसाठी पैसे नसल्याने त्यांना अखेरपर्यंत नोकरी मिळत नाही. शिक्षण घेऊनही नोकऱ्या न मिळाल्याने व शेतीत फार पिकत नसल्याने त्यांच्या कुटुंबाची आर्थिक घडी विस्कटत जाते. अशा या कुटुंबाच्या वाताहतीचे तसेच बदलत्या ग्रामवास्तवाचे, कृषिजीवनाचे चित्रण या कादंबरीत आलेले आहे.

**'बारोमास' कादंबरीतील शेतकऱ्यांचे जीवन, त्यांच्या समस्या :**

बारोमास म्हणजे बारा महिने. बारा महिने शेतकऱ्यांना शेतीची कामे करत असताना पेरणीपासून ते कापणीपर्यंत व शेतमाल मार्केटमध्ये नेऊन तो विकून पैसे मिळेपर्यंत; तर पुढील वर्षांच्या पेरणीपूर्वी मशागतीपर्यंत शेतकऱ्यांना ज्या काही हालअपेष्टांना सामोरे जावे लागते, त्याचे चित्रण या कादंबरीत सदानंद देशमुख यांनी अतिशय वास्तवदर्शी शैलीतून साकारलेले आहे. कादंबरीच्या सुरुवातीला एकनाथ त्याच्या कल्याणीच्या मळयात बसलेला असून एकूणच मागच्या दहा-पंधरा वर्षातील कृषिव्यवस्थेतील बदल, उत्पन्न याबद्दल विचार करतो आहे. याच वेळेस एकनाथला आपल्या नानूआजाची आठवण येते. साधारणत: पंधरा वर्षांपूर्वी ते पारंपरिक पद्धतीने शेती करायचे. नानूआजाचा संकरित बियाणे, रासायनिक खते, कीटकनाशके याला प्रचंड विरोध होता. त्यांच्या मते हे रसायन असून ते जास्त दिवस चालणार नाही. त्यामुळे जमिनीचा पोत बिघडून ती नापिक होऊन जाईल. तसेच संकरित, रसायनयुक्त अन्न खाल्ल्याने आपणही निकस होऊन जाऊ. ते स्वतः संकरित व रसायनयुक्त खायला नकार देतात व सगळीकडे संकरित धान्याचे उत्पादन सुरू झाल्यावरही सुरुवातीचे दोन वर्ष मुलाला (सुभानराव) गावरान बियाणेच पेरायला सांगतात.

लोक संकरित बियाणे वापरुन एकरी २०-२५ पोते धान्य पिकवू लागतात. मग सुभानराव बापाशी भांडून आधुनिक शेती करू लागतो. फक्त बापासाठी थोड्या जमिनीत गावरान धान्य पेरतो. परंतु हायब्रिड धान्य लवकर निघत असल्याने सगळ्या शिवारात फक्त हेच पीक असायचे. त्यामुळे शेतातील गावरान धान्याची कणसे पक्षी खाऊन टाकू लागतात. तेवढ्या शेतजमिनीतून काहीच पिकेनासे होते. पुढे नानूआजाला गावरान अन्न खायला मिळत नाही. असे असूनही ते हायब्रीड अन्न खायला नकार देतात. सुभानरावाला आजूबाजूच्या गावांमध्ये, तालुक्यांमध्ये गावरान गहू, ज्वारी मिळत नाही. त्यामुळे नानूआजाची उपासमार होऊ लागते. ते खाणे-पिणे सोडतात. त्यातच त्यांचे काही दिवसांनातर निधन झाले. आधुनिक शेती करूनही पुढे परवडेनासे होते. कारण उत्पन्न वाढले तसा उत्पादनखर्चही प्रचंड वाढला. आधुनिक पद्धतीने शेती करण्याच्या नावाखाली अधिक उत्पन्न मिळविण्यासाठी रासायनिक खते आली, संकरित बियाणे आली. संकरित बियाण्यांपासून आलेले पीक नाजूक असल्याने त्याच्या संगोपनासाठी, त्याच्यावर कीड पडू नये व पडलेली कीड नष्ट व्हावी यासाठी कीटकनाशके आली. शेतीतील उत्पन्न वाढले. मात्र त्यासोबत उत्पादन खर्चही वाढला. पेरणीच्या काळात संकरित बियाणे खरेदी व नंतर रासायनिक खते विकत घेण्यासाठी पैशांची जुळवाजुळव करताना शेतकरी घायकुतीला येऊ लागले. त्यानंतर कीटकनाशके खरेदी, शेतीतील मशागत, सुगीच्या दिवसातील कामे, घरखर्च, आरोग्य, शिक्षण हे सर्व कर्ज काढून करू लागले. त्यामुळे घरात पीक आले की, त्यांना ते लगेच मार्केटला न्यावे लागू लागले. आधी ते घरात दोन-तीन वर्षांचे धान्य वगैरे साठवून ठेवायचे. आता कर्जाची फेड करण्यासाठी तसेच व्याजाची गती थांबविण्यासाठी त्याला ते विकण्याशिवाय दुसरा पर्याय राहिला नाही. नानूआजा याबद्दल म्हणायचा, “आरे, आशी कशी ही आधुनिक शेती? तुमच्या घरात काईच माल नाई. हे त घर खंदून आंगण भरणं चाललं. तुमच्या खड्ड्यातली माती खड्ड्यातच राह्यली.” (पृ. १), “आरे पीक व्हते म्हणता बदबद. पण त्यो नुस्ता भपका. दिसायले देखावा. सम्दं उत्पन्न खर्चातच आटून जाते ना तुमचं... हे बर्कतीचं आस्त त पैसा जाते कुठी तुमचा? हायल्या कावून नाई बांधून राह्यले शेतकरी” (पृ. २).अशा प्रकारे आधुनिक पद्धतीने केली जाणारी शेतीही ग्रामीण भागातील शेतकऱ्यांना फायदेशीर ठरली नाही. आधुनिक तंत्र, रासायनिक खते, कीटकनाशकाच्या फवारण्या या व इतर गोष्टींमुळे उत्पादन खर्च वाढला. त्यामानाने उत्पन्न मात्र वाढले नाही व आलेल्या उत्पन्नाला योगी तो हमीभाव मिळत नसल्याने शेतकरी हवालदिल झालेले दिसून येतात. या कादंबरीतील एकनाथ हा शेतकरी कुटुंबातील आहे. त्याच्याकडे कोरडवाहू व बागायती अशी दोन्ही प्रकारची शेती आहे. वर्षानुवर्षे शेतात कष्ट करूनही त्याची व त्याच्या कुटुंबाची आर्थिक परिस्थिती सुधारलेली नाही. दरवर्षी पेरणीच्या वेळेस त्यांना व्याजाने कर्ज घ्यावे लागते.एकनाथच्या आईचे सर्व दागिने, बायकोची पोत घरखर्चासाठी विकावी लागलेली आहे. मधू(एकनाथचा भाऊ) तर त्याचा स्वतःचा खर्च भागविण्यासाठी शेतातील जवळपास सर्व झाडे टप्याटप्याने विकून टाकतो. घरात शेतीशिवाय उत्पन्नाचे दुसरे साधन नाही. एकनाथचे पाहुणेही शेतकरी असून कर्जबाजारी झाल्याने आत्महत्या करून घेतात. लेखकाने कादंबरीत चित्रण केल्याप्रमाणे या गावातील तसेच या भागातील शेतकरी आधी पारंपरिक पद्धतीने शेती करायचे, तेव्हा कमी पिकायचे. तरीही उत्पादन खर्च काहीही नसल्याने शेती परवडायची, परंतु मागच्या १५-२० वर्षात या भागातील शेतकरी आधुनिक शेतीकडे वळले. आधुनिकतेच्या नावाखाली कंपनीतून तयार झालेली संकरित बियाणे, रासायनिक खते, कीटकनाशके यांचा वापर वाढल्याने उत्पादन खर्चही जास्त वाढला. त्यामानाने उत्पन्न कमी येऊ लागले व आलेच तरी आधीच उत्पादन खर्चासाठी कर्ज उचललेले असल्यामुळे ते लगेच विकण्यासाठी मार्केटला न्यावे लागले. एकाच वेळेस मार्केटमध्ये आवक वाढल्यामुळे कमी भावात शेतमाल विकला जाऊ लागला. अशाएका दुष्टचक्रामध्ये ग्रामीण भारतीय शेतकरी सापडला. याला मार्केटचे तंत्र, कंपन्या, सरकारचे धोरण, व्यापारी, चढ्या व्याजदराने कर्ज देणारे सावकार हे जसे जबाबदार आहेत, तसेच लहरी निसर्गही जबाबदार आहे. 'बारोमास' कादंबरीतील एकनाथ, त्याच्या गावातील परिसरातील इतर शेतकरी, त्याचे पाहुणे यांना पाऊस वेळेवर न पडल्यामुळे, पेरलेले उगवले नसल्यामुळे दुबार पेरणी करावी लागते. म्हणजे आधी बी बियाण्यांसाठी जो खर्च केला होता, तो वाया गेला. त्यात पुन्हा ते विकत घ्यावे लागते. त्यासाठी एकनाथला महाकाळ या सावकाराकडून महिन्याला १०% टक्क्याच्या व्याजदराने कर्ज काढावे लागले. त्याचा मेहुणा कर्जबाजारी झाल्यामुळे आत्महत्या करतो. म्हणजेच शेतकऱ्यांच्या आर्थिक दुरावस्थेला निसर्गही तेवढाच जबाबदार आहे.

एकनाथ हा हुशार, कवीमनाचा व अभ्यासू तरुण आहे. परंतु नोकरी न लागल्यामुळे व घरची आर्थिक परिस्थिती गरिबीची असल्यामुळे तो हतबल आहे. अनेक ठिकाणी मुलाखती देऊनही डोनेशनसाठी त्याच्याकडे पैसा नसल्यामुळे त्याला नोकरी मिळत नाही. मग तो शेतीतच प्रयोग करून प्रगती करण्याचा प्रयत्न करतो. कल्याणीच्या मळयात द्राक्षे व केळी ही फळपिके घेण्याचा त्याचा मानस असतो. परंतु, आधीच कर्जबाजारी, भांडवलाचा अभाव, घरात शेतीव्यतिरिक्त उत्पन्नाचे दुसरे साधन नसल्यामुळे त्याच्या याही प्रयत्नांना यश येत नाही. पेरणीच्या वेळेस बियाणे व इतर खर्चासाठी तसेच सालगड्याला उचल देण्यासाठी गावातील सावकार महाकाळ याच्याकडून १०% इतक्या राक्षसी व्याजदराने त्याला कर्ज घ्यावे लागते. या आधी त्याच्या पत्नीची(अलकाची) पोत शेतीच्या खर्चासाठीच विकलेली असते. नंतर त्याच्याकडून ती बनवली जात नाही. एकनाथचे नरूभाऊ, तेजराव खपके, समाधान चांदणे या व इतर शेतकरी नेते व कार्यकर्त्यांसोबत चांगले संबंध आहेत. एकदा शेतकऱ्यांच्या आंदोलनात सहभागी झाल्यामुळे त्याच्यावर एक खोटी केसही सुरू आहे. थोडक्यात, आंदोलनात सहभागी होणाऱ्या शेतकऱ्यांवर सरकार व प्रशासनाकडून खोट्या केसेस दाखल करून त्यांचे खच्चीकरण केले जाते, असे दिसून येते. वर्षानुवर्षाच्या अशा अनुभवामुळे शेतकरी निराश होत जातो, खचत जातो. त्याला साध्या-साध्या गरजाही भागवता येत नाहीत. एकनाथची आई जुन्या साड्यांचे दांडे भरून, जोडून, ते वापरते. एकनाथला वापरायला पुरेसे कपडे नसतात. ही परिस्थिती जवळपास सर्व शेतकऱ्यांची आहे. एकनाथच्या घराच्या छताची माती खाली पडत राहते. परंतु त्याला ते दुरुस्त करणे शक्य होत नाही. त्याला शेतीत सुधारणा करून फळशेती करायची आहे. परंतु भांडवल नाही. डोनेशनअभावी त्याला नोकरी मिळत नाही. म्हणून त्याची सुशिक्षित असलेली बायको त्याला कायमस्वरूपी सोडून निघून जाते.

**ग्रामीण भागातील सुशिक्षितांचा गंभीर व चिंताजनक प्रश्न :**

ग्रामीण भागामध्ये सुशिक्षित तरुणांना नोकऱ्या मिळत नसल्याने ती एक गंभीर समस्या होऊन बसली आहे. 'बारोमास'या कादंबरीत दिलीप पवार, मधू, दिनकर दाभाडे, एकनाथ यासारख्या सुशिक्षित परंतु बेरोजगार नोकरीला लागू न शकलेल्या अनेक तरुणांचा उल्लेख तर अनेकांचे चित्रण आलेले आहे. वशिला, गरिबीमुळे डोनेशन देऊ न शकणे, ग्रामीण भागातील वास्तव्य यामुळे बऱ्याच गोष्टी उशिरा माहित होणे यामुळे या तरुणांना नोकरी मिळत नाही. घरी शेतीशिवाय दुसरा व्यवसाय, उत्पन्नाचे दुसरे साधन नाही. हाताला काम नाही. म्हणून हे टोळी बनवून जमिनीखालील सोनं शोधण्याचा प्रयत्न करतात. कित्येक दिवस खोदकाम करूनही त्यांना जुन्या विटा, मुर्त्या इत्यादीशिवाय दुसरे काहीच मिळत नाही. कादंबरीच्या शेवटी हताश होऊन मधु व त्याचे मित्र रस्त्यावरून वाहणाऱ्या गाड्या लुटण्याचा निर्णय घेतात. म्हणजे ते गुन्हेगारीकडे वळतात.

थोडक्यात,ग्रामीण भागात जर अशीच सुशिक्षित बेरोजगारांची संख्या वाढत राहिली व त्यांना नोकरी अथवा हाताला काम मिळाले नाही, तर ते वाममार्गाकडे वळू शकतात, याचे सूचक भाकीत 'बारोमास' या कादंबरीतून लेखकाने केलेले आहे. परंतु याच वेळेस यांच्यासारखाच सुशिक्षित परंतु बेरोजगार असूनही एकनाथसारखा तरुण शेतकरी चळवळीच्या माध्यमातून शेतकऱ्यांच्या शेतमालाला भाव मिळावा, त्यांना न्याय मिळावा, शेतमालाच्या आयात-निर्यातीच्या धोरणांमध्ये शेतकऱ्यांना अनुकूल अशी धोरणे सरकारने आखावीत, यासाठी आंदोलन, संघर्ष करताना दिसून येतो. त्यासाठी तुरुंगात जातो. थोडक्यात एकाच कुटुंबातील दोन परस्पर भिन्न प्रवृत्तीच्या भावांचे व्यक्तिचित्र रेखाटून लेखकाने वास्तवावर जळजळीत असा प्रकाश टाकलेला दिसून येतो.

**'बारोमास'कादंबरीची भाषाशैली :**

'बारोमास' कादंबरीची भाषा ही या कादंबरीचे एक अतिशय महत्त्वाचे बलस्थान आहे. या कादंबरीचे निवेदन जरी प्रमाण मराठीत केलेले असले, तरी ग्रामीण भागातील पात्रांच्या तोंडाची म्हणजे संवादाची भाषा मात्र ग्रामीण आहे. नेमके सांगायचे म्हणजे विदर्भातील बुलढाणा जिल्हा व या परिसरातील आहे. वैदर्भीय भाषेतील गोडवा, जिवंतपणा, सहजता आपल्याला या पात्रांच्या संवादांतून पाहायला मिळते. असे असले तरी सर्वच पात्रांची भाषा ही ग्रामीण वैदर्भीय स्वरूपाची नसून जी उच्चशिक्षित व शहरी पात्रे या कादंबरीत आलेले आहेत. उदा. अलका, तिचे आईवडील, बहिणी यांची भाषा ही प्रमाण मराठी आहे. एकनाथ एम. ए., बी.एड. झालेला असल्यामुळे तसेच

शहरात शिकलेला असल्यामुळे त्याची भाषा संस्कारित झालेली आहे. मात्र नोकरी न लागल्यामुळे त्याला खेड्यात राहावे लागते. तेव्हा त्यांची भाषाही त्याच्याही नकळत गावाकडच्या भाषेसारखी बनत जाते. कधी ज्याच्याशी प्रमाण मराठीतून बोलावे, त्याच्याशी ग्रामीण भाषेत तर ज्यांच्याशी ग्रामीण भाषेत बोलावे, त्यांच्याशी प्रमाण मराठीत असा त्याचा सुरुवातीचा भाषिक गोंधळही या कादंबरीत आलेला आहे. थोडक्यात, उच्चशिक्षितांची भाषेच्या बाबतीत पंचाईत याठिकाणी आपल्याला पाहायला मिळते.

या कादंबरीत संवादाच्या भाषेतून आपल्याला वैदर्भीय बोलीभाषेतील अनेक अर्थपूर्ण शब्द, विविध अर्थच्छटा असलेल्या म्हणी, वाक्यप्रचार यांची रेलचेल दिसून येते. एकनाथच्या मनातील दुःखाचे, आतल्या वेदनेचे वर्णन करण्यासाठी लेखकाने यादवकाळातील भाषेचा (महानुभाव संप्रदायाच्या गद्यशैलीचा) अतिशय समर्पकपणे उपयोग करून घेतलेला आहे.

**समारोप :**

थोडक्यात,'बारोमास' ही ग्रामीण जीवनाचे सर्वांगीण चित्रण करणारी २००० नंतरची एक महत्त्वाची कादंबरी आहे. जागतिकीकरणानंतरच्या कालखंडात ग्रामीण भागातील शेतकरी, शेतमजूर, शेतीपूरक व्यावसायिक यांच्यापुढे जगण्याच्या ज्या गंभीर समस्या उभ्या राहिलेल्या आहेत, त्यावर ही कादंबरी प्रकाश टाकते. पारंपरिक शेतीत बदल, आधुनिकीकरण, वाढता उत्पादनखर्च, जमिनीची होणारी धूप, नापिकी, दुष्काळ, शेतमालाला योग्य भाव न मिळणे, त्यासाठीची आंदोलने,शेतकऱ्यांवर दाखल होणाऱ्या खोट्या केसेस, शेतकऱ्यांच्या आत्महत्या, शिकून नोकरी न मिळणे अशा असंख्य समस्यांनी ग्रामीण भाग होरपळून निघत आहे. या वास्तवाचे चित्रण या कादंबरीत झालेले दिसून येते. ज्या भागातील चित्रण या कादंबरीत आहे, त्याच वैदर्भी भाषेतून हे जीवन चितारलेले असल्याने तिला वास्तवाचे, कलात्मकतेचे एक परिमाण लाभलेले आहे.

**संदर्भ ग्रंथ :**

१) देशमुख, सदानंद,'बारोमास', कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, तृतीयावृत्ती, २००७.

२) मोकाशी, मधुकर,'ग्रामीण-दलित साहित्य : चळवळ आणि समीक्षा', स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे, २००९.

*'Journal of Research & Development' A Multidisciplinary International Level Referred and Peer Reviewed Journal, Impact Factor-7.265, ISSN: 2230-9578, 30 October2021, Volume-12, Issue-15*
*Agriculture and Rural Development: Strategic Issues and Reform Options*

# वाशिम जिल्ह्यातील लोकसंख्येची घनता व जलसिंचनाची तीव्रता –भौगोलिक विश्लेषण

**डॉ. विजय ब. खराते**
असोसियट प्रोफेसर भूगोल विभाग प्रमुख कला विज्ञान महाविद्यालय, कामरगाव ता. कारंजा लाड, जि. वाशिम

**प्रस्तावना**

जलसिंचनाचा कृषीभूमीवर संरक्षणात्मक व भूमी उपयोजनात्मक अशा दोन दृष्टिकोनातून परिणाम होतो. जलसिंचनाचे किंवा पाण्याचे मानवी इतिहासात अतिशय महत्त्व आहे. कृषी उत्पादकतेच्यादृष्टीने जलसिंचनाचा विचार करावयाचा झाला तर कृषीत जी पिके घेतली जातात त्यासाठी कृषीभूमी उपयोजनात पाणी पुरवठा अत्यंत महत्त्वाचा घटक आहे. हा घटक पावसावर अवलंबून असल्याने अनिश्चित असतो त्यामुळे पिकांना पाहिजे त्या प्रमाणात पाणी मिळत नाही. परिणामतः कृषीभूमी उपयोजनात जलसिंचनाखालील स्थूल क्षेत्राचे प्रमाण वाढविणे आवश्यक आहे. वाशिम जिल्ह्यातील जलसिंचनाचा भूमी उपयोजनात्मक परिणाम या दृष्टिकोनातून वाशिम जिल्ह्यातील लागवडीखालील कृषी भूमीतील जलसिंचनाचे प्रमाण आणि संभाव्य कृषी भूमी असलेली पडित व अकृषक भूमी जलसिंचनामुळे लागवडीखाली आणल्या जाण्याची शक्यता भूमी उपयोजनाच्या अध्ययनातून पडताळून पाहिल्या जात आहे. वाशिम जिल्ह्यातील कारंजा, वाशिम, मंगरूळपीर, मालेगाव, मानोरा, रिसोड या सहा तालुक्यांमध्ये जलसिंचित क्षेत्र प्रमाणामध्ये भिन्नता आढळते. त्यामुळे जिल्ह्यामध्ये कृषीय-आर्थिक भिन्नता निर्माण झाल्याने ती जलसिंचनामुळे थोड्या फार प्रमाणात कमी करता येते. म्हणून जलसिंचनाचा हा भूमी उपयोजनात्मक परिणाम सांस्कृतिक व आर्थिक विकासावर साधणे अत्यंत आवश्यक झालेला आहे असे स्पष्ट होते.

**उदिष्टे –**

वाशिम जिल्हयातील लोकसंख्येची वाढत्या घनतेच्य प्रमाणात जलसिंचनाच्या तिव्रतेची अभ्यास करणे व बदलत्या काळानूसार लोकसंख्येची घनता व जलसिंचनाच्या तिव्रतेच्या प्रारूपात होणारा बदल अभ्यासणे हा संशोधन पत्रिकेचा प्रमुख उद्देश आहे.

**अभ्यास क्षेत्र**

अलिकडेच १ जुलै १९९८ मध्ये पश्चिम विदर्भातील अकोला जिल्ह्याचे विभाजन करून वाशिम जिल्ह्याची निर्मिती करण्यात आली. अकोला जिल्ह्याचे क्षेत्र प्रशासकीयदृष्ट्या मोठे असल्यामुळे या जिल्ह्याचे विभाजन वाशिम जिल्ह्यात करण्यात आले आहे.

वाशिम जिल्हा अक्षवृत्तीय १९°६' ते २०°४७' उत्तर अक्षांश आणि ७६°७' ते ७७°१४' पूर्व रेखांश दरम्यान विस्तारलेला आहे. संपूर्ण जिल्ह्याचे क्षेत्रफळ ५१९६ चौ.कि.मी. असून हा जिल्हा वाशिम, कारंजा, मंगरूळपीर, मालेगाव, मानोरा, रिसोड या ६ तालुक्यात विभागालेला आहे.

२०११ च्या जनगणनेनुसार वाशिम जिल्ह्याची एकूण लोकसंख्या ११,९६७१४ असून लोकसंख्येची घनता २४४ व्यक्ती प्रतिवर्ग कि.मी. आढळून येते. जिल्ह्यातील हवामान साधारणतः उष्ण व कोरडे असून कमाल तापमान ४५° से. व किमान तापमान १५° से. आहे. सरासरी पर्जन्यमान साधारणपणे ७५० ते १०५० मि.मी. एवढे आहे. वाशिम जिल्ह्यातील प्रमुख नदी पैनगंगा असून काटेपूर्णा, अडाण, बेंबळा, पूस, मन इत्यादी तिच्या उपनद्या आहेत. वाशिम जिल्ह्याच्या सीमावर्ती भागात दक्षिणेस हिंगोली, पूर्वेस यवतमाळ, उत्तरेस अमरावती आणि पश्चिमेस अकोला व बुलढाणा जिल्ह्याच्या सीमा संलग्न आहेत.

**संशोधन पद्धती व माहिती संकलन**

वाशिम जिल्ह्यातील लोकसंख्या वाढ आणि आर्थिक व सांस्कृतिक भूमी उपयोजन अभ्यासण्याकरिता वाशिम जिल्ह्यातील वर्ष १९८१, वर्ष १९९१ व वर्ष २००१ आणि वर्ष २०११ मधील लोकसंख्या वाढ व जलसिंचन व भूमी उपयोजनांतर्गत जलसिंचनाचे साधने याविषयी आकडेवारी वाशिम जिल्ह्याचे जिल्हा आर्थिक समालोचन, जिल्हा सांख्यिकीय कार्यालय वाशिम येथून गोळा करून तसेच जनगणना अहवाल व प्रत्यक्ष निरीक्षण करून शासकीय कार्यालयातून संबंधित माहिती संकलित केली. या संकलित माहिती व आकडेवारीवर संख्याशास्त्रीय तंत्रे, सांख्यिकी पद्धती व नकाशाशास्त्रीय तंत्राचा वापर करून संबंधित घटकाचे स्पष्टीकरण केले आहे.

**स्पष्टीकरण**

प्रस्तुत संशोधन पत्रिकेमध्ये वाशिम जिल्हयातील 1981 ते 2011 या कालावधी मध्ये लोकसंख्या व जलसिंचन क्षेत्र प्रमाणात काळानुसार भूमीउपोजनात्मक बदल कश्या प्रारूपात होत गेला हे विश्लेषण करण्याकरीता अभ्यास क्षेत्रातील तालुकानुसार लोकसंख्येची घनता व जलसिंचनाची तिव्रता सुत्राद्वारे काढून त्यांचा भूमी उपयोजनात्मक बदल सहसंबंधाद्वारे स्पष्ट करण्यात येत आहे. त्यासाठी 1981 ते 2011 लोकसंख्या जलसिंचनाच्या आकडेवारीचा उपयोग करून खालील सुत्रानुसार लोकसंख्येची घनता व जलसिंचनाची तीव्रता काढण्यात आली आहे.

१) $\text{लोकसंख्येची घनता} = \frac{\text{तालुक्यातील एकूण लोकसंख्या}}{\text{तालुक्याचे क्षेत्रफळ}}$

२) $\text{जलसिंचनाची तीव्रता} = \frac{\text{तालुक्यातील जलसिंचनाखालील क्षेत्र}}{\text{तालुक्याचे लागवडी खालील क्षेत्र}} \times 100$

वाशिम जिल्हयातील कारंजा, वाशिम, मंगरूळपिर, मालेगाव, मानोरा, रिसोड या सहा तालुक्यांमध्ये लोकसंख्येची घनता व जलसिंचनाच्या तीव्रतेतील क्षेत्रामध्ये काळानुसार भिन्नता आढळते. वाशिम जिल्हयातील जलसिंचनाच्या विविध साधनाद्वारे ओलिताखाली जलसिंचनाचे प्रमाण वाढवून व लागवडी खालील क्षेत्राच्या आधारावर जलसिंचन तिव्रतेच्या प्रारूपाचा अभ्यास करण्यात आला आहे. सारणी क्रमांक 1 वरून 1981 ते 2011 या 30 वर्षाच्या कालावधीत ज्या तालुक्यात लोकसंख्येची घनता वाढली आहे. त्याच तालुक्यात जलसिंचनाच्या तीव्रतेत बदल

झालेला दिसून येतो. वर्षे 1981 ते 2011 च्या दरम्यान वाशिम जिल्हयातील जलसिंचित क्षेत्र प्रमाणातील बदलांचा अभ्यास करता 1981 मध्ये जिल्हयाची लोकसंख्येची घनता 119 चौ. कि.मी व जलसिंचनाची तीव्रता 3.20 टक्के होती. परंतु 30 वर्षाच्या कालावधी मध्ये जिल्हयात सिंचनाच्या सोयी व साधने उपलब्ध केल्यामुळे सिंचन क्षेत्र वाढले. 2011 मध्ये लोकसंख्येची घनतेत वाढ होवून 244 चौ. कि.मी. झाली. व जलसिंचनाच्या तीव्रता 7.42 टक्के झाली, हा बदल 4.22 टक्के प्रमाणात झालेला आढळून येतो. वर्षे 1981 या वर्षात पुष्ठभागीय व विहीरीद्वारे तसेच इतर साधनांद्वारे ओलीताखालील सरासरी 100 हेक्टर कृषी क्षेत्रामागे 28 हेक्टर कृषी क्षेत्र जलसिंचनाखाली होते. तालुका नुसार लागवडीलखाली क्षेत्राचा अभ्यास करता वर्षे 1981 मध्ये मानोरा तालुक्यात सर्वात कमी 1.97 टक्के तर सिसोड तालुक्यात सर्वात जास्त 5.24 टक्के जलसिंचनाची तीव्रता आढळून आली. तर लोकसंख्येची घनता सर्वात कमी मालेगाव व सर्वात जास्त कारंजा तालुक्यात आढळून येत.

**सारणी क्र. 1 नुसार**

कालसापेक्ष तुलनात्मक बदलांचा अभ्यास करता असे स्पष्ट होते की, 2011 मध्ये वाशिम जिल्हयातील एकूण लागवडी खालील कृषी क्षेत्र 423430 हेक्टर असून त्यापैकी जलसिंचना खालील 314160 हेक्टर क्षेत्र आहे त्यावरून जिल्हयातील सरासरी जलसिंचनाची तीव्रता 7.42 टक्के आढळून येते. तालुक्यानूसार जलसिंचनाची तीव्रता व लोकसंख्येची घनता अभ्यासता मंगरूळपिर मध्ये जलसिंचनाच्या तीव्रतेचे प्रमाण सर्वात जास्त 12.60 टक्के आहे तर सर्वात कमी कारंजा तालुक्यात 3.93 टक्के आढळून येते. तसेच लोकसंख्येची घनता सर्वात जास्त वाशिम तालुक्यात 310 चौ. कीमी. तर सर्वात कमी मालेगाव तालुक्यात 180 चौ.कि.मी. आढळून येते.

**लोकसंख्या आणि जलसिंचन क्षेत्र प्रमाणातील भूमी उपयोजनात्मक बदल**

**वर्ष १९८१-२०११**

| अ.क्र. | तालुका | लोकसंख्या घनता | | | जलसिंचनाची तीव्रता (%) | | | सहसंबंध |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | 1981 | 2011 | बदल | 1981 | 2011 | बदल | |
| 1 | वाशिम | 137 | 31 | 173 | 3.32 | 9.66 | 6.34 | |
| 2 | कारंजा | 183 | 240 | 57 | 2.45 | 3.93 | 1.48 | |
| 3 | मंगरूळपीर | 130 | 230 | 100 | 3.30 | 12.60 | 9.03 | |
| 4 | मालेगाव | 108 | 180 | 72 | 2.82 | 4.62 | 1.08 | |
| 5 | मानोरा | 132 | 195 | 63 | 1.97 | 6.64 | 4.67 | |
| 6 | रिसोड | 137 | 235 | 98 | 5.24 | 7.19 | 1.95 | |
| | **एकूण** | **119** | **244** | **125** | **3.20** | **7.42** | **4.00** | |

## वाशिम जिल्हा : लोकसंख्येची घनता व जलसिंचनाची तीव्रता यातील सहसंबंध




वाशिम जिल्हा : लोकसंख्या घनता व जलसिंचन तिव्रता
वर्ष २०११




वाशिम जिल्ह्यातील जलसिंचन क्षेत्र प्रमाणातील भूमी उपयोजनात्मक बदलाचे अध्ययन करता वर्ष १९८१ या तीस वर्षीय काळात जलसिंचन क्षेत्र प्रमाणातील भूमी उपयोजनात्मक कालीक बदलाचे निष्कर्षात्मक विवेचन करता मंगरूळपीर तालुक्यामध्ये जलसिंचीत भूमी प्रमाणात

विशेष वृद्धी झालेली आहे. हा धनात्मक कालीक बदल ९.०३ टक्के एवढा असून मंगरूळपीरनंतर वाशिम तालुक्यामध्ये सुद्धा जलसिंचीत कृषीभूमी क्षेत्र प्रमाणात ६.३४ टक्के एवढा तीसवर्षीय कालीक बदल झालला आहे. एकंदरित वर्ष २००१ नंतर वाशिम जिल्ह्यामध्ये जलसिंचनाच्या प्रमाणात अल्प का होईना वृद्धी होत आहे त्यामध्ये वर्ष २०११ मधील जलसिंचीत कृषीभूमी क्षेत्रात सकारात्मक बदल झालेला आढळून येतो आहे.

लोकसंख्येतील बदल आणि जलसिंचीत कृषीभूमी क्षेत्रात बदल यामधील सहसंबंध ०.५१ असून तो धनात्मक मध्यमप्रतीचा सहसंबंध दर्शवितो. वाढत्या लोकसंख्येकरिता भूमीची उत्पादकता वाढविण्यास जलसिंचनाचे भूमी उपयोजनात्मक नियोजन करणे महत्त्वपूर्ण असल्यामुळे २०११ मध्ये जलसिंचित क्षेत्रात वाढ झाली असल्याचे स्पष्ट होते.

**निष्कर्ष**

वाशिम जिल्हयातील 1981 ते 2011 या 30 वर्षातील लोकसंख्येची घनता व जलसिंचनाच्या तीव्रतेचा अभ्यास केला असता असा निष्कर्ष् प्राप्त होतो की जलसिंचनाची साधने, विकास, सिंचनीत क्षेत्र, सिंचनाखालील पिके व लोकसंख्येच्या घनतेचा भूमी उपयोजनात्मक घनिष्ठ संबंध आहे. हा संबंध सांख्यिकीय आकडेवारीच्या आधारे 0.51 धनात्मक मध्यम स्वरूपाचा सहसंबंध दर्शवितो वाढत्या लोकसंख्येला कृषी उत्पादकता वाढविण्यास जलसिंचनाचे नियोजन करणे असल्यामुळे मागील 30 वर्षात जलसिंचीत क्षेत्रात वाढ झाल्याचे आढळून येते वाशिम जिल्हयात अडान नदीवर अडान प्रकल्प सर्वात मोठा जलसिंचन प्रकल्प आहे. याशिवाय अरूणावती नदीवर सोनल तसेच अडाळ गायीली इत्यादी लहानमोठे प्रकल्प निर्माण करून विहीरी कुंपनलिका, लघुपाट कोल्हापूरी बंधारे इत्यादीद्वारे उपसिंचन केल्या जाते व त्याद्वारे मोठ्या प्रमाणात सिंचनक्षेत्र वाढल्यामुळे वाढत्या लोकसंख्येच्य घनतेनुसार जलसिंचनाची तीव्रता वाढतांना सूध्दा आढळून येते. वाशिम जिल्ह्याचा कृषीविषयक उत्कर्ष साधण्यासाठी जिल्ह्यामध्ये सिंचन प्रकल्प उभारून सिंचन क्षमता वाढविणे आवश्यक आहे. वाशिम जिल्ह्यातील जी कृषी हंगामी आहे त्या कृषीभूमीवर जलसिंचनाच्या साहाय्याने सखोल लागवड करण्यात येते आहे व जिल्ह्यातील एकूण लागवडीखालील भूमी क्षेत्रामध्ये जलसिंचीत क्षेत्राची उत्तरोत्तर वाढ करण्याकडे कृषीधरांचा कल दिसून येतो आहे. परंतु संपूर्ण वाशिम जिल्ह्यातील जलसिंचनाच्या विविध साधनाद्वारे ओलिताखालील क्षेत्राचे प्रमाण हे जिल्ह्यातील कृषी क्षेत्र प्रमाणाच्या तुलनेत अत्यंत कमी आहे.

**संदर्भ सूची**

१) अग्रवाल ए.एन., (१९७७) "पॉप्युलेशन", नॅशनल बुक ट्रस्ट, दिल्ली.

२) बार्कले जॉर्ज एम., (१९५८), "टेकनिक्स ऑफ पॉप्युलेशन ॲनालिसीस", जॉन विले ॲड

a. सन्स् लि., न्यूयॉर्क.

३) भेंडे आशा अॅड कानिटकर तारा, (१९९२), "प्रिन्सिपल ऑफ पॉप्यूलेशन स्टडीज", हिमालया पब्लिशिंग हाऊस, फिफ्थ एडिशन, बॉम्बे.

४) ब्रायन डब्ल्यू इलबेरी, (१९७८), "अॅग्रीकल्चरल डिसीजन मेकींग अ बिव्हेअर पर्सपोक्टिव प्रोग्रेस इन ह्यूमन जीओग्रॉफी".

५) दंतवाला एम.एल., (१९६१), " ग्रीशियन स्ट्रक्चर अँड इकोनॉमीक डेव्हलपमेंट".

६) डॉ. एस. फुले, "कृषी भूगोल".

७) आर.ए. राजु (२००४), "टेक्नॉलॉजी ऑफ वॉटर मॅनेजमेंट".

८) एस.सी. पंडा (२००४), "ड्राय अॅन्ड अॅग्रीकल्चर".

९) स्टॅम्प एल.डी. (१९५८), "द मेजरमेंट ऑफ लॅन्ड रीसोर्स".

१०) Michael A.M., (1921), "Irrigation-Theory and Practice", Publishing House, New Delhi.

११) Dastane, N.G. (1972), "A Practical Manual For Water Use Research in

2. Agriculture", Navbharat Prakashan, Poona.

१२) जिल्हापरिषद कृषी अधिकारी अहवाल, वाशिम, सन २०११-१२

१३) महाराष्ट्र शासन, जलसंपदा प्राधिकीकरण वाशिम जिल्हा सन २०११-१२

१४) जोशी अ (२००९) महाराष्ट्रातील जलसंपदा, डायमंड पब्लीकेशन पूणे

# नवीन तंत्रज्ञानाचा शाश्वत कृषी विकासातील योगदान

**प्रा. मनोज किसन जाधव**
सहाय्यक प्राध्यापक अर्थशास्त्र विभाग मातोश्री वेलबाई देवजी हरिया कॉलेज, शहाड (प) जिल्हा – ठाणे
Mail – jadhavmanoj.jadhav73@gmail.com

**गोषवारा :**

शेती क्षेत्रात झालेले आमूलाग्र परिवर्तन हे हरितक्रांतीचे परिणाम आहे. म्हणून शेतीच्या विकासासाठी वापरण्यात येणारे नवे तंत्रज्ञान म्हणजे हरितक्रांती होय. कारण यापूर्वी शेतीची लागवड ही पारंपरिक पध्दतीने केली जात असे. तसेच जमिनीची मशागत देखील पारंपरिक पध्दतीने केली जात असे. या सर्व बाबींचा परिणाम हा शेती तून प्रापत होणा–या उत्पादनावर होत होता. कमी उत्पादनावर शेतक–याला समाधान मानावे लागत असे. त्याचबरोबर पिकांवर पडणारे कीड यामुळे शेतमालाचे प्रचंड नुकसान होत होते. शेतक–यांना अशा परिस्थितीतून बाहेर काढण्यासाठी एका क्रांतिकारी परिवर्तनाची गरज भासू लागली. हेच क्रांतिकारी परिवर्तन हरितक्रांतीमुळे घडून आले. हरितक्रांती मुळे शेतकरी वर्षातून दोनदा पिकांचे उत्पादन करू लागला तसेच रासायनिक खतांचा वापर करून जमिनीची सुपीकता वाढविण्यासाठी प्रयत्न करू लागला. पीक कीडनाशकांचा वापर करून पिकांचे संरक्षण करू लागला. भारतात शेतीचे ख–या अर्थाने आधुनिकीकरण करण्याकडे वाटचाल सुरू झाली. १९६०–१९७० या दशकानंतर आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर शेती क्षेत्रात होऊ लागला. त्यामुळे भारतात एक कृषी क्रांती घडून आली. प्रस्तुत शोध निबंध मध्ये नवीन तंत्रज्ञानाचा शाश्वत कृषी विकासातील योगदान हे कसे अनुकूल ठरत गेले हे मांडण्यात आले आहे. शेती विकासासाठी नवीन कृषी विकास धोरणाची भूमिका आणि नव तंत्रज्ञानामुळे भारतातील व्यापारी पिकांच्या उत्पादनात झालेल्या विकासात्मक बदलांचा अभ्यास या प्रस्तुत शोध निबंधात केला आहे.

**संशोधनाची उद्दिष्टे**

(१) हरितक्रांतीमुळे शेती क्षेत्रातील आमूलाग्र बदलाचा अभ्यास करणे.

(२) नवीन शेती विकास धोरणाचा अभ्यास.

(३) नवीन तंत्रज्ञानाचा देशातील व्यापारी पिकांच्या उत्पादनात झालेल्या विकासात्मक बदलाचा अभ्यास करणे.

**संशोधन साहित्यांचे अवलोकन आणि तथ्य संकलन**

प्रस्तुत शोध निबंधात संकलन करण्यात आलेली माहिती ही प्राथमिक आणि दुय्यम स्त्रोतांच्या आधारे केली आहे. संदर्भ ग्रंथ, प्रकाशित – अप्रकाशित मासिके, वृत्तपत्र तसेच शासकीय कृषी विभाग यांच्याद्वारे प्रकाशित होणा–या कृषी माहिती पुस्तिका यांचा आधार घेऊन माहिती प्राप्त करण्यात आली आहे.

**प्रस्तावना**

परंपरागत शेती ही देशी आदानावर अवलंबून होती कारण या परंपरागत शेती पध्दतीत कार्बनिक खते, जुनी अवजारे, बैल यांचा वापर शेती उत्पादन कार्यात होत होता. परंतु शेती क्षेत्रात आधुनिकीकरण झाल्याने रासायनिक खते, कीटकनाशके, उच्च दर्जाची संकरित बी – बियाणे, यंत्र सामुग्री, विस्तृत सिंचन व्यवस्था, डिझेल आणि वीज शक्तीचा वापर जास्त प्रमाणात होऊ लागला. या आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर शेती क्षेत्रात झाल्याने शेती उत्पादनात वेगाने वाढझाली. शेतीचे यांत्रिककरण व सिंचन सोयीमुळे ग्रामीण भागातील वीज आणि डिझेल यांच्या उपभोगात वाढझाली. हरितक्रांती मुळे जलसिंचनाच्या सोयी उपलब्ध झाल्याने पिकांना विशिष्ट वेळी आणि विशिष्ट प्रमाणात पाण्याचा वापर केला जाऊ लागला. यामुळे पाण्याच्या व्यवस्थापनेला महत्त्व प्राप्त झाले. पारंपरिक खतांचा वापर सातत्य होत असल्याने जमिनीतील सुपीकता कमी होऊ लागल्याने शेत जमिनीची उपजिवी शकती कमी होऊ लागली. ही शक्ती भरून काढण्यासाठी नवीन तंत्रात रासायनिक खतांचा वापर होऊ लागल्याने पिकांच्या उत्पादनात वाढीत वेग निर्माण झाल्याने शेती उत्पादनात बदल करून नवीन पीकांचे उत्पादन करणे शक्य झाले. तसेच संकरित बी–बियाणे वापर करून शेतकरी महत्तम लाभ मिळवण्याचे प्रयत्न करत आहे. संकरित बियाणे वापर करून एका वर्षात एकापेक्षा जास्त पिके घेता येऊ लागले. भूमीचा पुरवठा स्थिर असल्याने भूमीची विस्तृत लागवड करणे कठीण असते. परंतु, संकरित बियाणे वापरामुळे नवीन तंत्रयुक्त व नवीन तंत्रामुळे जमिनीचा वापर अधिकाधिक पीक घेण्याच्या दृष्टीने होऊ शकतो, यामुळे अनेक शेतकरी संकरित बियाणे वापरावर भर देत आहे. (पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ यांनी केलेल्या प्रयोगानुसार नवीन बियाणांचा व नवीन तंत्रांचा वापर करून मुंग – बटाटे – चवळी ही पिके २५४ दिवसामध्ये घेता येते. या प्रयोगामुळे बहुपिक पध्दतीची संभाव्यता वाढीस लागली.)

नवीन तंत्रज्ञानाचा व खतांचा वापर शेती क्षेत्रात होऊ लागल्याने पिकांचे रोगराई पासून बचाव होऊ लागला. नवे तंत्रज्ञान जसे की रासायनिक खते, कीटकनाशके, फवारणी यंत्र आणि इतर अवजारे ही जास्त खर्चिक असल्या तरी ते उत्पादन वाढीमध्ये शेतक–याला सहकार्य करतात. शेतीचे उत्पादन वाढून उत्पन्नात वाढ होते. म्हणून शेतीच्या उत्पादन वाढीसाठी नवतंत्रज्ञान वापरणे आवश्यक आहे.

**शाश्वत शेती**

इ. स. १९६०–१९६१ नंतर भारतात हरितक्रांती अनुभवास येऊ लागली. शेती उत्पादनात मोठ्या प्रमाणात वाढू लागले. पण उत्पादन वाढीमध्ये कसलेही सातत्य दिसून आले नाही. दरवर्षी ठरल्याप्रमाणे शेतकरी ठराविक प्रमाणात शेती उत्पादन घेऊ लागला. वार्षिक लोकसंख्येची गरज कमी शेती उत्पादनामध्ये भागवणे कठीण जाऊ लागले. त्यासाठी अन्नधान्य वाढीसाठी नवीन प्रयत्न करणे गरजेचे वाटू लागले. अशा परिस्थितीतून मार्ग काढण्यासाठी शेती तज्ज्ञांनी शाश्वत शेतीची संकल्पना विकसित केली. शाश्वत शेतीमुळे शेती क्षेत्रात विकसित बदल होण्यास सुरुवात झाली.

**शाश्वत शेतीची उद्दीष्टे**

1. उत्पादनात सातत्यपूर्ण वाढ करणे.
2. अधिक काळापर्यंत भरपूर उत्पादन प्राप्त करताना त्याचा पर्यावरणावर विपरीत परीणाम होणार नाही याची काळजी घेणे.
3. सेद्रिय खते वापर करण्यावर भर देणे.
4. सकस अन्नधान्य उत्पादन वाढीसाठी प्रयत्नशील राहणे.

**नवीन शेती विकास धोरण**

शेती विकासा करिता जी नवीन नीती वापरण्यात आली त्यामुळे शेती क्षेत्रात जे परिवर्तन घडून आले त्या परिवर्तनाला हरित परिवर्तन असे म्हणतात. नवीन शेती विकास धोरणाची मुख्य यशस्विता ही गहू आणि तांदूळ यांच्या उत्पादनात झालेल्या वाढी वरून दिसून येते. भारतात गहू च्या उत्पादनात जे प्रचंड प्रमाणात वाढझाली होती त्याचा मुख्य आधार हा हरितक्रांती होता.

**तालिका : अन्नधान्याच्या (खाद्यान्नाच्या) उत्पादनातील प्रगती (लाख टन)**

| धान्याचे भाव | १९६०–६१ लाख टन | १९९०–९१ लाख टन | १९९९–२००० लाख टन |
|---|---|---|---|
| (१) धान | ३५० | ७५० | ८१५ |
| (२) गहू | ११० | ५५० | ७५६ |
| (क) एकूण धान्य | ६९० | १६२० | १९९५ |
| (ख) एकूण डाळी | १३० | १०० | १३४ |
| एकूण खाद्यान्न (क + ख) | ८२० | १७६० | २०८९ |

1. वरील तक्यामध्ये गेल्या कही वर्षातील मुख्य पिकाच्या उत्पादनाचे प्रमाण दर्शिविले आहे. १९६०–६१ मध्ये तांदळाचे उत्पादन ३५०लाख टन होते, ते १९९१–२००० मध्ये ८१५ लाख टन झाले. भारतातील या प्रमुख पिकाचे उत्पादन वेगाने वाढत असल्याचे दिसून येते. तर १९६०–६१ मध्ये गहू उत्पादन हे ११० लाख टन होते तर १९९९–२००० मध्ये ते ७५६ लाख टन झाले.
2. एकूण धान्य व एकूण डाळी यांचे प्रमाणे १९६०–१९६१ या काळात अनुक्रमे ६९९ लाख टन आणि १३९ लाख टन होते. १९७२ मध्ये पडलेल्या दुष्काळाचा परिणाम हा पीक उत्पादनावर झालेला दिसून आला कारण १९६०–६१ ते १९९०–१९९१ या कालावधी डाळी उत्पादन करण्यामध्ये घट झाली. १९९०–९१ मध्ये डाळी उत्पादन प्रमाण १०० लाख टन होते. हेच प्रमाण १९९९–२००० मध्ये १३४ झाले. परंतु इतर धान्याच्या उत्पादनात मात्र प्रचंड वाढझाल्याचे आढळले. जसे मक्का, ज्वारी, बाजरी. या धान्यांमध्ये १९६०–६१ मध्ये ६९० लाख टन पर्यंत वाढझालेली. तर १९९९–२००० मध्ये १९९५ लाख टन झाल्याचे दिसून आले. हरितक्रांती नंतर शेती क्षेत्रात झालेले बदल हे वरील तक्तावरून स्पष्ट होते.

**भारतातील व्यापारी पिकांचे उत्पादन**

देशात नवीन तंत्रज्ञानाचा वापर शेती क्षेत्रात वाढल्याने उत्पादन वाढीस लागले. उत्पादन वाढल्यामुळे देशातील शेत मालाचे व्यापारीकरण करण्याला सुरुवात झाली. १९६०–६१ ते १९७४–७५ पर्यंत ऊस, राई, ताग, तीळ या पिकांच्या उत्पादनात हव्या तितक्या प्रमाणात वाढझाली नाही. परंतु १९७४–७५ या काळानंतर ऊस, राई, ताग, तीळ या पिकांच्या उत्पादनात मोठ्या प्रमाणात वाढझाल्याचे दिसून येते.

**तालिका : भारतात व्यापारी पिकांचे उत्पादन**

| पिकाचे नाव | १९६०–६१ | १९८०–८१ | १९९०–९१ | २००१–०२ |
|---|---|---|---|---|
| ऊस (गूळ) (लाख टन) | ११०० | १५४० | २४१० | ३००० |
| रुई (लाख गठ्ठे) | ६० | ७० | १०० | १०० |
| ताग (लाख गठ्ठे) | ४० | ८० | ९० | १२० |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| तेलबिया (लाख टन) | ७० | ९० | १८० | २१० |
| बटाटे (लाख टन) | ३० | १५० | २५० | २२० |

स्रोत : भारत सरकार, आर्थिक समीक्षा : २००२—२००३

प्रत्येकी १७० किलोची एक ह्याप्रमाणे लाख गाठींमध्ये उत्पादन दर्शविले आहे.

1. वरील तक्त्यावरून भारतात व्यापारी पिकांच्या उत्पादन वाढीचे प्रमाण दर्शवले आहे. १९६०—६१ या काळात ऊस, रुई, ताग, तीळ आणि बटाटे यांचे प्रमाण हे अनुक्रमे ११००, ६०,४०,७०,३० लाख टन होते. या काळात या व्यापारी पिकांचे उत्पादन अल्प प्रमाणात होत असल्याचे चित्र स्पष्ट होते. हीच स्थिती १९७४—१९७५ या काळापर्यंत अशीच होती. परंतु, १९७५ नंतर व्यापारी पिकांच्या उत्पादनात लक्षणीय वाढझाल्याचे दिसून आले.
2. ऊस, रुई, ताग, तीळ, बटाटे या पिकांचे प्रमाण २००१—२००२ मध्ये ३ ते ४ पटीने वाढली. २००१ मध्ये या व्यापारी पिकांचे उत्पादन प्रमाण हे (प्रती किलो एक लाख टन) ३०००, १००, १२०, २१०, २२० झाले. पिकांच्या वाढीसाठी नवीन तंत्रज्ञानाचा वापर आणि आधुनिक पध्दतीने शेती करण्याचा परिणाम आहे.

**नवीन कृषी धोरणाचे महत्व**

1. नवीन कृषी धोरण शेती उत्पादन वाढीस महत्त्वपूर्ण असून काही कृषी धोरणाच्या समर्थकांच्या मते, सखोल उत्पादन पध्दती भारतीय शेतीत अल्पकाळात उत्पादनात लक्षणीय वाढ करण्याचे उपाय आहे. खाद्यान्न स्वावलंबी होण्यासाठी अशाप्रकारच्या उत्पादन पध्दतीचा वापर होणे आवश्यक आहे.
2. आपल्या देशात शेती आदानांची उपलब्धता अल्प प्रमाणात आहे. त्यामुळे पूर्ण भारत देशाची गरज भागात नाही. त्यामुळे या आदानांची उपलब्धतेत वाढ होणे आवश्यक आहे.
3. कृषी आदानात वाढझाल्यास उत्पादनात वाढ होईल.
4. विशिष्ट क्षेत्रात झालेल्या उत्पादन वाढीचा इतर क्षेत्रातील उत्पादनावर प्रभाव पडू शकतो. उदाहरण, देशात कृषी उत्पादनात वाढझाल्यास प्रामुख्याने अन्नधान्याच्या निर्देशातून होणा—या आयातीत घट होवून दुर्लभ विदेशी चलनात बचत होऊ शकते, परावलंबित्व कमी होऊ शकते.
5. ग्रामीण भागात उत्तम प्रकारच्या लागवड पध्दतीची कल्पना शेतक—यांना देण्यासाठी कार्यक्रमाचे आयोजन करून उत्पादन वाढीस उत्तेजन दिल्यास कृषी विकासाला चालना मिळू शकते.

**निष्कर्ष**

अधिक उत्पादन घेण्यासाठी आधुनिक आणि दर्जेदार बियाणांचा वापर करावा लागतो. तसेच रासायनिक खते, पाणीपुरवठा यांच्यावर येणारा खर्च हा देखील जास्त असतो. जो एका लहान शेतक—याला परवडत नाही. कारण नवीन तंत्रज्ञान आणि शाश्वत शेती साठी लहान आणि मध्यम शेतकरी या लागवड खर्च हा आवाक्याबाहेर असतो. ज्या शेतक—यांकडे शेत जमिनीचा आकार हा १० एकर पेक्षा जास्त आहे. अशा शेतक—याला आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून शाश्वत शेतीच्या आधारावर कृषी उत्पादन आणि कृषी उत्पन्न वाढीस लावू शकतो. त्याचबरोबर शेतीसाठी लागणारी आधुनिक तंत्र, रासायनिक खते, संकरित बियाणे यांचा वापर मोठे शेतकरी हे अल्पभूधारक शेतकरीपेक्षा अधिक चांगल्या प्रकारे करू शकतो. नवीन कृषी धोरण देखील मोठे शेतकरी तसेच सीमांत शेतकरी यांना फायदेशीर असल्याचे दिसून येते.

**संदर्भ**

1. विकासचे अर्थशास्त्र— डॉ. जे. देशपांडे
2. विकासाचे अर्थशास्त्र— डॉ. विजय कविमंडल
3. कृषी अर्थशास्त्र — डॉ. नीता वाणी
4. भारतीय अर्थव्यवस्था — डॉ. सुखदेव खंदारे
5. भारतीय अर्थव्यवस्था आणि पर्यावरण — डॉ. जी. एन. झामारे

'Journal of Research & Development' A Multidisciplinary International Level Referred and Peer Reviewed Journal,
Impact Factor-7.265, ISSN: 2230-9578, 30 October2021, Volume-12, Issue-15
Agriculture and Rural Development: Strategic Issues and Reform Options

# समकालीन कृषी जीवनाचे ग्रामीण कवितेतील प्रतिबिंब

**प्रा. नारायण बाबुराव पाटील**

कर्मवीर काकासाहेब वाघ महाविद्यालय, पिंपळगाव (ब), ता. निफाड, जि. नाशिक.

## प्रास्ताविक

'शेतीप्रधान अर्थव्यवस्था' अशी ओळख असलेल्या आपल्या देशाच्या शेती व्यवस्थेत १९६० नंतरच्या हरितक्रांतीने खऱ्या अर्थाने चेहरा-मोहरा बदलायला सुरुवात झालेली दिसून येते. केवळ उपजीविकेचे साधन म्हणून केली जाणारी शेती आधुनिक काळात व्यापार आणि कृषी-उद्योगांचा आधारभूत घटक बनली. सामाजिक जीवनाचा अविभाज्य भाग असलेली ग्रामीण अर्थव्यवस्था व समाजव्यवस्था राजकारणाच्या अर्थात सत्ताकारणाचीही केंद्रबिंदू बनली. आधुनिक काळातील वाढत्या शैक्षणिक सुविधांमुळे व प्रसारमाध्यमांच्या विस्तारामुळे ग्रामीण समाजाला आपल्या अस्मितांची व न्याय हक्कांची जाणीव होऊ लागली. इतरांच्या तुलनेत आपली गळचेपी त्याच्या लक्षात येऊ लागली आणि आत्मभान आलेला वर्ग लेखणीच्या माध्यमातून व्यक्त होऊ लागला. १९८० नंतर या लेखनाने नवे वळण घेतले व ग्रामीण साहित्याच्या रूपाने मराठीत एक मुख्य प्रवाह उदयास आला. ग्रामीण कथा, ग्रामीण कादंबरी व ग्रामीण कवितांच्या रुपाने मराठी ग्रामीण नवलेखक कवींचा प्रचंड मोठा वर्ग उदयास आला. या साहित्यप्रवाहातील अतिशय लोकप्रिय साहित्यप्रकार म्हणून ग्रामीण-कृषी कवितांचा समावेश होतो. ज्येष्ठ साहित्यिक डॉ. द. ता. भोसले म्हणतात, "पाण्यात भिजलेल्या एखाद्या ढेकळासारखा अज्ञान अंधश्रद्धा शोषण आणि दारिद्र्य यात आजन्म विरत जाणारा आणि दिशाहीन स्वरूपाचे नि:सत्व जीवन जगणारा हा ग्रामीण समाज देहावर पडलेल्या शतकानुशतकांच्या मातीतून वर डोकावून आशावादी नजरेने आणि आत्मविश्वासाने अवतीभवती पाहू लागलेला आहे."[१]

कृषी व ग्रामीण जीवनाचे बदलते समाजवास्तव डॉ. भोसले यांनी आपल्या शब्दांमधून नेमकेपणाने स्पष्ट केले आहे. समकालीन व आधुनिक काळातील स्थित्यंतराचा परिणाम हा एकूण ग्रामीण साहित्य व ग्रामीण कवितेतून प्रतिबिंबित झालेला आहे. प्रस्तुत शोधनिबंधातून त्याचा वेध घेण्याचा प्रयत्न करीत आहे.

## १९८० नंतरची ग्रामीण कविता

स्वातंत्र्योत्तर काळात खेड्यांमधून मोठ्या प्रमाणात परिवर्तन झाले. गावगाड्यांनी बद्ध असलेला, एक मेकांच्या सलोख्याने, आधाराने राहाणारा, परस्परांविषयी आत्मीय भावना ठेवणारा गाव बदलला. कालपरत्वे ग्रामीण जीवन बदलले, जीवनाचे स्वरूप बदलले, समाजाची दृष्टी बदलते, त्याचे आचार विचार बदलतात. माणसांच्या - समाजाच्या भौतिक व ऐहिक गरजा बदलतात. या सर्व स्थित्यंतराचा ग्रामीण साहित्यावरही विविध प्रकारे परिणाम झाला. समाजाच्या प्रत्येक क्षेत्रातील स्थित्यंतराचा त्या समाजाच्या, राहणीमानावर, जीवनशैलीवर परिणाम घडत असतो व त्यातून सामाजिक स्थित्यंतर घडत असते. समाजात काही महत्त्वाच्या स्थित्यंतरास कारणीभूत ठरणाऱ्या

घटना घडत असतात. त्या घटनांचा साक्षीदार असणारा संवेदनशील मनाचा कवी गप्प राहणे शक्य नाही. तो त्या बदलाची, स्थित्यंतराच्या, निर्माण झालेल्या सामाजिक संघर्षाची शहानिशा करून त्या घटनांचे, सामाजिक संघर्षाचे त्यामागील तत्वज्ञानाचे शब्दरूप आपल्या कवितेतून ग्रामीण कवी मांडू लागले. ग्रामीण साहित्याची चळवळ सुरू झाल्यानंतर ग्रामीण कविता मोठ्या प्रमाणावर लिहिली जाऊ लागली. १९८०-८१ नंतर ती ग्रंथरूपाने पुढे येऊ लागली. ही कविता "काव्यगुणात" कमी असली तरी तिच्यातून व्यक्त होऊ पाहणारी जाणीव नोंद घेण्याजोगी होती.... आशयाभिव्यक्तीचे सर्व संकेत बाजूला सारून हे कवी सरळ जीवनानुभवाला भिडलेले दिसतात असे निरीक्षण डॉ. रवींद्र ठाकूर यांनी नोंदविले आहे. [२] ग्रामीण भागातला माणूस वाचू लागला, लिहू लागला त्यातूनच ग्रामीण समाज जीवनाचे, वास्तवाचे चित्रण ग्रामीण कवितेतून येऊ लागले. खेड्यातील नवी पिढी शिक्षणामुळे विचारी बनली तिची अस्मिता, सामाजिक जाणिवा वाढीस लागल्या. त्यामुळे मध्यम वर्गीय शहर स्थित लेखकांनी लिहिलेल्या ग्रामीण साहित्यामध्ये त्यांना उणिवा जाणवू लागल्या हे खऱ्या अर्थाने ग्रामीणतेचे चित्रण नाही, हे त्यांच्या लक्षात येऊ लागले. आपले अनुभव आपणच चित्रित करावेत या अस्मितेतून त्यांनी लेखणी हाती धरली. त्यात खेडयांचे वास्तव चित्रण येऊ लागले. बोलीभाषेचा वापर होऊ लागला. ग्रामीण समाज जीवनाकडे गांभीर्याने बघणारी व बदलत्या समाज जीवनाचे चित्र आपल्या काव्यातून मांडणारी नवी पिढी उदयास आली. यात प्रामुख्याने विठ्ठल वाघ, पुरुषोत्तम पाटील, एकनाथ देशमुख, प्रभाकर चौधरी, माधव थोरात, नारायण कुलकर्णी, उत्तम कोळगावकर, जगदीश देवपूरकर, राजन गवस, नारायण सुमंत, शशिकांत शिंदे, सूर्यभान चव्हाण, उषा भालेराव, सतीश शिरसाठ, भास्कर बडे, गोविंद थेटे, मोहन पाटील, इंद्रजित भालेराव, लक्ष्मण महाडिक, प्रकाश होळकर, रावसाहेब कुवर आदी मराठी ग्रामीण कवींनी बदलत्या ग्रामीण समाजजीवनाचे चित्र त्यांनी आपल्या कवितेतून मांडले आहे.

ग्रामीण भाषेच्या वापराविषयी १९८० नंतरच्या काळात नव्या पिढीने सर्व संकेत झुगारलेले दिसतात. अहिराणी, वऱ्हाडी, कोकणी या बोलीतून अस्सल ग्रामीण बोलीतील कविता जशी येते तसेच सरसकट विधानांचे रूप घेऊन येणारी, अष्टाक्षरी छंदाचा वापर करून यमकबद्ध अभिव्यक्ती करणारी अशी सर्वच रूपे या काळात आढळतात. अनुभव व जाणीव प्रमाण मानून त्यानुसार अभिव्यक्ति-विषयांना प्रमाण मानणारी मानसिकता या काळात दिसून येते.१९६० पासून १९९० पर्यंत अनेक कवी ग्रामीण कविता लिहीत असले तरी ही संख्या निश्चित समाधानकारक नाहीत. यातील नाव घेण्यासारखे दोन-तीनच नावे ग्रामीण कवितेत दिसतात. याविषयी नागनाथ कोत्तापल्ले यांनी खंत व्यक्त केली आहे १९४५ पासून मराठीत जाणीवपूर्वक ग्रामीण साहित्य निर्माण होत आहे. प्रारंभी ग्रामीण जाणिवांची अभिव्यक्ती कवितेतून होती परंतु कविता हा वाङमय प्रकार कमी कलावंतांना जवळचा वाटलेला दिसतो. ग्रामीण जाणिवांची अभिव्यक्ती करणारी किती कविता मराठीत आहे? त्यातही खऱ्या अर्थाने वास्तवाला सामोरे जाणारी कविता किती आहे याची मोजदाद केली तर काय चित्र स्पष्ट होईल ते आपल्याला माहीतच आहे. या काळातल्या ग्रामीण कवितेत हवी तेवढी व्यापकता आणि सखोलता मिळाली नसल्याची खंत कोत्तापल्ले व्यक्त करतात. [३]

**१९९१ नंतर जागतिकीरणाचे प्रतिबिंब**

जागतिकीकरणाची प्रक्रिया असली तरी १९९१ नंतरच्या काळात ग्रामीण भागात त्यामुळे दारिद्र्य, बेकारी व बकालपणा वाढला. शहरांना सूज येऊन नागरी समस्या तीव्र झाल्या असल्या तरी दुसऱ्या बाजूने खेडी ओस व भकास होऊन उद्ध्वस्त होऊ लागली आहे. मोबाईल संगणक रस्ते टी.व्ही. च्या वाहिन्या इ. कितीतरी नवीन बाबी खेड्या पर्यंत पोचल्या असल्या तरी 'आर्थिक सुबत्ता' हा जो जागतिकीकरणाचा परिणाम सांगितला जातो, तो खेड्यांपर्यंत पोहोचला नाही. उलट महागाई वजा नापिकी मुळे शेतकऱ्यांना शेती करणे व जगणे अवघड होऊ लागले. त्याचा परिणाम म्हणजे इतिहासात कधीच न झालेले शेतकऱ्यांच्या आत्महत्यांचे सत्र या दशकात वाढलेले आहे. २००६ या एकाच वर्षात विदर्भ व खानदेश येथील एकूण २७८ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आंकात शब्दबद्ध करताना इंद्रजित भालेराव सारख्या कवी म्हणतो -

'जागतिकीकरणाचा येड्रीनंचा डबा
कुणी धुतला निर्मळ गंगेत?
निरागस विहार करणाऱ्या नाकात
कुणी आणून कुंबला अचानक आंकात'?

मात्र ही आकडेवारी व बातम्या वाचूनही समाज व राज्यकर्ते उदासीन आहेत त्यावर भाष्य करताना ते परखडपणे नोंदवतात.

पंतप्रधान म्हणाले :
'घेतलेल्या कर्जाचे आणि कुटुंबाचं नियोजन करता येत नाही
म्हणून शेतकरी आत्महत्या करतात.
शेतकऱ्यांनी विचारलं-
देशाचे नियोजन जमलं नाही
म्हणून किती पंतप्रधानांनी आतापर्यंत आत्महत्या केली?

या आत्महत्यांची कारणमिमांसा करताना अविनाश गायकवाड लिहितात.

'आसुडा ऐवजी
आत्महत्या करतो शेतकरी
काबीज ज्यांच्या तमाम स्त्रोत, जमीन, पाणी
हलत नाही त्यांची जड कातडी!'

हे जाड कातडीची लोक कोण आहेत? त्याची जाणीवही या पिढीला झाली आहे. म्हणूनच कवी सुरेश शिंदे नोंदवितात -

पाणी खळयात पडो की मळयात
जाते मात्र त्यांच्याच तळयात'

किंवा शेतीतील कष्टाचे महाभारत नोंदविताना ते म्हणतात

'Journal of Research & Development' A Multidisciplinary International Level Referred and Peer Reviewed Journal,
Impact Factor-7.265, ISSN: 2230-9578, 30 October2021, Volume-12, Issue-15
Agriculture and Rural Development: Strategic Issues and Reform Options

'कागदावर काळ करण्या इतकं
सोपं असत काय?
मातीला हिरवा करणं
जीवाचं वापशावर पेरावा लागतो.
तेव्हा उगवतो हिरवा कोंब
बाबांनो
तुमच्या आकड्यांना आणि अक्षरांना
तर माझ्या डिग्रीला
वाळवी लागली नसती
मग माझ्या बापानं

आत्महत्या का केली असती कारण परंपरा माहीत झाल्याने चक्क कवी आता 'आत्महत्या नको हत्या करायला शिक' असे आवाहन करतो.

अर्थात १९९० नंतरच्या ग्रामीण कवितेत शेतकऱ्यांच्या सृजनाबरोबर त्यांचे शोषण, त्यांच्या वेदना, हाल-अपेष्टांबरोबर त्यांच्यावर होणारा अन्याय ही चित्रित झाल्याचे दिसून येतो. पण शेतकऱ्यांच्या समस्यांची पाळेमुळे प्रचलित राजकीय-आर्थिक व्यवस्थेत दडलेली आहे. याची जाणीव या कवींना झालेली आहेत, ती त्यांनी आपल्या कवितेतून व्यक्त केली आहे. आता केवळ जीवनसंघर्ष नव्हे तर अन्याय-जुलूम यांच्या विरुद्ध लढा या भूमिकेवर हे कवी येऊन ठेपले आहेत त्याची जाणीव सर्वप्रथम अत्यंत ताकदीने विठ्ठल वाघ यांनी आपल्या कवितेतून व्यक्त केली आहे. त्यानंतर इंद्रजित भालेराव हे दुसरे अतिशय महत्त्वाचे नाव आहे. त्याशिवाय नारायण सुमंत, जगदीश कदम, श्रीकांत देशमुख, अनिल पाटील, लक्ष्मण म्हाडिक, सदानंद देशमुख, केशव सखाराम देशमुख, जयराम खेडेकर, एकनाथ कांबळे, रमेश चिल्ले, प्रकाश होळकर, संतोष पवार, बालाजी इंगळे, महेश मोरे, ललित अधाने. पी. विठ्ठल, सुदाम राठोड, विरा राठोड, संदीप जगदाळे ही काही महत्त्वाची नावे या संदर्भात आवर्जून उल्लेख करावी अशी आहेत. त्यापैकी प्रत्येकावर स्वतंत्रपणे लिहीता येईल एवढी ऊर्जा त्यांच्या कवितेत निश्चितच आहे.

**२००० नंतरची दमदार कविता**

२००० नंतर लिहिणाऱ्या कवी मध्ये नव्या प्रश्नांना ताकदीने भिडणारे अनेक आशावादी चेहरे दिसतात. श्रीकांत देशमुख, ऐश्वर्या पाटेकर, तुकाराम धांडे, पृथ्वीराज थौर, केशव खटींग, पी. विठ्ठल, कल्पना धुमाळ, विष्णू थोरे, भरत दौडणकर, कैलास दौंड, मोहन कुंभार, विजयकुमार मिठे, विनायक येवले, कैलास सलादे, विनायक पवार, संतोष नारायणकर, अशोक कोळी, बालाजी मदन इंगळे, रवी कोरडे, ललित अधाने, लक्ष्मण बारहाते, ज्ञानेश उगले, गणेश मरकड, नामदेव कोळी, लता शेवाळे, किरण भावसार, सचिन गांगुर्डे, रवींद्र कांगणे, निमंत चांदगुडे, अमृत पेलंग, प्रभाकर शेळके, रावसाहेब जाधव, राजेंद्र उगले, निलेश शेळके, शैलेंद्र चव्हाण, राजेंद्र दिघे, अरुण पवार, रावसाहेब जाधव, नागेश

शेलार, दत्ता सोनवणे, किरण संधान, संतोष झोमन, सोमनाथ पवार, सोमनाथ फुगट, रवी देवरे, सागर जाधव, विलास माळी, दयाराम हगलाणकर, काशिनाथ वेलदोडे, शिवाजी भालेराव, रूपाली खैरनार, कोमल जगझाप ही नव्या पिढीतील कवी मंडळी महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून वेगवेगळया जाणिवांचे अविष्कार करताना दिसतात. वर दिलेली कवीची यादी आणखी वाढू शकते.

**निष्कर्ष**

एकंदरीत ग्रामीण व कृषी जीवनाचे प्रतिबिंब मराठी ग्रामीण कवितेने टिपले आहे हे प्रकर्षाने प्रस्तुत शोधनिबंधातून जाणवते. प्रस्तुत शोधनिबंधातून खालील काही निष्कर्ष हाती येतात.

१) ग्रामीण साहित्यातील मानवी जीवन हे नागरी जीवनापेक्षा वेगळे आहे. कृषी निगडित समस्या या साहित्याच्या प्रेरणा आहेत.

२) १९६० नंतर साहित्यात अनेक नवीन प्रवाह आले. ग्रामीण, दलित, जनवादी, स्त्रीवादी, आदिवासी व प्रबोधन साहित्याने मराठी साहित्याच्या कक्षा विस्तारल्या.

३) १९८० नंतर ग्रामीण कवितेचे दालन अनेक कवींनी समृद्ध केले. कृषी-जीवनाशी संबंधित नव साहित्यिक वर्गाचा वाटा मोठा राहिला.

४) १९९१ नंतरच्या जागतिकीकरणाचा प्रभाव सर्वच घटकांवर झाला. शेतीतील सामाजिक, आर्थिक व तांत्रिक घटकांमध्ये आमूलाग्र बदल झाले. ग्रामीण कवितेत त्याचे प्रतिबिंब पडलेले दिसून येते.

५) वाढत्या शहरीकरणाचा, आधुनिकीकरणाचा शेती व शेतकरी यांच्यावर सतत प्रभाव पडत आहे. आज सेझ, प्रकल्पग्रस्तांचे प्रश्न, कर्जबाजारीपणा, बेरोजगारी, कुटुंबाचे विभक्तीकरण, जमिनीचे तुकडीकरण या समस्यांमधून शेतकरी जीवनाच्या समस्यांमध्ये वाढ होत आहे. त्याचे प्रतिबिंब १९९१ नंतरच्या कवितांमधून स्पष्ट जाणवते.

६) २००० नंतरच्या उत्तर आधुनिक काळात शेती व शेतकरी जीवनात होत असलेली विविध स्थित्यंतरे व विस्तारलेल्या समस्या आधुनिक कवितेने टिपल्या आहेत. या काळात अनेक नव्या दमाचे ग्रामीण कवी उदयास आलेले दिसतात.

**संदर्भ**

१) डॉ. भोसले द. ता.- समकालीन साहित्यचर्चा, प्रतिमा प्रकाशन पुणे जून २०१० पृ. २०१

२) ठाकूर रविंद्र, प्रवाह आणि प्रतिमा, स्वरूप प्रकाशन २०११, पृ. ११०

३) कोतापल्ले नागनाथ- ग्रामीण साहित्य स्वरूप आणि शोध, स्वरूप प्रकाशन औरंगाबाद, द्वितीय आवृत्ती डिसेंबर २०१० पृ. १२४.

४) पवार पंडितराव- मराठी कविता आकलन आणि आस्वाद, दस्ताने रामचंद्र आणि कं. पुणे २००५ पृ. ३४१.

'Journal of Research & Development' A Multidisciplinary International Level Referred and Peer Reviewed Journal, Impact Factor-7.265, ISSN: 2230-9578, 30 October2021, Volume-12, Issue-15
Agriculture and Rural Development: Strategic Issues and Reform Options

# औरंगाबाद जिल्हयाच्या सामाजिक व आर्थिक विकासात नाबार्ड बँकेची भूमिका

**केदार सुदामराव गरड[1] डॉ.डी.एन.जिगे**

[1]संशोधक विद्यार्थी, अर्थशास्त्र विभाग, डॉ. बा.आं.म.वि.औरंगाबाद

[2]सहयोगी प्राध्यापक, अर्थशास्त्र विभागप्रमुख, देवगिरी महाविद्यालय औरंगाबाद

**गोषवारा:**

भारत हा कृषिप्रधान देश आहे. देशातील शेतकरीवर्ग हा मुख्यतः ग्रामीण भागात राहतो. ग्रामीण भारत व शेती या दोन्हीचा जवळचा संबंध पाहायला मिळतो भारताची सुमारे ६८ टक्के लोकसंख्या ग्रामीण भागात राहते भारताच्या लोकसंख्येच्या सुमारे ४९ टक्के लोकसंख्या कृषीक्षेत्रावर अवलंबून आहे. महाराष्ट्र राज्याची परिस्थिती यापेक्षा वेगळी नाही आहे. उलट महाराष्ट्रातील मराठवाडा या विभागाची परिस्थिती आणखीनच विचार करण्यास प्रवृत्त करणारी आहे. मोठ्या प्रमाणात असणारा अवर्षणग्रस्त भाग, सिंचनास अयोग्य अशी भौगोलिक रचना, पावसाचे अल्प प्रमाण, अच्छिद्र प्रकारचा खडक व त्यामुळे भूगर्भात असणाऱ्या पाण्याची निम्न पातळी यासारख्या अतिरिक्त कारणामुळे मराठवाडा सामाजिक व आर्थिक दृष्ट्या मागासलेला दिसून येतो. मराठवाड्यातील औरंगाबाद जिल्हयाला नाबार्डच्या मार्गदर्शनाखाली विविध बँकांमार्फत होणाऱ्या वित्तपुरवठ्याचा अभ्यास संबंधित विषयात केलेला आहे.

**प्रस्तावना:**

कोणत्याही प्रदेशाचा सामाजिक व आर्थिक विकास साध्य करण्यासाठी बँकिंग व्यवस्थेची महत्त्वपूर्ण भूमिका असते तेव्हा बँकिंग व्यवसाय व त्याचे एखाद्या प्रदेशावर होणारे परिणाम याचा अभ्यास करणे हे महत्त्वपूर्ण ठरतेयाच पार्श्वभूमीवर मराठवाड्यातील औरंगाबाद या जिल्हयात नाबार्डच्या मार्गदर्शक तत्वानुरूप विविध बँकांनी वर्ष २०१६-१७ ते २०२०-२१ या पाच वर्षात केलेला वित्तपुरवठा याचे विश्लेषण, निष्कर्ष व शिफारशी करण्याचा प्रयत्न केला आहे. देशात बँकांनी वित्तपुरवठा करताना ४०% पुरवठा हा अग्रक्रम क्षेत्राला करणे हे बंधन त्यांच्यावर असते. अभ्यास विषयात अग्रक्रम क्षेत्रापैकी कृषी, सूक्ष्म लघू व मध्यम उद्योग, शिक्षण व गृहनिर्माण या महत्त्वाच्या अग्रक्रम क्षेत्राला संदर्भीत पाच वर्षात वित्तपुरवठ्याचा कल कसा राहिला आहे व त्यात वर्षानुरूप कसे बदल घडत गेले आहेत याचे अभ्यासपूर्ण विश्लेषण केलेले आहे.

मराठवाडा प्रशासकीय विभागाच्या औरंगाबाद जिल्हयातील सामाजिक व आर्थिक विकासात नाबार्ड या बँकेची महत्वाची भूमिका राहिली आहे व जिल्हयातील बँकिंग व्यवस्थेने नाबार्डच्या मार्गदर्शनात वित्तपुरवठयाच्या माध्यमातून जिल्हयाच्या विकासात वैशिष्ट्यपूर्ण योगदान दिले आहे. मात्र त्यात काय बदल करता येतील तसेच त्यातील त्रुटी शोधणे, शिफारशी करणे व या कार्यात मुख्य भूमिका असलेली राष्ट्रीय कृषी आणि ग्रामीण विकास बँक (नाबार्ड) व तिचे मराठवाडा विभागाच्या विकासात पुनर्वित्तपुरवठयाचे योगदान याचा अभ्यास प्रस्तुत संशोधन विषयात करण्याचा प्रयत्न केला आहे.

**संशोधनाची उद्दिष्टे:**

1. औरंगाबादजिल्हयाच्या विकासासाठी नाबार्ड बँकेमार्फत राबविल्या जाणाऱ्या ग्रामीण व कृषी पत व्यवस्थेचा आढावा घेणे.
2. नाबार्डच्या वित्तपुरवठ्याची प्रभाविता अधिक वाढविण्यासाठी उपाययोजना सुचवणे.

**राष्ट्रीय कृषी आणि ग्रामीण विकास बँके (नाबार्ड) विषयी:**

कृषी व ग्रामीण क्षेत्राला वित्तपुरवठा करून विकासाला चालना देण्याच्या उद्देशाने बँकांची शिखर संस्था म्हणून १२-जुलै-१९८२ रोजी नाबार्ड या बँकेची स्थापना करण्यात आली. १९६३ साली रिझर्व बँक ऑफ इंडियाने 'कृषी व पूनार्वित्त महामंडळ' स्थापन केले याचे १९७५ साली 'कृषी पूनार्वित्त व विकास महामंडळात' रूपांतर केले. १९७९ बी. व्ही शिवरामन यांच्या अध्यक्षतेखाली रिझर्व बँकेने 'कृषी व ग्रामीण विकासासाठी संस्थात्मक पतपुरवठा पुनरावलोकन समिती' (CRAFICARD) समितीच्या शिफारशीवरून १९८१ मध्ये संसदेच्या कायद्याने 'कृषी पतविभाग', 'ग्रामीण नियोजन व पथकक्ष' आणि कृषी पूनर्वित्त व विकास महामंडळ' यांच्या एकत्रीकरणातून १२-जुलै-१९८२ रोजी नाबार्ड या बँकेची स्थापना करण्यात आली.

**औरंगाबाद जिल्हयामध्ये विविध बँकांमार्फत पाच वर्षात (२०१६-१७ ते २०२०-२१) अग्रक्रम क्षेत्रास झालेला वित्तपुरवतठा**

**(Fig.in lakhs)**

| Sr.no**.** | Year | Agriculture | MSME | Education | Housing |
|---|---|---|---|---|---|
| १ | २०१६-१७ | १,८३,११६ | १,५२,८९९ | १४,५९८ | ३६,३१४ |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| २ | २०१७-१८ | १,७४,१८३ | १,८०,२६९ | २०,५९५ | ७३,८६८ |
| ३ | २०१८-१९ | १,९७,६३६ | १,९१,०५२ | २२,२४१ | ८०,०७५ |
| ४ | २०१९-२० | २,११,००० | २,१२,०२० | २३,७३१ | ८५,४२४ |
| ५ | २०२०-२१ | १,८९,६०० | २,८९,९९१ | २०,६३६ | ७४,२८४ |




(Source:SLBC Maharashtra - Convener : Bank of Maharashtra)

**विश्लेषण:**

कृषीक्षेत्र: (Agriculture)

वरील माहिती वरून लक्षात येते की कृषी क्षेत्रामध्ये झालेल्यावित्तपुरवठ्याचे प्रमाण २०१६-१७ च्या तुलनेत २०१७-१८ या आर्थिक वर्षात कमी झाले तर २०१८-१९ त्यात बरीच वाढ झाली. त्याच वेळी २०१९-२० या आर्थिक वर्षात ते आणखी वाढून पुन्हा २०२०-२१ या आर्थिक वर्षात कमी झाले आहे अशाप्रकारे वित्तपुरवठाच्या प्रमाणात सातत्य दिसून येत नाही.

सूक्ष्म, लघू व मध्यम उद्योग: (MSME)

सुक्ष्म लघु व मध्यम उद्योगाचा अभ्यास करत असताना आढळून येतेकी २०१६-१७ या आर्थिक वर्षापासून वित्तपुरवठ्यामध्ये सातत्याने वाढ होत आहे २०२०-२१ या आर्थिक वर्षात तर मागच्या वर्षीच्या (२०१९-२०) तुलनेने अधिकच वाढ झालेली आहे थोडक्यात या क्षेत्रात वित्तपुरवठ्यामध्ये सातत्य असल्याचे दिसून येते.

शिक्षण: (Education)

शिक्षण क्षेत्राचा विचार करता या क्षेत्रामध्ये २०१६-१७ ते २०१९-२० या चार आर्थिक वर्षामध्ये वित्तपुरवठा वाढीचे सातत्य दिसून येते परंतु २०२०-२१ या आर्थिक वर्षामध्ये मात्र मागच्या वर्षीच्या तुलनेत वित्तपुरवठा कमी झालेला आहे. परंतु एकूण शिक्षणावर होणारा वित्तपुरवठा इतर क्षेत्राच्या तुलनेत कमी आहे यात वाढ होणे गरजेचे आहे.

गृहनिर्माण क्षेत्र: (Housing)

या क्षेत्रात वित्तपुरवठ्याचा विचार करता २०१६-१७ या आर्थिक वर्षापेक्षा २०१७-१८ या आर्थिक वर्षात जवळपास दुप्पट वाढ झालेली आहे. मात्र नंतर पुढील दोन वर्षे म्हणजेच २०१८-१९ व २०१९-२० वर्षात वाढ झाली त्याच वेळी २०२०-२१ या वर्षात मागच्या वर्षीच्या (२०१९-२०) तुलनेने वित्तपुरवठ्यामध्ये घट झालेली दिसून येते अशा प्रकारे गृहनिर्माण क्षेत्रातही वित्तपुरवठ्याचे सातत्य नसल्याचे जाणवते.

**निष्कर्ष**:

औरंगाबाद हा जिल्हा मराठवाड्यासारख्या अवर्षणग्रस्त व सामाजिक-आर्थिकदृष्ट्या मागास असलेल्या विभागात येतो तेव्हा या विभागातील औरंगाबाद जिल्ह्याच्या विकासामध्ये नाबार्ड तसेच औरंगाबाद जिल्ह्यासाठी असलेली अग्रणी बँक (बँक ऑफ महाराष्ट्र) या दोन्हींच्या परस्पर सहकार्याने औरंगाबाद जिल्ह्याचा विकास साध्य करण्यासाठी वित्तपुरवठ्याचे चांगले प्रयत्न चालू असल्याचे दिसून येतात. मात्र कृषी सारख्या अत्यंत महत्त्वाच्या क्षेत्रासाठी होणारी वित्तपुरवठ्यातील अनियमितता काळजी करण्यास भाग पाडणारी आहे. सुक्ष्म, लघु व मध्यम उद्योगाला ज्याप्रमाणे सातत्याने वित्तपुरवठा होत आहे. त्याप्रमाणे कृषी क्षेत्रातही वित्तपुरवठ्याचे सातत्य येणे गरजेचे आहे तसेच शिक्षण या अत्यंत महत्त्वाच्या क्षेत्राकरिता वित्तपुरवठ्याचे प्रमाण अल्प असल्याचे येथे दिसून येते. तसेच २०२०-२१ या वर्षाचा अपवाद सोडल्यास गृहनिर्माण क्षेत्रातही सातत्य असल्याचे दिसून येते ते कायम राहणे अपेक्षित आहे जेणेकरून जिल्ह्यातील लोकांची घरांची गरज पूर्ण होईल.

**शिफारशी**

1. कृषी क्षेत्राला होणाऱ्या वित्तपुरवठ्यात सातत्य आनणे.

2. कृषी क्षेत्रालावित्तपुरवठा होताना असणारी वेळखाऊ प्रक्रिया या क्षेत्रातील अनियमिततेला कारणीभूत असू शकते ती प्रक्रिया सुलभ करणे. जेणेकरून जास्तीत जास्त शेतकरी वित्तपुरवठ्याचा लाभ घेऊ शकतील.
3. शिक्षणासारख्या महत्त्वाच्या क्षेत्रामध्ये वित्तपुरवठ्यात वाढ होणे गरजेचे आहे.

## संदर्भग्रंथ सूची


1. प्रा. रायखेलकर आणि डॉ. दामाजी-'भारतीय अर्थव्यवस्था' विद्याबुक पब्लिशर्स, औरंगपुरा, औरंगाबाद.
2. डॉ. विजय कविमंडन- 'कृषी व ग्रामीण अर्थव्यवस्था' श्री मंगेश प्रकाशन, नागपूर.
3. रंजन कोळंबे- 'भारतीय अर्थव्यवस्था' भगीरथ प्रकाशन, पुणे.
4. प्रदीप आगलावे- १९९३- 'संशोधन पद्धतीशास्त्र व तंत्रे' विद्या प्रकाशन, पुणे.
5. SLBC Maharashtra - Convener : Bank of Maharashtra २०१६-१७ते२०२०-२१

# शेती आणि ग्रामीण विकास कार्यक्रमांत क्षेत्रीय ग्रामीण बँकांची भूमिका.

**प्रा.निनाद विजय जाधव**

विभाग प्रमुख ग्रामीण विकास विभाग बी.एन.एन.महाविदयालय,भिवंडी.जिल्हा-ठाणे ४२१३०५.

**Email ID:** ninadjadhav777@gmail.com

भारतासारख्या विकसनशील देशात ग्रामीण विकासाला अत्यंत महत्त्वाचे स्थान प्राप्त झाले आहे. देशाच्या अर्थव्यवस्थेवर ग्रामीण अर्थव्यवस्थेचा मोठा पगडा आहे. ग्रामीण भागात दारिद्रा, बेकारी, निरक्षरता, अंधश्रद्धा किवा देवभोळेपणा त्यांचे प्रमाण अधिक आहे. त्यामुळे ग्रामीण विकासात आर्थिक विकासा बरोबरच साक्षर्तेचे प्रमाण आणि वैध्यानिक जागृती निर्माण करणे फार गरजेचे आहे. ग्रामीण विकास म्हणजे देशातील ग्रामीण भागाचा विकास घडवून आणण्याची एक निरंतर प्रक्रिया होय. ग्रामीण विकास हा एक कृती कार्यक्रम आहे. त्याचप्रमाणे ग्रामीण समुदाय आणि त्यांच्या समस्यांचा अभ्यास करणारे एक सामाजिक शास्त्र आहे. या सामाजिक शास्त्राची व्याप्ती अतिशय व्यापक आहे. यामध्ये ग्रामीण जीवनाच्या सामाजिक, राजकीय व आर्थिक पैलूंचा समावेश केला जातो. भारतीय सामाजिक जीवनात ग्रामीण जीवनाला महत्त्व प्राप्त झाले आहे. भारतात ६,२७,००० खेडी आहेत. भारत खेड्यांचा देश समजला जातो. एकूण लोकसंख्येपैकी जवळजवळ ७५% लोकसंख्या ग्रामीण भागात राहणारी आहे. अनेक खेडी अगदी लहान-लहान आकाराची आहेत. काही खेडी शहरापासून लांब दूर डोंगर दऱ्याखोऱ्यात वसलेली आहेत. दऱ्याखोऱ्यात, हिमालयाच्या पर्वत रांगांमध्ये, सागरी किनारपट्टी भागात विखुरलेला आहे. त्याचा इतर शहरी भागांशी संपर्कही होऊ शकत नाही. अशा सर्व खेडेगावांचे सामाजिक जीवन अतिशय कष्टमय व मागास स्वरूपाचे आहे.आज देशाला स्वातंत्र मिळून ७१ वर्षे पूर्ण झाली असली तरी आजही किमान मुलभूत गरजा या समाजाला प्राप्त झालेल्या नाहीत. ग्रामीण जनतेला किमान अन्न, वस्त्र व निवारा याबरोबरच आरोग्य व शिक्षण यासारख्या प्रथामीन गरजांची पूर्तता होणे अत्यावश्यक आहे. देशाचा विकास साधायचा असेल तर, प्रथम ग्रामीण भागातील खेडी लहान-लहान गावे टिकवणे गरजेचे आहे. मानवी वंशाचे संगोपन करणे आवश्यक आहे. खेड्यांचा नाश झाला तर भारताचा नाश होईल; म्हणून ग्रामीण भागातील सुप्त साधन सामुग्रीचा शोध घेऊन ती विकसित करणे हेच ग्रामीण विकासात अपेक्षित आहे.

**कीवर्ड्स –** वैधानिक, दऱ्याखोऱ्यात, संगोपन, साधन सामुग्री इ.

**ग्रामीण विकास-व्याख्या :-**

1. प्राथमिक गरजांची पूर्तता करणे यामध्ये शुद्ध पिण्याचे पाणी गावात उपलब्ध करून देणे, चांगल्या प्रतीचे व पुरेसे धान्य योग्य कितीत उपलब्ध करून देणे, निवारा व्यवस्था, ग्रामीण विद्युतीकरण, शैक्षणिक सुविधा, आरोग्य विषयक सुविधा इत्यादी सोयी निर्माण करणे म्हणजे **'ग्रामीण विकास'** होय.
2. ग्रामीण भागातील दुर्बल घटक म्हणजे छोटे शेतकरी, भूमिहीन शेतमजूर आणि ग्रामीण कारागीर यांच्या विकासावर भर देऊन ग्रामीण भागाचा सर्वांगीण विकास करणे म्हणजे **'ग्रामीण विकास'** होय.
3. ग्रामीण जनतेने स्वतः उपक्रमशील राहून स्वावलंबी जीवन जगण्याचा प्रयत्न करणे, ग्रामीण जनतेच्या या प्रयत्न करिता तांत्रिक व इतर सेवा यांची तरतूद करणे आणि आपल्यामध्ये परिवर्तन घडवून आणणे म्हणजे **'ग्रामीण विकास'** होय.

**ग्रामीण विकासाचे स्वरूप :-**

1. **ग्रामीण विकास ही सरकारची जबाबदारी आहे :-**
2. देशाच्या नागरिकांनी निवडून दिलेले प्रतिनिधी हे देशाच्या सर्वांगीण विकासासाठी कार्य करीत असतात. भारतीय संविधानातील तरतुदीनुसार या प्रतिनिधींना देशाच्या विकासासाठी सर्व ते प्रयत्न करावे लागतात. ग्रामीण विकास म्हणजे पर्यायाने देशाचा विकास असतो. देशातील औद्योगिकरणामुळे निर्माण झालेला प्रादेशिक असमतोल दूर करण्यासाठी, ग्रामीण जनतेचे शहरी भागाकडे होणारे स्थलांतर कमी करण्यासाठी, बेकारी व गरिबी दूर करण्यासाठी देशातील ग्रामीण क्षेत्राचा विकास अत्यावश्यक बाब ठरते त्यामुळे त्याची संपूर्ण जबाबदारी देशाच्या शासनव्यवस्थेकडे असते.
3. **विस्तृत व्याप्ती आहे :-**
4. ग्रामीण विअक्साची व्याप्ती बरीच विस्तृत आहे.ग्रामीण भागातील संपूर्ण जनजीवन विकसित करण्याच्या दृष्टीकोनातून ग्रामीण विकासाची संकल्पना राबविण्यात येते. यामध्ये आर्थिक, सामाजिक व स्थितीत बदल घडून येणे आवश्यक आहे. त्याचबरोबर देशातील सांस्कृतिक व नैसर्गिक वातावरणाचे संरक्षण देखील महत्वाचे असते. ग्रामीण भागातील सिंचन संरचना, विज्ञान आणि तंत्रज्ञान व्यवस्थापन, जंगल आणि नैसर्गिक संसाधने, वातावरणातील बदल, वाहतूक आणि संदेशवहन इत्यादी बाबींचा देखील ग्रामीण विकास ही एक विस्तृत अशी संकल्पना आहे.

5. **निरंतर चालणारी प्रक्रिया आहे :-**
6. ग्रामीण विकासात शेती व त्या संबंधित उद्योग आणि व्यवसाय यांचा प्रामुख्याने समावेश होतो. शेती त्या भागातील नैसर्गिक परिस्थिती, शेतीचे प्रकार, शेतीचा आकार, जलसिंचन, शेतीची अवजारे व यांत्रिकीकरण, सहकारी शेती, शेतमालाची विक्री, शेतमजुरांच्या समस्या, पशुसंवर्धन व त्यापासून प्राप्त होणारे पदार्थ, वितरण, उत्पादन प्रक्रिया इत्यादी अनेक क्षेत्राचा विकास हा ग्रामीण विकासात अंतर्भूत असतो. त्यामुळे ग्रामीण विकास ही एक निरंतर चालणारी प्रक्रिया आहे असे म्हंटले जाते.
7. **नियोजित कार्यक्रम :-**
8. ग्रामीण विकासासाठी राबिवले जाणारे सर्व कार्यक्रम हे नियोजन प्रक्रीयेद्वारे निश्चित केले जातात. भारताच्या विकासासाठी आखण्यात येणाऱ्या पंचवार्षिक योजनेमध्ये ग्रामीण विकासासंबधी तरतूद केली जाते. त्य योजनेनुसार सर्व कार्यक्रम राबविले जातात. त्यामुळे ग्रामीण विकास हा एक नियोजित कार्यक्रम असतो.
9. **सरकारद्वारे वित्तपुरवठा होतो :-**
10. पंचवार्षिक योजनेद्वारा नियोजनबद्ध पद्धतीने राबविण्यात येणाऱ्या ग्रामीण विकास कार्यक्रमासाठी आवश्यक असणारा निधी हा देशाच्या सरकारद्वारे पुरविण्यात येतो.
11. **विकासातील असमतोल कमी होतो :-**
12. ग्रामीण विकास कार्याक्रमाद्धारे शेती व त्यासंबंधीत सर्वच घटकांचा विकास होतो. शहरी विकास प्रक्रीयेमुळे देशाच्या विकासात निर्माण झालेला असमतोल कमी करण्यासाठी ग्रामीण विकास कार्यक्रम हे महत्त्वाचे ठरतात.
13. **उपलब्ध साधन संपत्तीचा पुरेपूर वापर होतो :-**
    ग्रामीण विकास कार्यक्रमाद्वारे देशातील नैसर्गिक साधन संपत्तीचा योग्य, पुरेपूर आणि काळजीपूर्वक वापर केला जातो. त्यातून लघु उद्योग व कुटीर उद्योगांना कच्चा माल कमी किंमतीत मिळू शकतो. त्यामुळे उत्पादन खर्च कमी होऊन लाभदायकतेचे प्रमाण वाढण्यास मदत होते.
14. **एकात्मिक सहकार्याची गरज असते :-**
    ग्रामीण विकास कार्यक्रमाची प्रभावी अंमलबजावणी होण्यासाठी ग्रामीण क्षेत्रातील नागरिकांचा संपूर्ण सहभाग आवश्यक आहे. त्याशिवाय हे कार्यक्रम यशस्वीपणे राबविता येणार नाहीत. त्यासाठी एकात्मिक सहकार्याची गरज असते.
15. **कृषीवर आधारित आहे :-**
    शेती व त्यावर आधारित उद्योग हाच ग्रामीण विकासाचा आधार आहे. शेतीतील उत्त्पादनाशिवाय उद्योग चालविता येत नाहीत. उदा. साखर कारखाने, कापड उद्योग, तेल उद्योग इत्यादी. त्यामुळे उद्योगांना सातत्याने कच्चा माल प्राप्त होण्यासाठी ग्रामीण विकासांतर्गत शेतीचा विकास सध्या केला जातो.
16. **समान व सर्वांगीण विकास होतो :-**
    ग्रामीण विकासात सर्व क्षेत्राचा समान व सर्वांगीण विकास घडून येतो. स्त्री-पुरुष समानता,स्त्रियांचे संक्षमीकरण, शिक्षण व आरोग्याच्या सुविधा, सांस्कृतिक विकास, कुटुंब कल्याण व नियोजन, महिला व बाल विकास, समाज जागरूकता, अंधश्रद्धा निर्मुलन इत्यादी अनेक बाबींवर देखील ग्रामीण विकासांतर्गत कार्यक्रम आखले जातात. त्याने देशाचा समान विकास होण्यास सुरुवात होते.

**ग्रामीण विकासाची व्याप्ती / Egrro** :-

भारत हा आकारमानाने विशाल देश आहे. देशाचे क्षेत्रफळ ३२,८७,२६३ चौरस कि.मी. आहे. देशाची एकूण लोकसंख्या १७० कोटीच्यावर असून ग्रामीण भागात वास्तव्य करणारी लोकसंख्या जवळजवळ ७०% इतकी आहे. सामान्यपणे जगातील सर्वच देशांमध्ये ग्रामीण विकासाच्या संकल्पनेत शेती क्षेत्रावरच अधिक भर दिला जातो. रोजगाराचे प्रमाण किवा फक्त राहणीमान वाढवण्याच्या दृष्टीनेच शेती क्षेत्रावर भर दिला जातो असे नाही त्याच बरोबर सामाजिक सेवा व ग्रामीण उद्योगाच्या विकासासाठी देखील प्रत्यक्ष शेती क्षेत्र हेच महत्वाचे ठरते. सर्वांगीण ग्रामीण विकासात शेती विकास, औद्योगिक विकास, सामाजिक विकास, नैसर्गिक साधनसंपत्ती विकास, पाणी पुरवठा विकास इत्यादी अनेक क्षेत्रात जलद विकास होणे अभिप्रेत आहे. ग्रामीण विकासाची व्याप्ती आपल्याला खालील मुद्द्यांवरून स्पष्ट करता येईल.

**ग्रामीण व्यासायाचा विकास :-**शेती हा ग्रामीण भागातील मुख्य व्यवसाय आहे. देशातील एकूण लोक्संखेपैकी ६४.५% लोकसंख्या प्रत्यक्ष शेती व्यवसायात गुंतलेली आहे. परंतु बहुतांशी शेतकरी अल्प व अत्यल्प भूधारक असल्यामुळे परंपरागत पद्धतीने शेती करतात त्यामुळे शेती व्यवसायाचा विकास झालेला नाही. आर्थिक परिस्थितीमुळे या कुटुंबांना शेतीत भांडवली गुंतवणूक करून शेतीचा विकास साधता येत नाही; म्हणून शेती

व्यवसायाला भांडवल पुरवठा, पाणी पुरवठ्याच्या सोयी व आदानांचा पुरवठा करून शेती बरोबरच जोड व पूरक उद्योगांचा विकास महत्वाचा आहे. या उद्योगामधून ग्रामीण कुटुंबांना नियमित उत्पन्न मिळण्यासाठी त्यांचा विकास साधणे आवश्यक आहे; म्हणून या ग्रामीण भागातील व्यवसायांचा विकास साधण्याच्या दृष्टीने ग्रामीण विकासाची व्याप्ती मोठी आहे.

**मुलभूत सुविधा :-** ग्रामीण विकासाला पोषक वातावरण निर्माण होण्यासाठी ग्रामीण भागात मुलभूत सुविधांची आवश्यक आहे. यामध्ये वाहतूक, दळणवळण, बेकारी, बाजारपेठ, विद्युतपुरवठा, पाणी पुरवठ्याच्या सुविधा पुरेशा प्रमाणात विकास साधण्याच्या दृष्टीने ग्रामीण विकासाची व्याप्ती वाढली आहे.

**औद्योगिक विकास :-**ग्रामीण भागात केले जाणारे सर्व व्यवसाय प्राथमिक स्वरूपाचे आहेत. या व्यवसायामधून कच्च्या मालाची निर्मिती केली जाते. मात्र कच्च्या मालावर प्रक्रिया करणारे उद्योग शहरी भागात अधिक प्रमाणात आहेत. त्यामुळे उत्पादनाचे अधिक फिडे शहरी भागातील व्यापारी वर्गाला मिळतात. परिणामी ग्रामीण भागाचा अर्थीक विकास होत नाही; म्हणून ग्रामीण भागात उत्पादित होणाऱ्या कच्च्या मालावर प्रक्रिया करणारे उद्योग ग्रामीण भागातच सुरु करून ग्रामीण औद्योगिकीकरण करण्यासाठी मोठी संधी आहे.

**सामाजिक विकास :-**ग्रामीण भागात अनेक जाती-धर्माचे लोक वास्तव्य करीत असून परंपरागत चालत आलेल्या अनेक अनिष्ट प्रथा ग्रामीण समाजात आढळून येतात; त्यामुळे त्यांच्या विकासावर त्याचा विपरीत परिणाम होत आहे. ग्रामीण समाज विखुरलेल्या स्वरुपात असून दुर्गम भागात वास्तव्य करणाऱ्या समाजात अनेक समस्या आहेत. या संपूर्ण समाजाचा विकास साधण्यासाठी त्यांना विकास प्रक्रियेत सामावून घेण्याची आवश्यकता आहे. म्हणून या समाजाच्या मुलभूत समस्या सोडोवण्यासाठी व सामाजिक विकस घडवून आणण्यासाठी ग्रामीण विकासाची व्याप्ती वाढली आहे.

**मानवी संपत्तीचा विकास :-**ग्रामीण मानवी साधन संपत्तीचा विकास प्रक्रियेत पुरेपूर वापर करून घेण्यासाठी प्रथम मानवी साधन संपत्तीचा विकास साधने आवश्यक आहे. यासाठी ग्रामीण भागात शिक्षणाचा प्रसार करून उच्च शिक्षणाच्या सुविधा निर्माण करणे आवश्यक आहे. मानवी साधन संपत्तीमध्ये कौशल्य निर्माण करण्यासाठी प्रशिक्षण सुविधांची आवश्यकता आहे. मानवी कार्यक्षमता वाढविण्यासाठी व कार्यक्षमता टिकवून ठेवण्यासाठी आरोग्य सुविधांची आवश्यकता असते. तरच मानवी शक्तीचा पुरेपूर वापर विकास कार्यात करून घेता येतो. म्हणून ग्रामीण मानवी साधन संपत्तीचा विकास साधून आर्थिक विकासाला गती प्राप्त करून देण्यासाठी ग्रामीण विकासाची व्याप्ती अधिक आहे.

**नैसर्गिक साधन संपत्तीचा विकास :-**ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणात नैसर्गिक साधन संपत्ती उपलब्ध आहे. परंतु, या नैसर्गिक साधन संपत्तीचा पुरेपूर विकास न साधल्यामुळे सुप्त आवस्थेत पडून आहे अशा साधन संपत्तीचा विकास साधण्यासाठी मोठ्या प्रमाणात भांडवलाची आवश्यकता आहे. तरच या साधन संपत्तीचा आर्थिक विकासासाठी उपयोग करून घेता येतो. म्हणून भू-संपत्ती, जलसंपत्ती, खनिज संपत्ती, पशुसंपत्ती, सागरी संपत्ती इत्यादी घटकांचा योग्य उपयोग करून घेण्यासाठी ग्रामीण विकासाची व्याप्ती वाढली आहे.

**लोकसंख्या नियंत्रण :-**ग्रामीण भागातील जलद गतीने वाढणारी लोकसंख्या हे महत्त्वाचे ग्रामीण विकासाचे अडसर आहे. लोकसंख्या वाढीचा वेग तसाच ठेऊन आर्थिक विकासाचे कितीही प्रयत्न केले तरी ते अपुरे पडणारे आहेत. लोकसंख्या नियंत्रण हा महत्त्वाचा घटक असल्याने ग्रामीण विकासाची व्याप्ती अधिक आहे.

**ग्रामीण विकासाच्या शाखा :-**

**बिगरसंथात्मक कर्जपुरवठा :-**या प्रकारच्या स्त्रोत्रात सावकार, जमीनदार, सराफी पेधीवले इत्यादीच समावेश होतो. या प्रकारच्या कर्जामुळे शेतकर्यांमध्ये कर्जबाजारी होण्याचा प्रमाण अधिक आहे.

**संथात्मक कर्जपुरवठा :-**

या प्रकारच्या वित्तीय स्तोत्रात सहकारी सोसायट्या, सहकारी बँका, प्रादेशिक ग्रामीण बँका यांचा समावेश होतो. शेतकऱ्यांच्या वित्तीय गरजाचा कालावधी व खरीदी कराराच्या वस्तूंचे स्वरूप यावरून कर्जपुरवठ्याचे ३ उपप्रकार पडतात.

**अ) अल्प मुदतीचे कर्ज :-**

या कर्जाचा कालावधी १२ ते १५ महिने असतो. बी-बियाणे, कीटकनाशके इ. घेण्यासाठी या प्रकारचे कर्ज मिळते.

**ब) मध्यम मुदतीचे कर्ज :-**

हा कालावधी १५ महिने ते ०५ वर्षाचा असतो. जनावरांची खरेदी, जमीन सुधारणे, छोटी यंत्रणा खरीदी यासाठी हे कर्ज घेतले जाते.

**दीर्घ मुदतीचे कर्ज:** या कर्जाचा कालावधी ५ वर्षापेक्षा अधिक असतो. यात विहीर मोठी करणे, यंत्र खरेदी, जमीन खरेदी यासाठी हे कर्ज दिले जाते.

**राज्य सहकारी बँक :-** महाराष्ट्र राज्य सहकारी बँक ही राज्यातील सर्वात जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांना अल्प व मध्यम मुदतीचा कर्ज पुरवठा करते. ही बँक राज्यातील जिल्हा मध्यवर्ती बँकांची बँक म्हणून कार्य करते. राज्य सहकारी बँकेवर नाबार्डचे नियंत्रण असते.

**जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक :-** जिल्हा पातळीवर ही बँक काम करते. ही बँक प्राथमिक सहकारी संस्था व राज्य सहकारी बँक यांची मधली बँक म्हणून कार्य करते. सर्व प्रथामिंक संथांचे सभासद हे या संस्थेचे सभासद असतात. जिल्हा मध्यवर्ती बँक या रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया व राज्य सहकारी बँकेकडून कर्ज घेतात. जिल्हा मध्यवर्ती बँकांना त्याच्या भांडवलाच्या १२ ते १५ पट कर्ज घेता येते.

**प्रथामीन कृषी सहकारी पतसंस्था :-** ही संस्था गावपातळीवर शेतकऱ्यांना लघु व मध्यम कालावधीचे कर्ज उपलब्ध करून देते. या संस्था जिल्हा मध्यवर्ती सहकारी संस्थेच्या अंतर्गत काम करते. १० किवा अधिक व्यक्ती एकत्र येऊन या प्रकारची संस्था स्थापन करू शकतात. या संस्थेच्या सभासाधांना अल्प व मध्यम मुदतीचे कर्जे उपलब्ध करून देले जाते. शेती संदर्भातील बी-बियाणे, खाते, कीटकनाशके इ. वस्तू खरेदी करण्यासाठी तर कधी कधी या वस्तूंचा पुरवठा ही बँक करते.

**अग्रणी बँक योजना :-**

ग्रामीण भागाचा विकास करायचा असल्यास आणि शेतकऱ्यांना सावकारांच्या तावडीतून सोडवायचे असल्यास ग्रामीण भागात बँकांचा विस्तार करणे आवश्यक आहे. ग्रामीण भागातील सहकारी बँका आणि इतर वित्तीय संस्थांच्या धोरणामध्ये सुसूत्रता निर्माण करून जलद आर्थिक विकास साधण्याचे या बँकांचे धोरण आहे. कर्ज देतांना फक्त व्यावसाय हा एकाच हेतू ण ठेवता सर्वांगीण विकासाला देखील चालना देणे आवश्यक आहे. ही बाब लक्षात घेऊन ग्रामीण भागातील कृषी, लघु उद्योग, किरकोळ व्यापारी, गृहनिर्माण , स्वयंरोजगार, कृषी प्रक्रिया, कारखानदारी यासारख्या उद्योगांना भांडवल पुरवठा केला जातो.

**प्रादेशिक ग्रामीण बँका :-**

ग्रामीण भागातील कर्जबाजारीपणा कमी होऊन ग्रामीण भागाचा विकास कसा साधता येईल या दृष्टीने सरकारने २ ऑक्टोबर १९७५ रोजी प्रादेशिक ग्रामीण बँकांची सुरुवात केली. १ जुलै १९७५ रोजी एम नार्सिहम यांच्या अध्यक्षतेखाली एक ग्रामीण बँका विषयक कार्यगट स्थापन करण्यात आला. या कार्यगटाच्या शिफारशीनुसार प्रादेशिक ग्रामीण बँक कैद १९७६ अस्तित्वात आला. प्रादेशिक ग्रामीण बँकेच्या भांडवलामध्ये व्यावसायिक बँकेचा आणि १५% वाटा राज्य शासनाचा असतो. ग्रामीण बँकांना स्वतःचा व्याज दर ठरवण्याचा अधिकार २६ ऑगस्ट १९९६ पासून मिळालेला आहे.

**राष्ट्रीय कृषी व ग्रामीण विकास बँक (NABARD) :-**

रिझर्व्ह बँकेचे डेप्युटी गव्हर्नर हे नाबार्डचे चेअरमन म्हणून नेमले जातात. नाबार्डची स्थापना नाबार्ड कायदा १९८२ नुसार, १२ जुलै १९८२ रोजी झाली. देशाच्या ग्रामीण व कृषी पतपुरवठ्यामधील देशपातळीवरील सर्वोच्च संस्था म्हणून नाबार्डची भूमिका अत्यंत महत्वाची आहे. नाबार्ड मध्ये भारत सरकार व रिझर्व बँक ऑफ इंडिया यांची भागीदारी आहे. नाबार्ड कडून अल्पकालीन (१८ महिन्यांपर्यंत) मध्यमकालीन (१८ महिने ते ७ वर्षे) या काळापर्यंत तर दीर्घकालीन (२५ वर्षापर्यंत) मुदतीचे कर्ज सहकारी बँका, भूविकास बँकांना उपलब्ध करून देते. नाबार्ड कुटीर उद्योग, ग्रामोउद्योग या शेत्रामध्ये पतपुरवठा करणाऱ्या संस्थांना पुनर्वित्तीय सुविधा उपलब्ध करून देतो. सहकारी पतपुरवठा संस्थांवर देखरेख ठेऊन त्यांना उतेजन देणे तसेच ग्रामीण पायाभूत विकासासाठी निधी निर्माण करते.

**ग्रामीण विकासाचे अभ्यास पद्धती :-**

**ग्रामीण विकास :-**

ग्रामीण भागामध्ये काम करू इच्छिणाऱ्यानी ग्रामीण विकास या संकल्पनेचा नीट अभ्यास करायला हवा. ग्रामीण विभागाच्या विकासाची आवश्यकता तसेच ग्रामीण विकासाचे मोजमाप करण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या पद्धती, ग्रामीण विकासामध्ये गावाची रचना, घरांची रचना, रस्ते, पाणी पुरवठा, स्वच्छता गृह इ. अनेक स्वरूपाचा ग्रामीण विकासाच्या अभ्यास पद्धतीत महत्त्व आहे.

**ग्रामीण मार्केटिंग :-**

कोणत्याही व्यवसायाचे यश त्या वस्तूंचे मार्केटिंग कसे केले जाते यावर बऱ्याच प्रमाणात अवलंबून असते. या दृस्तीकोनातून ग्रामीण भागातील मार्केटची रचना कशी असते त्याचप्रमाणे ग्रामीण भागात मार्केटिंग करतांना कोणता विचार करावा लागतो; ग्रामीण भागातील अर्थव्यवस्था कशा पद्धतीची आहे; तसेच ग्रामीण भागातील आर्थिक, सामाजिक, राजकीय पर्यावरण कसे आहे आणि या सर्वांचा ग्रामीण भागातील मार्केटिंगवर काय परिणाम होतो;

बाजारपेठेतील यश हे ग्राहकाला समजून गेऊन त्याच्या गरजेप्रमाणे वस्तू उपलब्ध करून देण्यामध्ये आहे. या दृष्टीने ग्रामीण भागातील ग्राहक आणि त्याच्या आवडी-निवडी समजून घणे आवश्यक आहे. त्यानुसार मार्केटिंग मधील नवीन तंत्र ग्रामीण भागात वापरणे याचीही नितांत गरज आहे. या दृष्टीकोनातून बाजारपेठेचे संशोधन हे गरजेचे ठरते.

**ग्रामीण वित्तपुरवठा :-**

मार्केटिंग बरोबरच **'Agri Business Management'** मध्ये वित्तपुरवठ्याचे महत्त्व मोठ्या प्रमाणावर आहे. शेती व्यवसायाला वित्तपुरवठा करण्याची सध्याची पद्धत काय आहे  तसेच वित्तीय पुरवठ्याचे काय महत्त्व आहे. यासंबंधीची माहिती या विषयातून मिळते. ग्रामीण विभागामध्ये तसेच शेती व्यवसायाला भांडवलाचा पुरवठा करण्यामध्ये सहकारी बँकांनी मोठ्या प्रमाणावर हातभार लावला आहे. या दृष्टीने सहकारी बँका व त्यांनी केलेला वित्तपुरवठा याचा अभ्यास या विषयातून करता येतो. तसेच कर्ज घेतांना, धोक्याचे व्यवस्थापन कसे करावे याची माहिती सुद्धा होते.ग्रामीण विभागाच्या विकासामध्ये सूक्ष्म अर्थपुरवठा (micro finance) या पद्धतीचा महत्वाचा वाटा आहे; त्याचाही समावेश या विषयामध्ये होतो.

**शेतमालाचे विपणन :-**

१८५४साली सावित्रीबाई फुले यांचा 'काव्यफुले' हा काव्यग्रंथ प्रसिद्ध झाला. या काव्यसंग्रहाच्या रूपाने मराठी ग्रामीण कवितेचा प्रारंभ झाला असं म्हटलं जातं.१८५४साली सुरू झालेली ही परंपरा साधारणत:१९६०पर्यंत अत्यंत संथगतीने निद्रितावस्थेत हळूहळू पुढे जात होती. या कालखंडात बहिणाबाई चौधरी, ग ल ठोकळ,ग.ह. पाटील, सोपानदेव चौधरी असे बोटावर मोजता येतील इतकेच कवी लेखक ग्रामीण लोकजीवन मांडीत होते.पुढे 1960 नंतर म्हणजे महाराष्ट्र राज्याच्या निर्मितीनंतर मराठी साहित्य जोमाने पुढे जाऊ लागले याच काळात संविधानाचा स्वीकार, लोकशाही मुल्ये,विविध विचारधारा या सर्व बाबींचा ग्रामीणलोकजीवनावर हळूहळू प्रभाव पडू लागला आणि त्यातून ग्रामीण जीवनाचं स्वरूप बदलू लागलं.ग्रामीण भारतात विकासाच्या वाटा हळूहळू पोहचू लागल्या, शिक्षण खेड्यापाड्यापर्यंत पोहोचायला लागलं,दळण-वळणाची साधने वाढू लागली आणि यातून नवंग्रामीण जीवन आकाराला येऊ लागलं. राजकारण, चळवळी, आंदोलने याही गोष्टींचा प्रभाव हळूहळू ग्रामीण लोकजीवनावर पडू लागला.गांधीवाद,आंबेडकरवाद, साम्यवाद, हिंदुत्व आदि विचारधारांच्या अनुषंगानेही ग्रामीण जीवन ढवळायला सुरुवात झाली. ग्रामीण पिढी शिक्षण घ्यायला लागली विचार करायला लागली,साहित्यातील आपले स्थान शोधायला लागली,आपण आपले जीवनानुभव वास्तवासहित मांडले पाहिजे आपण व्यक्त झालं पाहिजे ही जाण या पिढीत निर्माण झाली आणि त्यातून 'ग्रामीण साहित्य' हा प्रवाह ऊर्जितावस्था घेऊन चळवळीच्या अनुषंगाने पुढे येण्याचा प्रयत्न करू लागला. ग्रामीण साहित्यातविविध वाङ्मय प्रकारांची निर्मिती व्हायला सुरुवात झाली. ग्रामीण कथा,ग्रामीण कादंबरी आणि ग्रामीण कविता ही त्यातील महत्त्वाची दालनं. एकंदरीत ग्रामीण साहित्यातील कृषीनिष्ठ जीवनाचा अभ्यास करीत असताना ग्रामीण कवितेच्या संदर्भात विश्वास जहागीरदार यांनी मांडलेले मत ग्रामीण साहित्यातील कृषीसंस्कृतीचे महत्व पटवून देणारे आहे ते म्हणतात,"ग्रामीण कविता म्हणजे ग्रामीण संवेदनशीलतेने घडविलेली कविता.कलावंताची संवेदनशीलता म्हणजे अनुभव घेण्याची त्याची पद्धती बाह्य वास्तव, सभोवताली घडणाऱ्या घटनांच्या बद्दल विशिष्ट जाणिवां निर्माण करीत असते आणि त्या कवितेच्या बुडाशी असतात. ग्रामीण कवितेमध्ये बाह्य वास्तव हे खेडे निसर्ग आणि पारंपारिक मूल्य यातून घडलेले ग्रामजीवन आहे आणि त्यात आकाररूपाला आलेली संवेदनशीलता त्या जीवनातील अनुभवाविषयीच्या प्रतिक्रिया देत असते. अशा कवितेच्या निर्मितीच्या बुडाशी असलेली संवेदनशीलता ही ग्रामीण संवेदनशीलता आहे. आणि अशी कविता ग्रामीण आहे. असेच स्थूलमानाने म्हणता येईल."[२] विश्वास जहागिरदार यांच्यावरील मतावरून प्रामुख्यानं हे लक्षात येतं की, ग्रामीण साहित्य म्हणजे केवळ ग्रामीण निसर्गाचे चित्रण करणारं साहित्य नव्हे, तर ज्या साहित्यात ग्रामीण संवेदना प्रामुख्याने मांडलेल्या असतात ते साहित्य ग्रामीण ठरते.जहागीरदारांचे मत कवितेच्या संदर्भात असले तरी ते इतरही ग्रामीण साहित्याला तंतोतंत लागू पडणार आहे.ग्रामीण साहित्य म्हणजे केवळ ग्रामीण लेखकाने अथवा कवीने लिहिलेले साहित्य असं आपणाला म्हणता येत नाही. ग्रामीण जीवन शैली, ग्रामीण संस्कृती, ग्रामीण लोकपरंपरा,ग्रामीण जीवन,ग्रामीण संस्कृती, कृषीनिष्ठ जीवन विशेषतः ग्रामीण बोलीसह जेव्हा साहित्यातून अवतरते तेव्हा ते साहित्य ग्रामीण ठरते.कृषीसन्मुखता हा ग्रामीण साहित्याचा महत्वाचा विशेष ठरतो. ग्रामीण साहित्याच्या संदर्भात आपला विचार मांडत असतांना गणेश देशमुख यांनी म्हटले आहे की,"ग्रामीण शहरी जीवन हा साहित्यातील ठळक भेद ग्रामीण साहित्याशी समांतर असणाऱ्या विश्लेषणात द्वारे प्रकटत नसल्याने ग्रामीण विशेषणचत्यासाठी वापरावे लागते. कारण नागरी व शहरी जीवन पद्धती मुल्ये,परंपरा, भाषा इ. या सर्वच दृष्टीने सामाजिक पातळीवरही हा भेद ठळकपणे जाणवतो. कृषिकेंद्रितता समूह प्रधानता, निसर्गसन्मुखता, स्वाभाविकता, स्वावलंबीत्व, कार्य-विभाजनाची प्रवृत्ती,स्थितीशीलता, कुटुंब, ग्रामसंस्थांचा प्रभाव, भाषिकपृथगात्मता, मौखिक साहित्य परंपरा,प्रदेशविशिष्ट अशी जीवनशैली इ.वैशिष्ट्यांमुळे ग्रामीण समाजाला आपला असा ठळक चेहरा प्राप्त झाला आहे.या सामाजिक व सांस्कृतिक संचिताचा प्रत्यय ग्रामीण साहित्यातून यावा अशी अपेक्षा असते.या इतिहासकालीन वैशिष्ट्याबरोबरच आधुनिक अशी जीवनवैशिष्ट्ये ग्रामीण साहित्यातून प्रकट होत असतात."[३]

गणेश देशमुख यांच्यावरील विचारातून आपणाला ग्रामीण आणि नागरी हा लोकजीवनातील जसा भेद कळतो, त्याचबरोबर 'ग्रामीणत्व' हे कृषीनिष्ठ कसे असते याची प्रचिती येते.ग्रामीणता ही एक स्वतंत्र अशा प्रकारची ओळख आहे.ग्रामीण संस्कृतीची तिची अशी एक खास आपली ओळख आहे. परंपरेने संक्रमित होत आलेले हे लोकजीवन आज एकविसाव्या शतकातही ग्रामीणत्वाचाकृषिनिष्ठ संस्कृतीच्या आदिम खुणा जपून आहे. ग्रामीण साहित्यातून चित्रित होणार ग्रामजीवन ग्रामीणत्वाचा खुणावर अवलंबून असते.या ग्रामीणत्वाच्या खुणा

लोकजीवनात विविध पद्धतीनं ठासून भरलेल्या असतात.ग्रामीण साहित्यातून निर्माण होणारा कुठलाही वाङ्मय प्रकार हा प्रामुख्याने त्या कवी वा लेखकाच्या जीवनाचाच एक अविभाज्य भाग असतो.प्रामुख्याने त्याच्या वाट्याला आलेले जीवन, त्याने पाहिलेलं भोगलेले जीवन त्याच्या साहित्यातून प्रकट होत असते. ग्रामीण साहित्य कृषीसन्मुख कसे असते या संदर्भात मांडणी करत असतांना आपणास कवी इंद्रजित भालेराव यांचं पुढील मत लक्षात घेण्यासारखं आहे ते आपल्या कवितेच्या प्रसवा विषयी विचार मांडताना म्हणतात,"घरी उपासमार होईल इतकी गरिबी नसली तरी शेतमजूर लावूनच सगळी कामे करून घ्यावीत इतकी तेव्हा श्रीमंतीही नव्हती. माझ्या सगळया बहिणीही लग्न होईपर्यंत आणि नंतर माहेरपणाला आल्यावरही शेतात काम करायच्या.त्यांच्या सोबत मीही राबायचो. कष्ट इतके स्वाभाविक वाटतात, की त्यांचे भांडवल करण्याचं मनातही येत नाही.माझ्या कवितेला मातीचा अस्सल गंध आहे असं जे समीक्षक म्हणतात, त्याचंही कदाचित हेच कारण असावं. प्रत्यक्ष भोगलेलं आणि पाहिलेलं शेतकरी जीवनाचं वास्तव हीच माझ्या कवितेची मुख्य भूमिका आहे असं वाटतं".४

इंद्रजित भालेराव यांच्या उपरोक्त मतावरून प्रामुख्यानं हे लक्षात येतं, की ग्रामीण साहित्य ते अस्सल मातीशी, मातीतल्या माणसांशी, त्यांच्या व्यथा-वेदनांशी नाळ जोडणारं साहित्य आहे. हे साहित्य कल्पनेतलं नसून वास्तवातलं आहे. सृजनाची ही प्रक्रिया स्वकडून आम्हीकडे जाणारी आहे. आणि हे आम्ही ग्रामसंस्कृतीचे पाईक आहेत.कृषीधर्म हा त्यांचा श्वास आहे. म्हणून त्यांची जीवननिष्ठाही कृषिनिष्ठजीवनाशी निगडित आहे.ग्रामीण साहित्य हे कृषीसंस्कृतीचे दुसरं नाव आहे.ग्रामीण साहित्य म्हटलं की, आपल्या डोळयासमोर शेती शेतकरी आणि त्यातील जीवनानुभव येतात.ग्रामीण साहित्याचे प्रमुख प्रवर्तक डॉक्टर आनंद यादव यांनी ग्रामीण साहित्याच्या संकल्पनेच्या संदर्भात आपली भूमिका मांडत असतांना म्हटले आहे की,"ग्राम म्हणजे खेडेगाव, तेथील जीवन पद्धती, तेथील समाज, त्या समाजाची कृषिप्रधान संस्कृती, तेथील विशिष्ट निसर्गाशी, मातीशी त्याचा असलेला वैशिष्ट्यपूर्ण संबंध. त्या संस्कृतीला लाभलेली इतर वैशिष्ट्ये तेथील मानवीजीवनाला त्या प्रदेशानुसार लाभलेली आर्थिक, सामाजिक, धार्मिक,ज्ञानात्मक,औद्योगिक वैशिष्ट्ये आणि त्यांच्याशी संबंधित प्रश्न आणि समस्या तसेच कालौघात होत जाणाऱ्या स्थित्यंतराचे तेथील जीवनसंस्कृतीवर होणारे संस्कार याचा आविष्कार ग्रामीण साहित्यात होत असतो."५डॉ.आनंद यादवांनी ग्रामीण साहित्य ही संकल्पना स्पष्ट करीत असताना मांडलेलं वरील मत अत्यंत महत्त्वाचं असं आहे. त्यांनी आपल्या मतात ग्रामीण जीवनाची पारंपारिक नाळ जपत असताना ग्रामीण जीवनावर होणारे प्रभाव त्यातून घडणारे बदल यांची अभ्यासपूर्ण मांडणी केली. एकंदरीत ग्रामीण जीवनसर्वस्पर्शी बनत असताना ते बदल साहित्यातूनही येण अपेक्षित असते.हीच भूमिका त्यांच्यावरील मतांमधून दिसून येते.

ग्रामीण लोकजीवन जसजसे बदलत गेले. तसतसे ग्रामीण साहित्य ही बदलत गेले. परंपरा आणि नवता या दोहोंचा मिलाफ आधुनिक काळामध्ये ग्रामीण जीवनात दिसू लागला.ग्रामीण जीवनाच्या या बदलाच्या अनुषंगाने मांडणी करीत असताना डॉ. वासुदेव मुलाटे म्हणतात,"माणसाचे शोषणकर्ते बदलू लागले आहेत.म.फुल्यांच्या काळात असणारा शोषक वर्ग आता तेवढासा समर्थ राहिलेला नाही.मूळचा खेडूत खेड्यातून आलेला लोकशाहीच्या नावाखाली राजकारण करून विविध सत्तास्थाने, अर्थस्थाने बळकावणारा हा शोषकवर्ग आहे.तो अधिक धूर्त,अधिक चाणाक्ष आणि वेळ प्रसंगी कोणत्याही मार्गाचा नीती-अनितीचा अवलंब करणारा आहे.या नव्या शोषकांकडून आपले शोषण, आपली पिळवणूक थांबवणे हे अधिक अवघड काम आहे. कारण अन्याय करणारा हाच मुळी शेतकऱ्यांच्या घरातला आहे.घरातलाच माणूस जर अन्याय करीत असेल तर दाद तरी कुणाकडे मागायची?आणि विरोध तरी कुणाला करायचा? स्वातंत्र्यानंतर स्वातंत्र्याची गोड फळे खायला मिळतील अशा भ्रमात असणाऱ्या मंडळीचा भ्रमनिरास झालेला होता,अपेक्षाभंग झालेला होता.स्वातंत्र्योत्तर काळात जन्मलेली व तारुण्यात पदार्पण केलेली पिढी बेकार बनून दिशाहीन अवस्थेत फिरत होती.हा उद्रेकाचा स्वर इ.स.1975 नंतरच्या ग्रामीण साहित्यात उमटू लागला. आणि आता इ. स.1990- 92 च्या काळातील ग्रामीण साहित्याने गांभीर्याने विद्रोहाचा सूर आळवायला सुरुवात केली आहे.आता रान पेटून उठते आहे."६
वासुदेव मुलाटे यांनी अत्यंत विद्रोही स्वरूपात ग्रामीण साहित्यातील बदलत्या स्वरूपाचं विवेचन वरील मतांमध्ये केलं आहे. ग्रामीण जीवन बदलत असताना ग्रामीण माणूस कसा बदलत चाललेला आहे, नीतिमूल्यांची पडझड कशी होते आहे. राजकारण स्वार्थांध कसे बनत चाललेलं आहे. बेरोजगारीचा प्रश्न किती भयंकर रूप घेतो आहे, या सर्वांची तीव्रता दिवसेंदिवस वाढताना आपणाला दिसते आहे. जागतिकीकरणाच्या सुरुवातीच्या काळात वासुदेव मुलाटे यांनी मांडलेलं वरील मत आज जागतिकीकरणाच्या संपूर्ण कचाट्यात अडकलेल्या

ग्रामीण माणसासाठीतितकचं प्रखरआणि भयावह आहे.आजचे ग्रामीण जीवनविविधांगाने बदलते आहे.ग्रामीण साधनेविविध अंगाने बदलत आहेत.साधनाच्या बदलामुळे कृषीसंस्कृतीची रचनाही बदलत चाललेली आहे.ग्रामीण जीवन नवीन बदल घेऊन येत आहे पण ग्रामीण जीवनातील प्रश्न मात्र जैसे थे आहेत त्यात जागतीकरणामुळे नवीन प्रश्नाची भर पडत चालली आहे.ग्रामीण भारतात आज जमिनीचे तुकडीकरण मोठ्या प्रमाणावर होत आहे.शेतीनिष्ठ दृष्टीकोन असलेली पिढी संपत चालली आहे.अत्याधुनीकरणाच्या या काळात जागतिकीकरणाच्या कचाट्यात सापडलेला ग्रामीण माणूस कृषीसन्मुख जीवनापासून दूर जात आहे.नव्या भांडवली व्यवस्थेचे प्राबल्य वाढत चालल्या मुळे आज ग्रामीण जीवन प्रभावित होत चालले आहे. भांडवली व्यवस्थेचा प्रचंड प्रभाव आणि दबाव आज विविध अंगाने ग्रामीण जीवनावर येतो आहे आणि त्याचे चित्रण आजच्या ग्रामीण साहित्यातून येत असतांना म.फुलेची विचारधारा आणि शोषणमुक्त समाजव्यवस्थेचा पुरस्कार आजच्या ग्रामीण साहित्याने होणे आवश्यक आहे.आजचे ग्रामीण साहित्यात केवळ दु:ख मांडणारे नको तर विद्रोही स्वरुपात दु:खाला वाचा फोडणारे आणि चळवळ सशक्त करणारे हवे आहे.शेवटी साहित्याचे प्रयोजन कलावादी की जीवनवादी या भूमिकेत न अडकता साहित्य समाज निर्मिती साठी निर्माण होणे आवश्यक आहे. अशी प्रखरता असा विद्रोह ग्रामीण साहित्यातून यायलाच हवा.साहित्यातून चळवळी निर्माण होणे आवश्यक.अशा प्रकारचे वातावरण ग्रामीण साहित्यातून आजपर्यंत निर्माण झालेले दिसत नाही ही खेदाची बाब म्हणावी लागेल.आज बदलत्या भांडवलशाही व्यवस्थेत बरोबर भारतातील लोकशाही नांदू लागली आहे.जागतिकीकरणाचा सर्वात जास्त प्रचंड प्रभाव भारतातील कृषी जीवनावर पडलेला आहे. आज ग्रामीण भारत 'ग्लोबलाईज' होत चाललेला आहे 'डिजिटल' बनत चाललेला आहे.संस्कृती संकराचे नवे समीकरण साहित्यातून येत आहे. कृषीसंस्कृती ही मानवी जीवनाचा मूलाधार आहे.कितीही तांत्रिक प्रगती केली तरी कृषी उत्पादना शिवाय पर्याय नाही.आजची ग्रामीण तरुणांची पिढी कृषी जीवनापासून फारकत घेण्याचा प्रयत्न करते आहे. भारतामध्ये शेतीकडे पाहण्याचा दृष्टीकोन पारंपरिक राहिला आहे.शासन स्तरावरही कृषीनिष्ठ जीवनासाठी ठोस उपाययोजना होताना दिसत नाहीत. त्यामुळे कृषीसन्मुखता येणाऱ्या पिढीमध्ये क्षीण स्वरूपात दिसते आहे.तरुणांमधील शेतीवरील प्रेम कमी कमी होत चाललेआहे जमिनी विकण्याचे प्रमाण वाढत चाललेलं आहे.आज गावं शहर बनताहेत. भांडवली व्यवस्था कृषिनिष्ठ जीवन शैलीवर प्रभाव टाकताना दिसते आहे. ग्रामीण साहित्यातील कृषिनिष्ठ जीवनशैली आधुनिक जीवनाकडे प्रवास करताना नको ते बदल स्वीकारीत पुढे जात आहे.अंधविश्वास,स्वैराचार, स्वार्थांध प्रवृत्ती बळावत चाललेल्या आहेत.यासर्वामुळे ग्रामीण माणसांमध्ये असलेली संवेदनशीलता हळूहळू बदलतचाललेली आहे.जगण्याचं एक नवं अक्राळ विक्राळ रूप समोर येत आहे आणि त्याची छाया ग्रामीण समाजावरही पडते आहे. या सर्व बदलांना स्वीकारून आजचं साहित्य पुढे जात आहे. ग्रामीण साहित्यातून बदलत्या ग्राम वास्तवाचं चित्रण होत असताना बदलत्या कृषीसन्मुख ग्रामीण समाजाचे चित्रण आजच्या ग्रामीण साहित्यातून येण क्रम प्राप्त आहे.पण हे सर्व बदल होत असतांना ग्रामीणत्वाची आदिम मंगलधारा अबाधित राहणं तेव्हढच महत्वाचं.

**संदर्भ**:

1. कोत्तापल्ले डॉ नागनाथ ग्रामीण साहित्य: स्वरूप आणि शोध,स्वरूप प्रकाशन औरंगाबाद तृतीय आवृत्ती २००७ पृ.७४
2. जहागीरदार विश्वास, म.सा.पत्रिका (ग्रामीण साहित्य विशेषांक) जुलै-डिसेंबर १९८० पृ.८९
3. देशमुख गणेश,'ग्रामीण समाजजीवन व साहित्य, स्वरूप प्रकाशन,औरंगाबाद प्रथमावृत्ती,२००८ पृ.२८३-२८४
4. भालेराव इंद्रजीत,पीकपाणी,मेहता पब्लिशिंग हाऊस,पुणे,चौथी आवृत्ती ऑगस्ट २००१ पृ.४८
5. यादव आनंद मराठी वाङ्मय कोश खंड ४ (समन्वयक संपा.विजया राजाध्यक्ष) महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ,मुंबई,प्रथमावृत्ती २००२ पृ.११३
6. मुलाटे वासुदेव,साठोत्तरी मराठी वाङ्मयातील प्रवाह (संपा.डॉ.शरणकुमार लिंबाळ)दिलीपराज प्रकाशन,पुणे प्रथमावृत्ती २००७ पृ.८०

**आधारभूत ग्रंथ :**

1. रसाळ सुधीर, कविता आणि प्रतिमा,मौज प्रकाशन गृह मुंबई, द्वितीय आवृत्ती, २००२.

2. पंडित नलिनी, जागतिकीकरण आणि भारत, लोकवाङ्मय गृह मुंबई, दुसरी आवृत्ती २००४
3. मुलाटे वासुदेव, ग्रामीण साहित्य चळवळ आणि आम्ही ,मेहता पब्लिशिंग हाऊस पुणे, प्रथमावृत्ती १९९६
4. कोतापल्ले नागनाथ आणि इतर, ग्रामीण दलित व स्त्रीवादी साहित्य,यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ नाशिक, प्रथम आवृत्ती २००१
5. अत्रे.त्रि.ना., गावगाडा ,वरद बुक्स पुणे ,आवृत्ती ३ री, १९८९
6. जाधव वामन, ग्रामीण साहित्य आणि शेतकरी, जीवन इंदिरा प्रिटींग प्रेस पुणे, द्वितीय आवृत्ती २००७
7. कोत्तापल्ले डॉ.नागनाथ, साहित्याचा अन्वयार्थ, स्वरूप प्रकाशन औरंगाबाद ,प्रथमावृत्ती १९९६

*'Journal of Research & Development' A Multidisciplinary International Level Referred and Peer Reviewed Journal, Impact Factor-7.265, ISSN: 2230-9578, 30 October2021, Volume-12, Issue-15*
*Agriculture and Rural Development: Strategic Issues and Reform Options*

# मराठवाड्यातील कापूस लागवडीचे अर्थशास्त्र

**उगले गीता दिलीप[1] डॉ. डी.एन. जिगे[2]**

[1]अर्थशास्त्र विभाग, संशोधक विद्यार्थी डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद

[2]सहयोगी प्राध्यापक अर्थशास्त्र विभागप्रमुख, देवगिरी महाविद्यालय, औरंगाबाद

Email :geetaugale01@gmail.com

**प्रस्तावना :**

जगातील सर्व देश हे अन्नविषयक गरजा आणि आर्थिक विकास साध्य करण्यासाठी कृषी क्षेत्रावरच अवलंबून असतात. त्यामुळे कृषी क्षेत्राला विकास प्रक्रियेत उल्लेखनीय महत्त्व प्राप्त झालेले दिसून येते. भारतामध्ये प्राचीन काळापासून शेती हा व्यवसाय मूलभूत व प्राथमिक व्यवसाय म्हणून गणला जातो. देशातील 2011-12 च्या जनगणनेनुसार 62 टक्के लोकसंख्या ही शेती व्यवसायावर अवलंबून आहे. भारतातील प्राथमिक क्षेत्राचा (कृषी) विकास हा भारतीय अर्थव्यवस्थेला अल्पविकसित व्यवस्थेतून विकसित व्यवस्थेत नेण्यासाठी कारणीभूत ठरू शकतो. एवढे सामर्थ्य भारतीय कृषी क्षेत्रात असल्याचे दिसून येते. प्राथमिक क्षेत्राचा पूर्ण कार्यक्षमतेने विकास करण्यासाठी या क्षेत्राकडे प्रामुख्याने लक्ष केंद्रित करणे आज घडिला आवश्यक ठरते. म्हणून देशपातळीवर देखील कृषी क्षेत्राचा विकास करण्याच्या दृष्टीने प्रयत्न केले जात आहेत.

महाराष्ट्र राज्य हे देशातील प्रगत राज्यांपैकी एक महत्त्वाचे राज्य आहे. तसेच राज्यात कृषी क्षेत्राला महत्त्वाचे स्थान आहे. कृषी क्षेत्रातून कच्चा मालाचा पुरवठा केला जातो. त्यामध्ये साखर उद्योग, तेल निर्मिती उद्योग, कापड उद्योग, फळ व भाजीपाला प्रक्रिया उद्योग, रेशीम उद्योग, मसाले पदार्थ उद्योग, चहा-कॉफी उद्योग, हे शेतीतील कच्च्या मालावर अवलंबून असणारे उद्योग आहेत. यामधील परकीय व्यापारात निर्यात केल्या जाणाऱ्या साखर, कापड, मसाल्याचे पदार्थ, फळे, कॉफी, भाजीपाला या वस्तू आहेत. यांबरोबरच कृषी क्षेत्रातून अन्नधान्य पुरवठा होतो. तसेच रोजगार व उदरनिर्वाहाचे साधन म्हणूनही कृषी क्षेत्राकडे पाहिले जाते. पण महाराष्ट्राची पाहिजे त्या प्रमाणात प्रगती झालेली दिसून येत नाही. आजही महाराष्ट्रात 83 टक्के शेती प्रामुख्याने पावसावर अवलंबून आहे. तर राज्यामध्ये सिंचनाचे प्रमाण अवघे 17 टक्के आहे. मध्य महाराष्ट्र व मराठवाड्यातील बराचसा भाग अल्प पर्जन्यवृष्टीच्या छायेत आहे. त्यामुळे बदलती पीक रचना आढळून येते. राज्यात प्रामुख्याने मोठ्या प्रमाणात व्यापारी पिकांचे उत्पादन घेण्याकडे भर देण्यात येत आहे. त्यामध्ये प्रामुख्याने सोयाबीन, कापूस, ऊस, फळे, भाजीपाला यांचे उत्पादन घेतले जात आहेत. यातील कापूस हे बागायती व कोरडवाहू अशा दोन्ही प्रकारे घेतले जाणारे पीक आहे.

**उद्दिष्टे :-**

1. मराठवाड्यातील कापूस लागवडीचे अर्थशास्त्र अभ्यासणे.
2. महाराष्ट्रातील एकूण कापूस लागवडीखालील क्षेत्रफळाशी मराठवाड्यातील कापूस लागवडीखालील क्षेत्रफळाचे प्रमाण शोधणे.

**संशोधन पद्धती :-**

प्रस्तुत शोधनिबंध हा दुय्यम आधारसामग्री वर आधारित आहे. यामध्ये विविध संदर्भ ग्रंथ, मासिके, शासनाचे प्रकाशित व अप्रकाशित अहवाल, शोधप्रबंध, वर्तमानपत्रे, इंटरनेट, इत्यादीचा वापर करून माहिती संकलित करण्यात आली आहे. तसेच शोधनिबंधासाठी 2011-12 ते 2018-19 असा कालावधी घेतला आहे. आणि (CAGR) चक्रवाढ वार्षीक वृद्धीदर या सांख्यिकीय साधनाचा वापर केला आहे.

CGAR सूत्र :- y = abt

Log y= log a+ t. log b
Where y = Area, Production, Productivity
a = constant term
b = regression coefficent
t = time variable in year

**मराठवाड्यातील कापूस पीक:-**

मराठवाड्यात एकूण आठ जिल्ह्यांचा समावेश होतो. त्यामध्ये औरंगाबाद जालना बीड नांदेड परभणी हिंगोली उस्मानाबाद लातूर हे जिल्हे येतात. मराठवाड्यात नगदी पीक म्हणून कापूस हे अत्यंत महत्त्वाचे पीक असल्याचे दिसून येते परिणामी मराठवाड्यात कापूस पिकास अत्यंत मोलाचे स्थान आहे. पांढर सोनं म्हणून कापसास ओळखले जाते. मराठवाड्यातील औरंगाबाद जालना बीड नांदेड परभणी या जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात कापसाची लागवड केल्याचे दिसून येते. तर या जिल्ह्यांच्या तुलनेत कमी प्रमाणात अनुक्रमे हिंगोली उस्मानाबाद लातूर या जिल्ह्यात कापसाची लागवड केल्याचे दिसून येते. किंबहुना मराठवाड्यात कापूस उत्पादकतेत व उत्पादनात जिल्हा निहाय विषमता आढळून येते. मराठवाड्यात प्रामुख्याने कोरडवाहू बागायती अशा दोन्ही प्रकारे कापूस लागवड केली जाते. यामध्ये जास्त प्रमाणात कोरडवाहू कापूस लागवड केली जाते. कोरडवाहू लागवड पावसावर अवलंबून असल्यामुळे पाऊस उशिरा आला तर लागवड उशिरा होते व त्याचा परिणाम  कापसाच्या उत्पादकता व उत्पादनावर होतो. याबरोबरच कृषी निविष्ठांच्या वापराबद्दल असलेल्या अज्ञानामुळे उत्पादन खर्च वाढतो पण उत्पादकता मात्र कमी मिळते याचा परिणाम  उत्पन्न कमी मिळते.

**मराठवाड्यातील कापसाचे उत्पन्न उत्पादकता कमी असण्याची कारणे :-**

1. कोरडवाहू शेती व हलक्या जमिनीच्या शेतीत कापूस लागवड
2. कपाशीचे वाण हे जमिनीचा प्रकार पाहून न लावता तसेच लावले जाते त्याचा परिणाम किडी-रोग बोंड आळी यांचा सामना करावा लागतो त्यामुळे उत्पादकता घटते.
3. सिंचनाचा अभाव
4. शेतकऱ्यांना खत पाणी यांचा योग्य प्रमाणात वापर करण्याचे अज्ञान
5. कापूस वेचण्यासाठी मजुरांच्या तुटवड्यामुळे होणारा उशीर यामुळे कापूस जास्त दिवस उन्हात राहतो परिणाम वजन कमी होते.

**उपायोजना :**

1. कोरडवाहू शेती मध्ये आंतरपीक घेतल्यास जोडपिकामुळे उत्पन्न वाढेल.
2. कापसाचे वान हे जमिनीच्या प्रकारास अनुकूल असे लावणे आवश्यक आहे त्यामुळे उत्पादकता वाढेल.
3. शेतकऱ्यांना शेतीतील पिकाबद्दल माहिती मिळणे गरजेचे आहे यामुळे फवारणी खते योग्य वेळी होऊन उत्पादकता वाढेल.
4. मराठवाड्यातील शेतकरी मानसिकतेत बदल होणे गरजेचे आहे. शेतीविषयक नवनवीन तंत्रज्ञान संशोधन यंत्रसामग्री स्वीकारण्यास मराठवाड्यातील शेतकरी अक्षमता दाखवतात परिणामी त्याचे उत्पादन तंत्रज्ञान परंपरागत पद्धतीने उत्पादन कमी होते. म्हणून मराठवाड्यातील शेतकऱ्यांनी परिवर्तनशील मानसिकता स्वीकारणे आवश्यक आहे.

5. मजुराच्या असणाऱ्या प्रश्नावर उत्तर म्हणून कापूस वेचणीसाठी यंत्राचा वापर करणे आवश्यक आहे. त्यामुळे कापसाचे वजन घटणार नाही व त्या मध्ये कस राहील.

**तक्ता क्र. 1.1**

**महाराष्ट्र व मराठवाड्याची कापूस लागवड क्षेत्रफळ (‘00’ha), उत्पादन (’00’ Toones) आकडेवारी**

| महाराष्ट्र | | | मराठवाडा | |
|---|---|---|---|---|
| **वर्षे** | **क्षेत्रफळ** | **उत्पादन** | **क्षेत्रफळ** | **उत्पादन** |
| 2011-12 | 16973 | 27714 | 41667 | 68204 |
| 2012-13 | 17299 | 22751 | 41870 | 67930 |
| 2013-14 | 17767 | 34477 | 41595 | 88345 |
| 2014-15 | 18337 | 10637 | 41899 | 35769 |
| 2015-16 | 18057 | 9246 | 42069 | 39139 |
| 2016-17 | 17372.3 | 37621.16 | 42124 | 107550 |
| 2017-18 | 17376.06 | 17008 | 43507.43 | 60939 |
| 2018-19 | 16122.22 | 17260.93 | 42187.38 | 65931.19 |

उपरोक्त तक्ता क्रमांक 1.1 मध्ये महाराष्ट्र व मराठवाड्यातील कापूस पिकाचे उत्पादन व क्षेत्रफळ दर्शविले आहे तर तक्ता क्रमांक 1.2 मध्ये चक्रीय वार्षिक वृद्धीदर दर्शविला आहे. यासाठी कालावधी 2011-12 ते 2015-16 व 2015-16 ते 2018-19 अशा दोन टप्प्यात कालावधी लक्षात घेतलेला आहे . यानुसार 2011-12 ते 2015-16 या कालावधीत महाराष्ट्रातील कापुस क्षेत्रफळाचा चक्रीय वार्षिक वृद्धी दर हा 0.23% असा धनात्मक स्वरूपात व उत्पादनाचा चक्रीय वृद्धीदर -13% असा ऋणात्मक स्वरूपात आढळतो. तर 2015-16 ते 2018-19 या कालावधीत क्षेत्रफळ व उत्पादनातील चक्रीय वृद्धीदर हा अनुक्रमे 0.09%, 19% याप्रमाणे धनात्मक स्वरूपात आढळतो. यावरून असे दिसून येते की महाराष्ट्रातील कापुस क्षेत्रफळात प्रथम कालावधी पेक्षा दुसऱ्या कालावधीत घट झालेली दिसून येते तर उत्पादनात मात्र वाढ झालेली दिसून येते.

**तक्ता क्र. 1.2**

**चक्रवाढ वार्षीक वृध्दीदर**

| | **2011-12 ते 2015-16** | | **2015-16 ते 2018-19** | | **2011-12 ते 2018-19** | |
|---|---|---|---|---|---|---|
| | क्षेत्रफळ | उत्पादन | क्षेत्रफळ | उत्पादन | क्षेत्रफळ | उत्पादन |
| महाराष्ट्र | 0.23% | -13% | 0.09% | 19% | 0.17% | -9% |
| मराठवाडा | 2% | -24% | -4% | 23% | -1% | -6% |

महाराष्ट्राप्रमाणे मराठवाड्याचा अभ्यास केल्यास मराठवाड्यातील कापूस पिकाचे उत्पादन व क्षेत्रफळ याचा 2011-12 ते 2015-16 या कालावधीतील कापूस लागवड क्षेत्रफळाचा चक्रीय वृद्धीदर 2% असा धनात्मक व उत्पादनाचा चक्रीय वृद्धीदर हा -24% असा ऋणात्मक स्वरूपात आढळून आला. तर 2015-16 ते 2018-19 या कालावधीत कापूस लागवड क्षेत्रफळाचा -4% असा ऋणात्मक स्वरूपात तर उत्पादनाचा 23% असा धनात्मक स्वरूपात चक्रीय वृद्धीदर आढळून आला. यावरून मराठवाड्यातील चक्रीय वार्षिक वृद्धीदर हा कापूस लागवड क्षेत्रफळात पहिल्या कालावधीपेक्षा दुसऱ्या कालावधीत घट झालेली दिसून येते तर उत्पादनात

मात्र वाढ झालेली दिसून येते. म्हणजेच महाराष्ट्र व मराठवाड्यात पहिल्या कालावधी पेक्षा दुसऱ्या कालावधीत कापूस लागवड क्षेत्रफळात घट झाली तर उत्पादनात मात्र वाढ झालेली दिसून येते. महाराष्ट्र व मराठवाड्याचा 2011-12 ते 2018-19 या एकूण कालावधीत चक्रीय वृद्धीदर, महाराष्ट्रातील कापूस लागवड क्षेत्रफळाचा 0.17% असा धनात्मक स्वरूपात आढळून आला तर उत्पादनाचा -9% असा ऋणात्मक स्वरूपात आढळून आला.मराठवाड्याचा एकूण कालावधीत कापूस लागवड क्षेत्रफळाचा व उत्पादनाचा चक्रीय वृद्धीदर अनुक्रमे -1%, -6% असा ऋणात्मक स्वरूपात आढळून आला.यावरून असे दिसून येते की महाराष्ट्रात कापूस लागवड क्षेत्रफळात वाढ झाली व उत्पादनात घट झाली तर मराठवाड्यात कापूस लागवडीचे क्षेत्रफळ व उत्पादन दोन्ही मध्ये घट झाल्याचे दिसून येते.

**निष्कर्ष:-**

मराठवाड्यातील कापूस लागवडीचा अभ्यास करताना खालीलप्रमाणे निष्कर्ष आढळून आले.

**1.** मराठवाड्यातील क्षेत्रफळातील घट उत्पादनास प्रभावित करणारी नाही. म्हणजे मराठवाड्यातील कृषी क्षेत्रात कापूस उत्पादन वाढीस पोषक वातावरण आहे.

**2.** महाराष्ट्र व मराठवाड्यात प्रथम कालावधीपेक्षा दुसऱ्या कालावधीत कापूस लागवड क्षेत्रफळात घट झालेली दिसून येते तर उत्पादनात मात्र वाढ झालेली दिसून येते.

**3.** मराठवाड्यात 2011-12 ते 2018-19 या एकूण कालावधीत कापूस लागवड क्षेत्रात व उत्पादनात घट झाल्याचे दिसून येते.

**4.** मराठवाड्यात कापूस लागवडीचे क्षेत्रफळ व उत्पादकता यामध्ये जिल्हानिहाय विषमता आढळून येते.

**संदर्भ :**

1. कुलकर्णी भुजंगराव (1998) 'मराठवाड्याचा विकास अभ्यास व चिंतन' विद्या प्रकाशन, औरंगाबाद
2. शिंदे जगन्नाथ (2018) महाराष्ट्रातील सर्व पिके महाराष्ट्र कृषी मार्गदर्शिका अल्ट्रा मेडिया, नाशिक
3. Daud mohammad shiyani R.L, B.S swaminathan Identifying the cycles in area, production, productivity and fltp of long staple cotton in Gujarat: A Fourier Analysis International Journl of Agricultur Innovation and research valume 6,ISSN (online) 2319.1473
4. www Maharashtra agricultur. gov. in
5. https:// www. agrowon. com

'Journal of Research & Development' A Multidisciplinary International Level Referred and Peer Reviewed Journal,
Impact Factor-7.265, ISSN: 2230-9578, 30 October2021, Volume-12, Issue-15
Agriculture and Rural Development: Strategic Issues and Reform Options

# भारतातील ग्रामीण विकासात सरकारी योजना

**डॉ. ताठे एस. व्ही[1] सौ. छाया भगवान बोर्डे[2]**

भूगोल विभागप्रमुख संत रामदास आर्टस, कॉमर्स आणि सायंन्स कॉलेज, घनसांवगी, जि. जालना

संशोधक (भूगोल) डॉ. बा.मू. विद्यापीठ, औरंगाबाद

आपला भारत देशाच्या विचार केला तर असे दिसून येते की, आपली ग्रामीण लोकसंख्या म्हणजेच त्या स्थानाला लाभलेले एक वेगळे स्थान प्राप्त झाले आहे. म्हणूनच जगामध्ये आजही आपल्या भारत देशांची ओळख खेडयांचा देश म्हणून केली जाते. निसर्गाचे सानिध्य असूनही तसेच नैसर्गिक साधन संपत्तीने समृध्द असूनही भारतीय जनतेचे वर्णन समृध्द देशातील गरीब म्हणूनच केला जातो. आणि आपली लोकसंख्या ही ग्रामीण भागात जास्त असते कारण आपली भारतीय संस्कृती ही कृषीप्रधान संस्कृती आहे म्हणून भारताच्या संस्कृतीचा कणा हा ग्रामीण विकास ठरतो आहे.

**बीजसंज्ञा** : ग्रामीण विकास, सरकारी योजना

**उदिदष्टे** : ग्रामीण विकासात सरकारी योजना अभ्यासणे.

**माहिती संकलन :**

सदर शोधनिबंधांचा अभ्यास हा पूर्व प्रकाशित प्राथमिक व दुय्यम माहितीवर आधारित असून विश्लेषणात्मक पध्दतीचा अवलंब केला आहे. भारताच्या संदर्भात पाहिले तर एखादया क्षेत्राचा विकास होण्यासाठी तो कशासाठी व्हावा याची प्रेरणा निर्माण झाल्यास तो विकास निश्चितच होतो. शिवाय तो बाहयप्रेरणेने न होता स्वंप्रेरणेतून झाल्यास निश्चितपणे ग्रामीण क्षेत्राचा आपण विकास केला आहे. खऱ्या अर्थाने शहरी विकासावर भर दिल्याने ग्रामीण भारत हा दुर्लक्षित राहिला. परंतु ग्रामीण विकासाकडे नियोजनकारांनी लक्ष केंद्रीत केल्याने ग्रामविकासाला प्राधान्य मिळू लागले. आपला भारत देश हा खेडयाचा देश आहे. वेगात वाढणारे शहरीकरण होत असतांना निम्मयाहून अधिक जनता म्हणजे भारताची बहुतांश जनता भारतामध्ये विखुरलेल्या सहा लाखांहुन अधिक खेडयामध्ये राहते.

राष्ट्रपिता महात्मा गांधी यांनी म्हटले आहे की, जोपर्यंत भारतातील खेड्र्यांचा विकास होणार नाही. तोपर्यंत खऱ्या अर्थांने भारताचा विकास होणार नाही. महात्मा गांधीचे विचार शोषणरहित, आत्मनिर्भर, विकेंद्रित अर्थव्यवस्थेवर आधारित होते. ग्रामीण अर्थव्यवस्थेचा सर्वांगिण विचार अंतर्भूत होता. गांधीजीन ग्रामीण अर्थव्यवस्थेचा सर्वांगीण विचार अंतर्भूत होता. गांधीजीन ग्रामीण विकाससंबंधीचे विचार लक्षात घेणे महत्त्वाचे ठरते, उत्पादन, उपभोग, विपणन, पशुपालन, शेती, कर्जपुरवठा इ. बाबत सहकारी समित्यांचे समर्थक होते. ते भांडवलशाही विरोधी होते. वाहतूकीच्या साधनाद्वारे त्यांना खेडी शहरासोबत जोडायची होती. ग्रामीण विकाससंबंधीचे त्यांचे विचार पुरातनवादी नसून व्यवहारी स्वरूपाचा वैज्ञानिक दृष्टिकोन त्यांनी स्पष्ट केला होता.

देशाच्या आर्थिक, सामाजिक व सांस्कृतीक विकासात ग्रामीण भागाचे महत्त्व असल्याने ग्रामीण विकासातून संपूर्ण अर्थव्यवस्थेचा विकास होतो.

1. ग्रामीण विकास :

a) ''दैंनदिन जीवनामध्ये ग्रामीण विकास म्हणजे ग्रामीण लोकांनी त्यांच्या कामकाजाच्या तसेच जीवन जगण्याच्या सवयीचे अशंता अनुकूल बदल घडवून आणणे असा अर्थ आहे.''

b) यात ग्रामीण भागात नवीन तंत्राचा वापर करणे, व्याख्याने देणे, विकासाविषयक माहितीपर दाखविणे इ. भर देऊन ग्रामीण लोकांच्या जीवनात बदल अपेक्षीत आहेत. यावरून दैनंदिन लोकांनी त्यांची जीवन जगण्याची काम करण्याची पध्दत बदलने म्हणजे ग्रामीण विकास होय.

2. नियोजन आयोगाचे मते :

   a) ''ज्या प्रक्रियेमुळे ग्रामीण लोकांच्या आर्थिक व सामाजिक जीवनामध्ये सुधारणा घडवून आणली जाते. त्या प्रक्रियेला ग्रामीण विकास असे म्हणता येईल.''

3. मिचेल टोडरा यांच्या मते,

‘ Rural Development Encompasses,

“Improvement in levels of living including employment, education, health and nutrition housing and a variety of social services.”

भारत 1981 जनगणना अहवाल नुसार, ज्या ठिकाणाची किंवा वस्तीस्थानाची लोकसंख्या 1500 पेक्षा कमी असेल जेथील लोकसंख्या घनता दर चौरस कि.मी. ला 400 पेक्षा कमी असेल आणि जेथे शेती व संबंधीत व्यवसायात गुंतलेल्या पुरूष कामकारी व्यक्तीचे प्रमाण 75 प्रतिशत / जास्त असेल असे क्षेत्र म्हणजे ग्रामीण क्षेत्र होय. ग्रामीण भागातील गरिबांना त्यांच्या विकासाची संधी मिळेल आणि तिचे ते आपल्या जीवनमानाचा दर्जा उंचवण्यासाठी वापर करू शकतील हेही त्यात अपेक्षित आहे. त्यामुळे ग्रामीण विकासाच्या प्रक्रियेत सामाजिक न्याय, शिक्षा, रोजगार, स्वालंबन, वित्तीय मदत, ग्रामीण रोजगार व आरोग्य, निवास व्यवस्था, पर्यावरण वगैरे व्यवस्थांचा सुविधांचा फायदा होतो. ग्रामीण विकास मंत्रालयाने किंवा विभागाने प्रामुख्याने शासकीय योजनाद्वारे विकासात्मक बदल घडवुन आणण्याचा प्रयत्न करत आहेत. त्यासाठी देशपातळीवर ग्रामीण विकासाच्या योजना ह्या 119 सुरू करण्यात आलेल्या आहेत. त्यामध्ये मुख्य योजना 13 एवढयाच आहे तर उपयोजना व ग्रामीण विकासाची संलग्न योजना ह्या 106 इतक्या आहेत.

ग्रामीण विकास विभाग / मंत्रालयाने स्थापना केलेल्या प्रमुख व मुख्य योजना पुढीलप्रमाणे.

1. राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना
2. इंदिरा आवास योजना
3. संपुर्ण ग्रामीण रोजगार योजना
4. स्वर्ण जंयती स्वंयरोजगार योजना
5. पाणलोट क्षेत्र विकास कार्यक्रम
6. राजीव गांधी ग्रामीण निवास योजना
7. संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियान
8. राष्ट्रीय बायोगॅस विकास योजना

9. आम आदमी विमा योजना
10. भारत निर्माण योजना
11. आदर्श गाव योजना।
12. पर्यावरण संतुलित समृध्द ग्राम योजना
13. अंत्योदय योजना

अशाप्रकारे सर्व योजना या ग्रामविकास विभागादवारे सुरू केलेल्या आहे.

ग्रामीण विकासाशी निगडीत असणाऱ्या अन्य उपाययोजना व संलग्न योजना हया कृषी विभाग, लघुपाटबंधारे विभाग, शैक्षणिक विभाग, स्वंरोजगार विभाग, आदिवासी विभाग वगैरे विभाग हे ग्रामीण विकासाच्या योजना राबवितात. वरील सर्व ग्रामीण विकासाच्या योजना राबविण्याची जबाबदारी ग्रामीण विकास मंत्रालय व ग्रामविकास विभाग यांनी हया सर्व योजना शासकीय यंत्रणेकडे सोपविलेली आहे. त्यामध्ये शासकीय संस्था जिल्हा परिषद, ग्रामपंचायत, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा केंद्र सरकारची शासकीय यंत्रणा म्हणून देशात प्रत्येक जिल्हयात स्थापन झालेली प्रमुख यंत्रणा आहे. या योजनांची अंमलबजावणीचे अधिकार असून अर्थसहाय्य हे केंद्र व राज्य 75:25 असे देत असते. या योजनेमार्फत पुढील योजना राबविल्या जातात. :-

1. स्वर्णजंयती ग्राम स्वयंरोजगार योजना
2. इंदिरा आवास योजना
3. पाणलोट क्षेत्र विकास कार्यक्रम
4. संपूर्ण ग्रामीण रोजगार योजना

वरील चारही योजना हया जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेमार्फत राबविल्या जातात. ह्रया योजना ग्रामीण जनेतेचे जीवनमान उंचावण्यासाठीच राबवल्या जात आहे. ग्रामीण भागातील लोकांचे जीवनमान तसेच त्यांचे राहणीमान सुधारणे, भौतिक सुविधा उपलब्ध करून देणे, दारिद्रय कमी करणे, बेकारी दूर करणे अशा विविध समस्यांचा दृष्टिकोन डोळंयासमोर ठेवून ही यंत्रणा ग्रामीण भागात हया वरील योजना राबवित आहेत.

**ग्रामीण विकासाच्या योजना :-**

केंद्र व राज्य शासनाच्या अनेक योजनाच्या अंमलबजावणीची जबाबदारी ग्रामपंचायतीवर सोपवली आहे. आपल्या ग्रामपंचायतीला विविध विकास योजनातंर्गत वेळोवेळी निधी मिळत राहणार असता. त्याच्या सुयोग्य विनियोगासाठी ग्रामसभेच्या माध्यमातून लोकसहभागाद्वारे ग्राम पंचायतीनी केलेल्या ग्रामविकास कृती आराखडयानुसार ग्रामीण विकास करणे ही ग्रामपंचायतीची मुलभूत जबाबदारी आहे. पंचायतराज व्यवस्थेमार्फत गट नियोजन, ग्राम नियोजन, जिल्हा नियोजन अशा पातळयावर नियोजनाची प्रक्रीयाची प्रक्रिया राबविण्यात येते. योजना तयार करून सरकारच्या मान्यतेसाठी पाठविण्यात येतात केवळ नियोजनाचे विकेंद्रीकरण करून सरकार थांबलेले नाही तर सरकारने ग्रामीण भागाच्या विकासासाठी विविध योजना राबविल्या आहेत. त्यात प्रामुख्याने भूमिहीन

शेतमजूर, सीमांत शेतकरी अत्यल्प भुधारक, स्त्रिया व मुले त्यांच्या विकासाच्या योजनाच्या, रोजगार निर्मीतीच्या योजना, दारिद्रय रेषेखालील अनुसूचित जाती जमातीच्या लोकासाठींच्या योजना इ. विशेष योजनाची अंमलबजावणी करण्यात आली आहे.

1. एकात्मिक ग्रामीण विकास कार्ग्रम (1980)
2. जवाहर ग्राम समृध्दी योजना (1999)
3. समग्र आवास योजना (1999)
4. संपुर्ण स्वच्छता अभियान (2002)
5. राजीव गांधी ग्रामीण निवारा योजना (1998)
6. राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना (2007)
7. कपार्टच्या योजना (1986)
8. जल स्वराज्य योजना (1985)
9. स्वर्णजयंती ग्रामस्वंरोजगार योजना (1999)
10. यशवंत ग्रामसमृध्दी योजना (2002)
11. इंदिरा आवास योजना (1985)
12. संपूर्ण ग्रामीण योजना (ऑगस्ट 2001)
13. संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियान (2001)

**निष्कर्ष** :

स्थूल मानाने बघता ग्रामीण क्षेत्राच्या विकासाला ग्रामीण विकास म्हणता येईल क्षेत्राचा विचार केल्यास पूरातन सामाजिक, व्यावसायिक व आर्थिक पध्दती ह्या सामान्य मानसाच्या अंगवळणी पडलेल्या आहेत. परंतु यात बदल घडवून येण्यासाठी ग्रामीण लोकांची बलस्थाने व दुर्बलता काय आहे. हक्क आणि कर्तव्ये कोणती याचे ज्ञान व मार्गदर्शन मिळाले तर ग्रामीण विकासात मोठा हातभार लावला जाईल.भारताच्या विकासामध्ये ग्रामीण विकासाची भूमिका महत्तवपूर्ण आहे. शेती विकास, ग्रामोद्रयोगांचा विकास, ग्रामीण सामाजिक समस्या सोडवणे, ग्रामीण व नागरी भागातील स्थलातरात होणारे बदल या दृष्टीने खुप महत्तवाचे आहेत. म्हणूनच ग्रामीण विकास ही संकल्पना व्यापक बनली याची शासनाला जाणीव झाली.

**संदर्भ :**

1. काळे वा. सी. डोईफोडे अ.की., राजदरेकर उमेश 2006, 'ग्रामीण भारताच्या समस्या' प्रथम आवृत्ती, मुक्ता इंटरप्रायजेस, नाशिक
2. नामदे ना. भा., राजहरेकर उमेश, 2007 'ग्रामीण सरकारी संघटना आणि विकासासंबंधी सरकारी दृष्टीकोन, प्रथम आवृत्ती, मुक्ता इंटरप्रायजेस, नाशिक
3. कराळे गंगाधर, 2006, 'ग्रामीण विकासाचा एकात्मिक दृष्टीकोन, प्रथम आवृत्ती, श्री. मंगेश प्रकाशन, नागपुर
4. www.rural.nic.in

# कृषी पर्यटन व ग्रामीण विकासा करिता उपयुक्त जलव्यवस्थापन

**डॉ बालासाहेब शिवाजी पवार**

वाणिज्य विभाग माधवराव पाटील महाविद्यालय ,पालम.

E-mail ID: bspawar2011@gmail.com

**प्रस्तावना:**

कृषिप्रधान देश म्हणून भारत ओळखला जातो. कारण कृषी क्षेत्र हे भारतीय समाज जीवनाचे एक अविभाज्य अंग आहे.म्हणूनच कृषी क्षेत्र हे भारतीय जीवनाचा आर्थिक कणा आहे .जवळपास 70 टक्के लोकसंख्या ग्रामीण भागात राहते आणि त्यांचा मुख्य व्यवसाय कृषी हा आहे. कृषी व्यवसाय हा निसर्गावर अवलंबून आहे, कधी अनुकूल विचार कधी प्रतिकूल असल्यामुळे ग्रामीण कृषी क्षेत्राचा विकास करण्याकरिता जलव्यवस्थापन आवश्यक आहे.. कृषी विभागाला मुबलक प्रमाणात पाणी उपलब्ध करून देणे काळाची गरज आहे. मनोज पाण्याचा प्रत्येक थेंब जमिनीत घडवला व जिरवला पाहिजे जेणेकरून ते पाणी जमिनीत मुरेल परिणामी पाण्याची पातळी वाढेल आणि बोरला मुबलक पाणी राहील आणि असे झाले तर निश्चितच शेतीव्यवसायाला विकास साधण्यासाठी मदत होईल.संस्कृती ची लागण खेड्यातही झालेली दिसते. निसर्ग आणि निसर्ग प्रक्रियेत पासून माणूस दुरावत चालला आहे. अनेक इलेक्ट्रॉनिक माध्यमांचा वापर माणूस आता करू लागला आहे. त्यामुळे इलेक्ट्रॉनिक माध्यमांचा वापर मोठ्या प्रमाणावर वाढला आहे. यातूनच संपर्क साधनांमध्ये मोठी वाढ झाली आहे. पण माणूस मात्र माणसांपासून दूर होत चालला आहे. माणसातील ग्रामीण संस्कृती आणि शहरी संस्कृतीतील अंतर वाढत चालले आहे. याचे प्रमुख कारण म्हणजे शिक्षणाचा प्रसार, शहरीकरण, शहराची वाढलेली लोकसंख्या आणि ग्रामीण भागातून आलेल्या नवीन व शहरी नागरिकांचा ग्रामीण जीवनाशी असलेला दुरावा होय. या शिवाय पुढच्या पिढीला ग्रामीण जीवनाची व संस्कृतीची जाण असावी, असे मनोमन आता वाटत आहे. मात्र पूर्वी सुट्टीत मामाच्या गावाला किंवा स्वतःच्या गावाला नातेवाइकांकडे मुक्कामाला जाणारा शहरी नागरिक कामाच्या व्यापामुळे किंवा इतर वाढलेल्या दुराव्यामुळे गावी जाण्यास आता सहसा तयार होत नाही. पण त्याची गावाविषयी असणारी ओढ ही मात्र कायम आहे. दुसऱ्या बाजूला शेतीचे व्यापारीकरण झाले आहे आणि असे व्यापारीकरण परवडणारे नाही असे दिसते. पारंपारिक शेती उत्पादने किंवा व्यापारी पिके या दोन्हीतही शेतकऱ्यांची उत्पादन खर्चावर आधारित भाव ही साधी गरज आणि मागणी पूर्ण होत नाही. त्यामुळे नवीन विचार करणे गरजेचे आहे. कृषी पर्यटन हा त्यावर एक मार्ग होईल; कारण जागतिकीकरणातून आलेल्या सुधारणामधून मानसिक शांतता मिळविण्याच्या धडपडीत असलेले पर्यटक आणि त्यांना दिलासा देणारी पर्यटन ही संकल्पना आहे. या संकल्पनेत विविधता आहे. शेतीतील फेरफटका, शेतात राहणे, शेती उत्पादनांची विक्री, शेतातील पिकांची पाहणी, शेतातील पिकांची माहिती, पाळीव प्राण्यांची माहिती, पाळीव प्राण्यांबरोबर राहणे, न्याहारी, भटकंती आणि रात्रीचे मनोरंजन किंवा जेवण अशा अनेक प्रकारे त्यात आता वैविध्य आणता येईल. पाश्चिमात्य देशांमध्ये जसे इटली, कॅनडा, युनायटेड स्टेट्स, फिलिपीन्स, भारत-पाकिस्तान या सारख्या देशात देखील पर्यटनाची चांगली संधी आहे.

**मुख्य संकल्पना:**

कृषी पर्यटन, ग्रामीण विकास, कृषी पर्यटन केंद्राचा विकास, ग्रामीण वैद्यकीय पर्यटन विकास, शेती घर/फार्महाउस जल व्यवस्थापन,, जलसंवर्धन पद्धती, जलस्त्रोत इत्यादी.

**उद्दिष्टे:**

1)कृषी पर्यटनाचा ग्रामीण भागावर झालेला परिणामाचा अभ्यास करणे.

2) ग्रामीण विकासाचा अभ्यास करणे

3) कृषी करिता जलव्यवस्थापन अभ्यासणे

**गृहीतक:**

1)कृषी पर्यटनातून ग्रामीण भागाचा विकासाला हातभार लागत आहे.

2) जलव्यवस्थापनामुळे विकास झालेला दिसून येतो

**संशोधन पद्धती**:

सदर शोधनिबंधात जलव्यवस्थापनामुळे कृषी पर्यटनातून ग्रामीण विकास कशाप्रकारे होत आहे. याविषयी माहिती मिळविण्याचा प्रयत्न केला आहे. यासाठी दुय्यम साधून सामग्रीचा आधार घेण्यात आला आहे. यात वर्तमानपत्र संदर्भपुस्तके, क्रमिक पुस्तके, दूरदर्शन, इंटरनेट वरील माहितीचा वापर करण्यात आला आहे.

**कृषी पर्यटन व ग्रामीण विकासासाठी उपयुक्त जलव्यवस्थापनप संकल्पना:**

कृषी पर्यटन म्हणजे प्रत्यक्षात शेती कशी केली जाते. शेती कसे पिकवतात. शेतात कोणकोणती पिके कधी येतात. शेतीची लागवड कशी आणि कधी केली जाते. एकंदरीत ग्रामीण भागातील शेतीविषयक सर्व उपक्रम आणि कार्य जे शेतात चालतात आणि हे सर्व शहरी लोकांना वाचून किंवा ऐकून माहित असते. पण प्रत्यक्षात शेतात जाऊन ते पाहणे, अनुभव घेऊन, ग्रामीण जीवनाचा पर्याय कृषी पर्यटनाच्या माध्यमातून ग्रामीण जीवनाचा प्रत्यक्ष स्वतः अनुभव घेणे म्हणजे "कृषी पर्यटन" होय.ग्रामीण भागातील शांत वातावरण, शुद्ध हवा, निसर्गरम्य परिसर, कला, संस्कृती, वेषभूषा, खाद्य संस्कृती, तसेच गावात मिळणारे दुर्मिळ वनस्पती, झाडे, प्राणी, पक्षी, झरे, डोंगर, दऱ्या, निसर्ग निरीक्षण, शिवार शेतीचा अनुभव घेणे, शहरी लोकांनी चार दिवस शेतावर जाऊन राहणे व शेतकर्याने शहरी लोकांचे सशुल्क स्वागत करणे. कृषी पर्यटन म्हणजे शेतात फेरफटका मारणे आपल्या संस्कृतीची ओळख करून घेणे. शहरी जीवनशैलीचा कंटाळा आलेल्या लोकांना कृषी पर्यटन हा नवीन चेहरा आहे. 'कृषी पर्यटनातून ग्रामीण विकास आणि ग्रामीण विकासातून महाराष्ट्राचा विकास' या ब्रीद वाक्याला साजेसे कृषी पर्यटन महाराष्ट्रात सुरु झाले आहे. भारत हा कृषिप्रधान देश आहे. लोकांच्या दृष्टीने नेहमीच्या धकाधकीच्या जीवनातून नाविण्याकडे नेणारी आणि आनंद देणारी संकल्पना पुढे येऊ लागली. शेतीच्या विकासातून ग्रामीण भागाचा विकास कसा साधता येईल, यासाठी अनेक नवनवीन योजना पुढे येऊ लागल्या. त्यातूनच कृषी पर्यटन ही एक संकल्पना देखील नव्याने रुसताना आता दिसत आहे. कृषी पर्यटनाकडे आकर्षित करण्यासाठी विविध पूरक व्यवसायांचा विकास कसा करता येईल, यासाठी परिसर विकास शेती प्रक्रियेतून विविध ग्रामीण वस्तू व साधनांची निर्मिती, विक्री करणे, काही उत्साही पर्यटकांना प्रत्यक्ष शेती व कृषिमाल प्रक्रिया उद्योगात सहभागासाठी उत्तेजन देणे. त्यातून त्यांना नवीन ज्ञान व अनुभव मिळतो, त्यातून काही शेती उत्पादनांची पर्यटक खरेदी करतात. सेवन करतात, त्याचा उपयोग घेतात. कृषी उत्पादन तंत्रज्ञानाचे ज्ञान मिळवीत आहेत, त्यासाठी

शेतावर मुक्काम करायला आता लोकांना आवडते. त्यातूनच शेतकऱ्यांना पर्यटकांकडून आता पैसे मिळू लागले आहेत. यामुळेच सरकारनेही कृषी पर्यटनाला प्रोत्साहन देणाऱ्या योजनांना प्रोत्साहन देण्यासाठी काही सवलती दिलेल्या आहेत. यामुळेच शेती पूरक व्यवसायांचे स्वरूप आता बदलले आहे. भारत भर आता कृषी पर्यटन ही संकल्पना वेगवेगळया पद्धतीने आपल्याला दिसून येते. पर्यटक त्याचा अनुभव घेताना देखील आपल्याला दिसत आहे. शहरी लोकांना पर्यटनातून ग्रामीण भागाचा अनुभव येत आहे व त्यांचा काही दिवसांसाठी का होईना ग्रामीण भागाकडे ओढा वाढत चाललेला दिसून येतो. कृषी पर्यटन ही संकल्पना जरी साधी वाटत असली तरी, त्यातून ग्रामीण भागाच्या विकासासाठी निश्चितच हातभार लागणार आहे. या कृषी पर्यटनातून आता मोठ्या प्रमाणावर अर्थार्जन होण्यास सुरुवात झाली आहे. कृषी पर्यटनातून ग्रामीण विकास निश्चित आहे असे म्हणावे लागेल.

**कृषी पर्यटन आणि ग्रामीण विकास:**

कृषी व्यवसायला पूरक व्यवसाय म्हणून आज कृषी पर्यटन व्यवसायाकडे पाहिले जाते. कृषी पर्यटन व्यवसायाचे पुढील फायदे विचारात घेता कृषी पर्‌यटन व्यवसाय फायद्याचे आहे असे म्हणावे लागेल. कृषी व्यवसाय हा पर्यटनाला जोडला गेल्यामुळे ग्रामीण विकासाला दोन्ही व्यवसायातून फायदा होईल. कृषी पर्यटनामुळे पर्यटन व्यवसायाच्या कक्षा व संधी वाढतील. त्यातून ग्रामीण विकास होईल. कृषी विकासाचा वेग वाढविण्यासाठी कृषी पर्यटन महत्त्वाची भूमिका पार पाडू शकते. शेतकऱ्यांना शेती सोबत उत्पादित ग्रामीण वस्तूंच्या विक्रीतून अर्थार्जन वाढवता येईल. भारतातील ग्रामीण भागातील विविध प्रेक्षणीय स्थळे व पर्यावरण त्यांची माहिती कृषी पर्यटनाच्या माध्यमातून पर्यटकांसमोर मारता येईल. त्यातून पर्यटन विकास होईल ग्रामीण भागात तयार होणाऱ्या वस्तू, स्थानिक कला लोकांकडे जातील. म्हणजेच ग्रामीण वस्तूंची विक्री वाढेल व शेतकऱ्यांना एक चांगली बाजारपेठ मिळेल. विक्री वाढल्यामुळे त्यांचा फायदा देखील होईल. वरील सर्व बाबींचा विचार करता, विविध विविध ठिकाणी कृषी पर्यटन केंद्रांचा विकास केल्यास ग्रामीण भागात भागाच्या विकासासाठी शेती व पर्यटनाचा उपयोग होईल. त्याद्वारे शेतकऱ्यांची आर्थिक परिस्थिती सुधारून परिणामी देशाचा देखील विकास होईल.

**कृषी पर्यटन केंद्रांचा विकास:**

कृषी पर्यटनासाठी विविध प्रकारच्या विविधतापूर्ण अशा केंद्रांची निर्मिती करणे अतिशय गरजेचे आहे. या पर्यटन केंद्रात आतूनच त्या-त्या भागाचे वेगळेपण पर्यटकांपर्यंत पोहोचणे शक्य होईल, असे पर्यटन केंद्र पर्यटकांचे आकर्षणाचे केंद्र म्हणून विकसित करता येऊ शकते. प्रत्येक कृषी पर्यटन केंद्र वैविध्यपुर्ण कसे करता येईल यासाठी प्रत्येक भागाचे वेगळेपण काय आहे, ते पाहून स्थानिक ग्रामीण पारंपरिक सांस्कृतिक बाबाचे दर्शन लोकांना घडविता येईल. जसे नृत्य, कला, इत्यादी. शहरी जीवन जगणाऱ्या पर्यटकांना स्थानिक आहार, खानपान, जेवण उपलब्ध करून दिल्यास पर्यटकांना आनंद देता येईल, अशी केंद्रे देखील येथे उभारता येतील. प्रत्येक ग्रामीण भागातील विविध पिके, फळे, भाजीपाला वेगवेगळया पद्धतीने पर्यटकांना उपलब्ध करून दिल्यास, ग्रामीण अनुभवातून पर्यटकांना वेगळा आनंद मिळतो. शेती उत्पादनातून काही पूरक उत्पादने पर्यटकांना आकर्षित करतात आणि त्या उत्पादनांना मागणी वाढते. त्यातून पर्यटन आणि ग्रामीण भागाचा विकास होण्यास मदत होते. काही ग्रामीण भागात विविध वस्तूंची

कलाकुसर, हस्तकला यातून लोकोपयोगी वस्तूंची निर्मिती केल्यास, पर्यटकांचे आकर्षण वाढते. त्यातून विक्रीही वाढते. त्यासाठी ग्रामीण भागात काही ठिकाणी अशी केंद्रे निर्माण केल्यास त्या-त्या भागात ग्रामीण विकास शक्य आहे. ग्रामीण भागातील काही खेळ, सांस्कृतिक कार्यक्रम यांचे आयोजन करून, ग्रामीण उपक्रमात पर्यटकांना सहभागी करून घेतल्यास आपल्या संस्कृतीचे व कलांचे वेगळेपण हे पर्यटकांसमोर मांडता येईल.

**वैद्यकीय पर्यटन विकास**:

औद्योगिकीकरणाचा वेग वाढत आहे, तसा लोकांच्या विकासाचा वेग देखील वाढत आहे; परंतु त्यातूनच आरोग्याच्या तक्रारीही वाढत आहे. लोकांना नेहमीच या धावपळीतून वेळ काढून बदल हवा आहे. त्याचसाठी ग्रामीण भागात काही नैसर्गिक स्त्रोतापासून, तसेच काही मानवनिर्मित, काही पारंपरिक उपचार पद्धतीतुन त्यांना आनंद व स्वास्थ्य मिळविण्याकडे आता त्यांचा कल वाढू लागला आहे. म्हणूनच आरोग्य पर्यटन किंवा वैद्यकीय पर्यटन ही संकल्पना देखील कृषी पर्यटना सोबतच विकसित होत आहे. भारतासारख्या देशात वैद्यकीय पर्यटनाला चांगला वाव आहे. भारतात अनेक ठिकाणी निसर्ग उपचार केंद्र, योग ध्यान-धारणा इत्यादी पासून आयुर्वेदिक उपचारांची अनेक केंद्र विकसित झालेली आता आपणास दिसत आहेत. त्यामुळे भारत जगातील पर्यटकांसाठी एक चांगले पर्यटन स्थळ व सोबत वैद्यकीय उपचारांचे केंद्र म्हणून आकर्षित करत आहे. त्यामुळे भारतातील ग्रामीण पर्यटन उद्योग आऊटसोर्सिंगद्वारे नव्या परवाकडे जात आहे. जगभरातील अनेक पर्यटक काही काळ अशा केंद्रांमध्ये राहून उपचार करून घेतात. दीर्घकालीन किंवा जास्तीच्या दुखण्यासाठी आयुर्वेद, योगा यासारख्या उपचार पद्धती चा वापर करून लोकांना व्याधिमुक्त केले जात आहे. काही स्थानिक उपचार पद्धतीचा वापर करूनही काही व्याधी बऱ्या करता येतात. असा अनुभव पर्यटकांना येत आहे. भारतातील पारंपरिक उपचार पद्धतीतून गरज भागवणारी अंदाजे तीन हजार च्या पुढे रुग्णालय आहेत. ती अजूनही विकसित होत आहेत. केरळमध्ये जशी उपचार पद्धती आहे, तशीच उपचार पद्धती आता इतरही ठिकाणी विकसित होऊ लागली आहे. त्या त्या भागात अशी उपचार केंद्र विकसित होऊन वैद्यकीय पर्यटन विकासाचाही वेग चांगलाच वाढत आहे. जगभरातील अनेक पर्यटकांमुळे ग्रामीण व वैद्यकीय पर्यटन दोन्हींचाही विकास होत आहे, वाढत आहे.

**फार्म हाऊस आणि कृषी पर्यटन विकास:**

भारतातही आता फार्म हाऊस आणि त्यातून पर्यटन; अशा संकल्पना विकसित होत आहेत. शहरातील श्रीमंत उच्चभ्रू लोकांनी ग्रामीण भागात शेती घेऊन, त्या ठिकाणी सर्व सोयींनी युक्त अशी ग्रामीण धाटणीची घरे बांधली आहेत. वर्षातून काही दिवस त्या ठिकाणी पर्यटनासाठी येणे जाणे सुरु केले आहे. यातूनच त्या - त्या भागाला पूरक साहित्य पुरविण्यातून ग्रामीण भागाचा विकास होत आहे. ज्यांना स्वतःची अशी व्यवस्था निर्माण करता येत नाही, त्यांच्यासाठी व्यावसायिकांनीही अशी पर्यटन स्थळे आता निर्माण केली आहेत. त्यामुळे ग्रामीण भागात अशी शेतीवर आधारित व शेती पूरक केंद्रे, हिल स्टेशन निर्माण केली जात आहेत. त्यामुळे स्थानिक लोकांना व्यवसाय/रोजगार मिळत आहे व आर्थिक फायदाही होत आहे. म्हणूनच शहराजवळील किंवा समुद्र, नदी, धरण इत्यादी नैसर्गिक ठिकाणी अशा लोकांची फार्म

हाऊसची संकल्पना आता वाढत आहे. त्यातून कृषी पर्यटन व त्याबरोबरच आरोग्य पर्यटन स्थळांचा विकास होत आहे.

**कृषी पर्यटनाचे फायदे:**

कृषी आणि पर्यटन या दोन गोष्टींच्या समन्वयातून बनलेली कृषी पर्यटन हि पर्यटनाची नवीन संकल्पना सध्या मोठ्या प्रमाणात वाढू लागली आहे. ग्रामीण भागातील शेती, निसर्ग, पशु- पक्षी, संस्कृती आणि जीवन शैली याचे शहरी भागातील लोकांना आकर्षण वाटू लागले आहे. यातूनच कृषी पर्यटनाचे पुढील फायदे प्राप्त होतात. कृषी पर्यटनामुळे ग्रामीण भागातील लोकांना रोजगार मिळतो. ग्रामीण भागातील वस्तूंना मोठी मागणी निर्माण होते. ग्रामीण भागाचा आनंद शहरी भागातील व्यक्तींना घेता येतो. दैनंदिन कामकाजाच्या व्यापातून मोकळीक साधता येते. निसर्गाशी समरस होता येते. ग्रामीण संस्कृती आणि कलांचा विकास होतो व त्या शहरी भागापर्यंत पोहोचण्यास मदत होते. ग्रामीण भागातील लोकांना मोठ्या प्रमाणावर अर्थार्जनाच्या संधी उपलब्ध होतात. ग्रामीण भागाचा विकास होतो परिणामी देशाचा देखील विकास होतो.

**कृषी विकासाकरिता जलव्यवस्थापन**

कृषी विकासाकरिता पाणी महत्वाचे साधन आहे. पाण्यामुळे पिकाला जीवदान मिळून उत्पादन क्षमता वाढते. म्हणून शेती उत्पादनासाठी जल व्यवस्थापन करणे अत्यंत गरजेचे आहे. पडणाऱ्या पावसाचे योग्य नियोजन करून पाणी साठवणूक करणे व शेतीसाठी त्याचा उपयोग करणे गरजेचे आहे.

**जलव्यवस्थापन पद्धती:**

ठिबक सिंचन पद्धती: या पद्धतीमुळे सुद्धा पाण्याची बचत50% होते आणि उत्पादनात भरघोस वाढ होते परिणामी पाण्याची बचत मोठ्या प्रमाणात होते शेती उत्पादन वाढते.तुषार सिंचन पद्धती: या पद्धतीमुळे शेतीला पाणी दिल्यास 30%पाण्याची बचत होते व पीक वाढून उत्पादन वाढते. डिफ्युजर जीवन वहिनी: या पद्धतीचा वापर जमिनीखाली एक मीटर रुंद व पंधरा ते वीस सेंटीमीटर जाडीचा माती व सेंद्रिय खताचा थर असतो या स्थळावर जीवनवाहिनी बसवून ती साध्या मातीने झाकून टाकले जाते त्यामुळे पाण्याचे बाष्पीभवन होत नाही परिणामी पाण्याची बचत होते द्राक्ष बाग आणि फळबागासाठी ही पद्धत उपयुक्त आहे

**जलस्त्रोत**

विहीरी व बोर पुनर्भरण करणे: या पद्धतीने मोठ्या प्रमाणावर पाण्याचा साठा करता येते. वीहीर व बोरला जास्त दिवस पाणी टिकून राहते. पाण्याचा वापर शेतीसाठी करता येते. उत्पादन वाढून विकास होतो.

शेततळे: जल व्यवस्थापनाची ही पद्धत अतिशय चांगली आहे. पावसाचे वाहून जाणारे पाणी शेततळयात साठवले जाते या पाण्याचा उपयोग शेतीला संरक्षित पाणी म्हणून त्याचा उपयोग करता येईल अडचणीच्या वेळेला शेतकरी या पाण्याचा उपयोग करेल शेततळे ही कमांड आणि अनकमांड या दोन्ही ठिकाणी होणे आवश्यक आहे परंतु शासनाची हि योजना फक्त अंनकमांड क्षेत्रासाठी च आहे.

**समारोप:**

शेती व्यवसायाला कृषी पर्यटनाची व जल व्यवस्थापनाची जोड देऊन उत्पादनात भर घालता येणारा प्रकल्प म्हणजे कृषी पर्यटन होय. कृषी पर्यटनामुळे शहरी लोकांना ग्रामीण भागाकडे जाण्याचे आकर्षण आता वाढत आहे. यातूनच ग्रामीण भागाच्या विकासासाठी हातभार लागत आहे. ग्रामीण भागातील रस्ते, विविध ठिकाणची पर्यटन स्थळे, नदी, धरणे, तलाव, गावातील आरोग्य विषयक सोयी यासारख्या बाबींचा मोठ्या प्रमाणावर विकास होत आहे. कृषी पर्यटनातूनच लोकांना आपल्या जीवनातील ताण- तणाव कमी करण्यासाठी देखील त्याचा उपयोग होत आहे. यातूनच ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणावर व्यवसायाच्या संधी आता उपलब्ध होऊ लागल्या आहेत. म्हणूनच कृषी पर्यटन हे ग्रामीण भागाच्या विकासास हातभार लावणारे एक प्रभावी माध्यम जलव्यवस्थापनाची शेती पिकासाठी शेतीवर आधारित असलेल्या घटकासाठी उपयुक्तता आहे.

**संदर्भ सूची:-**

1. कृषी पर्यटन: शेती विकासाची नवी दिशा, नीलिमा राजाराम मिरजकर, अर्थसंवाद, जानेवारी- मार्च 2013.
2. कृषी पर्यटन: ग्रामीण विकासाचा नवा मार्ग, संतोष कदम, अर्थसंवाद, जुलै - सप्टेंबर 2015.
3. मेघालय पर्यटन व कृषी पर्यटन, योजना, विनोद वीर, डिसेंबर 2010.
4. महाराष्ट्र राज्य पर्यटनाच्या माध्यमातून रोजगाराच्या संधी, नलावडे पंडित शेषराव, योजना, मे 2010.
5. भारतीय अर्थव्यवस्था डॉ. निर्मल भालेराव.
6. डॉ दिनेश -जल संरक्षण-अनंत प्रकाशन पा.-४१, कृष्ण विहार नई दिल्ली.
7. डॉ डी डी ओझा-जल संरक्षण-बालाजी प्रकाशन जयपुर-३० 2003.
8. अर्थसंवाद-एप्रिल- जून 2012/खंड 36 अंक 1
9. अर्थसंवाद-एप्रिल जून 2017/ खंड 41 अअं
10. www.agrotourismvishwa.com,8th January,2021

'Journal of Research & Development' A Multidisciplinary International Level Referred and Peer Reviewed Journal,
Impact Factor-7.265, ISSN: 2230-9578, 30 October2021, Volume-12, Issue-15
Agriculture and Rural Development: Strategic Issues and Reform Options

# शिवरायांचे रायगडावरील जलव्यवस्थापन एक अभ्यास

**योगिता कल्याणराव खापरे**
संशोधक विद्यार्थी एम. फिल. ( इतिहास)

**प्रस्तावना :**

सह्याद्रीच्या शिखर माथ्यावर अनेक गड किल्ले आहेत त्यातील काही शिलाहार यादवकालीन तर काही शिवकालीन गडकोट आहेत. छत्रपती शिवाजी महाराजांचे स्वराज्य या गड किल्ल्यांच्या आश्रयाने उभे राहिले होते. त्यामुळे गडावर त्यांचे विशेष प्रेम डोंगर माथ्यावरील या किल्ल्यावर प्रथम प्राधान्य पिण्याच्या पाण्याला असे आज्ञापत्रातील दुर्ग प्रकरणांमधील गडाची राखण या विषयासंबंधी लिहिले आहे. त्यात ते म्हणतात तसेच गडावर आधी उदक पाहून किल्ला बांधावा पाणी नाही आणि ते स्थळ आवश्यक बांधणे प्राप्त झाले तरी आधी खडक फोडून तळी टाकी पर्जन्य काळापर्यंत संपूर्ण गडास पाणी पुरेल अशी मजबूत बांधावी. गडावरी झराही आहे जसे तसे पाणीही पुरते म्हणून तितक्या वरीच निश्चिंती न मानावी, उद्योग करावा ,की निमित्त की झुंजा मध्ये भांडीयाचे आवाजाखाली झरे स्वल्प होतात आणि पाणी याचा खर्च विशेष लागतो, तेव्हा संकट पडते याकरिता तसे जागी जखीरियाचे पाणी म्हणून दोन चार टाकी तळी बांधावी. त्यातील पाणी खर्च होऊ न द्यावे ,गढुळाचे पाणी बहुत जतन राखावे, गड व पाण्याच्या देखभालीसाठी त्यांनी म्हटले की लोहार सुतार पाथरवट यांना गड पाहून एक एक दोन आसाम्या करून ठेवाव्या, लहान सहान गडावर यांचे नित्य काम पडते असे नाही. याकरिता त्यांचे कामारी हत्यारे त्याच वेळी तयार असू द्यावी. गडावरील दिला वर्षभर पाणी कसे पुरेल याचे नियोजन करून ठेवले होते. छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्वराज्याची राजधानी रायगड येथील जलव्यवस्था तर खास अभ्यासण्याजोगी आहे . रायगडावरील लेणी व डोंगराच्या पोटात खोदलेली थांब टाकी पाहिल्यावर लक्षात येते की रायगड हा प्राचीन गड असून त्याला किमान दीड हजार वर्षा चा इतिहास लाभला आहे शिलाहार राजा पासून शिवाजीराजा पर्यंत अनेक राजवटी रायगडावर नांदल्या आहेत.

जावळीच्या चंद्रराव मोऱ्यांचा चा पाडाव केल्यावर रायगड स्वराज्यात दाखल झाला शिवाजी महाराज जातीने रायगडावर आले. सरळसोट भिंतीसारखे चहुबाजूने तुटलेले उभे कडे, दिड गाव उंच आणि चौरंगा सारखा दीड मेल लांब आणि एक मेल रुंद सपाट माथा पाहिल्यावर तत्तास हाच जागा करावा, असे त्यांच्या मनात आले आणि स्वराज्याची राजधानी रायगड येथून पुढे सजू लागली.

**संशोधनाचे विधान:** शिवरायांचे रायगडावरील जलव्यवस्थापन एक अभ्यास

**उद्दिष्ट:**

१) शिवकालीन जीवन व्यवस्था अभ्यासणे.

२) जाणता राजा चे दूरगामी व्यवस्थापन अभ्यासणे.

३) शिवकालीन जल व्यवस्थापन अभ्यासणे.

४) शिवकालीन पर्यावरण विषयक व्यवस्थापन अभ्यासणे.

५) शिवकालीन स्वच्छतेचे अनोखे व्यवस्थापन अभ्यासणे.

**ग्रहीतके:**

1. शिवरायांचे रायगडावरील व्यवस्थापन आणि तंत्र वापरण्याची गरज.
2. रायगडाचे स्थान लक्षात घेता रायगडास राजधानी बनवणे शिवरायांचे लक्ष होते.
3. दूर दृष्टिकोनातून रायगड हा किल्ला प्रशासन चालवण्यास पूरक होता.
4. छत्रपती शिवरायांचे दूरगामी व्यवस्थापन होते.

5. छत्रपती शिवरायांचे वन व्यवस्थापन आणि पर्यावरण विषयक विचार प्रत्यक्षात उतरवणे गरजेचे होते.

**शिवकालीन जीवन :**

सह्याद्रीच्या शिखर माथ्यावर अनेक गड किल्ले गड किल्ले आहेत. त्यातील काही शिलाहार यादवकालीन तर काही शिवकालीन गडकोट आहेत .छत्रपती शिवाजी महाराजांचे स्वराज्य गड किल्ल्यांच्या आश्रयाने उभे राहिले होते. त्यामुळे गडावर त्यांचे विशेष प्रेम डोंगरमाथ्यावरील या किल्ल्यावर प्रथम प्राधान्य पिण्याच्या पाण्याला असे आज्ञापत्रातील दुर्ग प्रकरणांमधील गडाची राखण या विषयासंबंधी लिहिले आहे. त्यात ते म्हणतात तसेच गडावर आधी उदक पाहून किल्ला बांधावा पाणी नाही आणि ते स्थळ आवश्यक बांधणे प्राप्त झाले तरी आधी खडक फोडून तळी टाकी पर्जन्य काळापर्यंत संपूर्ण गडास पाणी पुरेल अशी मजबूत बांधावी गडावर झराही आहे. छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्वराज्याची राजधानी रायगड येथील जलव्यवस्थापन तर खास अभ्यासण्याजोगेआहे. रायगडावरील डोंगराच्या पोटात खोदलेली खांब टाकी पाहिल्यावर लक्षात येते की रायगड हा प्राचीन असून त्याला किमान दीड हजार वर्षांचा इतिहास लाभला आहे. शिलाहार राजापासून शिवाजी महाराजांपर्यंत अनेक राजवटी रायगडावर नांदल्या आहेत.

शिवाजी महाराजांनी आज्ञापत्रात म्हटले आहे की गडावर झऱ्याचे पाणी भरपूर आहे. म्हणून त्यावर विसंबून न राहता एक दोन तळी आधिक बांधून ठेवावी. प्रसंगी ती कामास येतील हे लक्षात घेऊन व निसर्गचक्राचा रोख पाहून यापुढे पिण्याच्या पाण्याचे नियोजन करणे किती गरजेचे आहे हे अलीकडचे बदलते वातावरण पाहून आपल्या लक्षात आले असेल.

राजधानी रायगडावर मुबलक पाणीसाठा आहे. गंगासागर तलाव कोळीम तलाव कुशावर्त तलाव हत्ती तलाव काळा तलाव आणि निकामी तीन तलाव धरून एकूण आठ तलाव रायगडावर आहेत त्यातील गंगासागर तलाव हा सर्वात मोठा असून राजवाड्या समोर तो बांधण्यात आला आहे. महादरवाजा तटबंदी दरवाजा जगदिश्वर मंदिर आणि सेवकांची जवळजवळ तीनशे इमारती रायगडावर बांधण्यात आल्या त्यासाठी लागणारा दगड गंगासागर व इतर तलावातील दगड खाणीतून काढलेला आहे. राज्याभिषेकावेळी सप्त नद्यांचे पाणी गंगासागर तलावात टाकले आहे या तलावा खेरीज पाऊणशे पाण्याची टाकी आहेत.

ती गडमाथ्यावर गुफेत व कड्यांच्या पोटात राजवाड्यापासून भवानी टोकापर्यंत आणि वाघ दरवाजा पासून टकमक टोकापर्यंत निरनिराळ्या ठिकाणी त्या खोदल्या आहेत रायगडावरील दहा हजाराच्या शिबंदीला पुरून उरेल एवढा प्रचंड पाण्याचा साठा रायगडावर होता शिवराज्याभिषेकाला रायगडावर एक लाख असामी आले होते हे तत्कालीन कागदपत्रे व इंग्रज पोर्तुगीज यांनी लिहून ठेवले आहेत या समारंभातील सर्व लोकांची पिण्याच्या पाण्याची तहान गडावरील पान वठ्यानी भागवली होती. रायगडावर सर्वांना मुबलक पाणी पुरेल एवढ्या पाण्याचे नियोजन कसे करण्यात आले त्याचा पाठपुरावा रायगडावरच पाहायला मिळतो शिवाजी महाराजांनी रायगडावर सर्वप्रथम दगडात बनवलेले पर्जन्यमापक यंत्र कुशावर्त तलावाजवळून मंदिराच्या मागे बांधून घेतले. कौटिल्याने दोन हजार चारसे वर्षापूर्वी पर्जन्यमापकाचा उपयोग शेती आणि धरणे बांधण्यासाठी केला होता. रायगडावरील दगडात बनवलेले हे पर्जन्यमापक त्याची सुधारित आवृत्ती म्हणजे आधुनिककच म्हटले पाहिजे वर्षाला सरासरी किती पाऊस पडतो हे पर्जन्यमापकामुळे समजत असल्यामुळे रायगडावरील शिबंदीसाठी किती तळी खोदावी लागतील, त्यासाठी त्यांची लांबी रुंदी व खोली किती ठेवायची म्हणजे त्यात साठवलेले पाणी पुढील पर्जन्यमापका पर्यंत पुरेल शिवाजी महाराजांच्या स्थापत्यविशारदाने अंदाज घेऊन गडावरील विद्यमान तलाव बांधण्यात आले.

**जाणत्या राजाचे दूरगामी व्यवस्थापन:**

छत्रपती शिवरायांचे जीवनच एवढे भव्य आहे की त्यांच्या आयुष्याच्या प्रत्येक दिवसावर एक ग्रंथ निर्माण व्हावा आज्ञापत्रातून त्यांच्या पर्यावरण विषयक भूमिकेचा अभ्यास करता हा राजा काळाच्या किती पुढे होता याची महती पटते शिवरायांनी प्रत्येक किल्ल्यावर केलेले काटेकोर जलव्यवस्थापन किल्ल्याच्या संरक्षणाच्या दृष्टीने सर्वात प्रथम पाण्याचे महत्त्व अत्यंत महत्त्वाचे व अनन्य साधारण आहे. आणि त्यांनी ते साडेतीनशे वर्षापूर्वी चाणाक्षपणे नियोजन केल्याचे आपल्याला दिसते. शिवरायांनी स्वच्छते बाबत त्यांचा निकोप दृष्टिकोन अत्यंत दूर दृष्टिकोनातून त्यांनी सतराव्या शतकात आपल्या गड कोटात शौचकुपाची व्यवस्था केली होती आजच्या काळात ही आवर्जून जाऊन बघावी अशी मलमूत्र विसर्जनाची अनोखी व्यवस्था आपल्याला थक्क करून टाकते.

आज हागणदारी मुक्त गाव व हगणदारीमुक्त समाज करण्यासाठी जे शासनाकडून प्रयत्न होत आहे, पैसा खर्च होत आहे. मात्र अजूनही अपेक्षित यश येत नसताना शिवरायांनी संपूर्ण भ्रष्टाचार मुक्त योजनेतून ही संकल्पना सतराव्या शतकात यशस्वीपणे राबवली ते पाहता शिवराय जलसंवर्धन वनसंवर्धन व ग्राम स्वच्छता योजनेचे खऱ्या अर्थाने प्रणेते होते यात शंका नाही. तसेच पर्यावरण विषयी अत्यंत महत्त्वाचे विचार पहाता खऱ्या अर्थाने हा राजा पर्यावरणाचा प्रणेता होता. आज संपूर्ण जग जागतिक तापमान वाढीने त्रस्त आहे या पार्श्वभूमीवर शिवरायांच्या विचारात त्यांच्या धोरणात आपल्याला नवी दिशा मिळेल.

**शिवरायांचे जलव्यवस्थापन:**

किल्ल्यांच्या संरक्षणाच्या दृष्टीने सर्वात प्रथम पाण्याचे महत्त्व अत्यंत महत्त्वाचे व अनन्यसाधारण आहे त्यात सह्याद्रीत व एकंदर भारतात चार महिने पाऊस पडतो त्यामुळे प्रत्येक किल्ल्यावर पाण्याची साठवणूक शिवराय काटेकोरपणे करत असत. शिवकाळात विजेचा शोध लागला नव्हता त्यामुळे विद्युत पंपाने पाणी खेळू नये त्या काळी शक्य नव्हते मात्र त्याही परिस्थितीत शिवनिर्मित प्रत्येक किल्ल्यावर वर्षभर पुरेल व प्रसंगी गडावर जर हल्ला झाला तर आणीबाणीच्या काळातही आवश्यक तो पाणी साठा कसा राहील याची योग्य ती काळजी शिवरायांनी घेतलेली आहे. त्याचे मुख्य कारण कारण त्याकाळी जलाभेद्य खडकांचे थर आणि पाझर नारे खडक यांच्या सहाय्याने पाणीसाठा करता येऊ शकतो हे तत्कालीन पाथरवट यांच्या खडक फोडणारी जमात लक्षात आले होते. त्यामुळे अशा हरहुन्नरी लोकांकडून शिवरायांनी किल्ल्यामध्येच खानी अथवा हौद किंवा दगडांच्या उतरणीवर खोल खड्डे निर्माण करून पाणी सतत पाझरत राहील याची व्यवस्था केली होती. त्याचबरोबर अशा जलाभेद्य खडकांची जर मुबलकता आढळली तर त्यातले मधले खडक अलगत काढून किंवा त्यांना पाणी पाझरत राहील इतके तासून तलाव तयार केले व पाण्याची मुबलकता कशी राहील याकडे विशेष लक्ष दिले .रायगडावरील गंगासागर तलाव, कोळीम तलाव सज्जनगडावरील सोनाळे तलाव प्रतापगडावरील रहाट चे तळे भवानी तलाव ही त्याची काही उदाहरणे आहेत. पाणवठे खोदून घेतले होते. रायगडावरील शिलालेखात रायगड बांधणाऱ्या हिरोजी इंदुलकर यांनी वापी कुप तडाग असा केलेला उल्लेख फार महत्वाचा आहे. राजधानी रायगडाच्या दृष्टीने पाणीसाठा गंगासागर तलाव हत्ती तलाव हिरकणी तलाव बामण तलाव काळा हाऊ द कुशावर्त तलाव, चांभार टाके हनुमान टाके आशा विपुल पाणी साठवणाऱ्या जागा वर्षभर पुरेसा पाणी पुरवण्याच्या दृष्टीने शिवरायांनी गड बांधतानाच करून घेतल्या होत्या. इतर किल्ल्यावर ही पाण्याची मुबलकता लोकांना उपलब्ध करून दिली होती मात्र त्याचे नियोजन अधिक काटेकोर होते.

**शिवरायांचे वन व्यवस्थापन:**

वनस्पती आणि माणूस यांचे एकमेकांशी असणारे नाते शिवरायांनी ओळखले होते .शिवरायांच्या संघर्षमय जीवनात देखील पर्यावरणाचे संतुलन ठेवणारी वनश्री त्यांच्या नजरे आड झाली नाही. त्याकाळची वनराई ही

भरमसाठ असूनही त्याचा रास शिवरायांनी कधी होऊ दिला नाही. प्रत्येक गडावर व गड परिसरात शिवरायांनी आंबा, वड, नारळ, शिसव, बाभूळ , ऐन यांची लागवड केली होती आरमारासाठी साग व शिसवी झाडे वापरली जात असत फळा फळा वरांसाठी आंबा चिकू फणस इत्यादी झाडे इतकेच नव्हे तर संदेशवहनासाठी काळा धूर व पांढरा धूर सोडणारी झाडेही शिवरायांनी खास लावली होती त्यांचा उपयोग त्याप्रमाणे करूनही घेतला होता. आज्ञापत्रात शिवराय निसर्ग संवर्धनाबाबत किती जागरूक होते याचा प्रत्यय येतो रयतेच्या भाजीच्या देठालाही हात लावू नये हे शिवरायांचे तत्व होते. अगदी गरज पडल्यास शेतकऱ्यास योग्य तो मोबदला देऊन झाडे खरेदी करावीत रयतेस तोशीस पडता कामा नये.फणस ही झाडे लेकरांसाठी वाढवली मात्र सैनिकांनी बळजबरीने तोडल्यास त्यांच्या दुःखाला पारावार उरत नाही अशी त्यांची भावना होती.

**स्वच्छतेचे अनोखे व्यवस्थापन:**

छत्रपती शिवरायांनी सतराव्या शतकात आपल्या गडकोटात शौचकुपांची व्यवस्था केली होती. आजच्या काळातही आवर्जुन जाऊन बघावी अशी मलमूत्र विसर्जनाची अनोखी व्यवस्था आपल्याला थक्क करून टाकते. शिवरायांच्या पर्यावरण व ग्रामस्वच्छतेचा दृष्टिकोन किती निकोप होता, याचे हे उत्तम उदाहरण ठरावे. आजच्या काळात आपण निर्मल ग्राम स्वच्छता अभियान राबवून त्यावर कोटय़वधी रुपये खर्च करतो; परंतु १७व्या शतकात अशा प्रकारची योजना शिवरायांनी कुठलाही गाजावाजा न करता भ्रष्टाचारमुक्त वातावरणात राबवली होती, हे विशेष! आजही प्रतापगडाच्या पूर्वेकडील बुरुजात, रायगड, राजगड, पुरंदर येथील ब-याच सुस्थितीत असलेली शौचकुपे पाहाता येतात. पहा-यावरील सैनिकांनी नैसर्गिक विधीसाठी कुठेही लांब व पहारा सोडून जाऊ नये, यासाठीही ही व्यवस्था. इतकेच नव्हे तर मलमूत्र खोल तटबंदी बाहेर दरीत पडण्याची व्यवस्था पाहून शिवराय काळाच्या किती पुढे होते, याची साक्ष पटते. गडावरच्या वस्तीमध्येही व गडावर कुठेही, कचरा साठला तर तो जाळून त्याची राख जमिनीत टाकून त्यावर भाज्या पिकवण्यात याव्यात, गड राबता व स्वच्छ ठेवावा, विहिरी, पाणवठे, सदैव स्वच्छ ठेवावेत, सांडपाण्याची योग्य विल्हेवाट, शोषखड्डय़ाची व्यवस्था, कंपोस्ट खतासाठी, सोनखतासाठी सदैव आग्रही दृष्टिकोन पाहता शिवरायांच्या स्वच्छताविषयक दृष्टिकोनाची प्रचिती येते.

**शिवाजी महाराजांचे जल व्यवस्थापन तंत्र आज वापरण्याची गरज:**

शिवकालीन जलसंचय व्यवस्थापनाचे तंत्र आज ही दगड खाणी खणताना दुहेरी फायदा मिळवण्यासाठी व्यापक स्वरूपात प्रत्यक्ष वापरात आणले पाहिजे, त्यामुळे शिवकालीन संस्कृतीचा वारसा देखील जतन करता येईल महाराष्ट्राच्या 82% भूभागात बेसॉल्ट प्रकारचा काळा कठीण दगड आढळतो पाणी साठवण्याची क्षमता पाच टक्के पेक्षा कमी आहे फारसे पाणी न मुरने या वैशिष्ट्याचा सकारात्मक विचार करता हा दगड तलाव खाण्यासाठी उपयुक्त आहे.त्यामुळे कल्पकतेने उपयोग केल्यास दगड खाणीत पाण्याचा साठा करणे सहज शक्य आहे. शिवराय हे सकारात्मक दृष्टिकोन ठेवून चालत असत त्यांना मोगलांच्या नजरकैदेत असताना त्यांनी हिरोजी इंदलकर यांना पत्र पाठवून दक्षिणेतील गडावरील पाणी साठ्याची चिंता लागली होती महाराजांचा सकारात्मक विचारसरणीची आजच्या स्थितीला खूप गरज आहे त्यांचा हा आदर्श आपण सर्वांनी डोळयासमोर ठेवला पाहिजे.

**सारांश:**

छत्रपती शिवरायांचे ग्रामीण जलव्यवस्थापन हे खूप अभ्यासण्याजोगेआहे .महाराजांच्या प्रत्येक दिवसाच्या नियोजनावर एक ग्रंथ तयार होतील असे नियोजन शिवरायांनी सतराव्या शतकात केलेले आपल्याला दिसून येते शिवरायांच्या डोक्यात दररोज नवनवीन कल्पना तयार होत असेल आणि त्या प्रत्यक्षात देखील उतरत असत. त्या डिजिटल युगाला मागे टाकून महाराजांच्या जलव्यवस्थापन वनसंवर्धन स्वच्छते बाबतीत नियोजन आणि पर्यावरण विषयीच्या नवनवीन कल्पना शिवरायांनी त्या काळात त्यांनी यशस्वी करून दाखवल्या त्याचा लाभ अजूनही

रायगडावर तेथील येणारे पर्यटक तेथील ग्रामस्थ त्या व्यवस्थेचा लाभ घेताना दिसून येत आहे. आजच्या नवीन पिढीने शिवरायांनी साडेतीनशे वर्षांपूर्वी केले होते आत्ता जर त्या नियमांचे आपण नियोजन केले तर आपल्याकडे जी अतिवृष्टी होते ती रोखली जाईल आजचा शेतकरी दर वर्षीच्या कोरडा दुष्काळाला त्रस्त आहे या गोष्टी हाताबाहेर जाणार नाही त्यामुळे शिवरायांचे विचार आचरणात आणणे आजच्या स्थितीला खूप महत्त्वाचे आहे.

**संदर्भ:**

१.आजचा रायगड, पांडुरंग पाटणकर 2006

२. एका राजधानी ची कहाणी, दुर्गराज गायकवाड .उदय दांडेकर

३. किल्ले रायगड, शंकर अभ्यंकर 1980

४.गडांचा राजा, राजांचा गड ,रायगड  प्र. गो .भट्टे

५. माझे नाव रायगड ,बळवंत मोरेश्वर पुरंदरे 1961

६.रायगड किल्ल्याचे वर्णन ,गोविंदराव बाबाजी  जोशी 1885

७. रायगड ची जीवन कथा, शांताराम विष्णू आवळसकर 1962,1974,1998

# "मल्टीस्टेट श्येडूल्ड को-ऑपरेटीव्ह बँकांची ग्रामीण विकासातील भूमिका"

**डॉ.रविंद्र अशोक आहिरे**
सहाय्यक प्राध्यापक, के. एस. के. डब्ल्यू. कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, सिडको, नाशिक.

## सारांश

सहकारी चळवळीचा देशाच्या आर्थिक विकासामध्ये महत्वपूर्ण सहभाग आहे. ग्रामजीवनाला अर्थगती देणा-या सहकारी बँकांना शंभर वर्षाचा वारसा लाभला आहे. सहकारी व्यवस्थेत १५५१ नागरी सहकारी बँका आणि ९६,६१२ ग्रामीण सहकारी बँका (२०१८) यांचा समावेश आहे. देशभरात सहकारी बँकांचे मोठे जाळे विस्तारलेले आहे. ५३ शेडयुल्ड नागरी सहकारी बँका, ३१ राज्य सहकारी बँका आणि १५९२ नॉन-शेडयुल्ड अर्बन को-ऑपरेटिव्ह बँका देशात अस्तित्वात आहेत. ज्या राज्यात ही संकल्पना रुजली त्या महाराष्ट्रात या बँकांची संख्या अनुक्रमे ५३९, ३८ आणि ५०१ एवढी आहे. १९८५मध्ये मल्टीस्टेट बँकांना परवानगी देण्यात आली आणि विविध राज्यांत शाखा सुरू करण्याचा मार्ग खुला झाला. २००४-०५ मध्ये १९ टक्के वाटा असलेल्या बँकांची २०१७ मध्ये अनुसूचित व्यावसायिक बँकांच्या तुलनेत एकूण संपत्ती केवळ ११ टक्के होती. अनेक चळवळींचे माहेरघर असलेल्या महाराष्ट्रात सहकार चळवळ रुजली आणि देशभर वाढली. या चळवळीचा वित्तीय समावेशीकरणाचा उद्देश सफल करण्यासाठी ठोस आर्थिक व्यवस्थेची गरज पूर्ण केली ती सहकार तत्त्वावर उभ्या राहिलेल्या बँकांनी या क्षेत्रात कालांतराने अनेक स्थित्यंतरे आली. त्यानुषंगाने अनेक बदल या क्षेत्राने स्वीकारले. त्यामुळे जागतिकीकरणाच्या झंझावातातही या बँकांचे महत्त्व आजही टिकून आहे, ही बाबच या व्यवस्थेचे महत्त्व अधोरेखित करणारी ठरते. सुरू असलेल्या वित्तीय समावेशीकरणाच्या यशस्वितेत या क्षेत्राचा मोठा वाटा असणार आहे.

## प्रस्तावना

सध्या बँक सेवा नसलेल्या दुर्गम भागाला बँक व्यवस्थेशी जोडण्याचे प्रयत्न सुरू आहेत, या प्रक्रियेत सहकारी बँकांची भूमिका निर्णायक ठरणार आहे. संबंधित यंत्रणांनाही याची कल्पना आहे. शहरी आणि ग्रामीण असे दोन चेहरे आपल्या देशाला लाभलेले असून, अर्थव्यवस्थेसाठी या दोहोंचे मोठे योगदान आहे. एकेकाळी तर आपली अर्थव्यवस्था ही कृषीप्रधान म्हणून ओळखली जात होती. शेती, कुटीरोद्योग आणि बारा बलुतेदार यांनी व्यापलेल्या या अर्थव्यवस्थेसाठी मात्र वित्तपुरवठयाची मोठी अडचण जाणवत होती. यामुळे ग्रामीण जनतेला आपली आर्थिक गरज पूर्ण करण्यासाठी सर्वथा सावकारांवरच अवलंबून राहावे लागत होते. यातून अनेक सामाजिक-आर्थिक समस्या उद्भवून त्याचा ग्रामीण अर्थव्यवस्थेच्या प्रगतीत अडथळा निर्माण झाला. अनेक आर्थिक दुष्टचक्रात येथील व्यवस्था गुरफटली. हा गुंता सोडवण्यासाठी द्रष्टय़ा लोकांनी सहकारतत्त्वावरील वित्तसंस्थांचे महत्त्व जाणले आणि सहकारी बँकांची व्यवस्था उभी करण्यासाठी पुढाकार घेऊन आर्थिक सहकारातून उद्धाराचा संकल्प केला. सहकार तत्त्वावरील बँकांची संकल्पना रुजली आणि देशभरात घट्ट पाय रोवून उभी राहिली.

बडोद्यात (वडोदरा) सर्वात पहिली सहकारी बँक उदयास आली आणि या क्षेत्राचा व्याप उत्तरोत्तर वाढतच गेला.

१९०४मध्ये पहिल्यांदा सहकार कायदा अस्तित्वात आला. त्यानंतर या क्षेत्रात काळानुरूप अनेक बदल घडले. १९१४ मध्ये मॅक्लॅगेन समितीने केलेल्या शिफारशीनुसार, बँकिंग क्षेत्रात तीन स्तरीय संरचना उदयास आली. गावपातळीवर कृषी पतपुरवठा संस्था, जिल्हा पातळीवर केंद्रिय सहकारी बँका आणि राज्यस्तरावर राज्य सहकारी बँकाअशी ही संरचना आकारास आली. पुढील काळात उत्पादन, प्रकिया, विपणन, वितरण, सेवा अशा सर्वच क्षेत्रांत हातपाय पसरलेली सहकार चळवळ वाढण्यास या बँकांनी मोठा हातभार लावला. सुरुवातीच्या काळात सहकारी बँकांचे उद्दिष्ट अगदीच मर्यादित स्वरूपाचे होते. विशिष्ट समूहाआधारित अस्तित्व असलेल्या या बँका त्यांच्या सदस्यांचीच आर्थिक गरज पूर्ण करू लागल्या. १९३९मध्ये मेहता भंसाळी समितीने अर्बन सहकारी बँकांची सर्वप्रथम स्पष्ट संकल्पना मांडली. त्यानंतर या क्षेत्रासंबंधात अनेक सर्वेक्षणे करण्यात आली. १९५८-५९मध्ये आरबीआयने सर्वप्रथम या क्षेत्राविषयी अभ्यास केला आणि या क्षेत्राच्या वाढीसंबंधात राज्य सरकारांना अनेक शिफारशी केल्या.

**उदिष्टे :**

१. बहुराज्यीय सहकारी बँकांची अर्थव्यवस्थेतील भूमिका स्पष्ट करणे.
२. बहुराज्यीय सहकारी बँकांची रचना स्पष्ट करणे.
३. ग्रामीण भागात बहुराज्यीय सहकारी बँकांचा कार्यभाग स्पष्ट करणे.
४. बहुराज्यीय सहकारी बँकांना भांडवल पुरवठ्याबाबत येणाऱ्या समस्यांचा/ आव्हानांचा अभ्यास करणे.

**सहकारी बँकांची अर्थव्यवस्थेतील भूमिका**

आजच्या घडीला काही सहकारी बँका खासगी बँकांच्या तोडीस तोड सेवा देत आहेत. नेटबँकिंग, एटीएम, एसएमएस बँकिंग, फॉरेक्स, डीमॅट यांसारख्या सेवा देत आहेत. काही बँका तर व्हिसा डेबिट कार्ड देण्याबरोबरच सुट्टीकालीन बँक सेवाही ग्राहकांना देत आहेत. सहकारी बँकांची गेल्या काही वर्षात झालेली प्रगती काही बँकांच्या उलाढालीवर लक्ष टाकल्यास सहज स्पष्ट होईल. ग्राहकांशी थेट संवाद साधण्याच्या कार्यशैलीमुळे या बँकांच्या ग्राहकसंख्येत वाढ होत असून त्याचा या क्षेत्राच्या उलाढालीवर सकारात्मक परिणाम होत आहे. पण ही प्रकरणे या क्षेत्राच्या महत्त्वापेक्षा खूप कमी ठरली. व्यवस्थेत टिकून राहायचे असेल तर काळानुरूप बदल हा एकमेव पर्याय आहे. ज्या बँकांनी ही काळजी घेतली त्या आज शिखरावर आहेत. ज्यांनी याकडे दुर्लक्ष केले त्या कालौघात गायब झाल्या. दुर्बल घटक आणि मध्यम वर्गीयांचा प्रमुख आधार असलेल्या सहकारी बँकांना व्यावसायिक दृष्टया अधिक मोठी झेप घेण्याची संधी निर्माण झाली आहे. सरकार आणि रिझर्व्ह बँकेकडून ग्रामीण भागाला मुख्य आर्थिक प्रवाहात आणण्यासाठी ग्रामीण भागातील बँकांचा पाया मजबूत करण्याचे धोरण राबवले जात आहे. वित्तीय समावेशनाच्या या प्रक्रियेतून ज्या भागात बँकिंग सेवा नाही अशा दुर्गम भागात ही सेवा पोहोचण्याची सहकारी बँकांची मोठी मदत होईल.

**सद्यस्थिती आणि आव्हाने**

ज्या ठिकाणी बँकिंग नाही अशा लोकसंख्येला कर्ज वितरण करण्यात सहकारी संस्था महत्वाची भूमिका निभावतात.भारतीय सहकारी चळवळीची मुळे १९ व्या शतकाच्या उत्तरार्धात असून गावांमध्ये लुबाडणाऱ्या सावकारांना पर्याय शोधण्यासाठी प्रयत्न करण्यात आला. मूलतः, सहकारी बांका लहान कर्जदार आणि व्यवसायांना कर्ज देणाऱ्या समुदाय आणि वस्त्यांमध्ये केंद्रित राहिल्या आहेत. उच्च व्याज दर आणि वैयक्तिक लक्ष यामुळे ठेवीदार या बँकांकडे आकर्षित होतात. सध्याच्या स्थितीत, सहकारी व्यवस्थेत १५५१ नागरी सहकारी बँका आणि ९६,६१२ ग्रामीण सहकारी बँका (२०१८) यांचा समावेश आहे.ग्रामीण सहकारी संस्था गावे आणि लहान शहरामध्ये आपल्या भौगोलिक आणि लोक्संख्यीय पोहोचेनुसार आर्थिक सेवा देतात तर नागरी सहकारी बँका नागरी आणि अर्धशहरी भागांत कर्ज पुरवठा करतात. सहकारी बँकांची वाढ बँकिंग क्षेत्राच्या एकंदरीत झालेल्या वाढीच्या बरोबरीने झाली नाही, हे नमूद करावे लागेल. परिणामी, २००४-०५ मध्ये १९ टक्के वाटा असलेल्या बँकांची २०१७ मध्ये अनुसूचित व्यावसायिक बँकांच्या तुलनेत एकूण संपत्ती केवळ ११ टक्के होती.

भारतातील बँकिंग कल आणि प्रगती यावर आरबीआय अहवालात २०१७-१८ सहकारी बँकांच्या स्थितीची माहिती दिली आहे. ग्रामीण सहकारी संस्थांमध्ये, संपत्तीचा दर्जा आणि नफा याबाबतीत कामगिरीत तफावत आहे. राज्य सहकारी बँकांनी एनपीए गुणोत्तर आणि नफाक्षमता सुधारली, तर जिल्हा सहकारी बँकां दोन्ही निकषांच्या बाबतीत खालावल्या. दीर्घ मुदतीच्या सहकारी संस्थांची आर्थिक कामगिरी कृषीच्या बाबतीत समाधानकारक पेक्षाही खाली होती आणि आता आणखी खालावली आहे.नागरी सहकारी बँकांच्या संदर्भात, आरबीआय आकडेवारी हे दर्शवते की, जरी संपत्तीचा दर्जा सुधारला असला तरीही एकूण नफाक्षमता माफक आहे. १५५१ बँकांमध्ये, २६ बँका या नियामकाच्या निर्देशाखाली आहेत आणि ४६ बँकांची पात्रता नकारात्मक आहे. नागरी सहकारी बँकामध्ये घोटाळे झाले आहेत. गुजरातमधील माधवपुरा सहकारी बँकेचे उदाहरण आहे, २००१ मध्ये ही बँक मोठी बँक झाली कारण शेअर दलाल केतन पारेख याला दिलेल्या कर्जाच्या स्वरुपात संपत्तीची लक्षणीय टक्केवारी तिच्याकडे होती.१९६६ मध्ये सहकारी बँका आरबीआयच्या रडारवर थेट आल्या पण दुहेरी नियमनाच्या प्रश्नांना सामोर्या गेल्या. नागरी सहकारी बँकाचे सिंगल स्टेट असतील तर आरबीआयकडून आणि सहकारी संस्था राज्य निबंधक आणि मल्टी स्टेट असतील तर केंद्रीय सहकारी संस्था निबंधक यांच्याकडून नियमन आणि देखरेख केली जाते. राज्य निबंधक निवडणूक आणि इतर अनेक प्रशासकीय तसेच ऑडीटींग यावर नियंत्रण असते. आरबीआय परवाना मंजूर करणे, रोख राखीव प्रमाण राखणे, वैधानिक तरलता आणि भांडवली पुरवठा प्रमाण राखणे आणि या बँकांची तपासणी अशा नियामक पैलूंचा समावेश आरबीआयच्या देखरेखीत असतो. पण अशी भावना आहे की, दुहेरी नियंत्रणामुळे खासगी क्षेत्रातील बँकांवर आरबीआयचा नियंत्रण असते तेव्हढे सहकारी बँकांवर नसते.सहकारी बँकांची भूमिका

अनुसूचित व्यापारी बँकांचा विस्तार आणि तंत्रज्ञानाचा स्वीकार वाढल्याबरोबर आकुंचित होत गेली. पेमेंट बँका, लहान आर्थिक बँका आणि एनबीएफसी यांच्याकडून त्यांना स्पर्धेचा सामना करावा लागतो आहे. भांडवलाशी संबंधित मुद्देही आहेत. नागरी सहकारी बँका सार्वजनिक रोखे किंवा प्रीमिअमवर शेअरद्वारे भांडवल उभारू शकत नाहीत. सहकारी संस्थेत ही समस्या असते की, व्यावसायिक बोर्ड असू शकत नाही. सहकारी बँकांचे संचालक मंडळ बँकेचे सभासद निवडून देतात आणि नेहमीच बँकेवर नियंत्रण मिळवण्यासाठी राजकारणी खेळ करत असतात. अनेक राज्यांत, अशा संस्थांचे राजकीय नियंत्रण कर्ज आणि नोकर्या देण्याच्या माध्यमातून राजकीय मेहेरबानीच्या जाळ्याच्या अविष्कारात महत्वाची भूमिका निभावते.

**सहकारी बँकांचा कार्यभाग**

ठेवीदार आणि इतर भागधारक यांचा विश्वास परत मिळवण्यासाठी सहकारी बँकांचे नियमन आणि प्रशासन याकडे नव्याने पाहिले पाहिजे. नियामक आरबीआय आणि सरकार यांनी सध्याच्या आर्थिक परिप्रेक्ष्यात असे प्रकार पुन्हा घडू नयेत यासाठी सहकारी बँकांच्या महत्वाचे फेरमुल्यांकन केले पाहिजे. काही सहकारी बँकांमध्ये प्रशासन व्यवस्था मोडकळीस आल्याची भावना आहे. बँक संचालक मंडळ, ऑडिटर,बँक व्यवस्थापन, रेटिंग एजन्सीज आणि नियामक हे प्रशासनाचा अभाव आणि सुमार दर्जाचे नियमनासाठी जबाबदार आहेत.

चांगल्या प्रशासनासाठी आपल्याला ठेवीदारांमध्ये विश्वास निर्माण करण्याची गरज आहे. जरी आरबीआयने राज्य सरकारबरोबर सामंजस्य करार केला असला तरी राज्य सरकारे परिणामकारक नियमनात सहकार्य करत नाहीत तोपर्यंत देखरेख कुचकामी ठरण्याची शक्यता आहे. आरबीआय सहकारी बँकांना व्यावसायिकपणे वर्तन करण्यासाठी आग्रह करत आहे. एच. मालेगम समितीने संचालक मंडळाशिवाय, योग्य आणि चपखल व्यक्तींचे व्यवस्थापन मंडळ नेमण्याची शिफारस केली होती. कल्पना अशी होती की, व्यवस्थापन मंडळ प्रत्यक्ष व्यवहारांचे नियंत्रण करेल ज्याला निवडून आलेल्या संचालकांनी विरोध केला. संचालकांची निवड पद्धतीत बदल करण्याची गरज आहे आणि विशिष्ट ज्ञान आणि व्यावसायिक व्यवस्थापन कौशल्य असे सभासद असले पाहिजेत.२०१८ मध्ये, आरबीआयने पात्र नागरी सहकारी बँकांचे स्वयंस्फुर्तीने लहान वित्त बँकांमध्ये परिवर्तन करण्याची योजना आर. गांधी यांच्या अध्यक्षतेखालील उच्चाधिकार समितीच्या शिफारशीच्या अनुसार जाहीर केली. सध्या ज्या उत्पादनाना व्यापारी बँकांमध्ये परवानगी आहे, त्यातील बहुतेक सर्व उत्पादने त्यांना मिळू शकतील आणि त्यांना भारतभर अस्तित्व राखता येईल.युसीबी ज्यांचे निव्वळ मूल्य ५० कोटी किंवा त्यापेक्ष जास्त आहे, त्या स्वयंस्फूर्त रीतीने परिवर्तनास पात्र असतील. पण लहान व्यापारी बँका होण्यास विरोध झाला, यात काहीच आश्चर्य नाही. आरबीआय असे म्हणू शकते की, पुढील वाढ गाठण्यासाठी नागरी सहकारी बँकांनी योग्य आणि उचित निकष पूर्ण करणारे व्यवस्थापन मंडळ नेमावे किंवा लहान व्यापारी बँका व्हावे.आरबीआयने असेही म्हटले की, बाजारातून भांडवल उभारण्यासाठी नागरी सहकारी बँकांनी स्वतःच एक छत्री संस्था उभारून संयुक्त स्टॉक कंपनी काढावी. आर्थिक दुर्बल बँकांच्या फायद्यात चालणार्या बँकांमध्ये विलिनीकरणास उत्तेजन द्यायला हवे.ल सहकारी बँकांमध्ये इतर बँकांशी स्पर्धा करण्यासाठी तंत्रज्ञानाचा वापर करण्यास

चालना दिली पाहिजे. मोठ्या नागरी सहकारी बँकांमध्ये इतर सहकारी बँकांच्या ठेवीच्या प्रमाणाकडे एक नजर टाकली पाहिजे. नागरी सहकारी बँकांनी इतर नागरी सहकारी बँकांच्या ठेवी स्वीकाराव्यात का, याचा फेरविचार करण्याची वेळ आली आहे. मोठ्या युसीबी ठेवींचे अपयश महत्वाचे आहे. ठेवीदारांचे हित आणि आर्थिक स्थैर्य लक्षात घेऊन. आंतर युसीबी ठेवीबाबत धोरणाचा फेरविचार केला पाहिजे.

**सहकारी बँकांची रचना**

देशभरात सहकारी बँकांचे मोठे जाळे विस्तारलेले आहे. ५३ शेडयुल्ड नागरी सहकारी बँका, ३१ राज्य सहकारी बँका आणि १५९२ नॉन-शेडयुल्ड अर्बन को-ऑपरेटिव्ह बँका देशात अस्तित्वात आहेत. ज्या राज्यात ही संकल्पना रुजली त्या महाराष्ट्रात या बँकांची संख्या अनुक्रमे ५३९, ३८ आणि ५०१ एवढी आहे. १९८५मध्ये मल्टीस्टेट बँकांना परवानगी देण्यात आली आणि विविध राज्यांत शाखा सुरू करण्याचा मार्ग खुला झाला. यातील काही बँकांना परकीय चलन बाजारात अधिकृत डीलर म्हणून परवानगी देण्यात आली. सहकार क्षेत्रातील बँकांचा महाराष्ट्रातील मजबूत पाया स्पष्ट होण्यास ही आकडेवारी पुरेशी ठरावी. रिझर्व्ह बँकेच्या ताज्या आकडेवारीनुसार आज देशभरात एकूण ५३ शेड्युल्ड नागरी सहकारी बँका, तर ३१ राज्य सहकारी बँका आहेत. महाराष्ट्र, सहकारात कायमच आघाडीवर राहिला. आजही महाराष्ट्रातच सर्वाधिक सहकारी बँका आहेत. सहकारी बँकांमुळे बँकिंग क्षेत्र खऱ्या अर्थाने तळागाळापर्यंत पोहोचले. जिल्हा, तालुका, गावस्तरावर सहकारी बँका उभ्या राहिल्या. सहकारी साखर कारखाने उभे राहिले. अनेक राजकीय नेते सहकाराच्या आधारानेच मोठे झाले. अगदी मुख्यमंत्री पदापर्यंत पोहोचले. सहकार क्षेत्र टिकून राहिले पाहिजे, यासाठी राजकारणातील भांडणे सहकारात येऊ नयेत, अशीच भूमिका आजवर घेतली गेली आहे. अमेरिकेत जर क्रेडिट युनियन्स उत्तम चालतात, युरोपातील 'राबो बँक' जर उत्तम चालते; तर भारतात रिझर्व्ह बँकेलाही ही काळजी घेणे गरजेचे ठरेल, असे भविष्यात दिसत आहे!

**सहकारी बँकांना भांडवल पुरवठ्याबाबत येणाऱ्या समस्यांचा/आव्हानांचा अभ्यास**

येणाऱ्या काळात रिझर्व्ह बँक, वरील सर्व बाबींकडे कसे पाहते आणि वटहुकुमाने मिळालेले अधिकार कसकसे वापरते, हे पाहावे लागेल. छोट्या छोट्या नागरी सहकारी बँकांना आपल्या कारभारात अधिक व्यावसायिकता आणणे आवश्यक ठरणार आहे; कारण असे न झाल्यास तशा बँकांचे सक्तीने विलीनीकरण अन्य मोठ्या सहकारी बँकेत करण्याचे अधिकार रिझर्व्ह बँकेला या वटहुकुमामुळे मिळाले आहेत. ठेवीदारांच्या ठेवी या सर्वातून अधिक सुरक्षित होतील, हे जरी वास्तव असले, तरीही नागरी बँकांची देशातील संख्या तीन आकडी होण्याची शक्यता माझ्यासारख्या अभ्यासकाला जाणवत आहे. राज्यांच्या अगर भारत सरकारच्या सहकार विभागातील अज्ञानी अधिकाऱ्यांचे अधिकार रिझर्व्ह बँकेसारख्या तज्ज्ञ व मध्यवर्ती नियंत्रकाकडे आले, ही आशादायक घटना आहे, असे मला वाटते; मात्र सहकारी अस्तित्व कायम

राहिले पाहिजे, तरच मध्यम व तळागाळाच्या गरजूंना आपापल्या गरजा सुलभ रीतीने भागविता येतील.

देशातील सर्व नागरी सहकारी बँका आणि बहु-राज्यीय सहकारी (multi-state cooperative) बँका आता भारतीय रिझर्व्ह बँकेच्या निरीक्षणाखाली येतील, अशी घोषणा केंद्र सरकारने गेल्या बुधवारी केली. कायम विविध घोटाळयांमध्ये अडकणाऱ्या या बँकांमधल्या ठेवीदारांच्या ठेवी आता सुरक्षित राहतील, असा थेट संदेश ठेवीदारांना देणारीच ही घोषणा आहे. सरकारी बँका, ज्यात १,४८२ नागरी सहकारी बँका आणि ५८ बहुराज्यीय सहकारी बँका आहेत, त्या सर्व बँकांच्या कारभाराकडे आता रिझर्व्ह बँकेचे लक्ष असणार आहे. तसेच, शेड्युल्ड बँकाप्रमाणेच, याही बँका आता रिझर्व्ह बँकेच्या नियंत्रणाखाली येतील.केंद्रीय मंत्रिमंडळाने घेतलेल्या या निर्णयामुळे, देशातील मध्यवर्ती बँकेला,सहकारी बँकांची परिस्थिती हाताळताना अधिक अधिकार मिळणार आहेत. या सहकारी बँकांची नोंदणी, खरे तर, बँक म्हणून नाही, तर सहकारी पतसंस्था अशी असते. सध्या, नागरी आणि बहुराज्यीय सहकारी बँकांची नोंदणी आणि कार्यान्वियन राज्य सरकारांच्या अधिकार क्षेत्रात येत असून संबंधित राज्यांच्या सहकारी संस्था कायद्यानुसार, त्यांचे व्यवहार होत असतात. या निर्णयामुळे मात्र, या सर्व बँका आता १९४९ च्या बँकिंग नियमन कायद्याअंतर्गत, भारतीय रिझर्व्ह बँकेच्या अधिकारक्षेत्रात आल्या आहेत.

भष्ट्राचार, प्रशासकीय अनागोंदी आणि त्यामुळे निर्माण झालेली मोठी बुडीत मालमत्ता(कर्ज) याच्या एकापाठोपाठ एक येणाऱ्या प्रकरणांमुळे, सहकारी बँकांची एकूणच यंत्रणा खिळखिळी झाली आहे. यातूनच, या बँकेवर रिझर्व्ह बँकेचे संपूर्ण नियंत्रण आणि देखरेख असावी, अशी मागणी पुढे येऊ लागली होती. गेल्या वर्षी, पंजाब आणि महाराष्ट्र सहकारी बँक (PMC) घोटाळा उघडकीस आल्यानंतर तर बँकिंग नियमन कायद्यात सुधारणा करण्याची तीव्र गरज निर्माण झाली होती. सरकारने केलेल्या या सुधारणेमुळे, सहकारी बँकांच्या कामकाजात अधिक कार्यक्षमता वाढेल, अशी अपेक्षा आहे.एका अहवालानुसार, गेल्या पाच आर्थिक वर्षांत, नागरी सहकारी बँकांमध्ये २२० कोटी रुपयांपेक्षा अधिक मूल्याच्या घोटाळयांची सुमारे १ हजार प्रकरणे नोंदली गेली आहेत. रिझर्व्ह बँकेने, माहितीच्या अधिकार कायद्याअंतर्गत, ही माहिती दिली आहे. ३१ मार्च २०१९ च्या आकडेवारीनुसार, देशभरातील १५४४ नागरी सहकारी बँकांमध्ये एकूण ४.८४ लाख कोटी रुपयांच्या ठेवी आहेत.नागरी सहकारी बँका सर्व नियमांचे काटेकोर पालन करतील आणि ठेवीदारांचे पैसे सुरक्षित राहतील, याची खातरजमा करण्यासाठी रिझर्व्ह बँकेने "ऑन साईट आणि ऑफ साईट" म्हणजे प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष देखरेख व्यवस्था लागू केली आहे. याअंतर्गत, नागरी सहकारी बँकांना वेळोवेळी आपली विवरणपत्रे, निवेदन इत्यादी कागदपत्रे रिझर्व्ह बँकेकडे द्यावी लागतील.या निर्णयानंतर, रिझर्व्ह बँकेला, या बँकांमध्ये हस्तक्षेप करण्याचे अधिकार मिळाल्यामुळे, नागरी सहकारी बँकांमध्ये

गेली अनेक वर्षे खोलवर रुजून बसलेल्या गैरव्यवहारांना चाप बसेल आणि व्यवहार सुरळीत होऊन ठेवीदारांच्या ठेवी सुरक्षित राहतील, अशी अपेक्षा आहे. नागरी सहकारी बँकांच्या कामकाजावर कठोर नियंत्रण आणण्याची वेळ आली असून, केंद्र सरकारने याच दिशेने अत्यंत योग्य पाऊल टाकले आहे.मात्र, त्यापुढे जात, यातील काही संदिग्ध बाबी आणखी स्पष्ट होण्याची आवश्यकता आहे. आता जेव्हा रिझर्व्ह बँकेला नागरी सहकारी बँकांवर देखरेख ठेवण्याचे अधिकार मिळाले आहेत, त्यावेळी त्या त्या सबंधित राज्यांमधील सहकार विभागांची भूमिका आणि कार्यक्षेत्र यापुढे काय असेल? नाबार्डमार्फत नियंत्रित केल्या जाणाऱ्या जिल्हा सहकारी बँकांचे भवितव्य काय असेल? त्याशिवाय, ठेवीदारांना हाही विश्वास देणे गरजेचे आहे, की नजिकच्या भविष्यात नागरी सहकारी बँकांचे खासगीकरण केले जाणार नाही.

नागरी बँकांना भेडसावणाऱ्या अडचणींमध्ये मुख्यतः ऋषणता रोखता विषयक जोखीम अपरिहार्य असतात. याशिवाय बदलत्या आर्थिक धोरणांचेही व्यावसायिक परिणाम होत असतात. आर्थिक उदारीकरणाच्या प्रक्रियेमुळे व्य़ाजदर, बाजारपेठ, चलनविषयक जोखीम हाताळाव्या लागतात. याबाबत मार्गदर्शन करण्यासाठी भारतीय रिझर्व्ह बँकेने काही पावले उचलली पाहिजे. त्यात ऋण प्रदान करणे, उत्पन्न स्त्रोत शोधणे, मालमत्तेचे वर्गीकरण करणे, पर्याप्त भांडवल उभारणी तसेच मालमत्ता व देणी यांचे सुयोग्य नियोजन करणे या समावेश होता. तळागाळापर्यंत बँकिंग सेवा पुरविण्याचे नागरी सहकारी बँकिंग क्षेत्राचे महत्त्व अनन्यसाधारण असले तरी त्यांचे बँकिंग क्षेत्रातील अस्तित्व हे त्यांच्या आर्थिक सक्षमतेवरच अवलंबून आहे. त्यांच्या आर्थिक सक्षमतेचे निकष हे रिझर्व्ह बँकेने ठरवून दिल्यासनुसारच असले पाहिजेत, ही वस्तुस्थिती देखील मान्य करावीच लागेल. अन्यथा प्रत्यक्ष मिळालेले उत्पन्नच केवळ हिशेबात घेण्यासंबंधातील अथवा अनुत्पादक कर्जासंबंधीचे निकष अमलात येईपर्यंत कोणतीही नागरी सहकारी बँक अडचणीत आली नव्हती. रिझर्व्ह बँकेने हे निकष लागू केल्यानंतरच सहकारी बँका अडचणीत आल्याचे चित्र दिसू लागल्याने रिझर्व्ह बँकेचे हे निकषच चुकीचे आहे, असे धाडसी विधान कोणी केले तर प्रत्यक्षातील वस्तुस्थिती दर्शवत असल्याने सामन्यांच्या मनामध्ये हा विचार संभ्रम निर्माण करू शकतो हेही मान्य पाहिजे. परंतु मुक्त अर्थव्यवस्थेत आंतरराष्ट्रीय निकष पूर्ण करावयाचे असतील, तर आपल्या व्यवसायात व्यावसायिकता आणणे अत्यंत महत्वाचे आहे.

**निष्कर्ष**

१. सहकारी बँका गामीण भागात परपुरवठा करण्यात यशस्वी ठरल्या आहेत. प्रमाण

२. सहकारी बँकाची शिखर बॅक म्हणुन राज्य सहकारी बँक महत्वपुर्ण भुमिका पार पाडतात.

३ . सहकारी बँकानी योग्य पतपुरवठा केल्याचे दिसुन येते.

४ . मागास व गामीण भागाच्या विकासात महत्वपुर्ण भुमिका सहकारी बँकानी बजावलेली आहे.

५ . सहकारी बँकाचे जाळे अलिकडील काळात विस्तृत झाल्याचे दिसुन येते.

सहकारी चळवळीचा देशाच्या आर्थिक विकासामध्ये महत्वपूर्ण सहभाग आहे. सहकाराच्या माध्यमातून देशाला नवी दिशा मिळाली आहे. सहकार चळवळीत नागरी सहकारी बँकांच्या उल्लेख सन्मानाने केला जातो. सहकार क्षेत्रातील बँकांचे महत्त्व काही वर्षांमध्ये सातत्याने वाढत आहे. एकेकाळी स्थानिक गरज भागविण्यासाठी स्थापन झालेल्या सहकारी बँका आज शहरातील काय जिल्हा, राज्या सीमा ओलांडून दुसऱ्या राज्यामध्ये सहकाराचा संदेश घेऊन पोचल्या आहेत. जनमानसात आपल्या वाटणाऱ्या या सहकारी बँका आधुनिक सोयीद्वारे ग्राहकांना सेवा प्रदान करत आहेत. तसेच निःस्वार्थी वृत्तीने कार्य करणाऱ्या अनेक सामाजिक संस्थांना नेहमीच भरभरून मदत करीत आहे. त्यामुळे सहकारी बँकांची पारदर्शकता व आपुलकीची भावना सर्व समाजाला ज्ञातच आहे. मुक्त आर्थिक धोरणांमुळे खासगी व व्यापाऱ्या बँका मोठ्या प्रमाणावर सुरू झाल्या आहेत. या बँकांच्या स्पर्धा नागरी सहकारी बँकांना शहरी भागात तरी निश्चितपणे जाणवू लागल्या आहेत. खासगी व विदेशी बँकांनी फक्त शहरी भागाकडे लक्ष केंद्रीत केले आहे. या स्पर्धेत ठामपणे उभे राहण्याची मानसिकता नागरी बँकांना गरजेची झाली आहे. अशा परिस्थितीत दुहेरी नियंत्रणाच्या कात्रीत सापडलेल्या व सर्वसामान्य नागरिकांच्या अडीअडचणी जाणून जनमानसात विश्वासार्हता व उत्तम ग्राहकसेवा या बळावर नागरी बँका आपले स्वतंत्र्य अस्तित्व टिकवून आहेत. या सर्व नागरी बँकांच्या स्थित्यंतरात आज या बँकांची नेमकी स्थिती काय याचाही विचार करण्याबरोबरच या स्थितीगतीचे नेमके विचारमंथन होणेही गरजेचे आहे.

**संदर्भग्रंथ :**

१.पा. राहूल वाघमारे-भारतीय अर्थव्यवस्था . युनिव्हर्सल टारगेट पुणे, नोव्हें . २०१३

२.कृषी अर्थशास्त्र-डॉ. निता वाणी.प्रशांत पब्लिकेशन,२०१२

3. प्रा. शशिकांत हरि अटावलकर भारतीय अर्थव्यवस्था - शेठ पब्लिकेशन (२००९-१0)

४. डॉ. महादेव श्रीरंग देशमुख डॉ. सोमनाथ सर्जेराव विभूत समग्रलक्षी अर्थशास्त्र शेठ प्रकाशन जानेवारी -२०१३

५. https://www.rbi.org.in/

६. https://sahakarayukta.maharashtra.gov.in/

'Journal of Research & Development' A Multidisciplinary International Level Referred and Peer Reviewed Journal, Impact Factor-7.265, ISSN: 2230-9578, 30 October2021, Volume-12, Issue-15
Agriculture and Rural Development: Strategic Issues and Reform Options

# कृषि क्षेत्रातील यशस्वी उपक्रमांचे सार्वत्रिकीकरण काळाची गरज

**अंकुश तुकाराम करपे**

अर्थशास्त्र विभाग, यशवंतराव चव्हाण महाविद्यालय, करमाळा, जि. सोलापूर.

**गोषवारा:-**

भारतीय अर्थव्यवस्थेच्या सर्वांगिण आर्थिक विकासामध्ये कृषि,उद्योग व सेवा क्षेत्राचे योगदान महत्त्वपूर्ण आहे. यामध्ये कृषि क्षेत्राचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. कारण कृषिवरच उद्योग व सेवा क्षेत्राचा विकास अवलंबून आहे. म्हणून कृषि हा राष्ट्रीय उद्योग मानला जातो. या कृषिक्षेत्रात आपणास विरोधाभास पहावयास मिळतो. एकीकडे कृषिप्रधान देश असे आपण म्हणतो. तर दुसरीकरडे या कृषिक्षेत्राचा म्हणावा तेवढा विकास झालेला दिसून येत नाही. याची अनेक कारणे असतील पण यापैकी कृषि क्षेत्रातील नाविन्यपूर्ण यशस्वी उपक्रमांचे सार्वत्रिकीकरण फारशे होत नाही. हे महत्त्वाचे कारण आहे. उद्योग व सेवा क्षेत्रात मात्र नाविन्यपूर्ण उपक्रमांचे सार्वत्रिकीकरण लवकर घडून येते. त्यामुळे त्या क्षेत्रांचा विकास मोठ्या प्रमाणावर होताना दिसून येतो. तेव्हा यावर उपाय म्हणून भाजीपाला थेट विक्रीचे मॉडेल, आदिवासी शेतकऱ्यांचा सेंद्रीय शेतीचा राजमार्ग, बांबू उद्योगातील अश्वासक वाटचाल, आदर्श शेतकरी स्वयंसहायता गट व दुधाचे ए.टी.एम. अशा विविध यशस्वी झालेल्या नाविण्यपूर्ण उपक्रमांचे सार्वत्रिकीकरण झाल्यास कृषिक्षेत्र व शेतकरी यांचा विकास मोठ्या प्रमाणावर घडून येईल. ही काळाची गरज आहे.

**बीजसंज्ञा :-** अर्थव्यवस्था, कृषिक्षेत्र, उपक्रम, नाविन्यपूर्ण, सार्वत्रिकीकरण, शेतमाल इ.

**प्रस्तावना :-**

२१ व्या शतकातील भारतामध्ये शेती हा अर्थव्यवस्थेचा कणा असलेला दिसून येतो. मात्र ही शेती मागासलेली आहे. याचा अर्थ शेती हे आपले भूषण पण आहे. आणि ती मागास पण आहे. तेव्हा कृषी हे आपले बलस्थान विकसित केल्याशिवाय अर्थव्यवस्थेचा सर्वांगिण विकास होणार नाही. कृषि क्षेत्राचा विकास करावयाचा असेल तर नवीन संशोधन, आधुनिक उत्पादन पध्दती, विक्री व्यवस्था, नवीन तंत्रज्ञान, आधुनिक शेती औजारे, विविध पिके, फळे, भाजीपाला, यांच्या भरघोस उत्पादन देणाऱ्या सुधारीत जाती यांचा प्रसार सर्व सामान्य शेतकऱ्यांपर्यंत होणे गरजेचे आहे. आज आपण पहातो की, प्रत्येक खेड्यात अगदी बोटावर मोजण्याइतकेच शेतकरी वरील सर्व बाबींचा वापर करुन उत्पादन घेतात. मात्र ८० ते ९० टक्केपेक्षा अधिक शेतकरी यापासून दूरच असतात. तेव्हा विविध आधुनिक शेती तंत्रज्ञानाचा वापर करणाऱ्या शेतकऱ्यांची संख्या मोठ्या प्रमाणावर वाढविणे हे आपणासमोरचे आजचे आव्हान आहे.

प्रयोगशील शेतकऱ्यांचे यशस्वी झालेले नाविन्यपूर्ण उपक्रम हे सर्व शेतकऱ्यांपर्यंत पोहचले पाहिजेत, त्यांचे सार्वत्रिकीकरण झाले पाहिजे तरच २१ व्या शतकातील भारतीय कृषि क्षेत्राचा सर्व समावेशक विकास घडून येईल. या शोधनिबंधामध्ये अशाच काही नाविण्यपूर्ण यशस्वी उपक्रमांचा विचार केला आहे.

**उद्दिष्ट्ये :-** प्रस्तुत शोधनिबंधाची खालील उद्दिष्ट्ये आहेत.

१) कृषी क्षेत्रातील यशस्वी उपक्रमांचा अभ्यास करणे.

२) कृषी क्षेत्राच्या विकासासाठी नाविण्यपूर्ण उपक्रम सूचविणे.

**संशोधन पध्दती :-** प्रस्तुत शोधनिबंध दुय्यम साधनसामुग्रीवर आधारीत आहे. यामध्ये संदर्भ ग्रंथ, विविध मासिके, नियतकालिके, वर्तमानपत्रे व वेबसाईट यांचा वापर केला आहे.

**कृषी क्षेत्रातील यशस्वी नाविण्यपूर्ण उपक्रम :-** सार्वत्रिकीकरणाच्या दृष्टीने उपयुक्त असणारे नाविण्यपूर्ण उपक्रम खालीलप्रमाणे सांगता येतील.

**भाजीपाल्याच्या थेट विक्रीचे मॉडेल :-**

पारंपारिक पिकांना फाटा देऊन परदेशी भाजीपाल्याचे उत्पादन घेण्याचा आणि विक्रीच्या व्यवस्थेसाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करण्याचा प्रयोग 'इंद्रायणी कृषि सेवा मंडळ' चऱ्होली ता. खेड, जि. पुणे येथील शेतकरी गटाने केला आहे. शेतमालाची प्रतवारी, पॅकिंग, साठवणूकीसाठी कोल्ड स्टोरेज आणि डिजीटल व थेट विक्री त्यांनी केली. शेतमाल विक्रीच्या पारांपारिक व्यवस्थेत न आडकता थेट विक्रीचा पर्याय स्वीकारला. इंद्रायणी कृषि सेवा मंडळ या शेतकरी गटाने शेतमाल विक्रीतून जवळपास दोन लाख ग्राहकांना ही सेवा देऊन हा पथदर्शी उपक्रम यशस्वी करुन दाखविला आहे. यामुळेच जूलै-२०१८ मध्ये या मंडळास 'मॉडर्न फार्मर पुरस्कार' मा. नरेंद्र मोदींच्या हस्ते देऊन गौरविण्यात आले.

कृषी सेवा मंडळ गटाच्या माध्यमातून ब्रोकोली, आईसबर्ग, रोमन लेट्युस, चैना कॅबेज, रेड कॅबेज, लोला रोसा, केल, सिमसम लेट्युस, रेड लेट्युस , सेलरी, पर्सली, थाईम, रोजमेरी, थाय ब्रिंजल, झुकीनी, थायचिली, गलंगल, सेज, बेसिल, काफेरलाईन, लीक, चेरी टोमॅटो, बेबीकॉन, बेबी पोटॅटो, चाऊस, फेनेल, ईडेबल फ्लावर, ब्लॅक कॅरेट, मशरुम अशा परदेशी भाजीपाला पीकांचे उत्पादन घेतले जाते. ते पुणे, मुंबईसह इतर राज्यातही थेट विक्रीसाठी पाठविले जाते. याशविाय ग्राहकांना ऑनलाईन ऑर्डरद्वारे ही घरबसल्या भाजीपाला पुरविला जातो.

**आदिवासी शेतकऱ्यांचा सेंद्रिय शेतीचा उपक्रम :-**

विक्रमगड तालुक्यातील आदिवासी शेतकऱ्यांनी गेल्या बारा-तेरा वर्षात स्वकष्टातून सेंद्रिय शेतीचा उपक्रम राबविला आहे. बाजारातील गरजेनुसार वेळोवेळी विक्री तंत्रात बदल करत त्यांनी व्यावसायिक मॉडेल विकसित केले आहे. सोबतच या आदिवासी शेतकऱ्यांचे आरोग्य आणि राहणीमान कैकपटीने सुधारले आहे. रसायन विरहित सेंद्रिय शेतीची कास धरल्यामुळे उत्पादीत फळे, भाजीपाला यांना मुंबईतील बाजारपेठ उपलब्ध झाली. व त्याला दर ही चांगला मिळाला. हरी-भरी टोकरी या संकल्पनेच्या माध्यामतून मुंबईतील असंख्य ग्राहक जोडले गेले.

घरीच सेंद्रिय खते बनविल्यामुळे उत्पादन खर्च कमी होऊन शेतकऱ्यांच्या उत्पन्नात वाढ झाली. तसेच जमिनीचा पोत ही सुधारला आहे. शिवाय उत्पादीत सेंद्रिय शेतमाल घरी खाल्याने कुटूंबाचे आरोग्य सुधारले आहे. त्यांचे आजारी पडण्याचे प्रमाण कमी झाले आहे.

**बांबू उद्योगातील आश्र्वासक वाटचालः-**

पुणे येथील संगणक अभियंता असलेल्या योगेश शिंदे यांनी नोकरी सोडुन बांबू शेती आणि बांबुपासून विविध उत्पादने विकसित करण्याच्या क्षेत्रात मोठी झेप घेतली आहे. बांबू इंडिया कंपनीच्या माध्यमातून त्यांनी पुणे जिल्ह्यातील डिर्डोशी, भोर, वेल्हे या भागातील सुमारे दोनशे बांबू उत्पादक शेतकऱ्यांना जोडून घेतले आहे. बांबू हे तसे बांधावरचे दुर्लक्षित पीक परंतू गेल्या काही वर्षात पेपरमिल, जैवइंधन निर्मिती आणि पर्यावरणपूरक बांधकामामध्ये बांबूचे महत्त्व वाढू लागले आहे. जगभरात बांबूपासून पंधराशेहून अधिक उत्पादने तयार होतात. त्यामध्ये आधुनिक

फर्निचर, घर सुशोभीकरण साहित्य, ज्वेलरी, घड्याळ, सायकल, शोभेच्या वस्तू यांचा समावेश आहे. गेल्या दोन वर्षात महाराष्ट्राच्या बरोबरीने आसाम, सिक्कीम नागालँड, मध्यप्रदेशातील पंधराशेहून अधिक बांबू उत्पादक शेतकरी यांच्याबरोबर टाय-अप करुन घेतला आहे. बांबू इंडिया कंपनी आसाम सरकार, मध्यप्रदेश सरकार, राष्ट्रीय बांबू मिशन, महाराष्ट्र बांबू बोर्ड यांच्या बरोबर काम करते. तसेच ३० उद्योजक यांच्याशी जोडलेले आहेत. शिंदे यांच्या यशस्वी कामगिरीची वाटचाल लक्षात घेऊन शेतीपूरक उद्योगातील स्टार्ट अपसाठी 'इनोव्हेटीव्ह स्टार्ट अप' पुरस्काराने इ.सन. २०१९ मध्ये सन्मानित करण्यात आले. इ.सन. २०२२ पर्यंत कंपनीची उलाढाल शंभर कोटीपर्यंत वाढवण्याचा मानस आहे. बांबू उद्योग विकासासाठी शेतकरी, कारागीर प्रशक्षिण, शालेय प्रदर्शन, उत्पादनांचा प्रसार, समाजमाध्यमाचा वापर केला जातो. आज बांबू इंडिया कंपनीच्या माध्यमातून देशांतर्गत बाजारपेठेसोबतच जगातील १८ देशांमध्ये बांबू उत्पादनांची विक्री केली जाते.

**आदर्श शेतकरी स्वयंसहायता गट :-**

शेतकऱ्यांना पिकवता येत, पण विकता येत नाही. असं म्हटलं जातं. शेतमाल विक्रीसाठी त्यांना संपूर्णपणे मध्यस्थ्यांच्या भल्यामोठ्या साखळीवर अवलंबून राहावे लागते. शेतात दिवसरात्र मेहनत करुन ही शेतऱ्यांच्या वाट्याला जेवढा मोबदला येतो. त्याच्या किती तरी पट अधिक परतावा कमी श्रमात, कमी कालावधीत मध्यस्थांची साखळी कमावते. दुर्गम भागात तर शेतकऱ्यांची स्थिती अधिकच दयनीय होते. व्यापारी देईल त्या भावाला शेतमाल विकल्याशिवाय पर्याय नसतो. विदर्भातील अकोला जिल्ह्यातील सुकळी गावातील तरुण शेतकऱ्यांनी या सर्व अडचणींवर उपाय शोधला आहे. इ.स. २०१२ पासून 'आदर्श शेतकरी स्वयंसहायता गटाद्वारे' हे काम केले जात आहे. सुरुवातीला या गटाद्वारे १०० एकर क्षेत्रातील गव्हाचे उत्पादन थेट ग्राहकांना विकले गेले. यासाठी कुठलीही आडत, हमाली, मोजाई शेतकऱ्यांकडून घेतली नाही. अलिकडील काळात या गटाने अकोला शहरात अॅग्रोमॉल उभारला असून त्याद्वारे सर्व प्रकारचे धान्य, फळे, भाजीपाला, डाळी, दूध, दुग्धजन्य पदार्थ यांची विक्री केली जाते. धान्य प्रक्रिया व प्रतवारी केंद्राद्वारे धान्याची प्रतवारी व प्रमाणीकरण करुन ग्राहकांना चांगला व दर्जेदार शेतमाल रास्त दरात विकला जातो. यामुळे ग्राहकांचा फायदा होतो. शिवाय थेट विक्री केल्यामुळे मध्यस्थांची साखळी तुटून शेतकऱ्यांनाही चांगला मोबदला मिळतो.

**दुधाचे ए.टी.एम. :-**

बँक ए.टी.एम. मधून २४ तास पैसे मिळू शकतात, तर मग दूध का नाही? ही संकल्पना समोर ठेवत सिन्नर तालुका विभागीय सहकारी दूध उत्पादक व प्रक्रिया संघाने जानेवारी - २०१८ मध्ये राज्यातील पहिले वातानुकूलित 'दूध ए.टी.एम.' नाशिकमध्ये सुरु केले. स्वच्छता, पारदर्शकता, व्यवहार्यता यामुळे या उपक्रमाला ग्राहकांची चांगली पसंती देखील मिळाली. त्यामुळे डेअरी उद्योगात नव्या प्रयोगाला सुरुवात झाली. या यंत्रणेद्वारे ग्राहकांना जर्सी गाईचे, म्हशीचे आणि साहिवाल, गीर गाईचे दूध तीन स्वतंत्र दूध ए.टी.एम. द्वारे २४ तास, निर्भेसळ व गुणवत्तापूर्ण दूध उपलब्ध करुन दिले जाते. ए.टी.एम. यंत्रणेत २४ तासानंतर नवीन दुधाचे पुनर्भरण केले जाते. दूध उत्पादक शेतकऱ्यांना दूध गुणवत्ता तपासणीनुसार भाव दिला जातो. स्वयंचलित यंत्रणेच्या माध्यमातून दूध संकलन केले जाते. मध्यस्थांची साखळी तोडून दूध उत्पादक

ते दूध संघ असा थेट व्यवहार केला जातो. यामुळे दूध उत्पादक व ग्राहक दोघांचाही फायदा होतो. दूध वितरणासाठी मनुष्य बळात बचत झाली असून दूध विक्रीत पारदर्शकता आली आहे. म्हणूनच ग्राहक व दूध उत्पादक यांच्या मनामध्ये विश्वास निर्माण झाला आहे.

अशा प्रकारे कृषि क्षेत्रात अनेक नाविन्यपूर्ण उपक्रम यशस्वीपणे राबविले जातात. अशा उपक्रमांचे सार्वत्रिकीकरण झाले पाहिजे. म्हणजेच ते उपक्रम सर्व शेतकऱ्यांनी अनुसरणे ही आजच्या काळाची गरज आहे. त्यामुळे कृषी क्षेत्राचा विकास होण्यास मोठी मदत होईल.

**निष्कर्ष :-**

१) इंद्रायणी कृषी सेवा मंडळ पुणे या शेतकरी गटाने शेतमाल विक्रीच्या पारंपारिक व्यवस्थेत न आडकता थेट शेतमाल विक्रीचा मार्ग अवलंबून शेतकरी वर्गापुढे एक आदर्श निर्माण केला आहे. या मंडळाद्वारे शेतमालाची प्रतवारी, ग्रेडींग, पॅकींग, साठवणूक व थेट विक्री केली जाते. तसेच परदेशी भाजीपाल्याचे उत्पादन घेऊन पुणे, मुंबई सह इतर राज्यातही त्याची थेट विक्री केली जाते. शिवाय ऑनलाईन आर्डरद्वारे ही ग्राहकांना घरपोच भाजीपाला पुरविला जातो.

२) विक्रमगड तालुक्यातील आदिवासी शेतकऱ्यांनी राबविलेला सेंद्रिय शेतीचा उपक्रम नाविन्यपूर्ण आहे. यामुळे शेतीचा रासायनिक खतावरील होणारा भरमसाठ खर्च तर कमी झालाच आहे. सोबतच जमिनीचा पोतही सुधारला आहे. तसेच आदिवासी शेतकऱ्यांचे आरोग्य आणि राहणीमान मोठ्या प्रमाणात सुधारले आहे. हरी-भरी टोकरी या उपक्रमाद्वारे मुंबईतील ग्राहकांनाही सेंद्रिय भाजीपाला व फळे उपलब्ध झाले आहेत.

३) बांबू इंडिया कंपनीने राबविलेल्या आगळया वेगळया उपक्रमामुळे बांबू उत्पादक शेतकऱ्यांना बांबू उत्पादन वाढविण्यास चालना मिळाली आहे. बांबू पासून जगभरात पंधराशेहून अधिक उत्पादने तयार केली जातात. बाबूं इंडिया कंपनीने देशांतर्गत बाजारपेठेसोबतच जागतिक बाजारपेठ काबीज केली आहे. बांबूपासून पर्यावरणपूरक विविध वस्तू निर्माण होत असल्याने पर्यावरण संवर्धनालाही चालना मिळत आहे.

४) शेतकऱ्यांना पिकवता येतं पण विकता येत नाही, हा प्रश्न सोडविण्यासाठीचा प्रामाणिक प्रयत्न 'शेतकरी स्वयंसहायता गटाने' केला आहे. या गटाने सर्व प्रकारची धान्ये, भाजीपाला, दूध, फळे, डाळी व दुग्धजन्य पदार्थ थेट ग्राहकांना विकण्याचा नाविण्यपूर्ण उपक्रम यशस्वीपणे राबविला आहे. या उपक्रमामुळे मध्यस्थांची साखळी तुटली व शेतकरी आणि ग्राहक या दोघांचाही फायदा झाला आहे. त्यांनी शहरात राबविलेली ॲग्रोमॉलची संकल्पना ही स्तुत्य आहे.

५) सिन्नर तालुका सहकारी दूध उत्पादक व प्रक्रिया संघाने दुधाचे ए.टी.एम. हा पथदर्शी उपक्रम यशस्वीपणे राबविला आहे. त्यामुळे दूध उत्पादक शेतकऱ्यांना मोठा फायदा झाला आहे. तसेच ग्राहकांनाही निर्भेसळ, स्वच्छ, दूध आपल्या गरजेनुसार २४ तास उपलब्ध झाले आहे. यामुळे दूध वितरणासाठीच्या मनुष्यबळात मोठी बचत झाली आहे.

**शिफारशी :-**

कृषिप्रधान असणाऱ्या आपल्या देशात व राज्यात कृषी क्षेत्राचा सर्वांगिण विकास घडवून आणावयाचा असेल तर शेतीतील यशस्वी नाविण्यपूर्ण उपक्रमांचे सार्वत्रिकीकरण होणे ही काळाची गरज आहे. इंद्रायणी कृषी सेवा मंडळाने राबविलेला थेट शेतमाल विक्रीचा उपक्रम व विदेशी भाजीपाला उत्पादनाचा उपक्रम सर्व शेतकऱ्यांनी अनुसरला पाहिजे. जेणेकरुन बाजारपेठेच्या अनेक नवीन संधी निर्माण होतील. तसेच आदिवासी शेतकऱ्यांचा सेंद्रिय शेतीचा उपक्रम सर्व शेतकऱ्यांनी आत्मसात केला पाहिजे. जेणकरुन विषयुक्त अन्नाची निर्मिती थांबेल. लोकांचे आरोग्य व

राहणीमान सुधारेल. शिवाय रासायनिक खतावरील खर्च मोठ्या प्रमाणात कमी होईल. सेंद्रिय शेतमालाला भावही अधिक मिळून शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती सुधारेल. या शिवाय बांबू इंडिया कंपनीने राबविलेला बांबू उत्पादनाचा अनोखा उपक्रम मोठ्या प्रमाणात अनेक शेतकऱ्यांनी राबविला पाहिजे. ज्यामुळे शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती तर सुधारेलच पण त्याबरोबरच पर्यावरणपूरक अनेक वस्तू ग्राहकांना मोठ्या प्रमाणावर उपलब्ध होतील. शेतकऱ्यांना पिकवता येत, पण विकता येत नाही. यावर उपाय म्हणून 'शेतकरी स्वयंसहायता गटाने' राबविलेला ॲग्रोमॉलचा पथदर्शी उपक्रम सर्व शेतकऱ्यांनी राबविला पाहिजे. जेणेकरुन सर्व प्रकारची धान्य, भाजीपाला, फळे, डाळी, दूध, दुग्धजन्य पदार्थ यांची शहरात थेट विक्री होईल. यामुळे शेतकरी व ग्राहक या दोघांचाही फायदा होईल. परिणामी मध्यस्थांची साखळी तुटेल. तसेच सिन्नर तालूका दूध उत्पादक व प्रक्रिया संघाने राबविलेला 'दुधाचे ए.टी.एम.' हा नाविण्यपूर्ण उपक्रम राज्यातील अनेक सहकारी व खाजगी दूध संघानी अनुसरला पाहिजे. जेणेकरुन दूध उत्पादक शेतकरी वर्गाला दुधाचा योग्य दर मिळेल व ग्राहकांनाही निर्भेसळ, स्वच्छ, ताजे दूध २४ तास उपलब्ध होईल.

**सारांश :-**

कृषिप्रधान असणाऱ्या भारतीय अर्थव्यवस्थेत कृषिक्षेत्र हे मागासलेले दिसून येते. याची अनेक कारणे असली तरी त्यापैकी कृषिक्षेत्रातील यशस्वी नाविण्यपूर्ण उपक्रमांचे सार्वत्रिकीकरण न होणे हे एक महत्त्वाचे कारण आहे. त्यामुळे जे प्रयोगशील शेतकरी आहेत. त्यांचे यशस्वी झालेले नाविण्यपूर्ण उपक्रम हे सर्व शेतकऱ्यांपर्यंत पोहचले पाहिजेत. म्हणजेच त्यांचे सार्वत्रिकीकरण झाले. तरच कृषिक्षेत्राचा विकास मोठ्या प्रमाणावर घडून येईल. पर्यायाने शेतकऱ्यांचाही आर्थिक विकास साध्य होईल.

**संदर्भ :-**

१) रायखेलकर व दामजी (२०१२), भारतीय अर्थव्यवस्था, विद्या बुक्स पब्लिशर्स औरंगपूरा, औरंगाबाद.
२) बिराजदार माधव ( २०१२) , महाराष्ट्राची अर्थव्यवस्था, विद्या बुक्स पब्लिशर्स औरंगपूरा, औरंगाबाद.
३) ॲग्रोवन (२०१९), दिवाळी अंक, सकाळ मिडिया प्रा. लि. बुधवार पेठ, पुणे.
४) योजना. (एप्रिल - २०१६), केंद्रीय सदन, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई.
५) उद्योजक (एप्रिल-२०२१), महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्र. औरंगाबाद. VOLXXXI, ISSUE IV,
६) www.agrowon.com

# "जालना जिल्ह्यातील शेती व्यवसायावर झालेला आतिवृष्टीचा परिणाम - एक भौगोलिक अभ्यास"

**प्रा. डॉ. भाऊसाहेब सोनाजी देवकर[1], प्रा. डॉ. सर्जेराव ताठे[2]**

[1]संत रामदास महाविद्यालय घनसावंगी, ता.घनसावंगी. जिल्हा.जालना

Email- bhausdevkar@gmail.com

[2]भूगोल विभाग प्रमुख, संत रामदास महाविद्यालय घनसावंगी, जिल्हा. जालना.

Email- tathe.sarjerao@gmail.com

**सारांश (Abstract) :**

जालना जिल्ह्यातील शेती व शेतकरी नैसर्गिक तथा अस्मानी संकटाच्या कचाट्यात शेती व्यवसाय सापडल्यामुळे शेतातील बी-बियाणे, खते, औषधींवर झालेला खर्चही वसूल होईना, तर दुसरीकडे कर्जाऊं रकमेवरील व्याजाचा डोंगर वाढतच चालला आहे. यामुळे नैराश्य आलेले शेतकरी आत्महत्ये सारखी पावले उचलत असून मागील दहा महिन्यांत अशा ६६ घटना घडल्या. यातील ५७ प्रकरणांत आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबातील वारसांना प्रत्येकी एक लाखाची मदत देण्यात आली तर २ प्रकरणे मदतीसाठी अपात्र ठरली. दरम्यान, उर्वरित सात प्रकरणे येत्या २५ ऑक्टोबर रोजी जिल्हाधिकारी कार्यालयात होणाऱ्या बैठकीत ठेवली जाणार आहेत. या मदतीमुळे काहीसा दिलासा मिळत असला तरी घरातील कर्ता माणूस गेल्यामुळे कुटुंबीय उघड्यावर येत आहे.

मागील वर्षी कोरोनामुळे सरकारने लॉकडाऊन घोषित केल्यामुळे रब्बीतील शेतमाल विक्रीवर निर्बंध आले. यामुळे शेतकऱ्यांना शेतमाल बेभाव विकावा लागला तर भाजीपाला, फळभाज्या अक्षरश: रस्त्यावर फेकून द्याव्या लागल्या. ऑक्टोबरमध्ये परतीच्या पावसाने थैमान घातल्याने उभ्या पिकांची नासाडी झाली. चालू वर्षात जानेवारी-फेब्रुवारी महिन्यातील बेमोसमी पाऊस व गारपिटीने रब्बीचे पीकही हातचे गेले. दरम्यान, जुलै, ऑगस्टमध्ये चांगला पाऊस झाला. यामुळे पिके चांगली जोमदार आलेली असताना अतिवृष्टीने कहर केल्याने हातातोंडाशी आलेला घास हिरावला गेला. तर यातून बचावलेल्या पिकांना सप्टेंबर-ऑक्टोबरमध्ये पावसाने पुन्हा 'गाठले. यामुळे सोंगणीला आलेले सोयाबीनही मातीत गेले. अशाप्रकारे दोन वर्षांतील तिन्ही हंगाम वाया गेल्यामुळे लावलेला खर्चही वसूल झाला नाही, दुसरीकडे कर्जाची रक्कम वाढत पुरु गेली. यामुळे नैराश्यातून ६६ शेतकऱ्यांनी मृत्यूला कवटाळले, यातही सर्वाधिक प्रकरणे भोकरदन तालुक्यात घडली.

**बीजसंज्ञा (Keywords):** शेतात बी-बियाणे, खते, औषधींसह मशागत,गारपीट, अतिवृष्टी, पुरामुळे, खासगी कर्ज, विम्याचे संरक्षण, शेतमालास हमीभाव,पिकांची नासाडी,दुहेरी संकट, रब्बीचे क्षेत्र ,उपाय योजना॰

**प्रस्तावना(Introduction) :**

जालना जिल्ह्यात जून ते सप्टेंबर दरम्यान अतिवृष्टी, ढगफुटी व पुराने थैमान घालून जिल्ह्यातील सव्वापाच लाख हेक्टरवरील पिके पाण्याखाली गेली. शेतजमिनीही खरडून गेल्या. अनेक शेतकरी, कष्टकऱ्यांसह मुक्या प्राण्यांनाही जिवाला मुकावे लागले. यातून काहीशे सावरत असतानाच बेमोसमी मान्सूनने जोरदार हजेरी लावली.यामुळे अतिवृष्टीतून वाचलेल्या सोयाबीनची सोंगणी, काढणी खोळंबली लांबणीवर पडल्या आहेत.जालना शहरासह जिल्ह्यात ठिकठिकाणी पाऊस झाल्यामुळे सखल भागात पाणी साचले. अगोदरच शेतात ओल असल्यामुळे पाणी जिरण्यास वाव नाही, यामुळे काही ठिकाणी पाणी वाहू लागले होते. परिणामी नदी, नाले, ओढ्यांनाही पाणी आले होते. काही दिवस पावसाने विश्रांती घेतल्यामुळे शेतकरी सोयाबीनच्या सोंगणी, काढणीसह रब्बी पेरणीसाठी शेतजमीन तयार करण्यात गुंतले मात्र, पावसाने पुन्हा दाणादाण करून टाकली असून सोंगून ठेवलेले सोयाबीन ओले झाल्याने कोंब फुटण्याची शक्यता निर्माण झाली होती. तर काही ठिकाणी सोयाबीन पाण्याखाली गेले आहे. दरम्यान, ढगाळ वातावरण व हवामान खात्याचा अंदाज लक्षात घेऊन काही शेतकऱ्यांनी सोंगणी अन् काढणी ताबडतोब करून घेतली व निघालेले सोयाबीन मोंढ्यात बेभाव विकूनही टाकले. काही शेतकऱ्यांनी सोयाबीनच्या गंजी ताडपत्री, प्लास्टिकने झाकून ठेवल्या तर काहींनी घराजवळ पत्र्याच्या छत करून त्याखाली स् सोयाबीन आणून ठेवले आहे. चिखल-मातीतून कसेबसे सोंगून ठेवलेले तर कुठे सोंगणीला आलेले सोयाबीन पाहून शेतकऱ्यांच्या डोळयात पाणी आले आहे. एकीकडे निसर्ग कोपल्याने पिकांची नासाडी झाली तर दुसरीकडे बाजारात भाव नाही, या दुहेरी संकटात शेतकरी सापडले आहेत. रब्बीचे क्षेत्र वाढण्याची

**अभ्यास क्षेत्र (Study Area) :**

प्रस्तुत शोधनिबंधाच्या अभ्यासा करिता अभ्यास क्षेत्र म्हणून संपूर्ण जालना जिल्ह्यातील शेती व्यवसायाचा व जून ते सप्टेंबरद रम्यान अतिवृष्टी, ढगफुटी व पुराने थैमान घालून जिल्ह्यातील अतिवृष्टी ग्रस्त भागाचा विचार करण्यात आलेला आहे. २०११ च्या जनगणने नुसार जालना जिल्ह्याचे क्षेत्रफळ ७६८७.३९ चौरस किलोमीटर आहे. जालना जिल्ह्यातील एकूण तालुके आठ आसून यामध्ये

भोकरदन,जाफ्राबाद,जालना,बदनापूर,अंबड,घनसावंगी,परतूर व मंठा हे आहेत. जालना जिल्हा मराठवाडा विभागातील, महाराष्ट्र राज्याच्या मध्य भागात आहे. हे १९⁰-१५' ते २०⁰-३२' उत्तर अक्षांश आणि ७५⁰-३६' ते ७६⁰-४५' पूर्व रेखांश दरम्यान स्थित आहे. महाराष्ट्र राज्याच्या ०२.५०% क्षेत्रफळ जालना जिल्ह्याचे आहे.

**संशोधनाची उद्दिष्टे (Objectives) :**

1. जालना जिल्ह्यातील शेती व्यवसायावर झालेला अतिवृष्टीचा परिणाम – यांचा अभ्यास करणे.

2. प्रस्तुत शोध निंबाधत गारपीट, अतिवृष्टी, पुरामुळे पिके वाया गेली तसेच खासगी व बँकांकडून घेतलेले कर्ज फिटत नाही, कुटुंबाचा सांभाळ या समस्यांचा अभ्यास करणे.
3. शेतात बी-बियाणे, खते, औषधींसह मशागतीसाठी मोठा खर्च येतो .सातत्याने मागणी करूनही बँका वेळेवर पीक कर्ज देत नाही, यामुळे शेतकऱ्यांना नाइलाजास्तव सावकाराकडून चढ्या व्याजदराने कर्ज घ्यावे लागते. या समस्यांचा अभ्यास करणे.
4. जिल्ह्यात १ जून ते १२ ऑक्टोबरपर्यंत अतिवृष्टी, पुरामुळे ५ लाख १६ हजार १७४ हेक्टर खरीप पिके वाया गेली .झाले शेतकरी बाधित ४४ हजार ७९ लाख ५ यामुळे .या समस्यांचा अभ्यास करणे.

**गृहितके (**Hypothesis**)** :

1. खरिपानंतर रब्बीची आशा मात्र बेमोसमी पाऊस यामुळे यंदा जून ते सप्टेंबरपर्यंत झालेल्या अति पावसामुळे ५ लाख १६ हजार हेक्टरवरील खरिपाचे नुकसान झाले .
2. गारपीट, अतिवृष्टी, पुरामुळे पिके वाया गेली असल्याने खर्चही वसूल होत नाही .तर दुसरीकडे खासगी व बँकांकडून घेतलेले कर्ज फिटत नाही, यातच कुटुंबाचा सांभाळ करण्याची जबाबदारी .या विवंचनेतून शेतकरी आत्महत्या करत असल्याचे तपासातून पुढे आले.
3. पुरामुळे ५४५ हेक्टरवरील शेतजमीनही वाहून गेली असून तलाव फुटून २२२ हेक्टर क्षेत्र बाधित झाले .यामुळे ५ लाख ७९ हजार ४४ शेतकरी बाधित झाले .दरम्यान, १३ ऑक्टोबर रोजी राज्यातील बाधित शेतकऱ्यांसाठी सरकारने दहा हजार कोटींचे पॅकेज जाहीर केले अस तरी ही मदत अद्याप हाती पडलेली नाही.
4. अशा बिकट परिस्थितीतही शेतकरी रब्बी हंगामाकडे आशेने पाहत आहे .ऑक्टोबर महिना रब्बी पेरणीचा मात्र, बेमोसमीने दणका दिल्यामुळे या पेरण्याही लांबणीवर पडल्या आहेत.

**माहिती स्त्रोत व संशोधन पद्धती (Research Methodology) :**

प्रस्तुत शोध निंबाधत जालना जिल्ह्यातील शेती व्यवसायावर झालेला अतिवृष्टीचा परिणाम – यांचा अभ्यास करणे. गारपीट, अतिवृष्टी, पुरामुळे पिके वाया गेली असल्याने खर्चही वसूल होत नाही. तर दुसरीकडे खासगी व बँकांकडून घेतलेले कर्ज फिटत नाही, यातच कुटुंबाचा सांभाळ करण्याची जबाबदारी. या विवंचनेतून शेतकरी आत्महत्या करत असल्याचे तपासातून पुढे आले. या शोधनिबंधाच्या अभ्यासा करिता प्राथमिक व दुय्यम साधन सामग्रीवर आधारित माहिती संकलित केलेली आहे. दुय्यम साधन सामग्री, प्रकाशित जनगणना अहवाल, संदर्भ पुस्तके, विविध लेख, नियतकालिके व दर्जेदार मासिकात प्रसिद्ध झालेले लेख.वार्षिक शासकीय अहवाल, वेब जाळे (संकेत स्थल) इत्यादींचा संदर्भ साहित्य म्हणून वापर केलेला आहे.

प्रस्तुत शोध निबंधाच्या अभ्यासात जालना जिल्हा आर्थिक व सामाजिक समालोचन सांख्यिकीय माहितीच्या आधारे विविध प्रकारची माहिती संपादन करून, संग्रहित केलेली माहिती विश्लेषणासाठी उपयोगात आणली आहे.शासकीय अहवाल व मासिके वृत्तपत्रे

आधारावर विश्लेषण निदर्शनास आले. इत्यादींचा संदर्भ साहित्य म्हणून वापर केलेला आहे.द्वितीयक सामुग्रीच्या आधारावर प्रस्तुत संशोधन निबंधात विश्लेषण करण्यात आलेले आहे.संशोधनातील निष्कर्ष हे उद्दिष्टावर आधारित असून विश्लेषण व निष्कर्ष यावरच काढलेले आहेत व त्यानुसार शिफारशी दिलेल्या आहेत.

**विषय विवेचन (Subject Analysis)** :

प्रस्तुत शोध निंबाधत जालना जिल्ह्यातील शेती व्यवसायावर झालेला अतिवृष्टीचा परिणाम – यांचा अभ्यास करत असताना असे निदर्शनास आले की, जालना जिल्ह्याचा सर्वात महत्वाचा भाग म्हणजे ८५% भौगोलिक क्षेत्र शेती वापराच्या अंतर्गत आहे. भौगोलिक क्षेत्राच्या एकूण ७६१२०० हेक्टर क्षेत्रांपैकी ६५१५५३ हेक्टर जमीन कृषी वापराच्या अंतर्गत आहे.

जिल्हयाचे भौगोलीक क्षेत्र ७७३ हजार हेक्टर असुन त्यापैकी जंगलव्याप्त क्षेत्र ६.५ हजार हेक्टर म्हणजेच ०.८४% आहे. शेतीकरीता उपलब्ध नसलेल्या क्षेत्रामध्ये बिगरशेती वापराखालील जमीन ५५.९ हजार हेक्टर म्हणजेच भौगोलीक क्षेत्राच्या ७.२३% होती. पडीत व लागवडीलायक नसलेली जमीन१५.५ हजार हेक्टर म्हणजेच २.०१% होती. अशा रीतीने एकूण भौगोलीक क्षेत्रापैकी १०.००% जमीन लागवडीला उपलब्ध नव्हती. शेतकऱ्याने उदरनिर्वाहासाठी किंवा धंदा म्हणून स्वतःच्या शेतावर चालविलेला व्यवसाय अशी ढोबळमानाने शेतीची व्याख्या करता येईल. शेतामधून काढावयाच्या उत्पादनावरून शेतीचे ऊसमळा, भात शेती, पशुधनप्रधान शेती, मत्स्य शेती इ. निरनिराळे प्रकार अस्तित्वात आलेले आहेत. तसेच सिंचनाच्या उपलब्धतेनुसार बागायती शेती, जिराईत शेती असेही प्रकार पडतात. खतांच्या वापरानुसार सेंद्रिय शेती, रासायनिक शेती असे प्रकारसुद्धा अस्तित्वात आले आहेत. स्थूलमानाने नैसर्गिक आणि आर्थिक घटकांमुळे शेतीच्या प्रकारात बदल होतात.शेती हा खुप महत्वाचा भाग आहे. जालना जिल्ह्यातील शेती व्यवसायावर झालेला अतिवृष्टीचा परिणाम – यांचा अभ्यास करत असताना असे प्रत्यक्ष दर्शनी असे जाणवले की, जालना जिल्ह्यातील गारपीट, अतिवृष्टी, पुरामुळे पिके वाया गेली असल्याने खर्चही वसूल होत नाही. तर दुसरीकडे खासगी व बँकांकडून घेतलेले कर्ज फिटत नाही, यातच कुटुंबाचा सांभाळ करण्याची जबाबदारी. या विवंचनेतून शेतकरी आत्महत्या करत असल्याचे तपासातून पुढे आले. त्यावरील उपाययोजना शोधण्याचा प्रस्तुत शोध निंबाधत प्रयत्न केलेला आहे.

शेतमजूर हा शेती व्यवसायातील महत्त्वाचा घटक होय. शेतमजुराची निश्चित व्याख्या करणे अवघड असले तरी 1950 मध्ये शेतमजूर चौकशी समितीच्या मते, "जे वेतनावर पीक घेण्यासाठीच्या कार्यात सहभागी होतात, त्यांना शेतमजूर म्हणतात." तसेच जे 50 टक्के किंवा त्यापेक्षा अधिक दिवस दैनिक मजुरीवर शेतात काम करतात, त्यांना शेतमजूर म्हणतात. थोडक्यात, शेतात काम करण्यासाठी ज्यांना तात्पुरते किंवा विशिष्ट कालावधीसाठी निवेदन देऊन कामावर ठेवले जाते, त्यांना शेतमजूर म्हणतात. भारतात लोकसंख्येत वेगाने वाढ झाल्यामुळे अनेक प्रश्न निर्माण झाले जसे की रोजगाराचा प्रश्न, निरक्षरतेचा प्रश्न यातूनच शेतमजुरांच्या संख्येत उत्तरोत्तर वाढ होत गेलेली आपणास दिसून येते. 1960 मध्ये झालेल्या शेतमजुराच्या सर्वेक्षणात ग्रामीण भागातील 25 टक्के कुटुंबे शेतमजुरांची असल्याचे आढळून आले आहे. नॅशनल कमिशन ऑन रुरल लेबर ने 1987-88 मध्ये ग्रामीण कुटुंबांपैकी 30.7 टक्के कुटुंबे शेतमजुरांची असल्याचे नमूद केले आहे. भारत हा विविधतेने नटलेला देश आहे, अगदी त्याच उक्तीप्रमाणे भारतात बहुतांश राज्यात विविध धर्म, विविध जाती, विविध पंथ याप्रमाणे शेतमजुरीच्या दरात सुद्धा समानता दिसून येत नाही. भारतात यामुळेच दारिद्र्यरेषेखाली लोकांचे प्रमाण बहुतांश आहे. पिढ्यानपिढ्या शेतमजुरी करूनही आर्थिक, सामाजिक व शैक्षणिक दृष्टीने मागे राहिलेला शेतमजुरांचा मोठा वर्ग रोजगारासाठी इतर क्षेत्राकडे स्थलांतरित होत असल्याचे आपणास पहावयास मिळते. लोकसंख्येचा विपुल असलेल्या भारतात या शेती व्यवसायाला शेतमजूर शोधण्याची वेळ आलिकडे शेतकऱ्यांवर आलेली आपणास दिसते. एकीकडे वाढत्या लोकसंख्येमुळे मजुरांची संख्या वाढलेली असताना दुसरीकडे मात्र शेतकऱ्यांना शेतमजुरांचा तुटवडा जाणवत आहे. अनेकांनी मजुरांच्या समस्येमुळे शेती करणे सोडून दिले आहे किंवा पीकपद्धतीत बदल केला आहे. मजूर आणि शेतकरी या दोन्ही घटकांच्या हिताचा समतोल साधून मजुरीच्या समस्येवर सुवर्णमध्य काढण्याची आवश्यकता आहे.

आपल्या देशाच्या अर्थव्यवस्थेचा कणा शेती आहे आणि शेतीचा मुख्य कणा शेतमजूर आहे. शेतकरी आणि शेतमजूर हे नातं खूप अतूट आहे. शेतमजुरांचे वर्गीकरण चार भागात करता येईल. यात पहिला वर्ग म्हणजे मोठ्या जमीनदाराकडे कायमस्वरूपी असणारा भूमिहीन मजूर. दुसऱ्या वर्गातील मजूरही भूमी नसतो मात्र तो मिळेल त्या शेतकऱ्याकडे मिळेल ते शेतीचे काम करतो. तिसरा प्रकार अल्पभूधारक मजुरांचा आहे. हा मजूर घरची थोडी शेती हंगामी पिके पेरून करतो आणि बाहेरील काम करतो. चौथ्या प्रकारचा मजूर हा शेतकरीच असतो. तो स्वतःच्या शेतीची कामे संपल्यावर दुसरीकडे थोड्या काळासाठी शेती काम करतो. देशात 1961 मध्ये शेतीवर अवलंबून असणाऱ्यांचे प्रमाण 72.36 टक्के होते. त्यापैकी 52.80 टक्के शेतकरी तर 19.5 टक्के शेतमजूर होते. 2011साली देशात शेतीवर आधारित लोकसंख्येचे प्रमाण 54.60 टक्के झाले त्यात शेतकरी 24.60 टक्के तर मजूर 30 टक्के आहेत. यावरून शेतीवर आधारित शेतकऱ्यांचे प्रमाण कमी झाले. मात्र शेतमजुरांचे प्रमाण वाढल्याचे दिसते कारण अनेक अल्पभूधारक व अत्यल्प भूधारक शेतकऱ्यांनी जमिनी विकल्या तर अनेक शेतकऱ्यांनी उत्पन्नाचे दुसरे व्यवसाय सुरू केले त्यामुळे मजूर वर्ग वाढलेला दिसतो. मात्र दुसऱ्या बाजूला मजूर तुटवडा देखील वाढला हा विरोधाभास वाटत असला तरी ते सत्य आहे. काही वर्षांपूर्वी शेतकऱ्याकडे खूप मजूर स्वतःहून कामाच्या शोधात यायचे त्यावेळी मजूर कमी होते आणि शेतीत खालील क्षेत्र जास्त होते. आज शेतीखालील क्षेत्र कमी झाले असून मजूरवर्ग लोकसंख्येने वाढला. शिवाय आधुनिक तंत्रज्ञान व यांत्रिकीकरणामुळे शेतमजुरांची गरज कमी झाली. तरीही आज जवळपास सर्वत्र शेतमजूर टंचाई आणि वाढती मजुरी यांचा सामना शेतकऱ्यांना करावा लागत आहे. त्यामागे विविध कारणे आहेत. पूर्वी खरीप आणि रब्बी पिके व्हायची आता मात्र वेगवेगळे बागायती, व्यापारी पिके, फळ पिके घेण्यासाठी पॉलिहाऊस, शेडनेट याचा अवलंब करण्यात येत आहे. त्यामुळे मजुरांची गरज वर्षभर भासू लागली आहे परंतु

अलीकडे मजूर हे पाच सहा महिनेच शेती मध्ये व तेही अल्प रित्या मिळतात. नंतर कारखानदारी किंवा ऊस तोडण्यासाठी किंवा शहरी भागाकडे स्थलांतरित होतात. त्यामुळे अलीकडे ग्रामीण आणि शहरी निमशहरी भागात अनेक छोटे-मोठे कारखाने, उद्योग, गोदाम, दुकानदारी, व्यापारीवर्ग वाढल्याने या ठिकाणी शेतीवर कामाला येणारे शेतमजूर विभागले गेले. कायमस्वरूपी सालदार, महिना स्वरूपाने काम करणाऱ्या मजुरांना वर्षभर काम मिळते. शिवाय उचल रक्कम मिळते. उचल एकूण वर्षाचे मजुरी पैकी 50 टक्के मिळते. त्या शिवाय इतर धान्याच्या स्वरूपात ही त्यांना उचल मोबदला दिला जातो. त्यामुळे कायमस्वरूपी वार्षिक शेतमजूर मिळतात परंतु हंगामी स्वरूपात शेतमजूर मिळत नसल्याने अनेक शेतकर्यांसमोर शेतमजुराचा तुटवडा निर्माण होत आहे. शेतमजुरांचा तुटवड्यामुळे अनेकांनी शेती करणे सोडून दिले आहे. काहींनी आपल्या कडेच काम करणाऱ्या शेतमजुरांना शेती वाट्याने, खंडाने दिली तर अनेकांनी कमी मजूर लागणारी पिके लावली आहेत. शेतमजूरांना त्यांच्या हक्काचे पैसे मिळाले पाहिजेत. यात दुमत नाही. मात्र मजुरी वाढविणे हे मात्र चूक आहे. एखाद्या वर्षी पिकाला चांगला भाव मिळाला की मजुरी तात्काळ वाढली जाते मात्र दर कमी झाल्यावर मजुरी कमी होत नाही. एकच काम रोजंदारीवर केल्यावर जास्त दिवस लागतात मात्र अंगावर काम दिल्यावर ते खूप कमी वेळात होते, असा अनेक शेतकऱ्यांचा अनुभव आहे. शेतमजुराची व्यसनाधीनता हा देखील एक मोठा प्रश्न आहे. शेतकऱ्यांनीही शेतमजुरांचे मूलभूत अधिकार मान्य केले पाहिजे. त्यांच्या अज्ञानाचा फायदा घेऊन, त्यांना हिशोब चुकीच्या पद्धतीने लावणे, शिवीगाळ करणे, मारझोड हे प्रकार थांबले पाहिजेत. काही दशकांपूर्वी मजुरांना मिळणारी मजुरी अत्यल्प होती, आज मात्र ती बऱ्यापैकी वाढलेली आहे. यामुळे अलिकडे ग्रामीण भागात छोटे शेतकरी एकत्रित येऊन सामुहिक स्वरूपाची शेती करताना आढळतात.

**शेतमजुरांचा तुटवडा निर्माण होण्याची प्रमुख कारणे:**

मजुरांच्या मागणी पुरवठ्यातील असमतोलामुळे शेतमजुरांच्या मजुरीचा समतोल बिघडत असल्याचे आपणास दिसून येते. जमीन धारक शेतमजुरांची स्वतःची थोडीफार शेती असल्यामुळे स्वतःच्या शेतीतील काम आटोपल्या शिवाय दुसऱ्या शेतीवर काम करण्यासाठी जाता येत नाही. त्यामुळे इतर शेतकऱ्यांना शेत मजुरांचा तुटवडा निर्माण होतो. सामाजिक प्रतिष्ठा हेसुद्धा शेत मजुरांचा तुटवडा निर्माण होण्यासाठी कारणीभूत आहे. बऱ्याच शेतकऱ्यांना समाजात शेतमजूर म्हणून काम केल्यास हीन वागणूक मिळते. समान प्रतिष्ठेचा अभाव आणि शिक्षणाचा अभाव असल्यामुळे अशी परिस्थिती निर्माण होते. परिणामी शेतमजुरांचा तुटवडा निर्माण होतो. अलीकडे शिक्षण पद्धतीचा सर्वत्र प्रसार झाल्यामुळे प्रत्येक घराघरातील मुले मुली शिक्षणासाठी शाळेला जातात त्यामुळे शेतामध्ये काम करण्यासाठी मजूर उपलब्ध होत नाहीत. त्यामुळे शेतमजुरांची ही इच्छा असते की, आपण थोडेफार काम करून पैसा कमवावा परंतु दुसरीकडे शाळेचे दार बंद होते. त्यामुळे मजुरांचा तुटवडा निर्माण होतो. शेतीतील रोजगाराचे हंगामी स्वरूप सुद्धा शेत मजुरांचा तुटवडा निर्माण होण्यासाठी कारणीभूत आहे. बहुतांश वेळेला शेतीमध्ये जून ते नोव्हेंबर पर्यंतच काम मिळते. त्यानंतर शेतीमध्ये काम मिळत नाही. त्यामुळे रोजगार यांचा तुटवडा पडतो. वर्षभर काम मिळण्याची शाश्वती नसते. त्यामुळे हे शेतमजूर इतर क्षेत्रात कामाला गेल्यामुळे शेती क्षेत्रामध्ये शेतमजुरांचा तुटवडा निर्माण होते. उद्योग क्षेत्र आणि सेवा क्षेत्राच्या तुलनेत कृषी क्षेत्रात विशिष्ट हंगामातच थोडीफार जास्त मजुरी मिळाली असली तरी वर्षभराचा विचार करता अल्प कालावधीमुळे मिळणारी मजुरी जास्त असली तरीही वर्षाच्या त्यांच्या मूलभूत गरजा भागविणे कठीण जाते. त्यामुळे हेच मजूर इतर क्षेत्राकडे वळले जातात परिणामी शेतीमध्ये शेत मजुरांचा तुटवडा निर्माण होतो. नवीन आर्थिक धोरण आणि सुधारणांमुळे व्यापार उद्योग, वाहतूक सेवा, शिक्षण व आदी क्षेत्राचा विकास झाल्यामुळे शेतमजूर या क्षेत्रांमध्ये स्थलांतरित झाले परिणामी शेतीमध्ये शेतमजुरांचा तुटवडा निर्माण झाला. शासकीय योजना व सवलतींचा अलीकडे मोठ्या प्रमाणात लोकांना लाभ मिळत असल्यामुळे शेतमजुरांच्या संख्येत उत्तरोत्तर घट होत आहे. तसेच स्वस्त धान्य दुकानातून अतिशय अल्प दरात धान्य मिळत असल्यामुळे लोकांना काम करण्याची इच्छा राहिली नाही. अतिशय अल्प दरात मुबलक प्रमाणात अन्नधान्य मिळत असल्यामुळे शेतमजुरांचे शेती कामाकडे दुर्लक्ष निर्माण झाले आहे. त्यामुळे शेतमजुरांचा तुटवडा निर्माण झाला आहे.एकीकडे शेतमजूर मिळविण्यासाठी कृषी क्षेत्रात शेतकरी स्पर्धा करू लागल्याचे आपणास दिसून येते. उदा. सोयाबीन काढणी काळामध्ये अगोदर माझ्या शेतातील पीक घरात यावे यासाठी शेतकरी शेतमजूर मिळवण्यासाठी मजुरांना अधिकची मजूरी देण्याची स्पर्धा अलीकडे दिसून येत आहे. त्यामुळे या संधीचा लाभ मजूरवर्ग घेतो. परिणामी त्यांचे मजूरीचे दर वाढतात आणि शेतीचा उत्पादन खर्च वाढून नफा कमी होतो आणि शेवटी शेतकऱ्यांना अवघड होते.

**शेतमजुरांच्या तुटवड्याचे विपरीत परिणाम:**

शेती हंगामात शेतमजुरांचा तुटवडा निर्माण झाल्यामुळे त्याचे विपरीत परिणाम होऊन अनेक समस्या निर्माण झालेले आहेत. त्या पुढील प्रमाणे- योग्य वेळी मजूर न मिळाल्यामुळे शेतीची कामे वेळेवर होत नाहीत. पेरणी, खुरपणी, टोकणी, विरळणी, कोळपणी यासारखी कामे वेळेवर न झाल्यामुळे पिकांच्या उत्पादनक्षमतेत घट होते. त्याचबरोबर मजुरांअभावी शेतामध्ये तन वाढल्यामुळे पिकांची नासाडी होते. कीटकनाशकांचा परिणाम पिकांऐवजी तणावरच होतो. तसेच तण काढण्याचा खर्च शेतकऱ्यांना विनाकारण करावा लागतो. याचा परिणाम पीक वाया जाते आणि इतर उत्पादन खर्च मात्र अनिवार्य असल्यामुळे जसे की मशागत, बियाणे, खते, कीटकनाशके आदी वर केलेला खर्चाचा भाग शेतकऱ्याच्या डोक्यावर बसतो. शेतमजुराच्या तुटवड्यामुळे जास्त मजुरी देऊनही कामावर लोक यायला तयार होत नाहीत, आले तरी उशिरा येणे, वेळ घालवणे, कामावरून लवकर निघून जाणे त्यामुळे शेतमजूर व शेतकरी यात भांडणे होण्याची शक्यता असते. वेळेवर मजूर न मिळाल्यास शेतात तयार झालेले पीक काढता येत नाही. त्यामुळे त्या पिकांची नासाडी होऊन शेतकऱ्यांचे नुकसान होते किंवा शेतकरी अडचणीत येतो.

**शेतमजुरांचा प्रश्न सोडविण्यासाठी उपाय योजना**

भारतीय शेती व्यवसायातील शेत मजुरांचा तुटवडा हा प्रश्न सोडविण्यासाठी काही उपाययोजना दिले आहेत त्या पुढील प्रमाणे- प्रत्येक शेती कामाचे दर निश्चित करण्यात यावेत. शेतमजुरांना किमान वेतन आणि रोजगाराची हमी देण्यात यावी. रोजगार हमी योजनेतून मजुरांचा पुरवठा करण्यात आला तर शेतकऱ्यांना व शेतमजुरांना दोघांनाही फायदा होईल. परप्रांतीय मजूर ही शेतीची गरज बनली आहे. कुक्कुटपालन, दुग्धव्यवसाय यासारखे कठीण आणि कष्टाची कामे आपल्याकडील मजूर करू शकत नाहीत. त्यामुळे परप्रांतीयांना अलीकडे महत्व दिले जात आहे. शेतमजुरांचा सर्व हिशोब ज्यांना जमेल अशा स्वरूपात तसेच दोन प्रती मध्ये लिहून ठेवावा. यात कोणत्याही प्रकारची फसवणूक होऊ नये. अशी दक्षता घेण्यात येईल. मजुरांसाठी क्षेत्र मोजण्यासाठी किंवा मजुरी मोजण्यासाठी पूर्वीच्या पारंपरिक पद्धतीचा वापर न करता अलीकडील आधुनिक मोजमापाचा वापर करून त्यांना क्षेत्र मोजणे किंवा मजुरी देण्यासाठी या आधुनिक साधनांचा वापर करण्यात यावा. एखाद्या शेतमालाचा बाजारपेठेत भाव वाढल्यावर त्या पिकाचे निगडित सर्व कामाची मजुरी वाढवू नये. रोजंदारी किंवा साल दाराला विशिष्ट वेळेत आणि विशिष्ट तास काम करण्याची सवय लावणे गरजेचे आहे. शेतमजुरांचे राहणीमान आणि दर्जा सुधारण्यासाठी शेतकऱ्यांनी त्यांना प्रोत्साहन द्यावे. शेतमजुरांना बँकिंग व्यवहाराशी जोडण्याची गरज आहे. शासनाने स्वस्तात अनुदाने देण्यासारख्या योजना बंद करून त्यात वाचलेला पैसा मजुराच्या विम्यासाठी खर्च करण्यात यावा स्वस्त धान्य दुकानावर अल्प दरात धान्य दिल्यामुळे लोक आळशी बनत आहेत. त्यांना कामावर जायची इच्छा होत नाही. काम करण्याची सवय बंद होत आहे. त्यामुळे श्रमप्रतिष्ठा या संकल्पनेवर गडांतर येते की काय अशी भीती अलीकडे वाटत आहे. शेतमजुरांना कृषिविषयक शिक्षण आणि प्रशिक्षण दिल्यास शेतमजुरांचा तुटवडा कमी होईल म्हणजेच असे प्रशिक्षण कमी वेळात जास्तीचे काम किंवा आधुनिक तंत्रज्ञान हाताळण्यासाठी त्यांना मदत होईल. शेतकऱ्यांची शेती ही पावसावर अवलंबून असल्यामुळे अनेक लोक शेतीवर अवलंबून घडवत असतात. त्यामुळे शेतकऱ्यांचे वारंवार नुकसान होत आहे अशा वेळी शेतकऱ्यांना विविध अनुदाने, विमा न भरपाई शासन व सरकारने दिल्यास शेतकऱ्याचे नुकसान भरून निघून शेतमजुरांची मजुरी वाढविण्यास अडचण येत नाही. त्यामुळे शेत मजुरांचा तुटवडा अशी अडचण निर्माण होणार नाही. सामुहिक शेतीचा अवलंब करून शेती केल्यास शेती मजुरांचा प्रश्न आपोआपच सुटेल.

**समारोप:**

भारतीय कृषीच्या विकासात अलीकडील महत्त्वाची अडचण म्हणून शेतमजुरांची टंचाई हे एक नवे आव्हान उभे राहिले. यावर मात करण्यासाठी वरील उपाय अवलंबिल्यास शेतमजुरांचा तुटवडा काही अंशी कमी होईल अलीकडे शेतमजुरांच्या तुटवड्यामुळे मोठे शेतकरी कशीतरी तग धरून शेती करत आहेत परंतु सामान्य व सीमांत शेतकरी यांना खूपच अवघड झाले आहे त्यांना शेती विकून दुसऱ्या व्यवसायात स्थलांतर होण्याची परिस्थिती निर्माण झाली आहे त्यामुळे दोघांचे समस्यांचा गांभीर्यपूर्वक विचार करून शेतमजूर तुटवडा यावर उपाय करण्याची सरकार व शासनाचे महत्त्वाची भूमिका आहे यांनी जर वेळेतच यावर विचार नाही केल्यास भारतीय शेतकरी वाऱ्यावर सोडून दिल्यासारखे होईल त्याचा परिणाम भारतीय शेतीची उत्पादकता घटेल. अन्नधान्याचा प्रश्न भेडसावेल. यावर चिंता व्यक्त करताना माननीय राष्ट्रपती प्रतिभाताई पाटील यांनी भारतीय प्रजासत्ताकाचा हीरक महोत्सवी सोहळयाच्या पूर्वसंध्येला देशवासीयांना संबोधित करताना 'आज दुसऱ्या हरित क्रांतीची भारताला गरज आहे

त्यासाठी त्वरित पावले उचलण्याची गरज' असल्याचे त्यांनी विशद केले आहे ग्रामीण भाग सुजलाम सुफलाम करायचा असेल तर शेतमजुरांच्या तुटवड्याच्या मुद्द्याकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. शेती क्षेत्राकडून दुर्लक्ष करून विकास म्हणजे एकांगी विकास होय.

**संदर्भसूची**

1 अर्थसंवाद, मासिक जुलै-सप्टेंबर 2010.

2 गंगाधर कायंदे पाटील, शेतीचे अर्थशास्त्र, चैतन्य पब्लिकेशन्स, नाशिक

3 रुद्र दत्त, के पीएम सुंदरम, भारतीय अर्थव्यवस्था,

4 इकॉनोमिक सर्वे गोरमेंट ऑफ इंडिया 2019 20

5 www.worldometers.info

6 दैनिक सकाळ, 29/06/2020.

*'Journal of Research & Development' A Multidisciplinary International Level Referred and Peer Reviewed Journal, Impact Factor-7.265, ISSN: 2230-9578, 30 October2021, Volume-12, Issue-15*
*Agriculture and Rural Development: Strategic Issues and Reform Options*

# विकास पत्रकारितेचे स्वरूप आणि महत्त्व : एक चिकित्सक अभ्यास

**डॉ. बाळासाहेब दत्तात्रय मागाडे**
सहायक प्राध्यापक, मास कम्युनिकेशन विभाग पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर
Email - drbalasahebmagade@gmail.com

**प्रस्तावना**

लोकशाही राज्यव्यवस्थेची इमारत कायदेमंडळ, राज्यशासन, न्यायसंस्था व पत्रकारिता या चार आधारस्तंभावर उभी असते. माहिती देणे, उदबोधन करणे आणि मनोरंजन करणे ही पत्रकारितेची मुख्यत: तीन कार्ये असतात. मुद्रित, इलेक्ट्रोनिक व डिजिटल माध्यमे या माध्यमांचा पत्रकारितेत समावेश होतो. केवळ माहिती दिल्याने समाजाचा विकास होत नसतो. त्यासाठी विकासाच्या कल्पना रुजविणे गरजेचे असते. समाजातील विकासभावना वाढीस लावण्याचे काम पत्रकारितेची विविध माध्यमे करीत असतात. हे काम तपासत असताना विकास संज्ञापन, विकास पत्रकारिता, विकास पत्रकारितेचे महत्त्व नेमके काय आहे हे पाहणे अत्यंत महत्त्वाचे आहे.

**विषयाचे महत्त्व**

माहिती समाज निर्मितीसाठी प्रसार माध्यमांची नितांत गरज असते. पत्रकारितेची विविध माध्यमे अविरतपणे आपल्याशी जोडलेल्या वाचक, प्रेक्षकांना विविध रूपातून माहिती पोहोच करून त्यांच्या माहितीच्या गरजा पूर्ण करीत असतात. माहितीचा उगम, प्रेषक, माध्यम व स्वीकारक हे घटक या प्रक्रियेत खूप महत्त्वाचे ठरत असतात. समाजाला माहितीयुक्त बनवत असताना त्यांचा सर्वतोपरी विकास व्हावा अशी माहिती देणे हे पत्रकारितेचे महत्वाचे कार्य आहे. हे कार्य नीटपणे पार पडण्याच्या टप्प्यात विकास पत्रकारितेचे महत्त्व समजून घेणे गरजेचे आहे. त्याच हेतूने ‘विकास पत्रकारिता : स्वरूप आणि महत्त्व’ हा विषय प्रस्तुत शोध निबंधासाठी निवडण्यात आला आहे.

**विषयाची व्याप्ती**

विकास पत्रकारिता हा वैश्विक स्वरूपाचा विषय आहे. जागतिक पातळीवर विविध देशातील विकास व माध्यम तज्ञांनी याबाबत मांडणी केली आहे. विषयाची व्याप्ती ध्यानात घेऊन मर्यादित संकल्पनेवर आधारित हा विषय अभ्यासण्याचा प्रयत्न या शोध निबंधात करण्यात येणार आहे.

**उद्दिष्टे**

1. विकास संज्ञापनाचे स्वरूप समजून घेणे.
2. विकास पत्रकारितेचे स्वरूप अभ्यासणे.
3. विकास पत्रकारितेचे महत्त्व अभ्यासणे.
4. मुख्य प्रवाहातील पत्रकारितेत विकास पत्रकारितेचे स्थान अभ्यासणे.
5. मर्यादा

विकास पत्रकारिता हा वैश्विक स्वरूपाचा विषय असल्याने विकास पत्रकारितेचे महत्त्व व स्वरूपाचा अभ्यास करण्यापुरता हा विषय मर्यादित करण्यात आला आहे. संशोधन पद्धत या शोधनिबंधासाठी वर्णनात्मक संशोधन पद्धत वापरण्यात आली आहे.

**तथ्य संकलन**

प्रस्तुत शोधनिबंधासाठी संशोधन करण्यासाठी यापूर्वी ज्यांनी विकास पत्रकारितेवर लेखन केले आहे त्या ग्रंथांचा प्राथमिक तथ्ये म्हणून वापर करण्यात आला आहे. प्रसारमाध्यमात प्रकाशित लेख, संशोधन लेख तसेच इंटरनेटवरील माहितीचाही आधार घेण्यात आला आहे.

**विकास संज्ञापन**

विकास संज्ञापन म्हणजे सामाजिक विकास सुलभ करण्यासाठी संज्ञापनाचा वापर करणे होय. विकास संज्ञापन हे विकासासाठी अनुकूल वातावरण स्थापित करते. जोखीम आणि संधींचे मूल्यांकन करते आणि शाश्वत विकासाद्वारे सकारात्मक सामाजिक बदल घडवण्यासाठी माहितीच्या देवाणघेवाणीला प्रोत्साहन देते. विकास संज्ञापन तंत्रांमध्ये माहिती प्रसार आणि शिक्षण, वर्तन बदल, सामाजिक विपणन, सामाजिक गतिशीलता, मीडिया ॲडव्होकसी (माध्यम वकिली), सामाजिक बदलासाठी संज्ञापन आणि समुदाय सहभाग यांचा समावेश होतो. विकास संज्ञापनतज्ञ जामिया यांनी विकास संज्ञापनाचे तत्त्वज्ञान मांडले. जे तीन मुख्य कल्पनांवर आधारित आहे. त्यांच्या तीन मुख्य कल्पना आहेत: उद्दिष्टात्मक, मूल्याधारित, आणि व्यावहारिक. नोरा सी. क्वेब्रल यांनी या व्याख्येचा विस्तार केला. "मानवी संप्रेषणाची कला आणि विज्ञान एखाद्या देशाच्या जलद परिवर्तनासाठी आणि तेथील लोकांच्या दारिद्र्यातून आर्थिक विकासाच्या गतिमान अवस्थेपर्यंत लागू होते, ज्यामुळे अधिक सामाजिक समानता शक्य होते आणि मोठ्या प्रमाणात मानवी क्षमतेची पूर्तता होते" अशी नवी व्याख्या केली. मेलकोट आणि स्टीव्हस यांनी याला "मुक्ती संज्ञापन" (Emancipation Communication) असे संबोधले. ज्याचा उद्देश अन्याय आणि अत्याचाराचा सामना करणे असा आहे. "डेव्हलपमेंट कम्युनिकेशन" हा शब्द काहीवेळा विपणन आणि जनमत संशोधनाच्या प्रकारासाठी वापरला जातो.

**विकास संज्ञापनाच्या व्याख्या**

विकास संज्ञापनाच्या अनेक विकास तज्ञांनी व्याख्या केल्या आहेत. त्या पुढीलप्रमाणे.

1. एर्स्काइन चाइल्डर्स यांनी पुढीलप्रमाणे व्याख्या केली आहे.
2. ''डेव्हलपमेंट सपोर्ट कम्युनिकेशन्स ही विकास योजना आणि अंमलबजावणीमधील एक शिस्त आहे. ज्यामध्ये विकास प्रकल्प आणि त्यांची उद्दिष्टे यांच्या डिझाइनमध्ये मानवी वर्तणूक घटकांचा अधिक पुरेसा विचार केला जातो.''
3. वर्ल्ड बँकेने पुढीलप्रमाणे व्याख्या केली आहे.

“डेव्हलपमेंट कम्युनिकेशन हे स्वदेशी वास्तवांच्या स्पष्ट आकलनावर आधारित "विकास प्रकल्पांमध्ये धोरणात्मक संवादाचे एकत्रीकरण" आहे.” या व्याख्यांचा विचार केला असता एक बाब स्पष्टपणे ध्यानात येते ती म्हणजे, विकास ही मानवाशी थेट संबंधित असलेली संकल्पना आहे.

**विकास पत्रकारितेचा उगम व विकास**

विकास पत्रकारितेचा उगम हा जागतिक पातळीवरील प्रयत्नांतून झाला आहे. तिसऱ्या जगातील राष्ट्रांच्या विकासाच्या वाटचालीमध्ये वृत्तपत्रे व अन्य जनसंज्ञापन माध्यमे महत्वाची भूमिका पार पाडू शकतील, अशा विश्वासातून १९५० च्या दशकात ‘विकास पत्रकारिते’चा जन्म झाला. त्याचे महत्वाचे निमित्त असे की, दुसऱ्या महायुध्दानंतर संयुक्त राष्ट्र संघटना (यूनेस्को) स्थापन झाली. आशिया, आफ्रिका, दक्षिण अमेरिका या भूभांगामध्ये असलेल्या आपल्या वसाहतींना स्वातंत्र्य देणे यूरोपमधील राष्ट्रांना भाग पडले. चीनमध्ये कम्युनिस्ट क्रांती झाली आणि यूरोपमधील अनेक राष्ट्रांतही कम्युनिस्ट राजवटी स्थापन झाल्या. त्यामुळे प्रगत पाश्चात्य औद्योगिक राष्ट्रे, कम्युनिस्ट राष्ट्रे आणि नव्याने स्वतंत्र झालेली पण मागासलेली राष्ट्रे असे जगाचे तीन भाग किंवा तीन जगे अस्तित्वात आली. मागासलेल्या तिसऱ्या जगातील राष्ट्रांना मदत देऊन त्यांना आपल्या गोटात ओढण्याची स्पर्धा अमेरिका व राशिया या राष्ट्रांत सुरू झाली. ‘विकासा’ची संकल्पना पहिल्या महायुध्दानंतर यूरोपमध्ये मार्शल योजनेच्या रूपाने पुढे आली. दुसऱ्या महायुध्दानंतर तीच संकल्पना ‘तिसऱ्या’जगातील राष्ट्रांच्या संदर्भात वापरण्याचा प्रयत्न झाला. परंतु पहिल्या महायुध्दानंतरची यूरोपीय राष्ट्रे आणि दुसऱ्या महायुध्दानंतर स्वतंत्र झालेली तिसऱ्या जगातील राष्ट्रे यांच्यात मूलभूत

भेद असल्यामुळे 'विकासा'च्या संकल्पनेत व प्रक्रियेत वेळोवेळी बदल करावे लागले आणि त्यानुसार विकास पत्रकारितेच्या स्वरूपात व भूमिकेत वेळोवेळी बदल झाले. औद्योगिकीकरण, शिक्षण, आधुनिकिकरण व नागरीकरण ही चतु:सूत्री विकास म्हणजे आर्थिक विकास, असे समीकरण १९५० च्या दशकात रूढ होते आणि त्यासाठी औद्योगिकीकरण, शिक्षण, आधुनिकिकरण व नागरीकरण ही चतु:सूत्री मानण्यात आली होती. या विकास कार्यक्रमाची सूत्रे जागतिक बँक, यूनेस्कोसारख्या आंतरराष्ट्रीय नाणे निधी संस्थांमार्फत ठरविण्यात येत असत. या कार्यक्रमात लोकांपर्यंत माहिती पोहोचविण्याचे काम जनसंज्ञापन माध्यमांनी करावयाचे होते. म्हणजे प्रगत औद्योगिक राष्ट्रांकडून सरकारमार्फत मिळालेल्या माहितीचे वितरण करण्यापुरती विकास पत्रकारितेची भूमिका मर्यादित होती. परंतु १९६५ नंतर या प्रकारच्या 'झिरप'सिध्दांतवादी विकास कार्यक्रमांना मिळणारे अल्प यश आणि त्यातून निर्माण होणाऱ्या अनेक समस्या यांमुळे तिसऱ्या जगातील विचारी तज्ज्ञांमध्ये या कार्यक्रमांबद्दलचा भ्रमनिरास झाला. 'विकास'म्हणजे फक्त 'आर्थिक'विकास नव्हे 'विकास' म्हणजे फक्त 'आर्थिक' विकास नव्हे तर सामाजिक, राजकीय, व सांकृतिक विकासाची जोड असेल तरच तो विकास टिकाऊ, तळागाळापर्यंत पोहोचणारा व मौलिक ठरतो. त्यासाठी विकास —प्रयत्नांत लोकांचा सहभाग आवश्यक आहे. पारंपरिक शेती, आरोग्य इ. विषयीच्या तळागाळातील लोकांच्या ज्ञानाचा उपयोग करून घेतला पाहिजे, असे विचार पुढे आले. पाउलो फ्रेरे या दक्षिण अमेरिकन कृतीशील – विचारवंताच्या द पेडॅगॉजी ऑफ द ऑप्रेस्ड ह्या ग्रंथाने विकासाच्या संकल्पनेत क्रांती घडवली. त्यामुळे विकास पत्रकारितेच्या भूमिकेतही बदल झाला. माहितीचे केवळ एकाच दिशेने (पाश्चात्य राष्ट्रे/सरकार/तज्ज्ञ यांच्याकडून शेतकरी, सामान्य माणूस यांच्याकडे) वितरण न करता सामान्य माणसाच्या विकासाबद्दलच्या कल्पना, अडचणी, अनुभव यांचा शोध घेणे, त्या माहितीचे उच्चपदस्थांना/सरकारला वितरण करणे, आणि लोकांनी आपला विकास आपणच घडवावा यासाठी त्यांना उद्युक्त करणे, त्यांना सहभागी करून घेणे ही सुद्धा विकास पत्रकारितेची भूमिका असली पाहिजे, असे १९७० व १९८० च्या दशकात मानण्यात येऊ लागले. प्रसारमाध्यमांतून केली जाणारी विकास पत्रकारिता माध्यमे ही वाचकांच्या दैनंदिन जीवनाशी निगडीत असतात. ताज्या घडामोडी प्रसारित करण्यासोबतच आपल्याशी जोडल्या गेलेल्या सर्व घटकांचा सर्वांगीण विकास व्हावा ही भूमिका ठेवून ते काम करीत असतात. कृषी, पायाभूत सुविधा, आरोग्य, शिक्षण, पर्यावरण, उद्योग आदी विषयाच्या आधारे प्रसार माध्यमांतून विकास पत्रकारिता घडून येते. प्रसारित अथवा प्रकाशित होणारा आशय हा बातमी, वृत्तकथा, यशकथा, विश्लेषणात्मक वृत्त, मुलाखत, शोधवृत्त, वृत्तमालिका आदी स्वरुपांतून प्रसारित अथवा प्रकाशित होत असतो.

**मुद्रित माध्यमे :**

मुद्रित माध्यमात वृत्तपत्रे, नियतकालिके यांचा समावेश होतो. मुद्रित माध्यमांत मजकूर, छायाचित्रे, आलेख याद्वारे विकास पत्रकारिता घडून येते. उद्योग-धंद्यातील उलाढाल, तेजी-मंदीची करणे, पायाभूत साधनांची उभारणी, मुलभूत गरजांची पूर्तता व्हावी यासाठी केले जाणारे वार्तांकन, स्मार्ट सिटी, आधुनिकीकरण, पर्यावरण रक्षण यासह विविध विषयावर सातत्याने मजकूर प्रसारित होतो. त्यामागील एकमेव कारण म्हणजे आपल्या माध्यमाशी जोडल्या गेलेल्या वाचकांचा सर्वांगीण विकास व्हावा. अनेक वृत्तपत्रात शेती, आरोग्य, पर्यावरण, उद्योग, शिक्षण या विषयाला वाहिलेली पाने दर आठवड्याला प्रसिद्ध होत असतात. त्यातूनही विकास पत्रकारितेचा हेतू साध्य होत असतो. उदा. दै.सकाळचे 'शिवार', दै. लोकमतचे 'शेतकरी' हे विशेष पान. सकाळ वृत्तपत्र समूहाचे 'अग्रोवन' हे शेती विषयाला वाहिलेले दैनिक याचे उत्तम उदाहरण आहे. याशिवाय नियतकालिकातूनही प्रत्येक अंकात विकास विषयक मजकूर कमी अधिक प्रमाणात असतो. ग्रामीण विकास विषयाला वाहिलेले "योजना" व आर्थिक विकास विषयाला वाहिलेले

"कुरुक्षेत्र" ही केंद्र सरकारची मासिके विकास पत्रकारिता ताकदीने करताना दिसतात. याशिवाय महाराष्ट्र सरकारचे मुखपत्र असलेले "लोकराज्य' हे मासिकही विकास विषयक मजकूर प्रसिद्ध करीत असते.

**इलेक्ट्रॉनिक माध्यमे :**

इलेक्ट्रॉनिक माध्यमात दृकश्राव्य स्वरूपातील विविध कार्यक्रम, मुलाखती, न्यूज स्टोरीज, दैनंदिन बातम्या याद्वारे विकास पत्रकारिता केली जाते. 'एबीपी माझा'वरील 'सात-बाराच्या बातम्या', 'न्यूज १८ लोकमत'वरील 'शेतकरी', दूरदर्शनवरील 'शेत-शिवार' आदी विशेष कार्यक्रम याचे उत्तम उदाहरण आहेत.

**डिजिटल माध्यमे :**

डिजिटल माध्यमात न्यूज पोर्टल व यू-ट्युब चॅनेलचा प्राधान्याने समावेश होतो. न्यूज पोर्टल व यू-ट्युब चॅनेल ही अत्यंत नवीन माध्यमे आहेत. यातूनही ग्रामीण प्रश्नांबाबत मांडणी केली जात असल्याचे दिसून येते. या माध्यमांची पोहोच झपाट्याने वाढत आहे.

**निष्कर्ष**

विकास पत्रकारिता समाजाला विकासोन्मुख बनवणारी आहे. समाजाची विकास विषयक भावना वाढीस लागावी यासाठी हे घडून येणे खूप महत्वाचे आहे. मात्र अलीकडील काळात माध्यमांत व्यावसायीकरण झाल्याने विकास पत्रकारिता मागे पडताना दिसत आहे. असे असले तरीही माध्यमांना मुख्य हेतूपासून जास्तकाळ लांब राहता येणार नाही. कारण माध्यमे ही थेट लोकांशी संबंधित असतात.

**समारोप**

विकास हा फक्त मोठ्या इमारती, चकाचक रस्ते बांधून होत नाही. फक्त एवढ्याच गोष्टी केल्यास विकास ही केवळ सूज बनेल. त्यातून शाश्वत काहीच साध्य होणार नाही. समाजाची सर्वांगीण उन्नती होण्यासाठी चांगले शिक्षण, चांगले आरोग्य, चांगले पर्यावरण, सक्षम उद्योग याचाही विकास होणे गरजेचे असते.

**संदर्भसूची**

1. Development Journalism, Abdulaziz Dino Gidreta, VDM Verlag (27 April 2011)
2. https://en.wikipedia.org/wiki/Development_communication
3. Development Journalism An Analysis, D. V. R. Murthy, Kaniska Publication, Delhi, 1 January 2012
4. THE MODERNITY OF TRADITION POLITICAL DEVELOPMENT IN INDIA, Lloyd l. Rudolph, Orient Longman Publication, 1987
5. पत्रकारिता एवं विकास संचार, प्रो अनिल कुमार उपाध्याय, Bharati Prakashan,1 जनवरी 2019
6. कृषि एवं ग्रामीण विकास पत्रकारिता, डॉ. अर्जुन तिवारी, वाराणसी बुक सेंटर, वाराणसी, 2001
7. आर्थिक पत्रकारिता, अलोक पुराणिक, प्रभात प्रकाशन, दिल्ली, २०१६
8. बदलती पत्रकारिता, कमिल पारखे, सुगावा प्रकाशन, पुणे-२०२०
9. कृषि पत्रकारिता का सैद्धांतिक एवं व्यवहारिक पक्ष, डॉ. रामकृष्ण पराशर, हिंदी माध्यम कार्यान्वय निदेशालय, दिल्ली विद्यापीठ, १९९२
10. मासिक योजना, मासिक कुरुक्षेत्र, मासिक लोकराज्य

# ग्रामीण जीवनातील शेतीचे महत्व

**सहा.प्रा. नंदकिशोर आत्माराम पाटील[1] डॉ. भाऊसाहेब सोनाजी देवकर[2]**

[2]भूगोल विभाग प्रमुख,दोशी वकील आर्ट्स कॉलेजआणि जी. सी. यू. बी. सायन्स आणि कॉमर्स कॉलेज,गोरेगाव - ता.मानगाव,जि° रायगड.

[1]संत रामदास आर्ट्स, कॉमर्स आणि सायन्स कॉलेज, घनसांगवी जिल्हा. जालना.

Email – nandkishorpatil1974@gmail.com[1] Email- bhausdevkar@gmail.com[2]

**सारांश**:

भारत हा कृषिप्रधान देश आहे. ग्रामीण संस्कृती ही प्रामुख्याने कृषी संस्कृती आहे. कृषी संस्कृतीवर ग्रामीण जीवनातले भलेबुरे अवलंबून असते. कृषी उत्पादनाचे साठवण, कृषी मालाचे वास्तविक किफायतशीर मूल्य निर्धारण करणे व ते मूल्य शेतकऱ्यांच्या खिशात पडेल यासाठी कृषी विभागाने झटणे आवश्यक आहे.तंत्रज्ञान, संशोधन यासर्व प्रक्रियांमध्ये शेतमजूर व शेतकऱ्यांना उचित सहभाग देणे गरजेचे आहे. शेती किफायतशीर करायची असेल तर ग्रामीण भागातून शहराकडे अनियोजित व अनियंत्रित स्थलांतर टाळणे आवश्यक आहे. ग्रामीण भागातील जीवनात लोकांना प्रगती व उत्साह वाटला पाहिजे. लहान शेती असलेल्या शेतकऱ्यांना गट शेतीसाठी विशेष आर्थिक अनुदान इत्यादी गोष्टीचा अवलंब केला गेला पाहिजे.

**प्रस्तावना:**

भारत हा खेड्यांचा देश आहे. आजही देशातील 70 टक्के लोक खेड्यात राहतात व शेती हा व्यवसाय करतात. जगाच्या पाठीवर कृषिप्रधान देश म्हणून आपल्या देशाची ओळखआहे.शेती हाच त्यांचा प्रमुख व्यवसाय आहे. कडधान्य, मसाल्याची पिके, फळे अशी विविध पिके शेतकरी घेताना दिसतो. ग्रामीण संस्कृती ही प्रामुख्याने कृषी संस्कृती असते. शेतीच्या अपयशाशी ग्रामीण जीवन निगडित असते. कुणबी हा ग्रामीण जीवनाचा आत्मा ठरतो. शेती हाच त्याचा प्रमुख व्यवसायआहे. शेती हा व्यवसाय करीत असताना त्याला आलुतेदार व बलुतेदारांची आवश्यकता भासते. ग्रामीण भागातील शेतकऱ्याचे जीवन शेतीवर अवलंबून असते. त्याच्या जीवनाच्या साऱ्या आशा, आकांक्षा, स्वप्ने सारे शेतीशी निगडित असतात. शेतीशी संबंधित असणारे ऋतुमान, निसर्ग, गुरे-ढोरे, सण-समारंभ या सर्व घटकांशी तो बांधलेला असतो. नागपंचमी, दिवाळी, पाडवा, पोळा, हे सण-समारंभ शेती संस्कृतीत महत्त्वाचे मानले जातात. निसर्ग हा शेती संस्कृतीतील महत्त्वाचा घटक आहे. निसर्ग व शेती यांचा अतूट संबंध असतो. उन्हाळा, पावसाळा, हिवाळा, निसर्गातील हे सर्व घटक शेतीला महत्त्वाचे असतात. मात्र ह्या ऋतूमध्ये पावसाळा हा ऋतू फारच महत्त्वाचा असतो. पाऊस पडला तरच शेती पिकते. सगळीकडे आबादानी होते. ग्रामीण जीवनात आनंद होतो आणि शेतकरी समाधानी होतो. मात्र पावसाने हुलकावणी दिली तर शेती पडीक होते. संपूर्ण ग्रामीण जीवनातील सारे घटक उध्वस्त होतात. पावसाच्या या अनिश्चितपणामुळे वारंवार दुष्काळ पडतो.शेतीत येणाऱ्या या अपयशामुळे व निसर्गाच्या लहरीपणामुळे शेतकऱ्यांचे जीवन अस्थिर बनते.कृषी संस्कृतीचा स्पर्श समाजजीवनाच्या सर्वच अंगांना झालेला दिसून येतो. त्यामुळे समाजातील सर्वात महत्वाचा म्हणून शेती व्यवसाय संबोधला जातो.

**संशोधनाची उद्दिष्टे :-**

1. शेतकरी जीवनाचा परिचय करून देणे.
2. ग्रामीण जीवन आणि शेतीचा संबंध अभ्यासणे.
3. ग्रामीण जीवन पद्धतीतील बदल अभ्यासणे.

**माहिती स्रोत आणि अभ्यास पद्धती:-**

1. प्रस्तुत संशोधन निबंध हा प्राथमिक व द्वितीय स्वरूपाच्या माहितीवर आधारलेला आहे.
2. माहिती संकलनासाठी निरीक्षण व मुलाखती या पद्धतीचा वापर केला आहे.
3. इतर आवश्यक माहिती संशोधन लेखातून व इतर संदर्भ ग्रंथातून घेतली आहे.
4. उपलब्ध झालेल्या माहितीवर योग्य संस्करण करून त्या माहितीचे विवेचन व विश्लेषण केले आहे.

**शेतकऱ्यांच्या जीवनाची वैशिष्ट्ये:-**

शेतकरी स्वतः रानात राहून पीक घेतो.वेळ प्रसंगी एखाद्यावर अरिष्ट आल्यास त्याच्या मदतीला तो धावून जातो. त्याच्या मनाचा मोठेपणा येथे दिसून येतो. गावा विषयी त्याला आपुलकी, जिव्हाळा असतो. गाव जगला पाहिजे ही त्यांची भावना असते. दुसऱ्याला जगवणे ही त्याची प्रवृत्ती असते. शेतकरी जीवनाचे हे खास वैशिष्ट्य आहे.ग्रामीण भाग म्हटलं की आपल्याला आठवतात त्या सुंदर बैलगाड्या, नदी, नाले, विहिरी सगळीकडे हिरवेगार असे शेत, चहूकडे हिरवळ, गाई-म्हशी असे विविध पाळीव प्राणी आपल्याला गावात पाहायला मिळतात. आपण सर्वजण अभिमानाने सांगतो की "भारत माझा खेड्यांचा देश आहे." निसर्ग आणि शेतकरीयांचा घनिष्ठ संबंध आहे. शेतकरी आपल्या कौशल्याने निसर्गातील बदलांचा आपल्या पिकांसाठी उपयोग करून घेतो. उन्हाळा, पावसाळा, हिवाळा या वेगवेगळया ऋतूंचा तो पिकांसाठी उपयोग करतो. उन्हाळ्यात जमीन नांगरतो. रानातली मशागतीची कामे तो उन्हाळ्यात करतो. पावसाची चाहूल लागताच तो पेरणीसाठी धडपडतो. पावसाळ्यात पिके जमीन भरून दिसतात. हिवाळा सुरू झाला की, पिके काढणी योग्य होतात. सुगीला सुरुवात होते. पूर्वी निसर्गावर अवलंबून असणारी शेती हळूहळू आधुनिक तंत्राने केली जाऊ लागली.

**शेतकरी व त्याचे कुटुंब**:

शेतकरी कुटुंबात नव्या व जुन्या पिढीतला संघर्ष पहावयास मिळतो. जुन्या पिढीतला शेतकरी पारंपरिक मुल्ये जगताना दिसतो तर नव्या पिढीतला शेतकरी आधुनिक जीवन मूल्यांचा स्वीकार करताना दिसतो. खेड्यात संयुक्त कुटुंबपद्धतीला खूप महत्व असते. शेतीच्या कामात एकत्र कुटुंबपद्धतीचा खूप उपयोग होतो. आजी - आजोबा, आई - वडील, चुलता - चुलती, बहीण, ही नाती ग्रामीण भागात जोपासली जातात. कुटुंबातील माणसांचा, गुराढोरांचा शेती व्यवसायाला हातभार लागतो. त्यामुळे शेतकऱ्याचे कुटुंब एकत्रित नांदत होते;परंतु अलीकडे शिक्षणाचा प्रचार आणि प्रसार होत असल्याने त्याचा फार मोठा परिणाम खेड्यातील जीवनावर झालेला दिसून येतो. शिक्षण, नोकरी, उद्योग, मजुरी या कारणांमुळे अलीकडे शेतकऱ्याची कुटुंबे विभक्त पद्धतीने जीवन जगताना दिसतात.

**शेतकऱ्याची राहणीमान:**

निसर्गाच्या सानिध्यात राहणाऱ्या शेतकऱ्याचे राहणीमान शहरी लोकांपेक्षा वेगळे असते. ऊन, वारा, पाऊस यापासून शरीराचे रक्षण होईल असा त्यांचा पोशाख असतो. पूर्वीभाजी,भाकरी,चटणी,कांदाअसा शेतकऱ्यांचा आहार असे. आज त्यांच्या जीवनात वेगवेगळया प्रकारच्या भाज्या दिसून येतात. शिवाय भाकरीची जागा पोळीने घेतली आहे. नेहमी आपल्या भाषेत बोलणारा शेतकरी त्याच्या बोलीभाषेत अनेक इंग्रजी शब्द आलेले दिसतात. कनेक्शन, लाईट, मोटार सायकल इत्यादी.

**विवाह समारंभ, सणवार:**

शेतकरी कुटुंबात मुलगा – मुलगी वयात आली की त्यांची लग्न शेतकरी लवकर उरकतो. सहाजिकच लग्नाच्या वेळी बारीक-सारीक गोष्टी तपासून पाहिल्या जातात. मगच लग्न ठरविले जाते. हुंडा, देणे-घेणे या प्रथा आजही थोड्या फार प्रमाणात ग्रामीण भागात प्रचलित आहेत. लग्न थाटामाटात व्हावे असे शेतकऱ्यास प्रामुख्याने वाटते. प्रसंगी सावकारी कर्ज काढून तो लग्नासारखे विधी थाटामाटात साजरे करतो. लग्नझाल्यानंतरमुलीलासासर – माहेरया दोन्ही गोष्टी महत्त्वाच्या असतात. दिवाळी, दसरा, रक्षाबंधन, नागपंचमी अशा सणांना भाऊराया त्यांना आणायला जातो.

**शेतकरी व व्यसनाधीनता**:

खेड्यातील बहुतांश शेतकरी विठ्ठल भक्त असतात. त्यांच्या गळयात माळ असते त्यामुळे ते मांसाहार व दारू यांपासून अलिप्त असतात. परंतु काही शेतकरी दारूसारखे व्यसन करतात. शिवाय कर्जबाजारीपणा, ओढाताण, दुष्काळाचे आगमन, कुटुंबातील भांडणतंटा यातून सुटका व्हावी म्हणून काही लोक दारू पिताना दिसतात; तसेच पान तंबाखू यांचे सेवन सर्रास शेतकरी करताना दिसतो. यातच बिडी ओढणे बरेच शेतकरी पसंत करतात. श्रम करत असताना थोडा विरंगुळा मिळावा म्हणून तंबाखू चघळली जाते.

**शेतकरी आणि लोकरूढी**

कृषी संस्कृतीत रूढी व परंपरा यांना खूप महत्त्व असते. शेतकरी कुटुंबात अनेक रूढी परंपरा जपल्या जातात. कोणत्याही कार्यात जाताना मांजर आडवे आल्यास अशुभ मानले जाते. विधवा स्त्रियांना शुभ कार्याला येऊ दिले जात नाही. वधू-वर यांना प्रथम पाहण्यासाठी जाताना तीन माणसे जात नाहीत. घरावर कावळा ओरडल्यास पाहुणा येणार असा संकेत मिळतो. अशा अनेक समजुती ग्रामीण भागात आजही टिकून आहेत.

**शेतकरी व प्रसारमाध्यमे:**

विज्ञानाच्या प्रचार आणि प्रसार यामुळे खेड्याचे रूप बदलले आहे. टीव्ही वर्तमानपत्र टेलीफोन अशा प्रसार माध्यमाने ग्रामीण जीवन झपाटून गेले. जगातल्या घडामोडींची माहिती शेतकऱ्याला मिळू लागली. थोडाफार का होईना या विज्ञानवादी विचारांमुळे अंधश्रद्धेला पायबंद बसला. शेती व्यवसायासाठी आवश्यक असणारी आधुनिक साधने यांची माहिती शेतकऱ्याला मिळू लागली. बी-बियाणे, खते, पाण्याचे नियोजन, ठिबक सिंचन, तुषार पद्धत अल्पकाळात जास्त उत्पादन कसे घेता येईल या विषयीची माहिती त्याला घरबसल्या मिळू लागली.

**शिक्षण आणि शेतकरी:**

महात्मा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महर्षी विठ्ठल रामजी शिंदे, कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या प्रयत्नाने ग्रामीण भागात शिक्षणाची गंगा आली. शेतकरी कुटुंबातील बोटावर मोजण्याइतपत मुले उच्च शिक्षण घेताना दिसतात. त्यात नोकरीसाठी बाहेरगावी जाण्यासाठी त्यांची मानसिकता तयार होत नाही. शेती संस्कृतीशी तो घट्ट बांधला गेलेला असतो. शेतकऱ्यांच्या मुलांना मालक म्हणून जगायचे असते. असे संस्कार त्यांच्यावर लहानपणापासून झालेले असतात. आपल्या हाताखाली नेहमी चार-पाच मजूर राबतात. मग आपण नोकर म्हणून कसे काम करायचे असे त्याला वाटते. शिवाय शेतकरी कुटुंबात मुलगा जन्माला आला की हळूहळू शेतीची कामे त्याच्या मागे लागतात. तो शेतीच्या कामात गुरफटला जातो. त्यामुळे शिक्षणासाठी अभ्यासासाठी त्याला पाहिजे तेवढा वेळ मिळत नाही. यामुळेच त्याला शिक्षणात यश प्राप्त करता येत नाही. वारंवार येणारे दुष्काळ, शेतीत येणारे अपयश, कर्जबाजारीपणा, ओढाताण, आर्थिक बाजू कमकुवत असल्यामुळे घरात असणारे ताण-तणाव या साऱ्याचा परिणाम त्याच्या शिक्षणावर होतो. त्यामुळे ना शिक्षण ना शेती अशी त्याची अवस्था होताना दिसते. उच्च शिक्षणामुळे त्याचा शहराशी संपर्क येतो. कळत-नकळत शहराचे संस्कार त्याच्यावर झालेले दिसतात. सहाजिकच त्यांची व खेड्याची नाळ तुटते. मात्र शिक्षणात गुणवत्ता नसल्यामुळे नोकरीची हमी नसते. शहरात राहिल्यामुळे त्याचे खेड्यात मन लागत नाही. मग नोकरी नाही आणि शेती नाही त्यामुळे खेड्यातील बेकारीचे प्रमाण जास्त दिसून येते.

**राजकारण आणि शेतकरी:**

खेड्यातील मातब्बर शेतकरी निवडणूक लढवित असतो.तो प्रतिष्ठेसाठी पाहिजे तेवढा पैसा खर्च करताना दिसतो. तो हार मानून घ्यायला तयार नसतो. खेड्यात हार-जीत या गोष्टी फार मानाच्या समजल्या जातात. काही वेळा जय पराजयामुळे खेड्यात संघर्ष होतो. त्यातून मारहाणीचे प्रकार होताना दिसतात. सरपंच असणाऱ्या पुढाऱ्याचा संबंध तालुक्याच्या ठिकाणी असतो. गावात सत्ताधारी जसा गट असतो तसाच विरोधकगटही असतो. दोन्ही गट आलटून-पालटून गावाची सत्ता उपभोगत असतात. पूर्वी शेतकऱ्यांच्या आणि शेतीचा जसा घनिष्ठ संबंध होता. तेवढाच गावातील पाटीलकी आणि शेतकऱ्यांचा घनिष्ठ संबंध होता; परंतु आता पाटील या पदाला पूर्वीसारखे महत्त्व राहिले नाही. आता गावात सरपंच या पदाला महत्त्व असते. आजही खेड्यातल्या राजकारणात दोन गट दिसून येतात. दोन्ही गट सामर्थ्यवान असतात. ग्रामपंचायत, जिल्हा परिषद, पंचायत समिती या निवडणुकांना ग्रामीण भागात खूप महत्त्व असते. गावातील राजकारण व सत्ता आपल्या हातात राहावी म्हणून दोन्ही गट धडपडतात. परंतु एकदा निवडणूक झाली की, पुन्हा खेड्यात राजकारणाला महत्त्व राहत नाही. लग्नसोहळे, सण,समारंभ, यात्रा अशा प्रसंगी राजकारणाचे गटतट विसरून लोक एकत्र येताना दिसतात.

**शेतकरी आणि सहकार**:

शेतकरी वर्गाचा व सहकार क्षेत्राचा घनिषठ संबंध असतो. ग्रामीण भागात असणाऱ्या वेगवेगळया सोसायट्या, नागरी सहकारी पतसंस्था, फळसंघ सहकारी क्षेत्रे इत्यादीचा संबंध येत असतो. अडचण असणाऱ्या शेतकऱ्यांना पतपुरवठा करणे व शेतीचे उत्पन्न वाढविणे हा त्यामागचा प्रमुख हेतूअसतो. सहकारामुळे शेती व्यवसायात परिवर्तन झाले असले तरी सर्वच सहकार क्षेत्रात त्याला फायदा होतो असे

नाही. शेतकऱ्यांकडून कारखान्याला जो ऊस आणला जातो; त्याला ठराविक अशी किंमत सरकार क्षेत्र बांधून देतांना दिसत नाही. दूध संघाचे, फळ संघाचे असेच धोरण आहे. त्यामुळे सर्व सहकारामुळे शेतकऱ्यात परिवर्तन दिसून आले. तरी आर्थिक दृष्ट्या शेतकरी आहे तसाच आहे. पूर्वी कर्जात असणारा शेतकरी आजही कर्जबाजारीदिसतो.

**शेतकरी व जोडधंदे:**

आधुनिक शेती करणारे शेतकरी शेती व्यवसायाला जोडून काही उद्योगधंदे करताना दिसतात. पशुपालन, शेळीपालन व्यवसाय असे छोटे छोटे व्यवसाय करतात. बहुतांश शेतकरी शेळीपालन हा व्यवसाय करतात. शेळीपालन या व्यवसायाला स्वतंत्र व्यवस्था करावी लागत नाही. वर्षाकाठी शेतकऱ्याला खात्रीशीर उत्पादन मिळते. शिवाय शेळीचे लेंडीखत पिकास खूपच उपयुक्त असते. त्यामुळे ग्रामीण भागातील बरेच शेतकरी शेळी पालन करताना दिसतात. शिवाय बहुतांश शेतकरी कोंबड्या पाळताना दिसतात. या कोंबड्या देशी असतात. आठवडे बाजाराला त्यांच्या अंड्यांची वकोंबड्यांची विक्री केली जाते. दुग्ध व्यवसाय ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणावर केला जातो. आजही खेड्यात खिल्लारगाई, जर्सी गाई, म्हैस, जाफराबादी म्हैस शेतकरी पाळताना दिसतो. शेणखत पिकास खूपच उपयुक्त असते. असे छोटे छोटे व्यवसाय करून शेतकरी शेती व्यवसायाला हातभार लावतो.

**शेतकरी आणि बोलीभाषा:**

शेतकरी कुटुंबात बोलीभाषा बोलली जाते. शेती संस्कृतीत काही शब्दांचा वापर शेतकरी नियमितपणे करताना दिसतो. शेतकरी ज्या प्रदेशात राहतो त्या प्रदेशातील बोलीभाषेचा तो वापर करतो. नगदी पिके घेणारा शेतकरी रानात पिकवलेला भाजीपाला घेऊन विक्रीसाठी तालुक्याच्या ठिकाणी येतो. शहरी लोकांचा व त्यांचा संपर्क येतो त्यामुळे शहरी भाषेचे संस्कार कळत नकळत त्यांच्यावर होतात.कृषी संस्कृतीत शेतकऱ्यांची जशी बोलीभाषा असते तशीच कृषी संस्कृतीशी निगडित असणाऱ्या बलुतेदार व अलुतेदार यांची स्वतंत्र बोलीभाषा असते. तसेच शेती संस्कृतीत असणारे काही शब्द आलुतेदार बुलतेदार वापरताना दिसतात रांजण, डेरा, परात, मडकं असे काही शब्द वापरतात. खेड्यातील बोलीभाषा बदलत जाताना दिसते. आज-काल शेतकरी बोलीभाषेत अनेक इंग्रजी शब्द वापरताना दिसतो. टेबल, फॅन, ग्लास, मोटारसायकल, लाईट, पॅन्ट, शर्ट इत्यादी.

**संदर्भ ग्रंथ:**

1. महाराष्ट्रातील शेती आणि शेतकरी - शांताराम बोकील, अभिनंदन प्रकाशन कोल्हापूर पहिली आवृत्ती 2007.
2. भारताचा कृषी भूगोल - प्रा. के. ए. खतीब, मेहता पब्लिशिंग हाऊस पुणे, द्वितीय आवृत्ती 1991.
3. मळ्याची माती - डॉ. आनंद यादव, मेहता पब्लिशिंग हाऊस पुणे, द्वितीय आवृत्ती 1987.
4. ग्रामीण साहित्य आणि शेतकरी जीवन - प्रा. वामन जाधव, शिक्षक हाउसिंग सोसायटी पंढरपूर, तृतीय आवृत्ती 2011.
5. https://campusjugaad.com/mr/gramin-jivanatil-samasya-nibandh-mahiti-bhashan/
6. https://maharashtratimes.com/editorial/article/there-is-no-will-for-betterment-of-agriculture/articleshow/61760115.cms
7. https://www.maayboli.com/node/69619
8. https://mr.wikipedia.org/wiki/%E0%A4%B6%E0%A5%87%E0%A4%A4%E0%A5%80
9. https://www.esakal.com/marathwada/corona-changed-life-style-285526

# "उपाय कोरोना-19 विरुद्धचा - आरोग्य चिंतन" - एक सामाजिक अभ्यास"

**प्रा.सामग सुनिल व्यंकटेश**

समाजशास्त्र विभाग प्रमुख,संत रामदास महविद्यालय,घनसावंगी, जि.जालना.

Email- svsamag@gmail.com

**सारांश (Abstract) :**

प्रस्तुत शोधनिबंधाच्या अभ्यासामध्ये "उपाय कोरोना-19 विरुद्धचा – आरोग्य चिंतन" यांचा आरोग्य व्यवस्थेवर झालेला परिणाम यांचा अभ्यास करणे. या पृथ्वीवर डोळयांनी दिसणाऱ्या सजीवांच्या २० कोटी व सूक्ष्मजीवांच्या सुमारे ४० कोटी प्रजाती, शंभर वर्षांपूर्वी होत्या. विषाणू' हा माणसासाठी हानिकारक अतिसूक्ष्मजीव, अनुकूल स्थिती व पोषण उपलब्ध असल्यास, एका दिवसात २८०००० अब्ज जीव वाढवतो. आपण लोकसंख्या वाढली वाढली म्हणून ओरड करतो.पण पृथ्वीवर माणसांची संख्या वाढून वाढून किती झाली, तर सुमारे ७५० कोटी. सूक्ष्मजीवांच्या संख्येचा व क्षमतेचा विचार केला तर आपण त्यांच्या खिजगणतीतही नाही. भले आपण स्वतःला सर्वश्रेष्ठ व शक्तीवान मानत असू, ७५० कोटींना ते कधीही पुसुन टाकू शकतात. जगात रोज हजारो माणसांना एडसची लागण होते. कधीना कधी अशी संहारक क्षमता बाळगणारा, पण हवा, पाणी किंवा डासांमार्फत प्रसार होणारा विषाणू येणार हे नक्की होते. हवेतून प्रसार होणारा या क्षमतेचा विषाणू कोरोनाच्या रूपात आला आहे, ही सर्वात चिंताजनक गोष्ट आहे. अजून पाण्यातून वा डासांतर्फे पसरणारा असा विषाणू आलेला नाही हे नशीब आहे.

**बीजसंज्ञा (Keywords):** कोरोना-19, विषाणू, पशू, पक्षी ,किडे, मुंगी, सृष्टीची उभारणी,
मनाचा क्षोभ, अशांति, वासना , इच्छा , हेतु, उपाय कोरोना-19 विरुद्धचा .

## प्रस्तावना (Introduction) :

प्रस्तुत शोधनिबंधामध्ये "उपाय कोरोना-19 विरुद्धचा – आरोग्य चिंतन" यांचा आरोग्य व्यवस्थेवर झालेला परिणाम यांचा अभ्यास करणे. नवनव्या तंत्रज्ञानाबरोबर निसर्गाच्या शोषणाची चढाओढ सुरू झाली. लेप्टोस्पायरोसिससारख्या आजारांच्या विषाणूंचे आणि खाड्या, खाजणे, नद्या, सागरांतील प्रदूषण व जीवसृष्टीचा समूळ नाश यांचे नक्की नाते आहे. जहाल रसायनांना तोंड देण्यासाठी अतिसूक्ष्म जीवांना आपल्या शरीरात बदल करावा लागतो व त्यांचे बदललेले गुणधर्म इतर सजीवांना अपायकारक ठरतात. मुंबईच्या गाभ्यात असलेल्या, भारतातील सर्वात प्रदूषित अशा जलसाठ्याची, माहीमच्या खाडीची परिस्थिती पहावी. म्हणजे विकासाचा जीवसृष्टीच्या संदर्भातील अर्थ कळेल. शंभर वर्षांपूर्वी महाराष्ट्रात भयंकर संहार करणारा प्लेग, त्यावेळच्या सर्वाधिक शहरीकरण झालेल्या हाँगकाँगवरून आलेल्या बोटीतील बाधित उंदरांमुळे पसरला होता. मानव व त्याआधीचा त्याचा पूर्वज वानर लाखो करोडो वर्षे जंगलात होते. हजारो वर्षे माणसे गावांत होती. छोटे समूह परस्परांपासून वेगळे होते. त्यामुळे जीवन शक्य झाले. विषाणू प्रसार व त्यामुळे एकाच वेळी होणाऱ्या उच्चाटनाचा धोका नव्हता. आता शहरे व पृथ्वीव्यापी पर्यटनामुळे तो आहे.

सर्दी, पडशाचे जिवाणू वातावरण व तापमानातील छोट्या फरकाने नाश पावतात परंतु सर्वात प्रतिकुलतेत जगू शकणाऱ्या जिवाणूंची कल्पनाही करणे कठीण आहे. तीव्र सल्फ्युरिक आम्लात जगणारे, तीव्र किरणोत्सारात, भूकवचात खोलवर आत्यंतिक उष्णतेत लोह, सल्फर, मँगेनीज इ. खाऊन जगणारे, बर्फात किंवा उकळत्या पाण्यातही टिकणारे सूक्ष्मजीव आहेत. आतापर्यंत आढळलेला, पेनिसिल्व्हानिया विद्यापीठातील संशोधकांनी जागृतावस्थेत आणलेला सर्वात दीर्घजीवी सजीव हा ६०० मीटर खोलीवर मेक्सिकोतील मिठाच्या खाणीत आढळलेला, २५ कोटी वर्षे सुप्तावस्थेत राहिलेला जिवाणु आहे. खरे जैविक जग हे माणसाच्या निरिक्षणापलिकडचे आहे. पृथ्वी हा जसा 'जलग्रह' आहे तसाच तो 'सूक्ष्मजीवग्रह' आहे. खरे तर पृथ्वीवर आपण जगत आहोत कारण सूक्ष्मजीवांनी परवानगी दिली आहे.

**अभ्यास क्षेत्र (Study Area)** :

प्रस्तुत शोधनिबंधाच्या अभ्यासा करिता अभ्यास क्षेत्र म्हणून संपूर्ण भारत देशाचा विचार करण्यात आलेला आहे. भारतातील मुख्य भूप्रदेशाचा अक्षवृत्तीय विस्तार 8°4′ 28” उत्तर ते 37°6′53′ 'उत्तर असा आहे. भारताचा अक्षवृत्तीय विस्तार 29°2′ 25” इतका आहे.भारताचा रेखावृत्तीय विस्तार 68°7′33” पूर्व ते 97°24′ 47” पूर्व इतका आहे. त्यानुसार भारताचा रेखावृत्तीय विस्तार 29° 17′ 14” इतकाआहे.

**संशोधनाची उद्दिष्टे (Objectives) :**

1) विविध आजाराच्या साथी येतात-जातात, दुष्काळ, महापूर, भूकंप इ. नैसर्गिक गोष्टी घडणे हा एक नैसर्गिक भाग आहे. महामारी हे एक निसर्गाची संतुलनाची व्यवस्था आहे. यांचा अभ्यास करणे.
2) कोरोना – १९ व्हायरस हे जिवंत व्यक्तिमत्त्व नाही. त्यामुळे त्याला मारू शकत नाही. तो शरीरात गेल्यानंतरच जैविक लक्षणे दाखवतो.यांचा आरोग्य व्यवस्थेवर झालेला परिणाम यांचा अभ्यास करणे.
3) परमेश्वराची व संत महात्मे, थोर स्वातंत्र सेनानी आणि थोर समाज सुधारक याञ्चि चरित्रे श्रवण करावी. ती एक मोठी सिद्धीच आहे. एकाग्रतेने श्रवण केल्याने ज्ञानात भर पडते. अज्ञानाचा अंध:कार नाहिसा होतो आणि सहज भक्ति घडते.

**गृहितके (**Hypothesis**)** :

१) पूर्वी येऊन गेलेल्या साथीवर अनेक मानसशास्त्रज्ञांनी समाजातील लोकांचे सर्व्हे केले तेव्हा लक्षात असे आले की, प्लेग, देवी वगैरे आजारांनी मेलेल्या लोकांपेक्षा नुसत्या भीतीने मेलेल्या लोकांची संख्या जास्त होती.
२) अनेक प्रकारच्या रोगांने झालेल्या मृत्यूचा आकडा पाहिला तर तो आकडा कोरोनापेक्षा कितीतरी पटीने जास्त आहे. मात्र कोरोनाने झालेल्या मृत्यूचा स्फोट केला जातोय. जगात कुठेही कोणी कोरोनाने मेले तर लाखो-कोट्यवधी माध्यमांतून त्याची बातमी जगभर पसरवली जातेय.
३) या विश्वातील सर्व प्रकारचे पशू, पक्षी, प्राणी, किटक, जिवाणू, विषाणू हे सर्व निसर्गाचे अविभाज्य घटक आहेत. त्यांच्याबरोबरच आपणास आपले जीवन जगायचे आहे. याविषयी मानवी समाजात आत्मविश्वास निर्माण होईल असे उपाय भारतीय संत साहित्यात आहेत .

**माहिती स्त्रोत व संशोधन पद्धती (Research Methodology) :**

कोणत्याही विषयातील संशोधन करीत असतांना ते संशोधन शास्त्र शुध्द व्हावे अचुक निष्कर्ष निघावे विषयाची उद्दिष्ट साध्य व्हावेत आणि वस्तुस्थितीची सत्य आकलन व्हावे यासाठी विविध विषयानुरुप विशिष्ट संशोधन पध्दतीचा अवलंब केला जातो. उपाय कोरोना-19 विरुद्धचा – आरोग्य चिंतन”यांचा आरोग्य व्यवस्थेवर झालेला परिणाम यांचा अभ्यास करणे. कोरोना-19 समस्या व त्यावरील उपाययोजना या विषयाच्या संशोधनासाठी विश्लेषणात्मक, वर्णनात्मक पध्दतीचा वापर केला असून तथ्य संकलनासाठी द्वितीय सामग्रीचा अवलंब केला आहे.

**विषय विवेचन** (**Subject Analysis)** :

कोरोना-१९ हा एक कॉमन कोल्ड आहे. कॉमन कोल्ड म्हणजे साधा सर्दीचा आजार! अनेक ग्रंथामध्ये त्याची ओळख कॉमन कोल्ड या नावाखालीच दिलेली आहे. हा आजार आतापर्यंत अनेकांना कितीतरी वेळा होऊन गेलेला असेल. आणि कित्येकांना लागण होऊनही काहीच लक्षणे न दिसल्याने आपोआप बराही झालेला असेल.

कोरोनाच्या व्हायरसची जरी लागण झाली तरी 80 टक्के लोकांना काहीच लक्षणे दिसत नाहीत. तो आजार येतो आणि चार-सहा दिवसांमध्ये आपोआप निघूनही जातो.15 टक्के लोकांना सामान्य उपचारांची गरज भासते. तेही साध्या उपचाराने बरे होऊ शकतात. पाच टक्के लोकांच्या बाबतीत मात्र कॉम्प्लेक्स निर्माण होऊ शकतो. पण हे पाच टक्के लोक म्हणजे जे वयोवृद्ध आहेत, ज्यांची प्रतिकारशक्ती अगदी मामुली आहे, ज्यांना डायबिटीस, हृदयविकार, टी.बी. किंवा तत्सम स्वरूपाचा पूर्वीचाच कुठला तरी आजार आहे. अशा लोकांपैकी काही लोक मरू शकतात. हे आहे कोरोनाचे सत्य. म्हणजे सुमारे 95 टक्के लोकांना कोरोनामुळे मृत्यू येण्याची शक्यता जवळ जवळ नगण्य आहे.

कोरोनाचा प्रसार हवेतून होत नाही. त्यामुळे आपण एकटे असताना किंवा आपल्या आसपास काही फुटांवर कोणी माणूस नसताना तोंडाला मास्क बांधणे अवैज्ञानिक आहे. कोरोनाचा आकार आहे, शंभर नॅनोमिटर. आणि आपल्या फडक्याची छिद्रे किती मोठी असतात, आपणास माहीत आहेच. मित्रांनो! आपण नव्हतो, तेव्हाही लाखो व्हायरस होते आणि आपण नसल्यानंतरही व्हायरस राहाणार आहेत. त्यातून एक फार मोठी भिती जनमानसामध्ये पसरली आहे. मरणाच्या बातम्या पुन्हा पुन्हा सांगितल्या जात आहेत. चांगले झालेल्या लोकांचे आकडे फोकस करून सांगितले जात नाहीत.

जेव्हा कुठल्याही गोष्टीचा अतिरेक होतो, अनेक गोष्टींमध्ये विषमता निर्माण होते, सृष्टीचक्रामध्ये काही वेगळ्या गोष्टी घडू लागतात, तेव्हा अशा घटना घडतात आणि त्याचे संतुलन साधले जाते. ही व्यवस्थासुद्धा नैसर्गिक नियमाचाच एक भाग आहे.जन्म-मरण हे चक्र सातत्याने सुरूच आहे. निसर्ग काही आपल्या हातातील गोष्ट नाही. तो सातत्याने वेगवेगळ्या प्रकारची परिस्थिती आपल्यापुढे निर्माण करीत असतो. त्या परिस्थितीला आपण सामोरे कसे जातो किंवा तिचा मुकाबला कसा करतो, तिला प्रतिसाद कसा व काय देतो, याच्यावर आपले जीवन, जगणे आणि त्याचे परिणाम अवलंबून असतात.

**कोरोना- १९ भीतीचे परिणाम :**

या विश्वातील सर्व प्रकारचे पशू, पक्षी, प्राणी, किटक, जिवाणू, विषाणू हे सर्व निसर्गाचे अविभाज्य घटक आहेत. त्यांच्याबरोबरच आपणास आपले जीवन जगायचे आहे. या जगात सुमारे 2 लाख 30 हजार प्रकारचे व्हायरस आहेत. आपण त्यांना टाळू शकत नाही. तर आपण स्वतःला अधिक सामर्थ्यशाली, शक्तीशाली बनवावे लागते. त्याच्या काही पद्धती आहेत. कुठल्याही साथीला, आजाराला, परिस्थितीला सामोरे जायचे असते. भ्यायचे नसते. पूर्ण शक्तिनिशी त्याचा मुकाबला करायचा असतो. यातच माणसाचे मनुष्यपण आहे. पण आज जास्तीत जास्त भीतीचे वातावरण पसरवण्याचे काम जणू काय मुद्दाम केले जातेय असे वाटायला लागते. त्याच्या ब्रेकिंग न्यूजचा विषय बनवला गेलाय. सामान्य माणसाला इतर गोष्टींची माहिती नसल्याने भीतीने ते अगदी गांगरून जातात. ही भीती का पसरवली जातेय, त्याचे कारण आहे.

आपण व्हायरसपासून पळून जाऊ शकत नाही. घरात कोंढून घेतले तरी आपल्या घरात आपल्या आसपास हजारो-लाखो व्हायरस वावरत असतात! खरे तर व्हायरस हा आपला निसर्गातील एक सोबती आहे, सहचारी आहे. मग आपण काय करायचे? आपण जसे पडणाऱ्या पावसाला थोपवून धरू शकत नाही. तसे व्हायरसला थोपवू शकत नाही. मग पावसापासून संरक्षण करण्यासाठी आपण काय करतो? आपण छत्रीचा वापर करतो. नेहमीसाठी घर बांधून ठेवतो. जेव्हा लढायी सुरू असते तेव्हा आपल्यावर वार होऊ नये म्हणून आपण काय करतो? आपण ढालीचा वापर करतो आणि आलेला वार त्याच्यावर झेलतो. तसेच व्हायरसचा मार झेलण्यासाठी आपल्या शरीरात प्रतिकारशक्ती नावाची जी ढाल आहे, तिचा वापर करणे हाच याचा प्रथम आणि शेवटचा सर्वोत्तम उपाय आहे. हा उपाय कोण सांगू शकते? जनमानसापर्यंत कोण घेऊन जाऊ शकते? हे काम डब्ल्यू. एच. ओ. करणार नाही. हे काम इंडियन मेडिकल असोशिएशन करणार नाही. हे काम फक्त आयुष मंत्रालय करू शकते. आता फक्त एकच आशा भारतातील आयुष मंत्रालयावर आहे.

**माणसे का मरताहेत? :**

कोरोना एक कॉमन कोल्ड आहे, तर इतकी माणसे का मरताहेत? असा स्वाभाविक प्रश्न विचारला जातोय.

१) त्याचे उत्तर असे की माणसे नेहमीच मरत असतात. ती जगभर मरतात. कोरोनाच्या नावावर जेवढी मरणे खपवली त्याच्यापेक्षा जास्त दुसऱ्या आजाराने
मरताहेत. संपूर्ण जगातील आकडा इतर रोगांच्या मानाने फारच कमी आहे.

२) ज्या इटलीमध्ये जास्त माणसे मेली कारण इटलीत वृद्ध माणसांची संख्या जास्त आहे. म्हातारी माणसे काहीतरी निमित्त होऊन मरतातच.

३) सर्वात महत्त्वाचा भाग म्हणजे माणसे उपचाराच्या पद्धतीमुळे जास्त मरताहेत! कोरोना झालेल्या माणसांवर जे प्रोटोकॉलनुसार उपचार केले जाताहेत त्यामुळे माणसे जास्त मरताहेत. कारण त्याच्यावर नको त्या औषधांचा मारा

केला जातोय. त्यामुळे जीवनशक्ती अगदी कमकुवत होऊन जाते आणि मग शरीर साथ द्यायची सोडून देते. म्हणजे इथे रोगापेक्षा उपाय भयंकर आहे.

४) गेल्या वर्षी इटलीमध्ये नुसत्या मलेरियाने दोन लाख लोक मेले होते. मात्र त्याच्या अशा बातम्या दाखवल्या नाहीत. त्याच्या ब्रेकिंग न्यूज आल्या नाहीत. म्हणून ते लोकांना माहीत नाही. ईश्वर ना करो, पण इटलीमध्ये अजून मरणाचा आकडा वाढू शकतो. कारण प्रत्येक वर्षी तिथे तेवढे लोक इन्फेक्शनने मरतातच. आय. एल. आय. म्हणजे इन्फ्लुएंझा लाईड इलनेस या आजाराने 20 हजारांहून लोक मेले होते.

**संत वाङ्मय आणि सामाजिक स्थिरता :**

पशू पक्षी किडा मुंगी । जीवमात्र निर्माण जगीं । जाणीवकळा सर्वांलागीं । येकचि हे ॥

सर्वांस जळ ते सीतळ । सर्वांस अग्नि ते जाळ । सर्वांस अंत:कर्ण केवळ । जाणती कळा ॥ श्रीमत दासबोध ग्रंथ ( १०/०१/१७-१८ )

सर्वांचेच अंत:करण एक कसे ? अंत:करण म्हणजे जाणती कळा.जाणीव कळा म्हणजे जाणणे ही प्रक्रिया.पशू पक्षी किडे मुंगी असे लक्षावधी जीव या सृष्टीवर निर्माण होतात.समज किंवा जाण ही सर्वांना सारखीच असते.प्रमाण, तीव्रता भिन्न भिन्न असेल परंतु सर्वच प्राणीमात्रांना पाणी हे शीतल आहे.अग्नी हा उष्णच आहे.तो चटका लावणारच.याचे कारण अंत:करण किंवा जाणती कळा पशू पक्षी प्राणी यांच्यामधे पिढयानपिढया एकच आहे. एकच राहणार आहे.

**सारांश (Conclusion) :**

चेहरा आणि डोळे यांना हाताने स्पर्श न करणे. फ्लू आणि कोरोनाव्हायरस यापासून वाचण्याचा सध्या हा एकच प्रतिबंधक उपाय आहे. विषाणू हवेतील सूक्ष्म कणातून पसरतात. श्वसनमार्गात असे सूक्ष्म कण आल्यास श्वसनमार्गाच्या पेशीमध्ये त्यांची वाढ होते.

"जे जे भेटे भूत ते ते मानीजे भगवंत" आपला जो उद्योग, नोकरी असेल ती सेवाभावाने कार्य करणे, "अनेकी सदा एक देवासी पाहे" ही वृत्ती ठेवावी".देव माझा आहे असे म्हणण्यापेक्षा मी देवाचा आहे हा भाव दृढ झाल्यास आत्मनिवेदन भक्ति साधते. भक्तिने मनाचे आरोग्य ऊत्तम राहते. विवेक जागृत राहतो, ऊत्तम सवयी जडतात, दृष्टी बदलते. मनाला शिकवण मिळते." मी"कोण याची जाणीव होते. आत्मज्ञान प्राप्त होते. सारासार विवेक कळतो. जीवनाची ईतिकर्तव्यता समजते.भक्ति,श्रवणाने मनुष्याला जगण्यासाठी खाल्ले पाहिजे ,खाण्यासाठी जगू नये हे कळते .मनाचे आरोग्य ऊत्तम राहते.

कोविड -19 महामारीचा प्रभाव, ज्यामुळे पर्यावरणाच्या विविध घटकांमध्ये लक्षणीय बदल झाले आहेत. जागतिक लॉकडाऊनमुळे निसर्ग, परिसंस्था आणि जैवविविधता या सर्वांचे पुनरुज्जीवन झाले आहे. वस्तूंवर केंद्रित झालेली वासना माणसाला विवेकभ्रष्ट करते . आविवेकी माणूस वासनापूर्तीसाठीं करूं नये तें करता. त्यामुळें समाजांत त्याची किंमत उरत नाही.

आत्तापर्यंत आपण निसर्गाचे शोषण करून भौतिकवादी जीवनाला इंधन देत होतो पण त्यावर थोडेसे अंकुश आले आहे. हे भविष्यासाठी चांगले लक्षण आहे. आता आपण भारताचे योगिक जीवन, साधी राहणी, उच्च विचार परंपरा, दयाळूपणा, प्रेम या दिशेने वाटचाल करत आहोत.नैसर्गिक संतुलन कसे राखता येईल हे चांगले समजले आहे.या लॉकडाऊनने आपल्याला कुटुंब आणि आरोग्याचे महत्त्व शिकवले आहे. जरी लॉकडाऊनमुळे आर्थिक आणि सामाजिक नुकसान झाले असले, तरी भारतीय संस्कृतीची ओळख योगिक जीवनाकडे परत येण्याने आपले जीवन सुखी आणि संतुलित होईल.

**कोरोना -१९ मुळे उद्भवलेल्या समस्या :**

१) अन्नधान्याची टंचाई. २) अंगातील आळस वाढने. ३) महागाई ४) व्यवसाय ठप्प झाले ५) बेरोजगार वाढले

**शिफारशी (Recommendation)**:

१) कोरोना काळात उद्भवलेल्या परिस्थितीमुळे शेकडो युवा उद्योजकांना प्रचंड समस्या आणि आर्थिक अडचणींना अजूनही सामोरे जावे लागत आहे. औद्योगिक क्षेत्र हवालदिल झाले आहे. त्यांना समजावून घेऊन अडी-अडचणी सोडविणे गरजेचे आहे.

२) देशांतर्गत वित्तीय परिस्थितीमधील सुकरता, सकारात्मक वित्तीय प्रेरणा आणि पुरवठा प्रक्रियेतील अडथळे दूर करणं, यातूनच अर्थव्यवस्थेतील चेतना जागी होईल. चक्राकार- प्रतिकारक स्थिरीकरण साधणारं विस्तारात्मक वित्तीय धोरण राबवून एकत्रित मागणी पुन्हा सुरळीत करावी लागेल.

३) गर्दीच्या ठिकाणी प्रवास करायचा असल्यास तोंडावर स्वच्छ रुमाल बांधणे पुरेसे आहे. लोकल, बस , सिनेमागृहे, यात्रा शक्यतो टाळा. स्वत:च्या वाहनातून प्रवास करताना वाहने स्वच्छ ठेवा. भरपूर पाण्याने व साबणाने हात धुवा. साबण जंतुनाशकच हवा असा आग्रह नाही.

४) भक्तिने मनाचे आरोग्य ऊत्तम राहते. विवेक जागृत राहतो, ऊत्तम सवयी जडतात, दृष्टी बदलते. मनाला शिकवण मिळते." मी"कोण याची जाणीव होते. आत्मज्ञान प्राप्त होते. सारासार विवेक कळतो. जीवनाची ईतिकर्तव्यता समजते.

५) कोरोनाव्हायरस कशापासून उत्क्रांत झाला हे अजून उघडकीस यायचे आहे. तोपर्यंत फक्त काळजी घेणे एवढेच आपण करू शकतो.

**संदर्भ (Reference) :**


1. डॉ. विठ्ठल घारापुरे: पर्यावरण भूगोल. पिंपळापुरे अँड कंपनी पब्लिशर्स नागपूर.
2. डॉ.विठ्ठल घारापुरे : मानवी भूगोल. पिंपाळापुरे अँड कंपनी पब्लिकेशन नागपुर.
3. भूगोलाची मूलतत्त्वे (खंड दुसरा) : प्रकाशक निराली प्रकाशन ,पुणे फेब्रु- २००९
4. पर्यावरणीय अध्ययन : प्रा. सवदी, कोळेकर, जोशी, निराली प्रकाशन, पुणे.
5. आर्थिक भूगोल : प्रा. सवदी, कोळेकर. प्रगती बुक्स प्रा. लि. पुणे.
6. डॉ. द.धी.काचोळे : समाजशास्त्र
7. दैनिक लोकमत
8. दैनिक पुण्यनगरी
9. दैनिक दिव्यमराठी
10. https://m.jagran.com
11. https://www.mpnrc.org
12. https://www.cowin.gov.in
13. https://www.maharashtra.gov.in
14. http://www.google.com/search?qcatche
15. www.maharashtra.gov.in/pdf/ECONOMIC

'Journal of Research & Development' A Multidisciplinary International Level Referred and Peer Reviewed Journal,
Impact Factor-7.265, ISSN: 2230-9578, 30 October2021, Volume-12, Issue-15
Agriculture and Rural Development: Strategic Issues and Reform Options

# २०१४ नंतर काँग्रेस पक्षाच्या वाटचालीचा चिकित्सक अभ्यास

**प्रा. मारुती चांगदेव हजारे[1] प्राचार्य डॉ. सुनीलकुमार कुरणे[2]**

[1]संतोष भीमराव पाटील आट्र्स, कॉमर्स आणि सायन्स महाविद्यालय, मंद्रूप

[2]समाजभूषण गणपतराव काळभोरमहाविद्यालय, लोणी काळभोर, ता. हवेली, जि. पुणे

भारतातील एकछत्री राजकीय वर्चस्व असलेला पक्ष असण्यापासून ते २०१४ व २०१९ च्या लोकसभा निवडणुकीतील कामगिरीपर्यंत, काँग्रेस पक्ष सतत उतरणीचा प्रवास करत आहे. या लेखात २०१४ च्या सार्वत्रिक निवडणुकीनंतरच्या काँग्रेस पक्षाच्या वाटचालीची चिकित्सा करण्याचा प्रयत्न केलेला आहे.

२०१४ मध्ये केंद्रातील काँग्रेस पक्षाच्या आघाडी सरकारवरसातत्याने झालेले भ्रष्टाचाराचे आरोप, वाढलेली महागाई, भ्रष्ट मंत्र्यांवर कारवाईला लागलेला वेळ, मध्यमवर्गामध्ये काँग्रेस पक्षाबद्दल निर्माण झालेला भ्रमनिरास, बेरोजगारी या गोष्टी जशा काँग्रेसच्या पराभवास कारणीभूत आहेत तसेच नरेंद्र मोदींचीनिर्माण झालेली लार्जर दॅन लाइफ अशी प्रतिमा देखील कारणीभूत आहे. नरेंद्र मोदींची या प्रकारची प्रतिमा प्रसारमाध्यमांनी व प्रचाराचा भाग म्हणून पक्षाने उभी केली, त्यामुळे दिल्लीतील राजकीय अवकाशमध्यममार्गी काँग्रेसच्या मध्यवर्ती वैचारिकतेपासून उजव्या बाजूला झुकला. ज्यामुळे २०१४ च्या लोकसभा निवडणुकीतील भारतीय जनता पक्षाचे (भाजप) राजकारण काँग्रेसमुक्त नव्या भारताची स्थापना करण्याचे वचन देणारे नवीन राजकीय प्रवचन ठरले.या राजकीय निवडणुकीनंतर, देशाच्या राजकीय क्षेत्रात काँग्रेस पक्षाच्या अधःपतनावर लक्ष केंद्रित करणारी पत्रकारितेची भरभराट झाली. तसेच काँग्रेस पक्षाच्या वर्तुळात देखील काँग्रेस पक्षाला रोखण्यासाठी झेंडे रोवले गेले. काँग्रेस पक्ष वैचारिकदृष्ट्या गोंधळात गेला. अंतर्गत मतभेद आणि दूरदर्शी रणनीतीचा अभाव यामुळे त्याचे निवडणुकीतील भवितव्य पुनरुज्जीवित करण्यात अपयश आले.सन २०१४ आणि २०१९ च्या लोकसभा निवडणुकांतील मोठ्या विजयांनंतर भाजप यशाच्या उच्चस्थानी पोहोचला. 'शत प्रतिशत भाजप' हे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी 'काँग्रेसमुक्त भारत' ही मोहीम सुरू झाली. नव्वदीच्या दशकापासून भाजपने हिंदुत्व, विकास, आघाडी राजकारण या आधारावर विस्ताराचे धोरण राबविले. काँग्रेस किंवा इतर प्रादेशिक पक्षांतील नेतृत्वास भाजपत आणण्याचे प्रयोग २०१४ पासून सुरू झाले. पक्षांतराचे प्रमाण २०१९ मध्ये वाढलेले दिसते. प्रस्थापित जाती-समुदायांशिवाय इतर मागास, अनुसूचित जाती-जमातींना पक्ष संघटनेत स्थान देऊन भाजपने आपला सामाजिक आधार वाढविला. मुस्लिम वगळता भाजपने पूर्वीच्या काँग्रेसचा आधार व्यापला आहे. आज भाजप सत्तेचा गैरवापर करून पक्षांतरास भाग पाडत असल्याचा दोन्ही काँग्रेसचा आरोप एका बाजूला मान्य केला, तरी जे मुळातच काँग्रेस विचारांपेक्षा सत्तेसाठी काँग्रेसमध्ये होते ते पक्ष सोडत आहेत, हा मुद्दाही तितकाच महत्त्वाचा ठरतो.

२०१५ -१६ मध्ये झालेल्या घटकराज्यांच्या विधानसभा निवडणुकीमध्ये सुद्धा काँग्रेस पक्षास पराभवाला सामोरे जावे लागले. मार्चमध्ये उत्तर प्रदेश, उत्तराखंड, पंजाब, मणिपूर आणि गोवा या राज्यांत झालेल्या विधानसभा निवडणुका या मोदींनी हाती घेतलेल्या नोटाबंदी आणि भाजप सरकारचे मध्यावधी मूल्यांकन असे एक प्रकारचे सार्वमत होते. नोटाबंदीच्या मुद्द्याने एक तीव्र राजकीय फूट निर्माण केली आणि काँग्रेसला केवळ भगवी जुगलबंदी थांबवण्याचीच नव्हे, तर आपली हरवत चाललेली परंपरा पूर्ववत करण्यासाठी आणि राजकीय यू-टर्न घेण्याची अत्यंत आवश्यक संधी उपलब्ध करून दिली.उत्तर प्रदेश आणि उत्तराखंडच्या मतदारांनी भगवा पक्षाला स्वतंत्र भारतातील सर्वात मोठ्या राज्य निवडणुकीतील जनादेश दिला. काँग्रेसने पंजाबमध्ये दिलासादायक विजय नोंदवला आणि मणिपूर आणि गोव्यात सर्वात मोठा पक्ष म्हणून भारतीय जनता पक्षाचा उदय झाला. छोट्या राज्यांमध्ये सरकार स्थापन करण्याची संधी काँग्रेस पक्षाने गमावली. हे मुख्यत्वे पक्षाच्या राज्य संभाषणकर्त्यांद्वारे खराब वाटाघाटी आणि त्याच्या राष्ट्रीय नेतृत्वाद्वारे फ्लिप फ्लॉपमुळे झाले. घटत्या चक्राने पूर्ण चक्र फिरवले आणि काँग्रेस आता फक्त चार राज्यांमध्ये सत्तेवर आहे.महाराष्ट्र,पंजाब, राजस्थान, मध्यप्रदेश व छत्तीसगडमध्ये काँग्रेस पक्षाची सत्ता उरलेली आहे.तर दुसरीकडे, भाजपने स्वबळावर किंवा युतीने १७ राज्यांमध्ये आपली राजकीय सत्ता वाढवलीआहे. भारताचानिवडणूकनकाशाजवळपासभगवाझालाआहे, जो देशाच्या राजकारणातील एक प्रमुख खेळाडू म्हणून भाजपच्या उदय झालेला आहे

राजीव गांधींच्या हत्येनंतर राजकारणापासून दूर राहिलेल्या सोनिया गांधींनी २००४ मध्ये पक्षाची सूत्रे हाती घेऊन पक्षाला पुन्हा चांगली स्थिती निर्माण केली आणि २००४ मध्ये पक्षाला केंद्रात पुन्हा सत्तेवर आणले.

२००४ मधील लोकसभा निवडणूक ही लोकप्रिय पंतप्रधान वाजपेयी यांच्या नेतृत्वाखालील NDA आणि सोनिया गांधी यांच्या नेतृत्वाखाली काँग्रेसच्या नेतृत्वाखालील संयुक्त पुरोगामी आघाडी (UPA) यांच्यातील लढाई होती. एनडीए सरकारने वाजवी कामगिरी केली होती, परंतु गुजरातमधील दंगल आणि त्याची “इंडिया शायनिंग” मोहीम मतदारांच्या पसंतीस उतरली नाही आणि ती निवडणूक आपल्या मुख्य प्रतिस्पर्ध्याकडून हरली. मनमोहन सिंग यूपीए सरकारचे पंतप्रधान झाले. नेतृत्व एका व्यक्तीपासून मनमोहन-सोनिया-राहुल त्रयोदिकांपर्यंत कमी करण्यात आले ज्याने पाच वर्षे (२००४-०९) चांगले काम केले आणि २००९ च्या राष्ट्रीय निवडणुकीत स्वबळावर २०० हून अधिक जागा जिंकून सत्ता टिकवून ठेवली. मनमोहन सिंग, सोनिया गांधी आणि राहुल गांधी यांचे एकत्रित नेतृत्व, राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना (NREGS), शेतकरी कर्जमाफी योजना, UPA सरकारची गरीब समर्थक धोरणे, स्थिरतेचा आत्मविश्वास आणि विजय यामुळे काँग्रेसची कामगिरी प्रभावी राहिली होती. UPA II सरकारमधील असंख्य घोटाळे, उच्च महागाई आणि बेरोजगारी दर, महागाई वाढ आणि गेल्या काही वर्षांच्या कारकिर्दीत देशाला झालेला धोरणात्मक लकवा यामुळे काँग्रेसने २००९ मध्ये मिळवलेले फायदे २०१४ मध्ये गमावले. २०१४ मधील सार्वत्रिक निवडणुकीत काँग्रेसची खरी अधोगती दिसून आली कारण देशात एकाच वेळी दोन प्रवाह चालू असल्याने एका नवीन आयामासह "लहर" निवडणुकीचे साक्षीदार झाले. पहिला प्रवाह काँग्रेसच्या विरोधात मजबूत सत्ताविरोधी लाट होती ज्यामुळे त्यांच्या जागांची संख्या 44 वर ढकलली जी सर्वात कमी आहे आणि त्यांची मतांची टक्केवारी 20% च्या खाली गेली. दुसरी लाट भाजपचे पंतप्रधान नियुक्त नरेंद्र मोदी यांच्या बाजूने होती ज्याने भाजपला दिल्लीत आरामदायी बहुमताने सत्तेवर आणले आणि सत्तेच्या राजकारणाच्या राष्ट्रीय स्पेक्ट्रममध्ये भाजपच्या वर्चस्वाची सुरुवात झाल्याचे संकेत दिले.नेहरूंच्या काळात पेरलेल्या काँग्रेस पक्षाच्या अधोगतीची बीजे इंदिराजींच्या काळात उगवली आणि वाढली आणि सोनिया-राहुलच्या काळात पूर्ण वाढलेले झाड होण्याआधी ते आपल्या अतिभारामुळे कोलमडून पडण्याची शक्यता निर्माण झाली. इंदिराजींच्या काळात निर्माण झालेल्या काँग्रेस पक्षाच्या अधःपतनाची कारणे सध्याच्या नेतृत्वाने शोधून काढली नाहीत. काँग्रेस सरकार आणि पक्षाच्या कार्यपद्धतीने नवीन समस्यांना जन्म दिला ज्यामुळे काँग्रेस पक्षाची घसरण आणखी वेगाने झाली. मनमोहन सिंग सरकार आणि काँग्रेस पक्षावर गांधी कुटुंबाने केलेले दुहेरी नियंत्रण योग्यरित्या कॅलिब्रेट केले गेले आणि सुरुवातीला चांगले काम केले परंतु दुसऱ्या टर्ममध्ये ते खराब झाले.सरकारचे रिमोट कंट्रोल आणि युती भागीदारांचे व्यवस्थापन यामुळे निर्माण झालेलेमतभेद२०१४ मध्ये गंभीर राजकीय संकटात बदलले गेले. राष्ट्रीय आणि राज्यविषयक बाबींवर हायकमांड सिंड्रोमचा विस्तार करण्यात आला होता आणि पक्षाच्या ग्राउंड लेवल वरील कार्यकर्त्यांशी त्याचा कोणताही संबंध उरला नव्हता. काँग्रेसमध्ये मजबूत नेत्याची अनुपस्थिती हा आणखी एक महत्त्वाचा घटक आहे.

नेहरूंच्या नेतृत्वाखालील काँग्रेस हा सर्वव्यापी पक्ष होता ज्याने उजव्या-मध्य-डाव्या विचारसरणीच्या छटा स्वीकारल्या आणि डाव्या आणि उजव्या प्रवृत्तीच्या राजकीय पक्षांना त्यांचे राजकीय आणि निवडणूक पंख पसरवण्याची संधी न देता भारतावर राज्य करण्यासाठी एकमत तयार केले होते . पक्षनेतृत्व आणि पक्ष संघटना समतोल आणि तितकीच मजबूत होती आणि त्यांच्या वर्चस्वाला आव्हान देण्यासाठी कोणताही मोठा विरोध नव्हता. काँग्रेसमधील उजव्या नेतृत्वासोबत खडतर संघर्ष आणि त्यानंतरच्या हकालपट्टीनंतर इंदिराजींच्या चढाईने केंद्राकडे डावीकडे धोरणे आणण्याचा मार्ग मोकळा केला आणि त्या त्यांच्या काळातील सर्वात लोकप्रिय नेत्या बनल्या. इंदिराजींच्या करिष्माई नेतृत्वाने पक्षाची श्रेणी आणि फाइल कमकुवत केली आणि त्यांनी देशावर राज्य करण्यासाठी आणि काँग्रेसचे पक्षाचे एकल वर्चस्व राखण्यासाठी केंद्रीकृत आणि अधिकृत निर्णयांवर विश्वास ठेवला.या पक्षाकडे सध्या एक मजबूत नेता आणि कार्यक्षम संरचना नाही आणि त्याचा गरिबांसाठीच्या डाव्या-कल्याणकारी धोरणांचा वैचारिक अजेंडा भाजपने हायजॅक केला आहे जो भारतीय राजकारणात स्वतःला एक वर्चस्व असलेला पक्ष म्हणून स्थान देण्यासाठी चतुराईने वापरत आहे. काँग्रेसला आपला वैचारिक अजेंडा पुन्हा लिहावा लागेल आणि देशातील भाजपच्या लाटेचा मुकाबला करण्यासाठी धर्मनिरपेक्ष राजकारणाच्या व्यापक क्षेत्रामध्ये उजव्या विचारांच्या लोकांसाठी पक्षाचे प्रवेशद्वार उघडावे लागेल. तळागाळातील पायदळ सैनिक आणि ध्वज वाहकांसह आपल्या कार्यकर्त्यांना पुनर्संचयित करून पक्ष संघटनेची पुनर्बांधणी करून पक्ष स्वतःला पुनरुज्जीवित करू शकतो आणि दूरच्या भविष्यात राजकीय पुनरुत्थान करण्यासाठी वास्तववादी ध्येये निश्चित करू शकतो.

लोकसभा निवडणूक: काँग्रेसची कामगिरी (सोनिया-राहुल गांधी)

| **Year** | **एकूण जागा** | **जिंकलेल्या जागा** | **पडलेली मते** (In percent) | **कमी/जास्त जागा** (Vote share) |
|---|---|---|---|---|
| १९९८ | ५४३ | १४१ | २५.८ | -३ |
| १९९९ | ५४३ | ११४ | २८.३ | +२.५ |
| २००४ | ५४३ | १४५ | २६.५ | -१.९ |
| २००९ | ५४३ | २०६ | २८.६ | +२.१ |
| २०१४ | ५४३ | ४४ | १९.५ | -९.१ |
| २०१९ | ५४३ | ५२ | २६ | +८ |

निष्कर्ष :

१) पक्षापेक्षा आपले संस्थान वाचवण्याच्या हेतूने काँग्रेस-राष्ट्रवादी काँग्रेसमधील प्रस्थापित नेते भाजप किंवा शिवसेनेत प्रवेश करीत आहेत. आणि हे असे नेते आहेत,ज्यांनी स्वतः किंवा त्यांच्या वडिलांनी दीर्घ काळ मंत्रिपदे किंवा आमदारकी उपभोगली आहे. हेच नेते परत काँग्रेस व राष्ट्रवादी पक्षाकडे येत आहेत या पक्षांतराकडे दोन्ही काँग्रेसने सकारात्मक दृष्टीने पाहणे आवश्यक आहे.

२) सत्ताधारी राष्ट्रवादी -शिवसेना- काँग्रेस महाविकास आघाडी सरकारविषयी जनतेमध्ये- विशेषत: ग्रामीण महाराष्ट्रात- शेती प्रश्नातून, रोजगाराच्या मुद्यातून नाराजीचा सूर निघू लागताच भाजपने विविध मार्गांनी हा असंतोष वाढविण्याचा प्रयत्न केलेला दिसून येतो.

३) राज्यात अनेक प्रश्न आहेत, तसेच भाजपने विरोधी पक्ष म्हणून सभागृहात किंवा सभागृहाबाहेर गेल्या दोन वर्षांत अनेक मुद्द्यांवर सक्रिय भूमिका घेतलेली दिसून येते.

४) प्रभावी विरोधी पक्षांचा अभाव हे महाराष्ट्राच्या राजकारणाचे दीर्घकालीन वैशिष्ट्यच राहिले आहे. संसदीय लोकशाही व्यवस्थेत बहुमतातील पक्ष सत्ताधारी पक्षाची, तर अल्पमतातील पक्ष विरोधी पक्षाची भूमिका बजावतो. लोकशाहीमध्ये अल्पमतालाही महत्त्व असल्याने विरोधी पक्षाला विशिष्ट स्थान-दर्जा असतो. सत्ताधारी निरंकुश होत असतील, तर त्यांच्यावर अंकुश ठेवण्याची, जनतेचे प्रश्न मांडण्याची व्यवस्था म्हणून विरोधी पक्षांची तरतूद आहे. महाराष्ट्रात प्रभावी विरोधी पक्षाचे अस्तित्व महाविकास आघाडीच्या काळात असलेले दिसून येते.

५) सत्ताधारी पक्ष अशी ओळख असलेला काँग्रेस पक्ष राज्यात २०१४ च्या विधानसभा निवडणुकीतील पराभवानंतर तिसऱ्यांदा विरोधी बाकांवर बसला. आणीबाणी, इंदिरा गांधींची एकाधिकारशाही आणि १९७७ मधील पराभवातून काँग्रेस वर्चस्वास पहिल्यांदा धक्का बसला. राज्यातील प्रभावी नेतृत्वावर केंद्रातून नियंत्रणाचे प्रयत्न सुरू झाले. या सर्व पार्श्वभूमीवर काँग्रेसमध्ये विभाजन झाले. महाराष्ट्रातही काँग्रेस विभागली आणि जुलै १९७८ ते फेब्रुवारी १९८० या पुलोदच्या कालखंडात इंदिरा काँग्रेस विरोधी पक्षात बसली. या कालखंडात आपल्या विरोधातील वातावरण शांत करण्याऐवजी पुलोद सरकार पाडणे हाच एकमेव कार्यक्रम काँग्रेस नेतृत्वाने केला आणि केंद्रात इंदिरा गांधी सत्तेवर आल्यानंतर त्यांच्या सरकार पाडण्याच्या प्रयत्नास यश मिळाले. इंदिरा गांधींनी राज्यात सुरळीत चाललेले पुलोद सरकार बरखास्त केले. तसेच २०१९ मध्ये काँग्रेस पक्षाने भारतीय जनता पक्षाला सत्तेपासून वंचित ठेवण्यासाठी महाविकास आघाडीच्या रूपाने शिवसेनेला पाठिंबा दिल्याचे दिसून येते.

६) नवी काँग्रेस घडविण्याचे आव्हान : राज्याचा विचार केला तर सर्व विरोधी पक्ष विखुरलेले दिसतात. त्यात डावे-पुरोगामी-समाजवादी म्हणवणाऱ्या पक्षांची ताकद नगण्य दिसते. आज विस्कळीत अवस्थेत असली तरी राज्यभर अस्तित्व राखून असलेल्या दोन्ही काँग्रेसच्या पुनरुज्जीवनाचे प्रयत्न होणे आवश्यक आहे. काँग्रेसचे समर्थन करण्याचा मुद्दा नाही. काँग्रेसनेही असंख्य चुका केल्यात, पण समकालीन परिस्थितीत मध्यममार्गी विचारांच्या पक्षांची आवश्यकता वाटते. काँग्रेससमोर विचारसरणी, नेतृत्व, संघटन, कार्यक्रम आणि सामाजिक आधार या पाचही पातळ्यांवर अडचण होऊन बसली आहे. यावर मात करून विरोधी पक्षाची जबाबदारी चांगली पार पाडून दाखवणे, हेच या पक्षासमोर मुख्य आव्हान आहे. नवी काँग्रेस उभी करावयाची असेल, तर काही धाडसी बदल करण्याशिवाय पर्याय नाही.

७) काँग्रेसने स्वातंत्र्यानंतर तीन दशके केंद्रीय आणि राज्यपातळीवर जे वर्चस्व मिळविले, त्यामागे स्वातंत्र्य-चळवळीचा वारसा हा महत्त्वपूर्ण घटक आहे. ती भिन्न हितसंबंधी गटांना सामावून घेणारी एक वैचारिक आणि सामाजिक आघाडी होती. तिच्या सर्वसमावेशक स्वरूपामुळेच राष्ट्रउभारणीची विविध प्रकारची आव्हाने स्वातंत्र्याच्या पहिल्या टप्प्यात पेलता आली. मुख्य म्हणजे समाजातील विविधतेची किंवा बहुसांस्कृतिक स्वरूपाची दखल घेत आणि त्या विविधतेस सामावून घेऊ शकणाऱ्या राष्ट्राची उभारणी करण्याचे आव्हान काँग्रेसच्या नेतृत्वाने व त्या काळातील काही बिगरकाँग्रेसी नेतृत्वाने लोकशाही राजकारणाद्वारे यशस्वीपणे पेलले. या काँग्रेसच्या वारशाची उजळणी आताच्या काँग्रेसजनांनी करणे आवश्यक आहे. आज देशातील बहुसांस्कृतिक समाजाचे स्वरूप नष्ट करण्याचे प्रयत्न होतानाच्या कालखंडात जुन्या वारश्यांची आठवण प्रासंगिक ठरेल. पण काँग्रेस सॉफ्ट हिंदुत्वाची भूमिका घेऊन आपल्या विचारांना मूठमाती देण्याच्या तयारीत आहे. विचारांतील धरसोडवृत्ती किंवा भाजपच्या विचारांना प्रतिक्रिया देण्याच्या व्यूहनीतीत काँग्रेस आपल्या मूळ विचारांपासून दुरावल्यानेच मतदारांत अविश्वासाचे वातावरण निर्माण झालेले दिसते. आपलीच वैचारिक कोंडी फोडण्याचे आणि मतदारांना पुन्हा वैचारिक विश्वास प्राप्त करून देण्याचे आव्हान काँग्रेससमोर आहे.

८) विधानसभा निवडणुकीत काँग्रेसला सामूहिक नेतृत्वाची संकल्पना घेऊन उतरावे लागेल. प्रत्येक नेता आपापल्या मतदारसंघापुरता किंवा एखाद-दुसऱ्या जिल्ह्यापुरता मर्यादित झाल्याने राज्यपातळीवरील किंवा विशिष्ट विभागाचा नेता म्हणून एखाद्या नेत्याचे नाव आज घेता येत नाही, अशी अवस्था एके काळी नेतृत्वाची फौज पुरविणाऱ्या काँग्रेसची झाली आहे. शिवाय जे कोणी काँग्रेसचे नेते म्हणवतात, त्यांना जनाधारही नाही. काँग्रेसला आक्रमक नेत्यांसोबतच समंजस नेतृत्वाचीदेखील गरज आहे. गांधी घराण्यावरील अवलंबित्व कमी करून नेत्यांना जनतेत काम करावे लागणार आहे. सामूहिक नेतृत्वाधारेच काँग्रेसला पुढे जावे लागणार आहे. निवडणुका नसतानाही मतदारसंघातील दौरे करावे लागणार आहेत. नाव घेण्यालायक जे चार-पाच नेते आहेत, ते सर्व मराठा समाजातून येतात. त्यामुळे मराठा समाजाप्रमाणेच ओबीसी, दलित, आदिवासी, मुस्लिम व महिलांचेही नेतृत्व केंद्रस्थानी आणणे आवश्यक आहे. घटलेला सामाजिक आधार वाढविण्यात हा घटक महत्त्वाचा ठरेल. सर्व समाजघटकांची मते मिळवणाऱ्या काँग्रेसला आज विशिष्ट अशा कोणत्याही समाजगटांचा भरघोस पाठिंबा मिळताना दिसून येत नाही. काँग्रेसला ओबीसी-दलितआि दवासी-मुस्लिम समाजांना गृहीत धरण्याचे धोरण सोडावे लागणार आहे. पारंपरिक मतदार पुन्हा एकदा जोडण्याचे मोठे आव्हान काँग्रेससमोर आहे.

९) प्रस्थापित मराठा समाजासोबतच ओबीसी, अनुसूचित जाती-जमाती, मुस्लिमांना आणि महिलांना योग्य उमेदवारी व नेतृत्वस्थान देण्याची दोन्ही काँग्रेसला तयारी करावी लागेल. राष्ट्रवादीकडे नाव घेण्यासारखे चार ओबीसी नेते तर आहेत, परंतु काँग्रेसकडे नाव घेण्यासारखा ओबीसी नेता राज्यात नाही. राष्ट्रवादीने छगन भुजबळ, धनंजय मुंडे आणि अमोल कोल्हे या ओबीसी नेत्यांचा केवळ प्रचारासाठी वापर न करता त्यांना प्रमुख नेतृत्वस्थानी बसवणेही आवश्यक आहे. मात्र याच गोष्टीची दोन्ही काँग्रेसजनांना ॲलर्जी आहे. या ॲलर्जीवर एकमेव उपाय म्हणजे बिगरमराठा नेतृत्वास मुख्यमंत्रिपदाचा उमेदवार घोषित करणे होय. हे राजकीय धाडस दोन्ही काँग्रेसकडे आजघडीला दिसत नाही. जेव्हा काँग्रेस हे धाडस करेल, तेव्हा त्यांच्यापासून दुरावलेला मागास समाज जवळ येण्यास वेळ लागणार नाही.

१०)काँग्रेसची पक्षसंघटनव्यवस्था मोडकळीस आली आहे. गेल्या पंधरा वर्षांत काँग्रेसचे सत्ताधारी व पक्षसंघटना यांच्यातील अंतर वाढत गेलेले दिसून येते. प्रदेश काँग्रेस व जिल्हा काँग्रेस संघटनेअंतर्गत विविध आघाड्या

यांच्यात समन्वय दिसत नाही. महत्त्वाचे म्हणजे नवा कार्यकर्ता जोडला जात नाही. भाजपकडे किंवा शिवसेनेकडे तरुण का आकर्षित होतात? बीड-औरंगाबाद मार्गावर झालेल्या संघाच्या अधिवेशनास किंवा मारुंजी (पुणे) येथील शिवशक्ती संगमामध्ये बहुजन तरुण मोठ्या संख्येने का सहभागी झाले? २०१४ नंतर स्थानिक कार्यकर्ते भाजप-सेनेत का प्रवेश करीत आहेत, याचा दोन्ही काँग्रेसने विचार करणे गरजेचे आहे. भाजप अगदी बूथ लेव्हलपर्यंतच्या कार्यकर्त्यांची शिबिरे घेताना दिसतो. अशी शिबिरे- अधिवेशने किंवा स्थानिक प्रतिनिधी-पदाधिकारी यांची अभ्यास शिबिरे घेण्याची काँग्रेसची परंपरा आता संपली आहे. नवी सदस्यनोंदणी करणे, त्यांना प्रतिनिधित्व देणे, अभ्यास शिबिरांतून त्यांना जुनी काँग्रेसची विचारधारा समजावून सांगणे आवश्यक आहे आणि पक्षाची धोरणे कार्यकर्त्यांमार्फत सामान्यांपर्यंत पोहोचवणे गरजेचे आहे.

११)धोरणात्मक कार्यक्रम आणि ठोस विचारप्रणाली घेऊन राज्यात जाणे आवश्यक आहे. काँग्रेसने १९८० नंतर सत्ता कोणासाठी राबविली, हा प्रश्नच आहे. गरिबांसाठी अनेक कल्याणकारी योजना आखल्या, पण त्या योजना गरजूंपर्यंत पोहोचू शकल्या नाहीत. उदारीकरणाच्या धोरणाची जोरकसपणे अंमलबजावणी केली, पण त्याचे लाभ प्राप्त झालेला मध्यमवर्ग मात्र भाजपकडे गेला. काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेस हे दोन्ही पक्ष सत्तेत नसले तरी चांगल्या योजना गरजूंपर्यंत नेण्याचे, आमदार निधीतून कामे उभारण्याचे, दुष्काळी भागात सामाजिक संघटनाचे किंवा लोकसहभागातून, कलाकारांच्या मदतीतून जे चांगले प्रयोग सुरू आहेत, त्यांना मदत करण्याची भूमिका विरोधी पक्षांना घ्यावी लागणार आहे.

१२)२०१९ च्या लोकसभा निवडणुकांमध्ये वंचित बहुजन आघाडीला सन्मानजनक मते मिळाल्याने दोन्ही काँग्रेसने त्यांना सन्मानजनक जागा देऊन आघाडीमध्ये स्थान देण्याची आवश्यकता आहे. केवळ योग्य जागावाटपच नाही, तर वंचित आघाडीला किमान उपमुख्यमंत्रिपद आणि किमान २५ टक्के मंत्रिपदे देण्याची तयारी दाखवली, तर ते भाजप-सेना युतीला आव्हान ठरेलच, शिवाय मोठा पाठीराखाही जोडला जाईल. अर्थात त्यासाठी वंचित आघाडीच्या नेतृत्वाचीदेखील आघाडीत सामील होण्याची प्रामाणिक तयारी हवी.

१३)भाजपचे व शिवसेनेचे २०१४ आणि २०१९ च्या लोकसभा निवडणुकांतील यश पाहता, खुद्द दोन्ही काँग्रेसला आपल्या पक्षाला येत्या विधानसभा निवडणुकीत मोठे यश मिळेल याची आशा नाही. २०१९ च्या लोकसभेला राज्यातील ४८ लोकसभा मतदारसंघांतील एकूण २८८ विधानसभा मतदारसंघांपैकी २२६ विधानसभा मतदारसंघांत दोन्ही काँग्रेसच्या तुलनेत भाजप व शिवसेनेला अधिक मताधिक्य मिळालेले आहे. ही मतांची विधानसभानिहाय मिळालेली आघाडी आणि सद्य राजकीय परिस्थिती पाहता, खूप वेगळा निकाल लागण्याची शक्यता नाही. त्यामुळे मतदारांची ज्या नेतृत्वावर नाराजी आहे, अशा प्रस्थापितांना बाजूला सारून आणि जे नेते पक्ष सोडतात त्यांना त्यांची वाट मोकळी करून देऊन नव्या नेतृत्वास उमेदवारी देण्याची संधी आगामी विधानसभेमध्ये आहे. त्यामुळे नवी काँग्रेस घडवण्याची संधी म्हणून आणि आगामी २०२४ ची विधानसभा लढवण्याची मानसिक तयारी करावी लागेल, तरच २०२४ ची निवडणूक काँग्रेस पक्ष सक्षमपणे लढवू शकेल.

१४)लोकांमध्ये मिसळून त्यांच्या प्रश्नावर काम करणे, नेतृत्व-सामाजिक आधार व पक्षसंघटन मजबूत करणे आणि काँग्रेसला जिल्ह्या-जिल्ह्यांतील प्रस्थापित घराण्यांपासून मुक्त करून नव्या नेतृत्वाला संधी देणे यातूनच काँग्रेसजनांना नवी काँग्रेस घडवता व वाढवता येऊ शकेल. सत्ताधारी पक्षाच्या मानसिकतेतून बाहेर पडून सक्रिय विरोधी पक्ष ही मतदारांनी सोपविलेली जबाबदारी पार पाडून, दोन विधानसभा निवडणुकांच्या दरम्यानच्या पाच वर्षांच्या काळात विरोधी पक्षांनी जी कामे करावयास हवीत, ती कामे तूर्त तरी सकारात्मक दृष्टीने काँग्रेसने केली पाहिजेत. संसदेत किंवा अनेक राज्यांतील सभागृहात गोंधळ, कामकाजावर बहिष्कार, असंसदीय-शिवराळ भाषेचा वापर असे नकारात्मक विरोधाचे प्रकार वाढताना दिसतात. त्याऐवजी विविध प्रश्न उपस्थित करून सभागृहाचे कामकाज पूर्णवेळ चालवून सत्ताधाऱ्यांना उत्तरे देण्यास प्रवृत्त करण्याकडे, सकारात्मक चर्चेकडे जाणे लोकशाहीच्या मजबुतीसाठी उपयुक्त ठरेल. त्या दृष्टीने काँग्रेसला पुढील काही वर्षांचा कार्यक्रम आखून त्याआधारे वाटचाल करावी लागणार आहे. 2014 अथवा 2019 मधील पराभव किंवा पक्षांतर किंवा सत्ता जाणे याकडे दोन्ही काँग्रेसजनांनी एक संधी म्हणून पाहावे.

# जालना तालुक्यातील लिंग रचनेचे अभिक्षेत्रीय वितरण एक अभ्यास

**प्रा.डॉ.सोमीनाथ सारंगधर खाडे[1] श्री. मनोज मधुराज डोईफोडे[2]**

[1]राष्ट्रमाता इंदीरा गांधी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,जालना, भुगोल विभाग

[2]संशोधक विद्यार्थी,भुगोल विभाग, डॉ.बाबासाहेब आंबेडकर विद्यापीठ,औरंगाबाद.

**प्रस्तावना :-**

लोकसंख्येची लिंगरचना हे लोकसंख्या शास्त्राच्या अभ्यासाचे मुख्य वैशिष्टये आहे. ही लिंगरचना प्रत्यक्ष जन्म व मृत्युवर आधारीत असते. लिंगरचनेवर स्थलांतर व व्यावसायीक रचना याचा प्रत्यक्ष प्रभाव असतो. कोणत्याही प्रदेशातील लिंगरचनेवर तेथील सामाजीक व आर्थिक परिस्थितीचा परिणाम झालेला पहावयास मिळतो. लिंगरचना ही प्रामुख्याने राहणीमानाचा दर्जा, सामाजिक परिस्थिती, धर्म, राष्ट्रीय उत्पन्न, शिक्षण ई. घटकांवर अवलंबून असते. सन 2011 च्या जनगणनेनुसार भारताच्या एकुण लिंगरचनेचा अभ्यास केला असता असे लक्षात येते की, दर हजार पुरुषामागे 937 स्त्रिया आहेत. तर हेच प्रमाण महाराष्ट्रात दर हजार पुरुषामागे 922 असल्याचे दिसुन येते, म्हणजेच एकुण लिंगरचनेवर वरील विविध घटकाचा परिणाम झाल्याचे दिसुन येते.

**अभ्यासक्षेत्र :-**

जालना जिल्ह्यातील एकुण (08) तालुकांपैकी जालना हा एक तालुका आहे. जालना तालुक्याचा अक्षवृत्तीय विस्तार 19.49 उत्तर अक्षवृत्त आणि रेखावृत्तीय विस्तार 75.52 पुर्व रेखावृत्ताच्या दरम्यान आहे. या तालुक्याची समुद्र सपाटी पासुनची सरासरी उंची 534 मीटर एवढी आहे. जालना तालुक्यातील लोकांचा मुख्य व्यवसाय तेल गिरण्या, स्टिल उत्पादन, बिडी उद्योग व दालमिल आहे. तालुक्याचे वार्षीक सरासरी तापमान 42 ते 43 सेल्शीयस एवढे असुन या तालुक्यात वार्षीक सरासरी 600 ते 650 मि.मी. एवढा पाऊस पडतो. या तालुक्यात एकुण147 ग्रामीण वस्त्या आहे. सन 2011 च्या जनगणनेनुसार या तालुक्याची एकुण लोकसंख्या 285577 एवढी आहे. तर या तालुक्याचे लिंग गुणोत्तर हे दर हजार पुरुषामागे 941 स्त्रिया एवढे आहे. या तालुक्यातील सध्याच्या वस्त्यांचाच 2011 च्या जनगणनेनुसार लिंगरचनेत झालेल्या बदलांचा अभ्यास केलेला आहे.

**उद्दिष्टे :-**

1. जालना तालुक्यातील लिंग रचनेच्या स्थल व कालसापेक्ष अभ्यास करणे.
2. जालना तालुक्यातील लिंग रचना वितरणाचा अभ्यास करणे.

वरील उद्दिष्टे समोर ठेवुन प्रस्तुत शोधनिबंध तयार केलेला आहे.

**आकडेवारी संकलन व अभ्यास पध्दती :-**

प्रस्तुत शोधनिबंधाचा संपुर्ण अभ्यास दुय्यम आकडेवारीवर आधारीत केलेला आहे. जालना जिल्हा जनगणना अहवाल 2011 मधुन जालना तालुक्यातील गावनिहाय पुरुष व स्त्रिया यांची आकडेवारी संकलीत केलेली आहे. जालना तालुक्यातील एकुण 147 वस्तीमधील लिंगरचना अभ्यासण्यासाठी वरील प्रकारे आकडेवारी संकलीत केलेली आहे. त्या आधारे लिंगरचना काढण्यासाठी अनेक भुगोल तज्ञाने वापरलेल्या सुत्राचा वापर केलेला आहे.

$$\text{लिंग रचना} = \frac{\text{एकुण स्त्रिया}}{\text{एकुण पुरुष}} \times 1000$$

वरील सुत्राचा वापर करुन संकलीत केलेल्या आकडेवारीच्या आधारे लिंगरचना काढण्याचा प्रयत्न केलेला आहे.

**तक्ता क्र.01**

**(जालना तालुक्यातील लिंग रचनेत कालासापेक्ष झालेला बदल 2011)**

| लिंगरचना प्रतवारी | गावांची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|
| अतिकमी 900 पेक्षा कमी | 36 | 24.49 |
| कमी 901 ते 950 | 60 | 40.81 |
| मध्यम 951 ते 1000 | 42 | 28.58 |
| जास्त 1000 पेक्षा | 09 | 6.12 |
| एकुण | 147 | 100 |

(स्त्रोत : भारतीय जनगणना अहवाल - जालना तालुका 2011)

प्रस्तुत तालुक्यातील लिंग रचनेचा अभ्यास गाव व शहर निहाय केलेला आहे. जालना तालुक्यात एकुण 147 निवासी वस्त्या आहेत. या वस्त्यांचा सन 2011 मधील लिंग रचनेचा अभ्यास करण्यासाठी चार अतिगट तयार करण्यात आलेले आहेत. त्यात पहिला गट 900 पेक्षा कमी लिंग गुणोत्तर असलेला गट अति कमी लिंग गुणोत्तर या नांवाने, दुसरा गट 901 ते 950 लिंग गुणोत्तर असलेला कमी लिंग गुणोत्तराचा गट, तिसरा गट 951 ते 1000 दरम्यान लिंग गुणोत्तर असलेला गट मध्य लिंग गुणोत्तराचा गट, तर 1000 पेक्षा जास्त लिंग गुणोत्तर असलेला गट जास्त लिंग गुणोत्तराचा गट म्हणुन तयार केलेला आहे.

जालना तालुक्यातील 2011 मधील लिंग गुणोत्तराचा अभ्यास केला असता सर्वाधिक वस्त्या मध्ये कमी लिंग गुणोत्तर असल्याचे दिसुन येते. त्यात तालुक्यातील एकुण वस्त्यांपैकी 40 वस्त्यांचा समावेश होत असुन या वस्त्या तालुक्यातील एकुण वस्त्यांचा 40.81 आहेत. तर सर्वात कमी वस्त्यामध्ये जास्ती लिंग गुणोत्तर असल्याचे दिसुन येते म्हणजेच अभ्यास क्षेत्रातील एकुण वस्त्यांपैकी 9 वस्त्या मध्ये जास्त लिंग गुणोत्तर म्हणजे 10000 पुरुषा मागे 1000 पेक्षा अधिक स्त्रियांचे प्रमाण असल्याचे दिसुन येते. तर यानंतर फक्त 36 वस्त्यामध्ये अतिशय कमी लिंग गुणोत्तर असल्याचे आढळते. या वस्त्यांचे प्रमाण हे एकुण वस्त्यांच्या 24.49 टक्के एवढे असुन त्या दर 1000 पुरुषा मागे 900 पेक्षा कमी स्त्रियांचे प्रमाण असल्याचे आढळले आहे. राहिलेल्या 42 वस्त्यांमध्ये लिंग गुणोत्तर हे मध्यम स्वरुपाचे असुन ते दर 1000 पुरुषा मागे स्त्रियांचे प्रमाणे 951 ते 1000 दरम्यान आहे. या गटातील वस्त्यांच्या 28.58 टक्के एवढे आहेत.

**निष्कर्ष :-**

जालना तालुक्यातील गाव व शहरातील लिंग रचनेचा अभ्यास केला असता असे दिसुन येते की, वस्त्या-वस्त्यांमधील लिंग गुणोत्तरामध्ये मोठया प्रमाणात बदल झालेला दिसुन येतो. जालना तालुक्यातील ज्या वस्त्यांमध्ये जास्त लिंग गुणोत्तर आहे त्या वस्त्या प्रामुख्याने ग्रामीण व डोंगराळ भागात असल्याचे प्रकर्षाने जाणवते. ग्रामीण भागातील बहुतांशी पुरुष मंडळी कामानिमित्त तालुक्याच्या ठिकाणी स्थलांतरीत झालेले आहेत. त्यामुळे तेथे अधिक लिंग गुणोत्तर असल्याचे दिसुन येते. तर ज्या वस्त्यामध्ये लिंग गुणोत्तर कमी असल्याचे दिसुन येते त्या वस्त्यांची तुलनात्मक साक्षरता ही जास्त असल्याचे जाणवते आहे. त्यामुळे लिंग रचनेत बदल होऊन तेथे लिंग गुणोत्तर कमी झाल्याचे जाणवते. तसेच आर्थिक परिस्थितीचा विचार केला असता ग्रामीण भागात पारंपारीक शेती व इतर व्यवसाय चालत असल्या कारणाने त्यांचे उत्पन्न कमी आहे त्या ठिकाणी लिंग गुणोत्तर अधिक असल्याचे दिसुन येते तर ज्या शहरी वस्त्यांमध्ये व्यवसाय व नौकरी केली जाते त्या साक्षर असलेल्या भागात लिंग गुणोत्तर कमी असल्याचे दिसुन येते.

**संदर्भ :-**

1. भारतीय जनगणना अहवाल जालना तालुका 2011
2. आपला जालना जिल्हा : प्रा. भगवान काळे
3. आपला जालना जिल्हा : सामान्य ज्ञान- रमेश बालाड
4. जिल्हा सामाजीक व आर्थिक समालोचन, जालना 1981, 1991,2001, 2011

# जालना जिल्ह्यातील अंबड आणि घनसावंगी तालुक्यातील आर्थिक आणि सामाजिक विकासात कर्मयोगी अंकुशराव टोपे समर्थ सहकारी साखर कारखान्याची भूमिका एक भौगोलिक अभ्यास (2001-2011)

**डॉ. एस. व्ही. ताठे[1] श्री. अभिजीत बी. गुजर[2]**

[1]मार्गदर्शक, संत रामदास कला, विज्ञान व वाणिज्य- महाविद्यालय, घनसावंगी.

[2]संशोधक, भूगोल विभाग, संत रामदास कला, विज्ञान व वाणिज्य- महाविद्यालय, घनसावंगी.

**प्रस्तावना :**

भारत हा कृषिप्रधान देश म्हणून ओळखला जातो. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर कृषी क्षेत्रामध्ये अन्नधान्याची शेती भारतामध्ये केली जात होती परंतु 1980 नंतर म्हणजेच भारतामध्ये हरितक्रांती नंतर मोठ्या प्रमाणात नगदी पिकांचे प्राबल्य वाढून ऊस पिकाचे क्षेत्र देखील या ठिकाणी मोठ्या प्रमाणात विस्तारले गेले. भारतामध्ये 2001-2002 या वर्षांमध्ये उसाचे उत्पादन 298 दशलक्ष टन होते तर 2010-11 मध्ये ऊसाचे उत्पादन 342.38 दशलक्ष टन उत्पादन होते. महाराष्ट्र राज्य देखील ऊस उत्पादनाचे मुख्य राज्य म्हणून ओळखले जाते. महाराष्ट्र राज्यामध्ये 2010-11 मध्ये उसाखालील क्षेत्र 9:45 लाख हेक्टर क्षेत्र होते. प्रस्तुत शोधनिबंधामध्ये जालना जिल्ह्यातील कर्मयोगी अंकुशराव टोपे सहकारी साखर कारखाना व त्याच्या माध्यमातून जालना जिल्ह्यातील आर्थिक व सामाजिक क्षेत्रामध्ये होणारे बदल अभ्यासण्यात येणार आहेत.

**अभ्यासक्षेत्र** :

भौगोलिकदृष्ट्या जालना जिल्हा मध्यभागी येतो. जालना जिल्ह्याचा अक्षवृत्तीय विस्तार $19^{0}1$ उत्तर ते $23^{0}3'$ उत्तर अक्षवृत्त आणि $75^{0}4'$ पूर्व ते $76^{0}4'$ पूर्व रेखावृत्त या दरम्यान झालेला आहे. जालना जिल्ह्याच्या उत्तर सीमेवर जळगाव जिल्हा, पूर्वेस बुलढाणा व परभणी जिल्हा, दक्षिणेकडे बीड जिल्हा व पश्चिम बाजूस औरंगाबाद जिल्हा वसलेला आहे. 2011 च्या जनगणनेनुसार जिल्ह्याचे एकूण क्षेत्रफळ 7,727 चौकिमी एवढे असून, ते महाराष्ट्र राज्याच्या क्षेत्रफळाच्या तुलनेत 2.51 टक्के एवढे आहे व याच जनगणनेनुसार जालना जिल्ह्याची एकूण लोकसंख्या 19,58,483 एवढी आहे, तर लोकसंख्येची घनता दर चौ किमीला 171 इतकी असून शहरी लोकसंख्येची घनता दर चौकिमीला 3018 एवढी आहे. जिल्ह्यामध्ये एकूण आठ तहसीलींचा समावेश होत असून त्या पुढीलप्रमाणे आहेत. जालना, बदनापूर, जाफराबाद, भोकरदन, परतूर, मंठा, अंबड, घनसावंगी

**उद्दिष्टे** :

1) अभ्यास क्षेत्रांमधील साखर कारखान्यांची भौगोलिक स्थिती स्पष्ट करणे.

2) साखर कारखान्याच्या माध्यमातून होणारे ऊस गाळप व ऊस उत्पादन स्पष्ट करणे.

3) साखर कारखान्याच्या सोबतच इतर उत्पादन निर्मिती स्पष्ट करा.

4) ऊस उत्पादनामुळे अभ्यास क्षेत्रामध्ये झालेल्या आर्थिक व सामाजिक बदल अभ्यासणे.

**अभ्यास पद्धती :**

प्रस्तुत शोधनिबंधासाठी द्वितिय स्वरूपाच्या आकडेवारीचा उपयोग करण्यात आलेला आहे. त्यामध्ये प्रामुख्याने साखर कारखान्यांचे वार्षिक अहवाल, सामाजिक व आर्थिक अहवाल, साखर आयुक्त पुणे अहवाल, जालना जिल्हा जनगणना 2011 अहवाल या साधनाने माहितीचे स्रोत म्हणून उपयोग करण्यात आलेला आहे.

जालना जिल्हा
स्थानदर्शक नकाश




नकाशा क्र. 1.1

**अंकुशराव टोपे समर्थ सहकारी साखर कारखाना ऊस गाळप मे. टन 2001-2011**

| | वर्ष | उस गाळप मे. टन | साखर उत्पादन क्विंटल | साखर उतारा |
|---|---|---|---|---|
| 01 | 2001-02 | 424060 | 535048 | 10.45 |
| 02 | 2002-03 | 454425 | 558217 | 11.51 |
| 03 | 2003-04 | 435902 | 406820 | 10.91 |
| 04 | 2004-05 | 934072 | 105235 | 11.26 |
| 05 | 2005-06 | 447076 | 501111 | 11.21 |
| 06 | 2006-07 | 523590 | 856060 | 11.50 |
| 07 | 2007-08 | 720791 | 805350 | 11.17 |
| 08 | 2008-09 | 607645 | 521741 | 11.44 |
| 09 | 2009-10 | 554990 | 719410 | 11.40 |
| 10 | 2010-11 | 547120 | 587850 | 10.55 |

स्रोत: संशोधकाने संकलित केलेल्या माहितीवर आधारीत

अंबड आणि घनसावंगी परिक्षेत्रामध्ये समर्थ सहकारी साखर कारखान्याच्या माध्यमातून ऊस उत्पादन व ऊस गाळप यांचा अभ्यास केला असता खालील आकडेवारी स्पष्ट होते. सन 2001-02 मध्ये कारखान्याच्या माध्यमातून 42 40 60 मेट्रिक टन उसाचे गाळप करण्यात आले व 53 50 47 क्विंटल साखरेचे उत्पादन घेण्यात आले. या कालावधीमध्ये साखर उतारा हा 10.45 एवढा होता. या नंतरच्या वर्षी 2002-03 मध्ये 45 44 25 मेट्रिक

टन उसाचे गाळप उत्पादन व 55 82 17 एवढे साखरेचे उत्पादन घेण्यात आले. या पुढील वर्षी 2003-04 मध्ये 43 59 03 मेट्रिक टन ऊस गाळप व 40 68 20 क्विंटल साखरेचे उत्पादन. 2004-05 यावर्षी 93 472 मेट्रिक टन ऊस गाळप व 10 52 35 क्विंटल साखरेचे उत्पादन घेण्यात आले.2005-06 यावर्षी 44 70 76 मेट्रिक टन ऊस गाळप व 50 11 11 क्विंटल एवढे साखरेचे विक्रमी उत्पादन घेण्यात आले. 2006-07 मध्ये 523590 मेट्रिक टन उसाचे गाळप व 85 60 62 क्विंटल साखरेचे उत्पादन घेण्यात आले. 2007-08 या वर्षामध्ये 70 07 91 मेट्रिक टन उसाचे गाळप करण्यात आले तर 80 53 50 क्विंटल साखरेचे उत्पादन घेण्यात आले. या वर्षीचा साखरेचा उतारा हा 11.17 एवढा होता. 2008-09 या वर्षामध्ये 60 76 45 मेट्रिक टन उसाचे गाळप करण्यात आले व 52 17 41 क्विंटल साखरेचे उत्पादन घेण्यात आले. 2009-10 या वर्षामध्ये 55 49 90 मेट्रिक टन उसाचे गाळप तर 71 94 10 क्विंटल साखरेचे उत्पादन घेण्यात आले. सर्वात शेवटच्या म्हणजे 2010-11 मध्ये 54 71 20 मेट्रिक टन एवढे ऊस गाळप करण्यात आले तर यावर्षी 58 73 50 क्विंटल साखरेचे उत्पादन घेण्यात आले व या वर्षी साखरेचा उतारा हा 10.55 तेवढा होता.वरील आकडेवारीवरुन समर्थ सहकारी साखर कारखान्याच्या माध्यमातून इथेनॉल प्रकल्प राबवला जातो. तसेच सहकारी तत्त्वावरती सूतगिरणी व दुग्ध प्रकल्प यांचे देखील उत्पादन तालुक्यांमध्ये घेतले जातात. ऊस उत्पादनाच्या माध्यमातून शेतकऱ्यांना त्यांच्या नगदी पिकांचा योग्य मोबदला या ठिकाणी मिळतांना आपल्याला दिसून येतो. त्यामुळे त्यांचे जीवनमान उंचावण्यासाठी निश्चितच मदत होताना दिसून येत आहे. समर्थ सहकारी साखर कारखान्याच्या माध्यमातून समर्थ सहकारी बँक शेतकऱ्यांना कर्जवाटप देखील करते यामध्ये शैक्षणिक कर्जाचा देखील समावेश होतो. 2011-12 या वर्षामध्ये शेतकऱ्यांना ऊस उत्पादनातून मिळणारा मोबदला निश्चितच आश्वासक  स्वरूपाचा होता. त्यामुळे त्यांच्या आर्थिक व सामाजिक जीवनावर सकारात्मक परिणाम होताना दिसून येतो.

**शिक्षण** : अभ्यास क्षेत्रामध्ये उस या नगदी पिकाचे विक्रमी उत्पादन घेतले जाते व यामुळे शेतकऱ्यांचे जीवनमान उंचावले असून साक्षरतेचे प्रमाण तसेच उच्च शिक्षणाचे प्रमाण अंबड आणि घनसावंगी या दोन्ही तहसीलमध्ये अधिक असलेले दिसून येते. यामध्ये अंबड या ठिकाणी शासकीय तंत्रनिकेतन असून या ठिकाणी मोठ्या प्रमाणात विद्यार्थ्यांना फारच अल्प दरामध्ये शिक्षणाच्या संधी उपलब्ध होताना दिसून येतात. यासोबतच घनसावंगी येथे शासनाच्या माध्यमातून उच्च शिक्षण घेण्यासाठी मॉडेल कॉलेजची व्यवस्था करण्यात आली असून याचा देखील अभ्यास क्षेत्रांमध्ये सिंहाचा वाटा आहे.

**आरोग्य** : समर्थ सहकारी साखर कारखान्याच्या माध्यमातून कारखान्याचे सभासद तसेच शेतकऱ्यांसाठी दरवर्षी आरोग्य शिबिरे भरवली जातात व या शिबिरामध्ये सर्व रुग्णांवर मोफत उपचार केले जातात. अंबड या ठिकाणी जिल्हा आरोग्य रुग्णालयाचे उपकेंद्र असून या ठिकाणीदेखील जिल्ह्याच्या ठिकाणी असणाऱ्या सर्व सुविधा रुग्णासाठी उपलब्ध होतात.

**दळणवळण व वाहतूक** :    अभ्यास क्षेत्रांमध्ये कच्चा माल म्हणजेच ऊस या पिकाची वाहतूक साखर कारखान्यापर्यंत सुरळीत पोहचावी म्हणून या ठिकाणी रस्त्याचे जाळे मोठ्या प्रमाणात निर्माण करण्यात आले आहे. अभ्यास क्षेत्रामध्ये साखर कारखान्याच्या जवळून राष्ट्रीय महामार्ग देखील गेलेला असल्यामुळे याचा मोठा फायदा या कार्यक्षेत्रातील ऊस उत्पादक शेतकरी यांना झालेला दिसून येतो.

कर्मयोगी अंकुशराव टोपे समर्थ सहकारी साखर कारखाना

स्थानदर्शक नकाशा




नकाशा क्र. 1.2

**निष्कर्ष व शिफारशी :**जालना जिल्ह्यामध्ये सहकारी तत्त्वावर चालणारा कर्मयोगी अंकुशराव टोपे सहकारी साखर कारखाना हा जालना जिल्ह्यातील अंबड व घनसावंगी तालुका या कार्यक्षेत्रामध्ये एक प्रमुख साखर उद्योग म्हणून पुढे आलेला आहे. शेतकऱ्यांना त्यांचा कच्चा माल म्हणजे अतिशय कमी वेळेमध्ये कारखान्यापर्यंत पोहोचवता येतो म्हणजे त्याचा उतारादेखील अधिक मिळतो. त्यामुळे निश्चितच त्यांना होणारा नफा देखील अधिक आहे. शेतकरी मोठ्या प्रमाणात सेंद्रिय खताचा वापर करतात तसेच कारखान्याच्या क्षेत्रामध्ये इथेनॉल प्रकल्प व दुग्ध प्रकल्प हे देखील उपलब्ध असल्यामुळे शेतकऱ्यांना जोड व्यवसाय म्हणून दुग्धपालन देखील करता येते. यातून देखील आर्थिक संपदा साधता येते. कारखान्यांच्या क्षेत्रांमध्ये उसाचे क्षेत्र वाढत असून यामुळे कारखान्याची गाळप क्षमता वाढवली जावी व तसेच कारखान्याच्या माध्यमातून शेतकऱ्यांना अल्प दरात सेंद्रिय खताचा पुरवठा करण्यात यावा.

**संदर्भ ग्रंथ :**

1. साखर आयुक्त महाराष्ट्र, अहवाल, 2011

2. डॉक्टर बी डी इंगळे औद्यागिक अर्थशास्त्र, अरुण प्रकाशन, लातूर

3. सु. वा. करमकर, 1990, साखर निर्मिती, अनमोल प्रकाशन, पुणे

4. S. Pruthi “(1995)History of sugar industry in India” Reliance a. Publication House, New Delhi page no. 1-8

5. Sami Uddin and Mahfoozur rRahman (1983)’cooperative sector in india’ S Chand & company Ltd New Delhi page no. 47-52.

6. http://www.indiansugar.com/uploads/FSS_ACT_2006.pdf.

7. http://www.indiansugar.com/uploads/Sugar_Development_Fund_Ac

8. t-1982.pdf. 9. http://www.indiansugar.com/uploads/EC(AMENDMENT) ACT.pdf

# ग्रामीण जीवनातील शेतीचे महत्त्व

**डॉ. दीपक गायकवाड**
**श्री शाहू मंदिर महाविद्यालय, पुणे**

**सारांश**

भारत हा खेड्यांचा देश आहे. खेड्यातील जनजीवन हे शेतीवर अवलंबून आहे. जोपर्यंत खेडी आहेत तोपर्यंत शेतीचे महत्व कमी होणार नाही. आजच्या जागतिकीकरणामुळे, उदारमतवादी धोरणामुळे शेतीच्या उत्पादनावर दूरगामी परिणाम झाला आहे. त्यामुळे या तंत्रज्ञानाच्या युगात आजच्या युवकांचा शेतीकडे पाहण्याचा दृष्टिकोन नकारात्मक आहे असे जाणवते. परंतु जोपर्यंत मानवी भूक अस्तित्वात आहे तोपर्यंत शेतीचे महत्व कोणीही कमी करू शकत नाही. ग्रामीण जीवन आणि शेती एकमेकांपासून कोणीही वेगळे करू शकत नाही. त्या एकाच नाण्याच्या दोन अविभाज्य बाजू आहेत.

**प्रास्ताविक**

ग्रामीण जीवनात शेतीचे महत्त्व आहेच, परंतु कोरोनाच्या पार्श्वभूमीवर ग्रामीण जीवनातील शेती कोणत्या अवस्थेतून संक्रमित होत आहे याचा गांभीर्याने विचार करावा लागेल. यामध्ये बदल झाला नाही तर भविष्यकाळात अनेक राष्ट्रीय समस्यांना सामोरे जावे लागणार आहे. पाठीमागच्या काही शतकात शेतकऱ्यांची शेतीची अवस्था कधी चांगली तर कधी बिकट असल्याचे दिसते. शेती हा आपल्या अर्थव्यवस्थेचा महत्त्वाचा घटक आहे. कोरोनाच्या काळात ठप्प झालेल्या अर्थव्यवस्थेला मागील दोन वर्षापासून शेतीने वाचवले आहे, हे सर्व जगाला माहिती आहे. महात्मा गांधीजींनी 'खेड्याकडे चला' हा संदेश दिला, याचे कारण खेडी ओस पडू नयेत. शेतीकडे दुर्लक्ष होऊ नये हा त्यामागील विचार होता. पण जागतिकीकरणाची प्रक्रिया सुरू झाली तसे शेतीकडे व शेतकऱ्यांकडे दुर्लक्ष होऊ लागले. आणि आजच्या स्थितीलाही तिची अवस्था फारच बिकट आहे, ती अधिक बिकट होऊ नये म्हणून या पुढील काळात काळजी घेतली पाहिजे.

**ग्रामीण जीवन आणि शेती**

भारतातील शेती ही पारंपरिक आहे. याचे चित्रण प्राचीन ग्रंथांमध्येही आढळून येते. शेतकरी व शेती कल्याणाचा विचार सर्वप्रथम कुळवाडी भूषण छत्रपती शिवाजी महाराज यांनी मांडला. आपल्या स्वराज्यात शेतकऱ्यांच्या भाजीच्या देठालाही कोणी हात लावता कामा नये ही महाराजांची शिकवण होती. महाराजांनंतर हाच विचार डोळ्यासमोर ठेवून महात्मा फुले यांनी शेती व शेतकऱ्यांच्या प्रश्नांना वाचा फोडली. 'शेतकऱ्यांचा असूड' या ग्रंथात ब्रिटिशकालीन शेतकऱ्यांची व शेतीच्या परिस्थितीचे वर्णन आले आहे. म्हणजेच मागील काही शतकांपासून ग्रामीण जीवनातील शेतीचे महत्त्व अधोरेखित होताना दिसते आहे. शेतीचे वास्तव समोर येत आहे. ग्रामीण जीवनात शेतीचे महत्त्व अधोरेखित होत असताना सन २०१७-२०१८ या वर्षात पहिल्यांदाच भारतात शेतकऱ्यांचा संप झाला. तोही आपल्या महाराष्ट्रातील अहमदनगर जिल्ह्यातील पुणतांबे या छोट्याशा गावात. पहिल्यांदाच शेतकऱ्यांनी संप करण्याचे ठरवले व संपूर्ण महाराष्ट्रात त्याचे पडसाद उमटले. ही एक ऐतिहासिक घटना होती. भारतासारख्या कृषिप्रधान देशात अशा घटना घडाव्यात ही एक विचार करायला लावणारी बाब आहे. भारताला स्वतंत्र होऊन इतकी वर्ष होऊनही शेती व ग्रामीण जीवनाचे प्रश्न वाढतच आहेत. दुष्काळ, महापूर, आत्महत्या, गारपीट, कर्ज, सेझ, हमीभाव या सारख्या गंभीर समस्यांना आजच्या शेतकऱ्यांना तोंड द्यावे लागते ही गंभीर बाब आहे. शासनाच्या विविध योजना ही परिस्थिती सुधारण्यासाठी अनुकूल आहेत परंतु त्या योजना पाहिजे त्या पद्धतीने शेवटपर्यंत शेतकऱ्यांपर्यंत, ग्रामीण जीवनापर्यंत पोहोचत नाहीत. यातून नैराश्य निर्माण होऊन शेतकऱ्यांमध्ये असुरक्षितता निर्माण होत आहे. शेतीकडे पाहण्याचा नकारात्मक दृष्टीकोन त्यांच्यामध्ये निर्माण होत आहे. आजच्या युवा पिढीसाठी ही गोष्ट चिंताजनक आहे. येणाऱ्या काळात देशाला याची फार मोठी किंमत मोजावी लागेल.

ग्रामीण जीवनातील शेतीचे महत्त्व ओळखून महाराजा सयाजीराव गायकवाड व राजर्षी शाहू महाराज यांनी आपल्या संस्थानात वेगवेगळे उपक्रम व प्रयोग केलेले होते. महाराजा सयाजीराव गायकवाड आपल्या भाषणात म्हणतात, "माझ्या राज्यातील शेतकरी वर्गाची स्थिती सुधारण्यासाठी आज पंचवीस वर्षे झाली. नानातऱ्हेचे प्रयत्न मी करून पाहिले आहेत. जमिनीच्या साऱ्याची आकारणी अधिक सारासार विचाराने केली. जुन्या कायद्यांना सोपे सरळ रूप देऊन ते अधिक लोकोपयोगी केले व शेतकरी लोकांची हमखास प्रगतीच साधतील असे नवे कायदेही केले. शेतीच्या कामी उपयोगी पडतील अशा सडका बांधल्या व रेल्वे सुरू केल्या. आणि जरूर तर पाटाचे पाणी शेताला मिळावे म्हणून जिथे जिथे तलाव बांधणे शक्य होते तिथे ते बांधले गेले आहेत व अजूनही बांधले जात आहेत. मोफत

शिक्षणाची सोय सर्व गावातून करून दिली आणि ग्रामवाचनालये सुरू केली. शेती व व्यापार यांच्याकरिता स्वतंत्र खातीच काढून दिली आहेत आणि व्यापारविषयक परिस्थितीची संपूर्ण रीतीने पाहणी देखील करून घेतली आहे."[१] शेतकऱ्यांच्या व ग्रामीण जनतेच्या प्रश्नांची सोडवणूक राजांनी कशी केली होती हे यावरून दिसून येते. ही दूरदृष्टी विचार करायला लावणारी आहे.

ग्रामीण जीवनातील शेती एका चक्रव्यूहातून जात असताना काही सकारात्मक बाबीही दिसून येतात. देशाच्या उत्तर भागात झालेल्या हरितक्रांतीच्या पार्श्वभूमीवर आपल्या राज्यांमध्येही संकरित आणि अधिक उत्पन्न देणाऱ्या जातींचा वापर झपाट्याने वाढत गेला. कृषी क्रांतीचे जनक डॉ. एम. एस. स्वामीनाथन यांनी आजच्या शेतीला हरितक्रांती असे जरी नाव दिले असले तरी, भविष्यकाळाची शेती सदा हरितक्रांती अशी असेल असे म्हटले आहे. कालची शेती पारंपरिक, आजची शेती आधुनिक व उद्याची शेती शाश्वत बनवणे हे ध्येय ठेवावे लागेल. भविष्यकाळातील शेती करताना आधुनिक शेती तंत्रज्ञानाचा वापर करून शेती तंत्रज्ञानाची साथ घेऊन या शेतीला शाश्वत बनवणे काळाची गरज आहे. उद्याच्या शेतीला विचार करताना पारंपारिक आणि आधुनिक शेतीमध्ये सामंजस्य स्थापित करीत असताना जे प्रश्न उभे राहतात त्यावर अत्यंत गांभीर्याने विचार करणे आवश्यक आहे.

महाराष्ट्रात आज वीस ते पंचवीस हजार खेडी आहेत. या खेड्यात महाराष्ट्राचे सत्तर ते ऐंशी टक्के लोकसंख्या राहते. भारतीय संस्कृती ही प्रामुख्याने शेतीप्रधान, ग्रामीण संस्कृती आहे. ग्रामीण जीवनाचा खरा चेहरा शेती उद्योग आहे . याविषयी डॉ. आनंद यादव म्हणतात,. "भौगोलिकदृष्ट्या भारतीय भूमी खेडयांनाच जन्म देण्याच्या दृष्टीने अनुकूल आहे. ती उंच-सखलतेने डोंगरदऱ्यांनी भरलेली आहे. जंगले, वने, नद्या-नाले या भूमीत भरपूर आहेत. मान्सून प्रदेशात ही भूमी येत असल्याने व विस्ताराने ही विशाल असल्याने निसर्गाची वृक्षवल्ली फळाफुलांची विविधता हिच्यात पुष्कळच आहे. पिकांची विविधताही पुष्कळच आहे. दुसरे असे की देशातील पावसाचे स्वरूप हे वर्षातील तीन-चार महिने टिकणारे असल्यामुळे या देशातील सुपीक- नापीक जमिनीला कृत्रिमरीत्या पाणीपुरवठा करावा लागतो. त्यामुळे विहिरी, कालवे खोदावे लागतात. तळी, तलाव, बंधारे तयार करावे लागतात. काही तळी, तलाव निसर्गनिर्मितही आहेत. यातूनच शेतीला पाणी पुरवावे लागते. त्यामुळे जेथे जशी पाण्याची व्यवस्था करता येईल किंवा कशी जशी असेल तिथे तशी खेडी वसत गेली. भारतीय मुख्य व्यवसाय शेती हाच असल्याने भारतीयांना पिकाऊ जमिनी असतील तिथे वस्ती करावी लागली. यातूनच छोट्या-छोट्या वस्तींची खेडी तयार झाली.

कृषिप्रधानता, शेती उद्योग हा खेड्यांचा आत्मा आहे. हा आत्मा जोवर नाहीसा होत नाही तोवर भारतीय खेडे कितीही सुधारले तरी खेडेच राहणार आहे, हे उघड आहे."२ यावरून ग्रामीण जीवन व शेतीचे नाते व महत्त्व स्पष्ट होते. भारतीय संस्कृतीचे मूळ जीवन ग्रामीण शेती हे आहे. भारतीय शेती वेदकालापासून अस्तित्वात होती याचे स्पष्ट पुरावे ही आपल्याला मिळतात.

**ग्रामीण जीवन व साहित्य**

ग्रामीण साहित्याला भारतीय जीवनात व संस्कृतीत अनन्यसाधारण महत्त्व आहे. याविषयी आनंद यादव म्हणतात, "इथल्या मातीचे दर्शन घडविणारे ते खास साहित्य आहे. ग्रामीण जीवनाचा आत्मा असलेली ही शेती आणि ती कसणारे शेतकरी हेच ग्रामीण साहित्याचा आत्मा का असतात याची कल्पना यावरून येईल आणि शेतकरी आणि शेतीवर पिकणारी पिके व आसपासचा निसर्ग यांनी ग्रामीण साहित्यातील वातावरण मोठ्या प्रमाणात भारून गेलेले का असते हेही कळू शकेल."[३] शेती व ग्रामीण जीवन हा ग्रामीण साहित्याचा आत्मा आहे पण आजच्या घडीला शेती व ग्रामीण जीवनाचे चित्रण मराठी साहित्यात बदलताना दिसत आहे.

दळणवळणाच्या सुकरतेमुळे शहराशी संपर्क वाढल्यामुळे ग्रामीण जीवनात बदल झालेला दिसतो. त्यामुळे तेथील नागरी जीवनातील विविध जीवनोपयोगी साधने याचा वावर जास्त प्रमाणात खेड्यात झालेला आढळतो आणि ग्रामीण जीवन पालटून गेलेली दिसते. मात्र या बदलामुळे ग्रामीण जीवनातील छोटा शेतकरी आणि ग्रामीण जीवनाचा गाभा असलेल्या मजूर वर्ग उपेक्षितच राहिला. त्याला सरकारी योजनेचे फायदे घेता आले नाहीत. ग्रामीण भागातील मजुरांच्या नशिबी मात्र असलेले दारिद्र्य, उपासमार, उपेक्षा अजून गेली नाही त्यामुळे त्यांचे स्थलांतर पाठी मागच्या काही वर्षांपासून शहराकडे जास्त प्रमाणात झालेली दिसते. याचा परिणाम शेतीवर झालेला आहे. आज शेती करण्यासाठी मजुरांची कमतरता मोठ्या प्रमाणात भासत आहे. याला ही सर्व व्यवस्था व कारणे जबाबदार आहेत असे म्हणावे लागेल.

**समारोप**

गेल्या काही हजार वर्षात मानवी समाज शेतीप्रधान, उद्योगप्रधान आणि माहितीप्रधान अवस्थांमध्ये संक्रमित होताना दिसत आहे. पण आता तो ज्ञानप्रधान अवस्थेत प्रवेश करत आहे, केला आहे. आज संपूर्ण विश्व ज्ञानप्रधान अवस्थेकडे जात असले तरी शेतीप्रधान अवस्था विसरून चालणार नाही. भविष्यकाळात ज्ञानप्रधान अवस्थेतून विश्व पुढे संक्रमित झाले तरीही शेती आणि ग्रामीण जीवन यांचे महत्त्व कमी होणार नाही हे तितकेच खरे आहे. ग्रामीण जीवनातच नव्हे तर संपूर्ण मानवी विश्वात शेतीचे महत्त्व आहे. भविष्यकाळातही ते असणारच आहे यात शंका नाही. फक्त शेतीचे, ग्रामीण जीवनाचे प्रश्न सोडवताना त्यांना पॅकेजची गरज नसून संजीवक व स्वावलंबी शेतीची गरज, नव्या कर्मशील आणि किफायतशीर ज्ञानाच्या आणि बंधूभावी संवादाच्या सातत्यपूर्ण पॅकेजची गरज आहे.

ग्रामीण जीवनातील शेतीला अधिक बळकट करण्यासाठी तिचे महत्त्व अधोरेखित करण्यासाठी सरकारने शेतीवरील विविध निर्बंध उठवावेत. प्राधान्याने शेतीमालाचा बाजार, जमीन धारणा व हस्तांतरण यावरील निर्बंध महत्त्वाचे आहेत. वीज, रस्ते, पाणी, साठवणूक आधी संरचना मजबूत करण्यासाठी योग्य पावले उचलली पाहिजेत. शेतकऱ्यांच्या बाजार भावाला हमीभाव द्यावा. शेती क्षेत्राचे भवितव्य शेतकऱ्याला घडवण्याची संधी द्यावी. पण सध्याचे चित्र उलटे दिसत आहे. पाठीमागच्या काही महिन्यापासून नवीन कृषी कायद्याविरोधात शेतकऱ्यांनी आंदोलने केली. शेतकऱ्यांनी आंदोलनाचे हत्यार का उपसले आहे? या प्रश्नांबाबत व विविध प्रश्नांविषयी आत्मपरीक्षण करण्याची वेळ आली आहे. ग्रामीण जीवनातील शेतीचे महत्त्व भविष्यकाळात अबाधित ठेवण्यासाठी यावर कायमस्वरूपी औषध शोधावे लागेल यात शंका नाही.

**संदर्भ-**

१. लांडगे शिरीष, रोंगटे तुकाराम, सांगळे राजेंद्र, (संपादक), 'उत्कर्षवाटा', शब्दालय प्रकाशन श्रीरामपूर,२०१९, पृष्ठ क्र.१९

२. यादव आनंद, 'ग्रामीणता साहित्य आणि वास्तव' मेहता पब्लिशिंग हाऊस पुणे, १९८१, पृष्ठ क्र. २२

३. 'ग्रामीणता साहित्य आणि वास्तव' पृष्ठ क्र. २३

# कोविड – १९ चा भारतीय कृषी व ग्रामीण विकासावर झालेला परिणाम

**प्रा.डॉ.संतोष दळवी**

सहाय्यक प्राध्यापक व विभागप्रमुख , अर्थशास्त्र विभाग, म.वि.प्र.समाजाचे क.का.वाघमहाविद्यालय पिंपळगाव (ब.) ता. निफाड जि. नाशिक

E-mailid – skdalavi862@gamil.com

**गोषवारा –**

सध्यस्थितीत जगभरात सुरू असलेल्या कोविड – १९ साथीचा रोग सर्व देशभर पसरलेला आहे.करोना साथीच्या रोगामुळे भारतातील आर्थिक घडामोडींना मोठा फटका बसला आहे.भारतीय अर्थव्यवस्थेत करण्यात आलेल्या देशव्यापी टाळेबंदी /लॉकडाऊन दरम्यान कृषि, औद्योगिक, सेवा, पर्यटन, शिक्षण अशा सर्वच क्षेत्रांवर मोठ्या प्रमाणात विपरीत परिणाम झालेला दिसून येतो.यामुळे जशी देशाची अर्थव्यवस्था अस्ताव्यस्त झाली, तसेच मानवीजीवनहीअसाहाय्य झालेले दिसून येते.ज्या कृषी क्षेत्रावर समस्त अर्थव्यवस्थेचा भार आहे त्या कृषीक्षेत्राचीहि या आपत्तीच्या काळात वाताहत झालेली दिसून येते. कृषी उत्पादनांचा उपभोग,त्यांची निर्यात,या क्षेत्रावर अवलंबून असणारे प्रक्रिया उद्योग, या क्षेत्रावर प्रत्यक्ष अप्रत्यक्ष अवलंबून असणारा कामगार वर्ग या सर्वांनाच प्रत्यक्ष अप्रत्यक्ष रित्या या महामारीचे परिणाम भोगावे लागले.

**प्रमुख संज्ञा –**कोविड – १९,वैश्विक महामारी,जागतिक मंदी,शेतमालाची निर्यात,कोविड - १९ कृषी क्षेत्रावरील प्रत्यक्ष परिणाम,ग्रामीण विकासावरील परिणाम.

**प्रस्तावना –**

जागतिक आणि भारतीय अर्थव्यवस्थेच्या पातळीवर विचार करता पहिले महायुद्ध , दुसरे महायुद्ध तसेच १९२९ची जागतिक महामंदी या सारख्या अनेक आर्थिक सामाजिक तसेच राजकीय समस्यांना आजतागायत जगाने तोंड दिले आहे. याला भारतही अपवाद नाही. मात्र फेब्रुवारी २०२०पासून कोविड - १९ या समस्येने संपूर्ण जगाला ग्रासले.मोठ्या प्रमाणात जीवित हानी या आजारामुळे जागतिक स्तरावर घडून आली. जगाचे अर्थचक्र या आजाराने थांबविले असे म्हटले तर ते चुकीचे ठरणार नाही. अनेक देशांमध्ये रोजगाराचा प्रश्न, आर्थिक मंदीचा प्रश्न,स्थलांतराचा प्रश्न असे अनेक प्रश्न नव्याने त्या त्या अर्थव्यवस्था समोर या आजाराने उपस्थित केले.

कोविड-१९ या वैश्विक महामारीने जगासमोर नविन आव्हाने आणि आडचणी उभ्या केल्या आहेत. कोरोना संकटाने फक्त आरोग्य व्यवस्थे समोर आव्हान उभे केले असे नाही तर त्याचा परिणाम म्हणून जगभरातील आर्थिक , सामाजिक, औद्योगिक, शैक्षणिक, वित्तीय अशा अनेक बाबतीत अनेक मोठे आणि ठळक बदल घडून आले आहेत. आज कोरोना विषाणुमुळे संपुर्ण जग अडचणीत आहे. बहुतांश देशाचे अर्थिक व्यवहार ठप्प झालेले दिसुन येत आहे. कोविड-१९विषाणुचा मोठया प्रामाणावर होणारा संसर्ग रोखण्यासाठी जगामध्ये लॉकडाऊनसारख्या उपायांचा वापर करण्यात येत आहे. यामुळे देशांतर्गत उत्पादन, सेवा आणि उद्योग बंद करण्यात आलेले आहेत. जगानं आतापर्यंत दोन महायुध्दे अनुभवलेली आहेत परंतु या महायुध्दाची झळ काही देशांना लागलीच नव्हती. या महायुध्दामध्ये जे देश सहभागी झाले नव्हते तिथली अर्थव्यवस्था आणि नागरीक सुरक्षीत होते. अर्थात त्यावेळी अर्थव्यवस्थेचे जागतिकीकरण मोठया प्रामाणावर झालेले नव्हते.

आजच्या परिस्थितीचा विचार करता कोरोना विषाणुमुळे मागील महायुध्दापेक्षाही गंभीर परिस्थिती जगामध्ये निर्माण झाली आहे.आलेल्या महामारीमुळे संपुर्ण जग भयभीत झालं आहे. सर्वशक्तिमान व विकसित समजल्या जाणाऱ्या अमेरीका आणि युरोपीयन देशांनी या महामारीसमोर हात टेकले आहेत. जागतीक अर्थव्यवस्थेचे दोन महायुध्दामुळे जेवढे नुकसान झालेले नाही त्यापेक्षा अधिक नुकसान या महामारीमुळे होत आहे असे मत तज्ञांनी व्यक्त केले आहे.

**संशोधन समस्या विधान – "कोविड – १९ चा झालेला भारतीय कृषी व ग्रामीण विकासावर झालेला परिणाम अभ्यासणे "**

**संशोधनाची उदीष्ट्ये –**

**१)** कोविड- १९ चे भारतीय कृषी क्षेत्रावर झालेले दुष्परिणाम समजून घेणे.

**२)** कोविड - १९ च्या दुष्परिणामांना तोंड देण्यासाठी योग्य उपाय योजना सुचविण्याचा प्रयत्न करणे.

**संशोधनाची गृहीते –**

**१)** कोरोना काळात भारतीय कृषी क्षेत्रात मंदीची स्थिती निर्माण झाली.

**२)** कोरोना काळात शेती उत्पादची निर्यात तसेच आंतर्गत वाहतूक विस्कळीत झाल्याने शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले .

**संशोधन पद्धती –** प्रस्तुत संशोधन कार्यासाठी संशोधनाच्या प्राथमिक व द्वितीय संशोधन पद्धती पैकी द्वितीय संशोधन पद्धतीचा उपयोग करण्यात आला आहे. त्यामध्ये प्रस्तुत संशोधन कार्यासाठी लागणाऱ्या सामग्रीचे संकलन वर्तमानपत्रे, मासिके, साप्ताहिके, संदर्भ ग्रंथ त्याचबरोबर ऑनलाईन वेबसाइट्स, यूट्यूब चॅनेल्स यांच्या माध्यमातून करण्यात आलेले आहे.

**संशोधन विश्लेषण –** ३० जानेवारी २०२० ला भारतातील केरळ राज्यात कोरोनाचा पहिला रुग्ण आढळून आला. त्यानंतर ७ मार्च रोजी महाराष्ट्रात काही रुग्ण आढळून आले व त्यानंतर ही संख्या सतत वाढत गेली.२३ मार्च २०२० रोजी देशभर जनता कर्फ्यू लावण्यात आला आणि त्यानंतर देशभर जगातील सर्वात कठोर टाळेबंदी राबविण्यात आली. संचारबंदी टाळेबंदी बंद असणारे उद्योग बंद पडलेल्या बाजारपेठा बंद असणाऱ्या व्यापारी आस्थापना या सर्वांबरोबरच जगाचा पोशिंदा म्हणून ज्याच्याकडे पहिले जाते त्या बळीराजालाही या कोरोना महामारीने संकटात लोटले. आणि यामुळे कृषी क्षेत्राशी संबंधित अनिष्ट परिणामांची साखळी निर्माण होण्यात झाला. प्रदीर्घ टाळेबंदी मुळे आणि अकुशल कामगारांचे स्थलांतरण यामुळे अर्थव्यवस्थेत मंदीचे वातावरण निर्माण झाले. लक्षावधी लोकांचे रोजगार बुडाले आणि स्थूल देशांतर्गत उत्पादनाचा दर वजा म्हणजे ऋणात्मक झाला या सर्वांमुळे अर्थव्यवस्थेच्या विविध क्षेत्रांना सहाय्यभूत ठरणाऱ्या कृषी क्षेत्रावर मोठ्या प्रमाणात त्याचे अनिष्ट परिणाम घडून आले.धातू उद्योग, कापड उद्योग, अभियांत्रिकी उद्योग , पायाभूत सुविधा, बांधकाम क्षेत्र, वाहतूक व्यवसाय किरकोळ विक्री क्षेत्र या क्षेत्रांच्या विकासाला पूरक व्यवसाय म्हणून शेती क्षेत्राकडे पहिले जाते आणि या कोरोना महामारीने शेतीव्यवसायचेच कंबरडे मोडल्याने देशातील वरील सर्वच क्षेत्रांना त्याचे विपरीत परिणाम भोगावे लागले. वित्तपुरवठ्याला असणारी मागणी वेगाने घटली आणि बँकिंग व्यवस्थेचे कंबरडे मोडते की काय अशी परिस्थिती निर्माण झाली. यापेक्षा भयंकर परिणाम ऊर्जा , वाहन उद्योग यासाठी आवश्यक असणारे सुटे भाग बनविणारे कारखाने वाहतूक पर्यटन या क्षेत्रांमध्ये अतिशय गंभीर स्वरूपाचे परिणाम दिसून आले. त्यातल्या त्यात जमेची बाजू म्हणजे फक्त आरोग्य विषयक सेवा , औषध निर्मिती क्षेत्र या बाबतीत थोडेसे सकारात्मक परिणाम दिसून आले तर कृषी संलग्न व्यवसाय , अन्नप्रक्रिया उद्योग हे मात्र या कोविड -१९ च्या सुनामीच्या परिणामापासून दूर राहिले असे म्हणावयास हरकत नाही. जनता कर्फ्यू आणि टाळेबंदी नंतर जे काही निर्णय घेण्यात आले त्यामुळे कृषी क्षेत्रातीलनिर्यात, शेतमालाच्या किंमती,प्रक्रिया उद्योग इ.अनेक दुष्परिणाम झालेले दिसून येतात त्याचा आढावा पुढील प्रमाणे घेता येईल.

**कोविड - १९ कृषी क्षेत्रावरील प्रत्यक्ष परिणाम**

कोविड - १९ चा आपल्या शेतीवर आणि शेतीपूरक व्यवसायावर सखोल आणि व्यापक परिणाम झालेला दिसून येत आहे. सन २०१९-२० यावर्षी पाऊस अतिरिक्त झाल्यामुळे आणि महापुरामुळे खरिपाचा हंगाम नुकसानीचा गेला,मात्र अतिरिक्त पावसाचा परिणाम म्हणून रब्बी पिके आणि उत्पादन चांगले आले होते.यात उस, फळे, भाजीपाला, मिरची, कांदा, लसुन, भात, गहू, सोयाबीन, हरभरा, कापूस, ज्वारी यांचा समावेश आहे.मात्र टाळेबंदी सर्व कामे बंद राहिल्यामुळे या पिकांची कापणी आणि काढणी देखील योग्य प्रकारे आणि वेळेत करता आली नाही. त्यामुळे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. द्राक्ष, पेरू, काजू, चिकू, आंबा, कलिंगड आणि इतर फळांची काढणी वेळेत न झाल्याने त्यांचेही नुकसान झाले.याबरोबरच प्रक्रिया उद्योग यात प्रामुख्याने दुग्धव्यवसाय, कुकुटपालन, फळ प्रक्रिया उद्योग बंद राहिल्याने मोठ्या प्रमाणात नुकसान झाले.भाजीपाला फळे यांच्या किंमती कमी झाल्याने शेतकऱ्यांचे नुकसान झाले प्रसंगी उत्पादन खर्च देखील वसूल झाला नाही.मजूर कोणत्याही प्रकारचे काम न करू शकल्याने त्यांना उत्पन्नन मिळाल्याने त्यांच्यावरही उपासमारीची वेळ आली. एकूण शेतमजुरांना पैकी ५४.९% भूमिहीन तर ४५.१% अल्पभूधारक आहेत.४०० दशलक्ष लोकांना टाळेबंदीचा फटका बसला आहे.रोजगार बंद झाल्याने औद्योगिक कामगारांची ही शेतमालाला असणारी मागणी कमी झाल्याने शेतकऱ्यांचे नुकसान झाले

'Journal of Research & Development' A Multidisciplinary International Level Referred and Peer Reviewed Journal, Impact Factor-7.265, ISSN: 2230-9578, 30 October2021, Volume-12, Issue-15
Agriculture and Rural Development: Strategic Issues and Reform Options

आहे.२०१८-१९ या आर्थिक वर्षात शेतमाल निर्याती पासून ३८ अब्ज डॉलर्स इतके उत्पन्न मिळाले होते ते या वर्षात सोडून द्यावे लागले.नगदी पिकांना लागणारा मजूर स्थलांतरित असल्याने आणि काम बंद आणि गावी गेल्याने आता तुटवडा निर्माण झाला असून मजुरीचे दर वाढल्याने खर्चात वाढ होत आहे. बाजारपेठा बंद वाहतूक सुविधांचा अभाव यामुळे मुंबई पुणे दिल्ली अहमदाबाद या सारख्या शहरांना होणारा शेतमालाचा उठाव झालाच नाही आणि शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान झाले. नाशिक जिल्ह्यातील निफाड तालुका तसेच दिंडोरी तालुका ही द्राक्षपंढरी म्हणून ओळखली जाणारी तालुके या कोणाच्या काळात मोठ्या प्रमाणात संकटात सापडली. करोडो रुपयांची आर्थिक उलाढाल असणारा द्राक्ष व्यवसाय कोरोना च्या काळात मोठ्या प्रमाणात संकटात सापडला.एका बाजूला रासायनिक खते आणि कीटकनाशके यांच्या गगनाला भिडलेल्या किमती , मजुरीचे वाढलेले दर , अवेळी पडणारा पाऊस या सर्व खडतर वाटेने जाऊन शेतकऱ्यांनी द्राक्ष पिकवली मात्र ऐन द्राक्ष काढणीच्या हंगामात कोरोनाचे आक्रमण झाले आणि द्राक्ष उत्पादक संकटाच्या खाईत लोटला गेला. कोरोनाआल्यानंतर साखर कारखाने ही हंगाम संपन्यापूर्वीच बंद झाल्याने ऊस तोडणी कामगारांवरही बेकारीची कुऱ्हाड कोसळली आणि त्यांच्यावर उपासमारीची वेळ आली.ऊस उत्पादक शेतकऱ्याला आपल्या उसाची अन्यत्र सोय करताना किंवा त्या माध्यमातून उत्पन्न मिळवताना मोठी कसरत करावी लागली. अनेक शेतकऱ्यांना सावकारी कर्जाचा आधार घ्यावा लागला व शेतकरी कर्जबाजारी बनला.यातून हळूहळू शेती आणि शेतीशी संलग्न व्यवसाय तसेच प्रक्रिया उद्योग हे हळूहळू शिथिल होत गेले.शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्याने पुढील खरीप हंगामाची तयारी यामध्ये मशागत खते बी-बियाणे अवजारे उपलब्ध करणे हेदेखील आर्थिक दृष्ट्या जिकरीचे झाले.टाळेबंदीचा शेती आणि पूरक व्यवसायावरील परिणाम राज्य आणि क्षेत्रनिहाय वेगवेगळा आहे. यातून जरी आत्ता धान्य साठा पुरेसा असला तरी भविष्यात टंचाई निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही, असे मत अखिल भारतीय शेती संघर्ष समितीचे समन्वयक अविक शहा यांनी व्यक्त केले आहे.

पश्चिम बंगालमधील झारग्राम, सुंदरबन परिसरात अन्नधान्याची टंचाई जाणवू लागली आहे. हापुस आंब्याच्या बाबतीत विचार करता एकूण उत्पादनापैकी ५५% उत्पादन महाराष्ट्रात होते आणि त्यासही मुंबई, पुणे आणि कोल्हापूर ही मोठी बाजारपेठ आहे.मात्र या बाजारपेठा या काळात बंद राहिल्याने आणि मागणी घटल्याने उत्पादकांचे मोठ्या प्रमाणावर आर्थिक नुकसान झाले असे निरीक्षण आंबा उत्पादक संघटनेचे अध्यक्ष चंद्रकांत मोकळ यांनी नोंदविले आहे. उत्तर प्रदेशात आगाऊ पैसे देऊन अन्नधान्य आणि फळांची मागणी केली जाते, मात्र कोरोना काळात ती न झाल्याने आणि वाहतूक सुविधा ठप्प झाल्याने व पॅकेजिंग न झाल्याने ७०% मागणी कमी झाली.त्यामुळे जर शेतकऱ्यांना कर्ज पुरवठा केला नाही तर ते कोरोना ऐवजी उपासमारीने मरतील असे मत अनेक तज्ज्ञांनी व्यक्त केले. सिराज हुसेन माजी शेती सचिव म्हणतात,पंजाब आणि हरियाणातून गहू सरकारने खरेदी केला मात्र तो बिहारमधून झाला नाही. मक्याची आधारभूत किंमत १७६० रुपये प्रति क्विंटल असताना ११०० विकावा लागला. मध्यप्रदेश मध्ये चण्याची देखील तीच स्थिती झाली. चना प्रति क्विंटल ६०० ते ७०० रुपये कमी भावाने विकावा लागला. शेतमाल आयोगाचे माजी अध्यक्ष महेंद्र देव यांच्या मते टाळेबंदी काळात मागणी घटल्याने शेतकऱ्यांचे खूपच नुकसान झाले आहे, त्यामुळे त्यांना रोख स्वरूपात मदत देणे अत्यावश्यक आहे. मात्र दुसऱ्या बाजूने काही शेतमालाच्या किमती वाढवून त्याचा आर्थिक बोजा सर्वसामान्यांवर तसेच गरिबांवर पडत आहे. यात प्रामुख्याने तृणधान्य आणि उत्पादने, दूध आणि उत्पादने, खाद्यतेल, फळे, भाजीपाला, कडधान्य, साखर आणि बेकरी उत्पादने तसेच मसाले यांचाही समावेश आहे. उदाहरणार्थ तृणधान्यांच्या बाबतीत भाववाढ एप्रिल २०१९ मधील १.२% वरून मार्च २०२० मध्ये ५.३% तर एप्रिल २०२० मध्ये ७.८%

वरील सर्व विवेचनावरून को -१९ टाळेबंदी भारतीय शेती विकासाला किती मारक ठरली आहे हे सिद्ध होते.

**ग्रामीण विकासावरील परिणाम –**

कृषी क्षेत्र कोरोनाच्या काळात अडचणीत सापडल्यामुळे साहजिकच त्याचे ग्रामीण विकासावरही विपरीत परिणाम झाल्याचे दिसून येते.कारण कृषी क्षेत्रात काम करणारा ग्रामीण कारागीर यामुळे अडचणीत सापडल्याचे दिसते.या वर्गातून वेगवेगल्या वस्तु आणि सेवांसाठी असणारी मागणी यामुळे घाटल्याचे दिसते.याच बरोबर उद्योग व्यवसाय अडचणीत आल्यामुळे ग्रामीण भागातून जो उद्योग व्यवसायासाठीचा पूरक सेवा देत होता त्याही थांबल्या साहजिकच या सर्वांचा एकत्रित परिणाम म्हणून ग्रामीण विकासावरही याचे गंभीर परिणाम दिसत आहेत. ग्रामीण कारागिरांमध्ये बेकरीचे प्रमाण वाढले, या काळात अनेक लोकांनी ऑनलाइन खरेदीचा मार्ग वापरल्याने छोटे

व्यावसायिक अडचणीत सापडले , काहींना आपला व्यवसाय बंद करावा लागला,ग्रामीण भागातून शहरी भागाकडे रोज मोठ्या प्रमाणात लोकांची ये जा सुरू असते परंतु कोरोना काळात हे प्रमाण खूपच कामी झाल्याचे दिसते. परिणामी ग्रामीण वाहतूक व्यवसायिकांवर बेकार होण्याची वेळ आली.

**सारांश–**कोविड - १९ या विषानूच्या माध्यमातून जगावर आलेल्या आपत्ति चे परिणाम भारतलाही मोठ्या प्रमाणात भोगावे लागले.भारतातील कृषि ,उद्योग , व्यापार, बँक या सर्वच क्षेत्राला मोठ्या प्रमाणात नुकसान सहन करावे लागलेले दिसून येते.कृषी क्षेत्राला तर याचे मोठ्या प्रमाणात गंभीर परिणाम भोगावे लागले.कृषी उत्पादनांची निर्यात थांबली, परकीय चलनाचा ओघ थांबला , ग्रामीण विकासाची गती थांबली, ग्रामीण कारागीर कष्टकरी वर्ग यांच्यावर बेकारीची वेळ आली. एकंदरीत कोरोना काळात ग्रामीण विकासावर विपरीत परिणाम झाला.

**निष्कर्ष –१)**कोव्हिड-१९ मुळे कृषी क्षेत्राची निर्यात कमी होऊन परकीय चलनाचा ओघ कमी झाला.

**२)**कोव्हिड-१९ मुळे तृनधान्यांसारख्या घटकांच्या किंमती अचानक वाढल्याने संमान्यांना त्याची झळ बसली.

**३)**कोरोना काळात भारतीय कृषी क्षेत्रात काही उत्पादनांच्या बाबतीत मोठ्या प्रमाणात मंदीची स्थिती निर्माण झाली त्यामुळे शेतकरी अडचणीत सापडला.

**४)** अर्थव्यवस्था आणि प्रामुख्याने कृषी क्षेत्राला या स्थितीतून सावरण्यासाठी खूप मोठा आधार या क्षेत्राला द्यावा लागेल आणि त्यातही जर पुन्हा कोरोंनाची तिसरी लाट येऊन सरकारला लॉकडाऊन सारखा निर्णय घ्यावा लागला तर मात्र शेती व्यवसाय पुन्हा आडचणीत येऊ शकतो हे नक्की.

**शिफारशी –**

**१)**सरकारने अन्य क्षेत्राकडील निधि काही काळासाठी कमी करून तो आरोग्य विभागाकडे वळवून आरोग्य विषयक सुविधांवर भर देणे आवश्यक आहे.की जेणेकरून पुन्हा अशी आपत्ति येऊन लॉकडाउन सारखा मार्ग अवलंबवा लागणार नाही.

**२)**कृषी क्षेत्राची निर्यात वाढविण्यासाठी निर्यातक्षम उत्पादन वाढीला चालना देण्यासाठी विशेष अनुदानाची तरतूद काही काळासाठी तरी करावी लागेल.

**३)**ग्रामीण विकासाची गती वाढविण्यासाठी ग्रामीण भागातील कारागीर आणि कष्टकरी वर्ग यांच्यासाठी अशा प्रकारच्या आपत्तीच्या काळासाठी सरकारने काहीतरी विशेष तरतूद करण्याची गरज अलीकडील काळात निर्माण झाली आहे.

**संदर्भसूची –**

**1.** मराठी अर्थशास्त्र परिषद – अर्थसंवाद त्रैमासिक – एप्रिल – जून 2020
2. Dr. Kishore Kumar Das & S. Patnaik (2020), "The Impact of COVID-19 in Indian Economy - An Empirical Study", International Journal of Electrical Engineering and
3. Technology, 11(3), 2020, PP. 194-202 (29th June, 2020 online)
4. Report of Centre for Monitoring Indian Economy (CMIE), 7th April, 2020, 7th April. 2020, January, 2021.
5. www.esakal.com 5.Jan.2021
6. https://marathi.thewire.in/corcna-and-indias-economy-
7. https://www.orfonline.org/marathi/impact-of-covid-19-onrural-lives-and-livelihoods-in-india-654101
8. https://traunbhart.org

# पश्चिम विदर्भातील मुख्य रस्ते मार्गांची संपर्कतेची पातळी : भौगोलिक अध्ययन

**डॉ विशाल एस मून**
सहाय्यक प्राध्यापक, भूगोल विभाग, सहकार भूषण एस के पाटील महाविद्यालय कुरुंदवाड, तालुका – शिरोळ, जिल्हा- कोल्हापूर

**सारांश**

वाहतूक मार्गाची संपर्क करा हे नेहमी विकास दर्शवत असते यात प्रामुख्याने रस्ते वाहतूक व रेल्वे वाहतूक याचा अभ्यास केला जातो रस्ते वाहतुकीचा विकास रेल्वे वाहतूक पेक्षा अधिक झाला असल्याने रस्ते मार्गाची संपर्क साधा विकासावर अधिक प्रभाव करत असल्याचे लक्षात येते. रस्ते वाहतुकीचे महत्त्व राज्याच्या व देशाच्या विकासात महत्त्वाचे आहे हे दर्शविण्याचा प्रयत्न प्रस्तुत संशोधनात करण्यात आलेला आहे तीच 1968 या शास्त्रज्ञांच्या मतानुसार ऊस वाहतूक जाळयांचे शिरोबिंदू एकमेकांसोबत थेट जोडण्याचे प्रमाण म्हणजे संपर्क कसा होय आणि हे शिरोबिंदू जितके जास्त प्रमाणात जोडलेले असतील तितकीच संपर्कता हे अधिक असते. कारण सर्व वाहतुकीच्या मार्गामध्ये संपर्कता असणे अतिशय आवश्यक असते. प्रस्तुत शोधनिबंधामध्ये महाराष्ट्र राज्यातील श्चिम विदर्भ प्रदेशातील रस्ते मार्गाच्या संपर्कतेचे अध्ययन केले असून रस्ते मार्गाची संपर्कता ही जिल्हा निहाय स्पष्ट केलेली आहे. त्यासाठी रस्ते वाहतूक मार्गाचे केंद्र व शाखा याचे अध्ययन करण्यात आले आहे

**बीजसज्ञा** मुख्य रस्ते, संपर्कता, संपर्कतेची पातळी, विकास

**प्रस्तावना**

रस्ते मार्गाचा विकास हा त्या प्रदेशातील सामाजिक आर्थिक विकास दर्शवित असते. ज्या प्रदेशात रस्त्यांची संपर्कता अधिक असते अशा प्रदेशात विकास अधिक झालेला आढळून येतो. संपर्कता म्हणजे कोणत्याही क्षेत्रात किंवा प्रदेशात वाहतूक मार्ग एकमेकांशी जोडलेले असणे असा होतो. संपर्कता ही कोणत्याही क्षेत्रातील वाहतुकीच्या विकासासोबत व्यापार आणि वस्तूच्या देवाणघेवाण वाढीस लावते. राष्ट्रीय पातळी व वाहतूक व्यवस्थेच्या मजबुतीकरणासाठी तसेच राज्याच्या अंतर्गत स्वयंपूर्ण वाढ करण्यासाठी भारत सरकारने सुपर हायवे नावांची रस्ते विकास योजना अस्तित्वात आणली आहे. या योजनेचा कालावधी वीस वर्षाचा असून या सुपरहायवे योजनेमध्ये संपर्कता यावर विशेष लक्ष केंद्रित केले आहे. वाहतुकीचे मार्ग एकमेकांना ज्या आकारात जोडलेले असतात त्यानुसार वाहतूक मार्गाचा आकृतीबंध आढळते. पश्चिम विदर्भातील वाहतुकीच्या मार्गाचा एकूण आकृतिबंध हा विस्कळीत आढळून येतो.

प्रस्तुत शोध निबंधामध्ये पश्चिम विदर्भातील रस्ते मार्गांच्या केंद्र व शाखेचे अध्ययन करून संपर्कतेची पातळी निश्चित करण्यात आलेली आहे.

**अभ्यासाची उद्दिष्ट्ये**

१) अभ्यास प्रदेशातील मुख्य रस्ते मार्गांचे केंद्र व शाखा (जोड व तीठे) यांचे अध्ययन करणे

२) अभ्यास प्रदेशातील मुख्य रस्ते मार्गांची संपर्कतेची पातळीचे जिल्हानिहाय अध्ययन करणे

३) अभ्यास प्रदेशातील संपर्कतेच्या पातळीतील तफावतीचे अध्ययन करणे

**अभ्यास क्षेत्र**

अभ्यास क्षेत्र म्हणजेच पश्चिम विदर्भ हा महाराष्ट्र राज्यात पूर्वेकडे स्थित आहे, या प्रदेशाला अमरावती विभाग देखील म्हटले जाते. या प्रदेशात एकूण पाच जिल्ह्यांचा समावेश होतो, अमरावती, अकोला, यवतमाळ, वाशीम आणि बुलढाणा.

पश्चिम विदर्भाचे अक्षवृत्तीय स्थान १९° २३' उत्तर ते २१° ४३' उत्तर अक्षांश असून रेखावृत्तीय स्थान हे ७५° ५७' पूर्व ते ७९° ०९' पूर्व रेखांश आढळून येते. अभ्यास प्रदेशाचे एकूण भौगोलिक क्षेत्रफळ ४६०१८ चौकिमी असून ते महाराष्ट्र राज्याच्या १४.७५% आढळून येते. अभ्यास प्रदेशाची २०११ च्या जनगणनेनुसार एकूण लोकसंख्या हि ११२५८११७ असल्याचे आढळून येते.

**माहिती स्त्रोत व अभ्यास पद्धती**

प्रस्तुत शोध निबंध हा प्रामुख्याने द्वितीय स्त्रोताद्वारे प्राप्त केलेल्या माहितीच्या आधारे पूर्ण केलेला असला तरी आलेले निष्कर्ष हे आलेखमिती (Graph Theory) पद्धतीवर आधारित आहे. मुख्य रस्ते मार्गांचे केंद्र व शाखांचे

मूल्यमापन करण्यासाठी सार्वजनिक बांधकाम विभाग कार्यालयाकडून अद्ययावत नकाशा संकलित करण्यात आला. त्या मूळ नकाशाच्या सहाय्याने भौगोलिक माहिती प्रणालीच्या सहाय्याने नकाशा तयार करण्यात आला आणि जिल्हानिहाय रस्ते मार्गांचे केंद्र व शाखा (Nodes and Linkages) यांचे मापन करण्यात आले आहे.

केंद्र व शाखांच्या सहाय्याने मुख्य रस्ते मार्गांची संपर्कतेची पातळी हि K. J. Kansky (1963) यांच्या पुढील सूत्राच्या सहाय्याने काढण्यात आलेली आहे.

**संपर्कतेची पातळी = [V (V - 1)] ÷ [2 ÷ E]**

V – Vertices (केंद्र), E- Edges (शाखा)

प्राप्त झालेले निष्कर्ष हे सारणीमध्ये दर्शवून अभ्यास प्रदेशातील नकाशामध्ये त्याचे वितरण दर्शविण्यात आलेले आहे.

**मुख्य रस्ते मार्गांचे केंद्र व शाखा (Nodes and Linkages)**

मुख्य रस्ते मार्गातील केंद्र व शाखांची संख्या हि राष्ट्रीय व राज्य महामार्गांच्या संपर्कतेवरून काढलेली आहे. ज्या ठिकाणी एकापेक्षा अधिक रस्ते येऊन मिळतात अशा ठिकाणास 'केंद्र' (Node) असे म्हणतात, तर त्या केंद्राला जितके रस्ते येऊन मिळतात त्यांना त्या केंद्राच्या 'शाखा' (linkages) असे म्हणतात. ज्या प्रदेशात यांची संख्या अधिक असते अशा प्रदेशात रस्ते मार्गाचा विकास अधिक असून रस्ते संपर्कता विकसित असते. परंतु केंद्राची संख्या व शाखांची संख्या यात अधिक तफावत नको कारण अधिक तफावत हि संपर्कतेची पातळी कमी करताना आढळते.पुढील सारणी क्रमांक १ मध्ये अभ्यास प्रदेशातील केंद्र व शाखांची संख्या व सूत्रानुसार काढलेली संपर्कतेची पातळी जिल्हानिहाय दर्शविण्यात आलेली आहे.अभ्यास प्रदेशात मुख्य रस्ते मार्गांचे एकूण १३३ केंद्र व २७१ शाखा आढळून येतात म्हणजेच शाखांची संख्या हि केंद्रापेक्षा दुप्पट असून प्रत्येक केद्रापासून सरासरी २ रस्ते जातात. सर्वाधिक केंद्रांची व शाखांची संख्या हि यवतमाळ जिल्ह्यात आढळून येते कारण या जिल्ह्याचे भौगोलिक क्षेत्रफळ हे विभागात सर्वाधिक आहे त्यामुळे रस्त्यांची संख्या अधिक आहे. परंतु यवतमाळ जिल्ह्याच्या क्षेत्रफळाच्या तुलनेत मात्र मुख्य रस्त्यांचा विकास मात्र कमी झालेला आढळून येतो.

**सारणी क्रमांक १, पश्चिम विदर्भ – मुख्य रस्ते मार्गांचे केंद्र व शाखा आणि संपर्कतेची पातळी**

| जिल्हे | केंद्र (Nodes) | शाखा (Linkages) | संपर्कतेची पातळी Level of Connectivity) |
|---|---|---|---|
| अमरावती | ३६ | ६८ | ९.२६ |
| अकोला | १२ | २७ | २.४४ |
| बुलढाणा | ३१ | ६५ | ७.१५ |
| यवतमाळ | ४५ | ८७ | ११.३७ |
| वाशीम | ०९ | २४ | १.५ |
| **एकूण** | **१३३** | **२७१** | **३१.७२** |

स्त्रोत – संशोधक



'Journal of Research & Development' A Multidisciplinary International Level Referred and Peer Reviewed Journal,
Impact Factor-7.265, ISSN: 2230-9578, 30 October2021, Volume-12, Issue-15
Agriculture and Rural Development: Strategic Issues and Reform Options

यवतमाळ नंतर अमरावती व बुलढाणा जिल्ह्यामध्ये मुख्य रस्ते मार्गांच्या शाखा व केंद्र अधिक आढळून येतात. तर सर्वात कमी प्रमाण हे अकोला व वाशीम जिल्ह्यात आढळून येते. अभ्यास प्रदेशात अकोला व वाशीम या दोन जिल्ह्यांनी सर्वात कमी क्षेत्रफळ व्यापले आहे आणि त्यामुळेच मुख्य रस्ते मार्गांचा विकास कमी असून संपर्कता कमी आढळते. अकोला व वाशीम या दोन जिल्ह्यांचे क्षेत्रफळ कमी असले तरी त्या तुलनेत मुख्य रस्ते मार्गांची संपर्कता मात्र कमी आढळून येते.

अभ्यास प्रदेशात केंद्र व शाखांचे जाळे हे प्रामुख्याने दर्यापूर, अमरावती, अचलपूर, वरुड, खामगाव, मेहकर, अकोट, पुसद, पांढरकवडा, या शहरांकडे अधिक आढळून येते. तर इतर शहरांकडे हे याचे जाळे विरळ असल्याचे आढळून येते.

**मुख्य रस्त्यांची संपर्कतेची पातळी (Level of Connectivity)**

सूत्रानुसार मुख्य रस्त्यांची काढलेली संपर्कतेची पातळी हि वरील सारणी क्रमांक १ मध्ये शेवटच्या रकान्यात दर्शविली आहे. संपर्कतेची पातळीचा निर्देशांक हा एकूण गटामध्ये विभाजित करून विश्लेषण करण्यात आलेले आहे. निर्देशांक ५ पेक्षा कमी म्हणजे कमी संपर्कतेची पातळी, ५ ते १० दरम्यान निर्देशांक म्हणजे मध्यम संपर्कतेची पातळी व १० पेक्षा अधिक निर्देशांक म्हणजे उच्च संपर्कतेची पातळी असे निर्धारित करण्यात आलेले आहे.

**उच्च संपर्कतेची पातळी**

यवतमाळ जिल्ह्यात मुख्य रस्त्यांचे केंद्र व शाखा अधिक असल्याने या जिल्ह्यात संपर्कतेची पातळी देखील विभागात सर्वाधिक आढळून येते. या जिल्ह्याचा हा निर्देशांक ११.३७ आढळून येतो. इतर सर्व जिल्ह्याचा निर्देशांक हा कमी असून सरासरी संपर्कतेची पातळी या जिल्ह्याची अधिक आढळून येते.

**मध्यम संपर्कतेची पातळी**

अमरावती आणि बुलढाणा या दोन जिल्ह्यातील मुख्य रस्ते मार्गांचा संपर्कतेचा स्तर मध्यम आढळून येतो. अमरावती जिल्ह्यातील उत्तरपश्चिमेकडील प्रदेश हा डोंगराळ स्वरूपाचा असून या भागात राज्य महामार्गांचे जाळे कमी विकसित आहेत तसेच त्याचप्रमाणे राष्ट्रीय महामार्गांचा विकास हा केवळ जिल्ह्याच्या मध्यभागातच झालेला आढळून येतो. बुलढाणा जिल्ह्यातील मुख्य रस्त्यांचे केंद्र व शाखांचे गुणोत्तर हे मध्यम असल्याने संपर्कतेची पातळी हि सरासरी आढळून येते.

**निम्न संपर्कतेची पातळी**

अकोला आणि वाशीम या दोन जिल्ह्यातील मुख्य रस्त्यांची संपर्कतेची पातळी हि निम्न आढळून येते. या दोन्ही जिल्ह्यात मुख्य रस्त्यांचा म्हणजेच राष्ट्रीय व राज्य महामार्गांचे जाळे कमी विकसित असून त्यांच्या भौगोलिक क्षेत्रफळाच्या तुलनेत रस्त्यांचा विस्तार देखील कमी आहे. त्यामुळेच मुख्य रस्त्यांची संपर्कता अतिशय कमी असून त्याचा स्तरही कमी आढळून येतो. वाशीम जिल्ह्याचा अमरावती विभागामध्ये सामाजिकआर्थिक विकास स्तरही कमी असल्याचे आढळते. रस्ते विकासाचा या जिल्ह्याच्या विकासावरही  प्रभाव पडत असल्याचे आढळते.



**निष्कर्ष व उपाययोजना**

अभ्यास प्रदेशातील मुख्य रस्त्यांचे जाळे एकसारखे पसरले नसल्यामुळे त्यांची संपर्कताही असमान आढळून येते. पश्चिम विदर्भातील भौगोलिक रचनेचा प्रभाव रस्त्यांच्या संपर्कतेवर पडलेला आढळून येतो. ज्या प्रदेशात भूरचना हि डोंगराळ आहे अशा प्रदेशात मुख्य रस्त्यांचे जाळे हे कमी विकसित असल्याचे निदर्शनास येते.

यवतमाळ जिल्ह्यात विभागात सर्वाधिक संपर्कता आढळून येते परंतु यवतमाळ जिल्ह्याचे भौगोलिक क्षेत्रफळ हे विभागात सर्वाधिक असून त्या तुलनेत हि संपर्कता कमीच आहे व जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासासाठी जिल्ह्यातील प्रत्येक लहान मोठी शहरे व बाजारपेठे हि मुख्य रस्त्यांनी जोडणे आवश्यक आहे.

अभ्यास प्रदेशातील प्रत्येक शहर आणि मुख्य बाजारपेठ तसेच मुख्य शैक्षणिक केंद्रे हे मुख्य रस्त्याने जोडणे व त्यातील संपर्कता वाढविणे आवश्यक आहे. पश्चिम विदर्भातील लोकसंख्या व भौगोलिक क्षेत्रफळ या दोन्ही घटकांचा समन्वय साधून मुख्य रस्त्यांची संपर्कता वाढविणे हे सर्वांगीण विकासासाठी आवश्यक आहे. दोन केंद्रामधील मुख्य रस्त्यांचे जाळे वाढवून तसेच सर्व शहरे मुख्य रस्त्याने जोडून केंद्रांची संख्या वाढविल्यास संपर्कतेची पातळी वाढेल व अभ्यास प्रदेशाच्या विकासास चालना मिळेल.

**संदर्भसूची**

1. Garrison W. L. and Marble D. E. (1974), “Graph Theoretical Concept in Transport Geography”, Ed Michal E. Eliot Hurst, Mcgraw Hill Book Co., New York, Page No.67.
2. Kansky, K.J. (1963), "Structure of Transportotion Network Relationship Between Network and Regional Charactersics." "University of Chicago" Chicago.
3. मून विशाल एस (२०१३), “पश्चिम विदर्भाच्या शहरांमधील रस्ते मार्गांची संपर्कता व सुगमता यावर परिणाम करणाऱ्या घटकांचे भौगोलिक विश्लेषण” अप्रकाशित शोध प्रबंध, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती पृ क्र ११७-१२६

# ग्रामीण व कृषी विकासात येणाऱ्या समस्या व त्यावरील उपाययोजना यांचा - एक भौगोलिक अभ्यास

**प्रा. डॉ. सर्जेराव ताठे[1]   प्रा.डॉ. देवकर भाऊसाहेब सोनाजी[2]**

[1]भूगोल विभाग प्रमुख, संत रामदास महाविद्यालय घनसावंगी,जिल्हा. जालना.

Email- tathe.sarjerao@gmail.com

[2]सहाय्यक प्राध्यापक, भूगोल विभाग, संत रामदास महाविद्यालय घनसावंगी. जिल्हा.जालना

Email- bhausdevkar@gmail.com

**सारांश (Abstract) :**

"ग्रामीण व कृषी विकासात येणाऱ्या समस्या व त्यावरील उपाययोजना यांचा -एक भौगोलिक अभ्यास" या शोध निंबधात ग्रामीण भागातील शेतकरी व कामगारांची आर्थिक स्थिती सुधारण्यासाठी व देशाचा औद्योगिक विकास साध्य करण्यासाठी शासनच प्रयत्नशील असते विकासाच्या विविध योजना आखून उद्योगधंदे,शेती, सेवाक्षेत्र, व्यापार, पायाभूत सुविधा यांच्यात वृध्दी करुन रोजगाराच्या अधिकाधिक संधी उपलब्ध करुन देऊन आर्थिक विकासाला चालना देण्याची भूमिका शासनालाच पार पाडावी लागते. भारत हा खेड्यांचा देश आहे. आजही भारतात ग्रामीण भागात राहणाऱ्या लोकसंख्येचे प्रमाण अधिक आहे. बहुसंख्य ग्रामीण लोकांच्या उपजीविकेचे साधन शेती आहे. संपूर्ण भारताची सर्वांगिण प्रगती मुख्यत्वे ग्रामीण भागाच्या सर्वागिण उन्नतीवरच अवलंबून आहे. त्यामुळे ग्रामीण भागातील कृषी विकासात येणाऱ्या समस्या व त्यावरील उपाययोजना यांचा अभ्यास करणे गरजेचे आहे.म्हणून सदरील शोध निंबधामध्ये या विषयी सविस्तर अभ्यास करून निष्कर्ष काढण्यात आले आहेत.

**बीजसंज्ञा (Keywords):**

शेती व्यवसाय,ग्रामीण आर्थिक विकास, शेतकरी व कामगारांची आर्थिक स्थिती, उपजीविकेचे साधन शेती, कृषी विकासात येणाऱ्या समस्या व त्यावरील उपाययोजना.

**प्रस्तावना :**

आजच्या काळात अनेक लोक नवनवीन प्रयोग व तंत्रज्ञान यांचा उपयोग करून कृषी मशागत करून हेक्टरी आधिक उत्पन्न काढण्यासाठी प्रयत्न करत आहेत. आधुनिक काळात जगातील अनेक देशांनी ग्रामीण विकास व कृषी क्षेत्र यांच्या सहसंबंध घालून त्यावर आर्थिक विकास करण्यासाठी कोणती प्रक्रिया करावी लागते आणि त्यांची आमल बजावणी करून नवीन तंत्रज्ञान स्विकारल्यामुळे ग्रामीण विकास व कृषी स्वरूपात बदल झाला आहे. राज्याला ग्रामीण व नागरी विकासाच्या योजना राबवताना कृषी क्षेत्राशी संबंधित अनेक योजना आखाव्या लागतात. राज्यातील उपलब्धसाधन सामुग्रीचा पर्याप्त वापर करून सर्वांगिण ग्रामीण विकास साध्य करण्याचा प्रयत्न केला जातो. विविध विकास योजनांच्या माध्यमातून कृषीचा सर्वांगिण विकास साध्य करणे हे राज्याचे उद्दिष्ट असते. एकंदरीत ग्रामीण भागातील नदीचे पाणी व अन्नद्रव्य,वीज,खत, व्यवस्थापन आणि संवर्धन करण्यासाठी लोकसहभागातून अधिकाधिक प्रमाणात ग्रामीण भागातील कृषी क्षेत्राशी संबंधित रोजगार संधी निर्माण झाल्या आहेत.

**अभ्यास क्षेत्र (Study Area) :**

भारत ही जगातील सर्वात जुनी संस्कृती आहे. यासह, हे बदलत्या काळाशी स्वतःला जुळवून घेत आहे. स्वातंत्र्यानंतर भारताने शेती व्यवसाय,ग्रामीण आर्थिक विकास, सामाजिक आणि आर्थिक प्रगती केली आहे. भारत शेतीमध्ये स्वयंपूर्ण झाला आहे आणि आता त्याची गणना जगातील सर्वात औद्योगिकीकृत देशांमध्येही केली जाते. भारताचे क्षेत्रफळ 32,87,263 चौरस किमी आहे.जगातील सातवा सर्वात मोठा देश म्हणून, भारत उर्वरित आशियातून वेगळा आहे, जो पर्वत आणि समुद्रांनी वैशिष्ट्यीकृत आहे, जे त्याला एक अद्वितीय भौगोलिक ओळख देते. संपूर्ण उत्तर गोलार्धात स्थित भारताची मुख्य भूमी 8˙4" ते 37˙6" उत्तर अक्षांश आणि 68˙7" आणि 97˙25" पूर्व रेखांश दरम्यान आहे. उत्तर ते दक्षिण पर्यंत त्याची कमाल लांबी 3,214 किमी आहे. आणि पूर्व ते पश्चिम कमाल रुंदी

2,933 किमी आहे. आहे. त्याच्या जमिनीच्या सीमांची लांबी सुमारे 15, 200 किमी आहे. आहे. तर मुख्य भूमी, लक्षद्वीप आणि अंदमान आणि निकोबार बेटांच्या किनारपट्टीची एकूण लांबी 7,516.6 किमी आहे.

**संशोधन समस्या (Research Problem):**

१) भारत सरकारने व महाराष्ट्र शासनाच्या वतीने ग्रामीण व  कृषी विकासाच्या विविध योजना राबवुन देखील ग्रामीण व कृषी विकासाला यश का आले नाही?

२) ग्रामीण व कृषी विकासाच्या बाबत शासनाच्या भुमिका व योजनाच्या मर्यादा कोणत्या ?

३) कृषी व्यवसाय हा ग्रामीण भागातील अर्थव्यवस्थेचा श्वास आहे.या दोन्ही गोष्टींचा अंतर्भाव साधून त्यांच्या संबधित विविध प्रकारच्या योजना कोणत्या?

४) ग्रामीण व  कृषी विकासात येणाऱ्या समस्या व त्यावरील उपाययोजना कशाप्रकारे राबविण्यात येत आहेत?.

**संशोधनाची उद्दिष्टे (Objectives) :**

ग्रामीण भागातील अर्थव्यवस्थेचा कणा हा  कृषी क्षेत्राशी संबंधित असून या विषयावरील संशोधनाला निश्चित दिशा प्राप्त होण्यासाठी खालील प्रमाणे उद्दिष्टे निश्चित करण्यात आली आहेत.

१) आज ग्रामीण विकासात व कृषी क्षेत्राच्या विकासासाठी प्रयत्न केले जात आहेत तरीही यामध्ये अनेक आडथले आहेत याविषयी अभ्यास करणे.

२) ग्रामीण विकास व शेतीचे प्रश्न समजण्यासाठी शासनाच्या ग्रामीण विकास व  कृषी   विषयक विकासातील समस्या व त्यावरील उपाययोजना यांचा  आढावा घेणे.

३) ग्रामीण विकास व  कृषि विकास, यांच्या संबधित आर्थिक बाजू, जलसिंचन, पीक उत्पादकता वाढ,तसेच रस्ते व दळवळणाच्या बाबत अभ्यास करणे.

४) ग्रामीण विकास व कृषि हा संयुक्त  विषय असल्यामुळे राज्यसरकार बरोबरच केंद्रसरकारच्या ग्रामीण व  कृषिविषयक धोरणांचा व योजनांचा मागोवा घेणे.

**संशोधन विषयाचे महत्व (Important of Research Topic) :**

ग्रामीण भागातील अर्थव्यवस्था ही बहुंताशी कृषी क्षेत्राशी संबंधित आहे.ग्रामीण भागाचा विकास झाल्याशिवाय खऱ्या अर्थाने भारताचा विकास झाला असे म्हणता येऊ शकत नाही. ग्रामीण भागातील लोकांचा मुख्य व्यवसाय आजही शेती हाच आहे. भारताची ओळख कृषिप्रधान देश म्हणून  सांगितली जाते. भारत सरकारने औद्योगिक सुधारणांना प्राधान्य दिले असले तरी, कृषि क्षेत्राचे महत्व अजिबात कमी होणार नाही.

पंचवार्षिक योजनामध्येही ग्रामविकासाचा कणा असलेल्या कृषी क्षेत्राला प्राधान्य देण्यात आले. अतिरिक्त लोकसंख्येच्या या देशात एकेकाळी अन्नधान्याची टंचाई होती. स्वातंत्र्योत्तर काळात देशात हरितक्रांती झाली.म्हणून  अन्नधान्याच्या बाबतीत आपला देश स्वयंपूर्ण झाला. शेती हाच ग्रामीण जीवनाचा कणा असल्याने प्रत्येक सरकारला शेतीविषयक धोरण आखून ग्रामीण विकासाच्या योजना राबवणे आवश्यक असते. या पार्श्वभुमीवर ग्रामीण व  कृषी विकासात येणाऱ्या समस्या व त्यावरील उपाययोजना यांचा अभ्यास महत्वाचा ठरतो.

**गृहितके (Hypothesis) :**

भारत देशातील ग्रामीण व कृषी विकासात शासनाची भूमिका या विषयावर संशोधन करतांना प्राथमिक अभ्यासाच्या अवलोकनातून खालील गृहितकृत्य निश्चित करून सदरील शोध निंबधात  संशोधन कार्य  करून विविध गोष्टी मांडण्याचा प्रयत्न केला आहे.

1) ग्रामीण व कृषि विकास, जलसिंचन, उत्पादकता वाढ याबाबत शासनाचे अपूरे प्रयत्न व दुर्लक्ष करण्याची प्रवृत्ती निर्देशित होते.

2) ग्रामीण विकास व कृषी विकासात येणाऱ्या समस्या व त्यावरील उपाययोजना यांचा अभ्यास करत असताना असे जाणवते की, आपण खरंच आजही आपल्या देशात अनेक मूलभूत गरजा पूर्ण करण्यासाठी फार मोठ्या प्रमाणात प्रयत्न करत आहोत.
3) जे प्रयत्न आज अविकसित देश करत आहेत तेच आपण आपल्या देशात अजूनही करत असतो.
4) आज भारतीय स्वांतत्र्याला ७२ वर्ष झाले आहेत तरीही यामध्ये प्रामुख्याने ग्रामीण विकास व कृषी क्षेत्राशी संबंधित अनेक योजना राबवताना फार मोठी कसरत करावी लागते.

**माहिती स्त्रोत व संशोधन पद्धती (Research Methodology) :**

"ग्रामीण व कृषी विकासात येणाऱ्या समस्या व त्यावरील उपाययोजना यांचा -एक भौगोलिक अभ्यास" या शोध निंबधात ग्रामीण भागातील शेतकरी व कामगारांची आर्थिक स्थिती सुधारण्यासाठी प्रस्तुत शोधनिबंधाच्या अभ्यासा करिता प्राथमिक व दुय्यम साधन सामग्रीवर आधारित माहिती संकलित केलेली आहे. दुय्यम साधन सामग्री, प्रकाशित जनगणना अहवाल, संदर्भ पुस्तके, विविध लेख, नियतकालिके व दर्जेदार मासिकात प्रसिद्ध झालेले लेख.वार्षिक शासकीय अहवाल, वेब जाळे (संकेत स्थल) इत्यादींचा संदर्भ साहित्य म्हणून वापर केलेला आहे. प्रस्तुत शोध निबंधाच्या अभ्यासात "ग्रामीण व कृषी विकासात येणाऱ्या समस्या व त्यावरील उपाययोजना याबतीत राष्ट्रीय स्तरावर उपलब्ध सांख्यिकीय माहितीच्या आधारे विविध प्रकारची माहिती संपादन करून, संग्रहित केलेली माहिती विश्लेषणासाठी उपयोगात आणली आहे.

**विषय विवेचन व विश्लेषण (Subject Analysis) :**

"ग्रामीण व कृषी विकासात येणाऱ्या समस्या व त्यावरील उपाययोजना यांचा -एक भौगोलिक अभ्यास" या शोध निंबधात ग्रामीण भागातील शेतकरी व कामगारांची आर्थिक स्थिती सुधारण्यासाठी व देशाचा औद्योगिक विकास साध्य करण्यासाठी महाराष्ट्र राज्याचाही अभ्यास करण्यात आलेला आहे. महाराष्ट्र हे भारताच्या पश्चिम भागात वसलेले राज्य आहे. क्षेत्रफळा नुसार महाराष्ट्र हे भारतातले तिस-या क्रमांकाचे राज्य आहे. क्षेत्रफळानुसार महाराष्ट्र हे भारतातले तिस-या क्रमांकाचे राज्य आहे.याबरोबरच संपूर्ण ग्रामीण भागाचाही विचार करण्यात आलेला आहे. भारतातील व विशेतः महाराष्ट्रातील ग्रामीण विकास व कृषी विकासात येणाऱ्या समस्या व त्यावरील उपाययोजना यांचा अभ्यास करत असताना असे जाणवते की, आपण खरंच आजही आपल्या देशात अनेक मूलभूत गरजा पूर्ण करण्यासाठी फार मोठ्या प्रमाणात प्रयत्न करत आहोत.जे प्रयत्न आज अविकसित देश करत आहेत तेच आपण आपल्या देशात अजूनही करत असतो.आज भारतीय स्वांतत्र्याला ७२ वर्ष झाले आहेत तरीही यामध्ये प्रामुख्याने ग्रामीण विकास व कृषी क्षेत्राशी संबंधित अनेक योजना राबवताना फार मोठी कसरत करावी लागते.भारताला स्वातंत्र्य मिळाले तेव्हा जनतेच्या अपेक्षा खूप उंचावल्या होत्या. भारतीय संविधानातून स्वातंत्र्य व समान संधी संपत्तीचे विकेंद्रीकरण, सर्व स्त्री- पुरुषांना काम, पर्याप्त रोजी रोटी, सुरक्षितता, सामाजिक न्याय, आर्थिक विषमता नष्ट करणे या तत्वांचा अविष्कार झाला आहे. घटनाकारांनी नवसमाज निर्मितीचे स्वप्न साकार करण्यासाठी आर्थिक विकासाची प्रक्रिया सुरु करुन लोकशाहीची प्रयत्नपूर्वक उभारणी करणे व धोरणात्मक सातत्याद्वारे देशाचा विकास घडवून आणण्याची जबाबदारी शासनाकडे सोपविली आहे.

शासन आर्थिक व सामाजिक योजनांची आखणी व अंमलबजावणी ज्या पध्दतीने करते त्यावरच त्या राज्याचा ग्रामीण व कृषी विकास अवलंबून असतो. मर्यादित जमिनीतून जादा उत्पन्न घेण्यासाठी दोन पिके घेणे आवश्यक असते. पण पावसाच्या पाण्यावर ते शक्य नाही. त्यामुळे शेतीविषयक आर्थिक विकास साध्य करण्यासाठी शासनाने अनेक प्रकारच्या पाटबंधारे योजना राबविल्या सिंचन योजनांना गती देण्यासाठी शासनाने अनेक पाटबंधारे प्रकल्प उभारले.केवळ पाटबंधारे प्रकल्प उभारून सिंचनाचा प्रश्न सोडवता येणार नाही हे लक्षात घेऊन शासनाने लाभक्षेत्र विकास कार्यक्रमाची आखणी केली आहे. पाणलोट क्षेत्र विकास कार्यक्रम भारत सरकारने हाती घेतला या कार्यक्रमासाठी पूर्वी ५०% अर्थसहाय्य शासनाकडून मिळत होते आता १०० % खर्च केंद्रातर्फे देण्यात येतो. शासनाने तुषार सिंचन ठिबक सिंचन यांना प्रोत्साहन दिले आहे. त्यामुळे देशातील ठिबक सिंचन क्षेत्रात वाढ झाली आहे. सिंचनाच्या क्षेत्राचा विकास करताना शासनाने जेवढी सिंचन क्षमता निर्माण केली तेवढेही क्षेत्र आज भिजत नाही हे कटू वास्तव आहे.

भारताच्या कृषी विकासात शासनाच्या भूमिकेचा आढावा घ्यावयाचा असेल तर गेल्या 75 वर्षात शासनाने जे आर्थिक धोरण राबविले त्यामुळे किती विकास झाला ? कमी व्याजदराने व सहज कर्ज शेकऱ्यांना उपलब्ध होतात काय ? या प्रश्नाची उत्तरे शोधली तर कटू वास्तव दुर्लक्षित करता येणार नाही शेतकऱ्यांसाठी विकास योजना शासन राबवीत असले तरी शेतकऱ्यांच्या आत्महत्येचे प्रमाण वाढत आहे. आजही शेतीला पुरेसे पाणी, वीज मिळत नाही. त्यामुळे शेतकऱ्यांना शेती परवडू शकत नाही. शेती खर्चासाठी केली जाणारी तरतूद उद्योगधंद्याकडे वळविल्यामुळे शेती अडचणीत आली आहे.

**ग्रामीण व कृषी विकासासाठीच्या शासकीय योजना :**

खालील प्रकारच्या अनेक शासकीय योजना आहेत.आज भारतीय लोकसंख्या आतिरिक्त झालेली आहे,म्हणून भारतातील शेतकऱ्यांची आजची परिस्थिती अत्यंत हालाखीची असून भारतात लोकसंख्येच्या प्रमाणात अन्नधान्याचे उत्पादन अपुरे असल्यामुळे इतर देशांकडून धान्य आयात करावे लागत असे, हा प्रश्न सोडविण्यासाठी शासनाने अनेक योजना आखल्या व कार्यान्वित केल्या. सन १९६५ साली हरितक्रांतीमुळे देशांच्या एकूण अन्नधान्य उत्पादनात वाढ झाली. शासनाने अधिक धान्य पिकवा योजना, दुधाचा महापूर, फळबाग विकास योजना, ठिबक व तुषार सिंचन योजना, सामाजिक वनीकरण, बियाणे महामंडळाची स्थापना, पशुसंवर्धन व एकात्मिक विकास कार्यक्रम, भूमिसुधार योजना, कृषि प्रशिक्षण व संशोधन संस्था सहकारी तत्वावर प्रक्रिया करणारे कारखाने आदी योजनांच्या माध्यमातून कृषि क्षेत्राच्या विकासाला गति मिळवून दिली. रासायनिक खतांचा वापराला प्रोत्साहन दिले. शासनाने माती परीक्षण व खतांचा दर्जा सुधारण्यासाठी प्रयोगशाळा उघडल्या आहेत. शेतीच्या विकासासाठी खाजगी सावकारांच्या पाशातून शेतकऱ्यांना मुक्त करण्यासाठी शासनाने पीककर्ज पुरवठ्याची व्यापक व्यवस्था केली.

तसेच शेती क्षेत्रात पायाभूत सुविधांच्या विकासासाठी मध्यम व दीर्घमुदतीचा कर्जपुरवठा करण्यात येतो. शासनाने अल्पभूधारक शेतकऱ्यांचे कर्ज माफ करुन नियमित कर्जपुरवठा करणाऱ्या शेतकऱ्यांचे व्याज माफ करण्याची योजना घोषित केली आहे. सन १९८५ साली पीकविमा योजना लागू करण्यात आली आहे. शासनाने जमीन सुधारण्या संदर्भात कुळ कायदा, कमाल जमीन धारणा कायदा, कसेल त्यांची जमीन कायदा, तुकडी बंदी कायदा करून शेती विकासाला चालना दिली.शेतीमालाची योग्य किंमत निश्चित करण्यासाठी शासनाने सन १९६५ मध्ये कृषि मूल्य आयोग स्थापन केला. शासनाने कापसाला योग्य भाव मिळावा व शेतकऱ्यांची व्यापाऱ्यांकडून होणारी लुट रोखण्यासाठी कापूस एकाधिकार योजना सुरु केली. या योजनेत शासन शेतकऱ्यांना कापसाची योग्य किंमत देण्यासाठी हमी दर जाहीर करुन त्या दराने कापसाची खरेदी करते.

शेती विकासाला चालना देण्यासाठी केंद्रशासनाकडून शेतकऱ्यांना जिप्सम, पी.एस.बी. पाकिटे एच.डी.ई. पाईप, पीकसंरक्षण अवजारे औषधी या वस्तुचे वाटप ५०% अनुदानावर करण्यात येते. तसेच ऊस विकास कार्यक्रमासाठी शासनाने शेतकऱ्यांना ५० % अनुदान दिले. शासनाने कृषि यांत्रिकीकरणास प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने कृषि व्हेटर, पॉवर टिलर, मळणी मशीन अवजारे, जलसिंचन सुविधेसाठी इंजिन, इलेक्ट्रीक मोटार, पेट्रोकेरोसिन इंजिन घेण्यासाठी अल्प अत्यल्प भूधारकांना अनुदान देऊन कृषि उत्पादन वाढीसाठी प्रोत्साहन दिले तसेच कृषि अवजारे वाटप या योजनेअंतर्गत विविध प्रकारची अवजारे शेतकल्यांना ५० % अनुदानावर पंचायत समितीच्या माध्यमातून वाटप केली जातात. कोरडवाहू अल्पभूधारक शेतकऱ्यांना विहीर खोदण्यासाठी जवाहर रोजगार विहीर योजनेअंतर्गत शासनाने अर्थसाहाय्य देण्याची तरतूद केली आहे. शेतकऱ्यांना शेती करताना सुरिक्षतता वाटावी यासाठी सन २००६-०७ पासून शेतकरी व्यक्तीगत अपघात विमा योजना शासनाच्या वतीने राबविण्यात येत आहे एकदरीतच शासनाने कृषी विकासासाठी विविध विकास योजना अंमलात आणुन कृषी क्षेत्राच्या विकासाला चालना देण्याचे कार्य केले आहे.

**ग्रामीण विकासाच्या इतर योजना :**

१) मुख्यमंत्री ग्रामसडक योजना,२)यशवंत ग्राम समृध्दी योजना ३)ग्रामीण स्वरोजगार प्रशिक्षण संस्था ४) ग्रामीण आवास योजना ५) राष्ट्रीय ग्रामीण जीवनोन्नती अभियानांतर्गत महिला किसान सशक्तीकरण परियोजना राबविणे.६) अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास कार्यक्रम.७) आदर्शगाव संकल्प व प्रकल्प ८) आम आदमी विमा योजना ९) कृषी विषयक योजना ११) मृदा आरोग्य कार्ड योजना 2021 ,१२) हळद लागवड आणि कीड व्यवस्थापन, इत्यादि प्रकारच्या अनेक योजना आहेत.

**निष्कर्ष** ( Conclusion ) **:**

१) शेती व्यवसाय आज फार बिकट झालेला आहे. पुढील पिढीकडे एक गुंठाही जमीन राहणार नाही. पूर्वी १९५० ते १९७५ या कालावधीत गावाकडे भरपूर जमीन होती.सरासरी प्रत्येक कुटुंब २०-३० एकर जमिनीचे मालक,मोठे वाडे,दांडगा रुबाब,निसर्गावर चालणारी शेती,अगदी १० वी-१२ वी शिकलेले शिक्षक, मिलिटरी भरती, पोलीस भरती झाले तसेच स्पर्धा परीक्षेत सहज यश मिळायचे.अनेक पदवीधर, तहसीलदार त्या काळात झाले.नाही जरी नोकरी लागली तर आहे की,20-30 एकर शेती,उत्तम शेती, दुय्यम नोकरी, तृतीय व्यापार अशी म्हण होती. आता ही परिस्थिति बदलेली आहे.

२) आपला भारत देश उद्योग व आधुनिकतेकडे जाऊ लागला, सन १९७१-७२ च्या दुष्काळापासून निसर्गाने झटका द्यायला सुरुवात केली.शेतीची विभागणी सुरु झाली, २० कराचे मालक ५ एकरावर आले.बाहेरील राज्यातील कामगारांचे मुंबई शहरात शिरकाव सुरु झाले.शेती आता भांडवलदाराची होऊ लागली. विहिरी, मोटारी, पाईप लाईन आल्या.पाणी उपसण्याची स्पर्धा सुरु झाली.राजकारण गावागावात घुसलं, पुढारपणाच्या नादात अनेकांनी जमीनी कवडी मोलाने विकल्या, बाई-बाटलीत अनेकजण बरबाद झाले.स्पर्धा वाढली, आता नोकरी सोपी राहिली नाही.

३) वाढणाऱ्या गरजेपोटी जमिनी विकायला सुरवात झाली.२० एकराचा मालक मोकळा झाला व गावच्या कट्ट्यावर विड्या फुकू लागला, पोरं बेकार फिरू लागली. सन १९९५-२००९ हा काळ मराठी माणसाच्या जबरदस्त घसरगुंडीचा काळ.परराज्यातून मोठया प्रमाणात लोक आले.मोठे उद्योग यांनी काबीज केले, हॉटेल शेट्टी लोक, दूध-पेपर-भाजीपाला-टॅक्सी-पाणीपुरी-किरकोळ दुकानदारी उत्तरेतील लोकांनी काबीज केली.सहकारी कारखाने, बँका, पेट्रोल पम्प, बिअर बार, दारू दुकानें चाणाक्ष पुढाऱ्यांची झाली.मराठी माणूस मात्र अजूनही विहीर पाडतो आणि शेतीच करतो.

**शिफारशी (Conclusion) :**

१) ग्रामीण भागातील अर्थव्यवस्थेचा कणा मजबूत करण्यासाठी शेतकऱ्यांची कर्जे माफ करून त्यांच्या आत्महत्येचा प्रश्न सुटणार नाहीत तर त्यासाठी शासनाने ग्रामीण भागातील विकासा करिता शेतीप्रधान औद्योगिक धोरण राबविणे आवश्यक आहे.

२) भारत देशातील वाढत्या लोकसंख्येमुळे कृषी उत्पादनाची पातळी उच्च दराने वाढविणे तसेच कृषि क्षेत्राची उत्पादकता वाढविणे हे ग्रामीण भागातील आर्थिक विकासासाठी अनिवार्य आहे.

३) ग्रामीण भागातील गरिबांना व बेरोजगारांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करुन देण्यासाठी कृषी क्षेत्रात सार्वजनिक व खाजगी क्षेत्रातील गुंतवणूक करणे व सहकार क्षेत्राला प्रोत्साहन देणे. कृषी विकास नियोजनात महत्वाचे आहे. तरच ग्रामीण भागाचा विकास होऊन कृषी क्षेत्राशी संबंधित अर्थ व्यवस्था स्थिर होऊन, ग्रामीण माणसांचे जीवन जगणे सुसाह्य होईल.

४) ग्रामीण भागातील अर्थव्यवस्थेचा पाया मजबूत करण्यासाठी व कृषी विकासासाठी आवश्यक असलेल्या जलसिंचनाच्या कृत्रिम व्यवस्था शासनाने निर्माण केल्याशिवाय पर्याय नाही.

५) महाराष्ट्र राज्यात ज्या जाती जमातीसाठी स्वतंत्र महामंडळ अस्तित्वात नाही अशा आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांची संख्या लक्षात घेऊन या समाजातील सुशिक्षित बेरोजगारांच्या आर्थिक उन्नतीचा मार्ग खुला करण्यासाठी, त्यांच्यासाठी स्वयंरोजगाराच्या योजना राबवून त्यात येणाऱ्या अडचणी दूर करणे.

६) आजही शेतीला पुरेसे पाणी, वीज मिळत नाही. त्यामुळे शेतकऱ्यांना शेती परवडू शकत नाही. शेती खर्चासाठी केली जाणारी तरतूद उद्योगधंद्याकडे वळविल्यामुळे शेती अडचणीत आली आहे.

**संदर्भ (Reference) :**

०१) भूगोलशास्त्रातील संशोधन पद्धती -(२००७)

०२) श्रीकांत कार्लेकर, मोहन काळे, डायमंड पब्लिकेशन्स पुणे.

०३) के. ए. खतीब - महाराष्ट्राचा भूगोल ,मेहता पब्लिकेशन हाऊस.

०४) डॉ. अरुण कुंभार - कृषी भूगोल ,पायल पब्लिकेशन ,986 सदाशिव पेठ ,पुणे 30 .

०५) डॉ .एस.व्ही.ताठे- महाराष्ट्राचा भूगोल, चिन्मय पब्लिकेशन औरंगाबाद.

०६) डॉ. सुरेश फुले - कृषी भूगोल, विद्याभारती प्रकाशन लातूर.

०७) डॉ. विठ्ठल घारापुरे - 2000 कृषी भूगोल पिंपळापुरे अँड कंपनी नागपूर .

०८) All India Soil and Land Venues Survey Organization 1971 .

०९) आर्थिक भूगोल - प्रा.डॉ.के.ए.खतीब.

१०) https//Maharashtra.gov.in

११) https//cza.nic.in

१२) https//rural..nic.in

१३) https//agricoop.ac.in/

१४) www.cidoindia.com

# उपन्यास में चित्रित किसान विमर्श

**डॉ. संतोष रामचंद्र आड़े**

संत रामदास कॉलेज, घनसावंगी जि जालना

साहित्य समाज को देखने का एक अच्छा जरिया है। जिस समय प्रेमचन्द 'गोदान' और 'प्रेमाश्रम' उपन्यास लिख रहे थे उस समय भारत में स्वतंत्रता आन्दोलन चल रहा था। किसान सामन्ती और जमींदारी तथा महाजनी जैसी कुव्यवस्थाओं से जूझ रहा था। समाज में घटित होने वाली घटनाओं का प्रभाव लेखक पर पड़ना स्वाभाविक था। आम तौर पर प्रेमचन्द को किसानों का कथाकार कहा जाता है और गोदान भारतीय किसानों के जीवन का महाकाव्य। हिंदी साहित्य में औपन्यासिक क्षेत्र में पहली बार ऐसा हुआ था जब प्रेमचन्द ने किसी किसान को नायक बनाकर उपन्यास लिखा तथा किसानों की दयनीय स्थिति को हू-ब-हू अभिव्यक्त किया है। खैर जो भी हो किसानों के प्रति हो रहे अन्याय, शोषण, सूदखोरों द्वारा बेरहमी में इन पर किया गया अत्याचार और किसान किस तरह अपने ही खेतों में मजदूर बन जाता है इन सभी का चित्रण प्रेमचन्द से ही प्रारम्भ होता है।

सामाजिक व्यवस्था, सभ्यता और संस्कृति के संबर्धन और विकास के लिए अर्थ(रूपया) की महत्वपूर्ण भूमिका होती है। भारत कृषि प्रधान देश माना जाता है। आज भी सत्तर फीसदी लोग जीवन यापन के लिए कृषि को आधार बनाया है। समय की मांग के अनुसार कृषि के उत्पादन में परिवर्तन होना लाजमी है। इग्लैंड से भारत तक का औद्योगिक क्रांति का सफ़र और भारत में हरित क्रांति होने से कृषि उत्पादन में काफी बदलाव आया है परन्तु किसान किसी न किसी रूप से शोषित और प्रताड़ित रहा है। जिसकी अभिव्यक्ति उपन्यासकारों ने की है। किसानों के संघर्षमय जीवन को केन्द्रीय बिंदु बनाकर प्रेमचन्द से कथाकार संजीव और पंकज सुबीर तक एक लम्बी परम्परा रही है।

आनंद यादवांचे 'मायलेकरं' हे दीर्घकथाकाव्य त्यांच्या चिंतनशीलतेचा परिपाक होय. ग्रामीण साहित्य चळवळीची प्रेरणा म्हणूनही आनंद यादवांच्या या दीर्घकथाकाव्याकडे पाहता येते. याविषयी डॉ. कैलास सार्वेकर म्हणतात, ''मायलेकरे या संवाद काव्याची प्रेरणा आनंद यादव यांच्यातील चिंतनशील कवी व्यक्तिमत्वातून मिळाली असावी. कलावादाकडून वास्तवतेकडे वळलेल्या आनंद यादवांनी ग्रामीण साहित्य व ग्रामीण समाज याविषयीचे मूलगामी चिंतन ग्रामीण साहित्याची भूमिका मांडताना केले. ते त्यांच्या विविध लेखांमधून गद्य स्वरूपात साकार झाले. या चिंतनशील गद्य विचारांचा भावनिक पातळीवरील काव्यात्म आविष्कार म्हणजे 'मायलेकरं' होय.'' या दीर्घकथाकाव्याचा प्रभाव पुढच्या कवितांवरती झालेला दिसतो. उदाहरणार्थ इंद्रजित भालेराव यांचे आम्ही 'काबाडाचे धनी', 'कुळंबिणीची कहाणी' व जगदीश कदम यांचे 'नामदेव शेतकरी' इत्यादींचा उल्लेख करता येण्यासारखा आहे. याविषयी डॉ. वासुदेव मुलाटे म्हणतात,''ही कविता निसर्ग शेती व ग्रामीण जीवनाशी एकरूप होऊन येते. मराठी ग्रामीण कवितेला एक नवीन वळण देणारी ही कविता आहे.''आनंद यादव यांची कविता ही 1980 नंतरच्या ग्रामीण कवितेचे पहिले पाऊल होते. आनंद यादवांनी ग्रामीण जीवनातील भूक, दारिद्र्य चित्रित केलेले आहे. याबरोबरच न्यायासाठी, हक्कासाठी बंड, विद्रोहही उभा केलेला दिसतो. आनंद यादवांच्या 'मायलेकरं' या काव्यातून संपूर्ण ग्रामीण जीवन येते आहे. याविषयीचे बारीक-सारीक संदर्भ आनंद यादव यांनी सूक्ष्मपणे रेखाटलेले आहेत. त्यातून आलेले माहितीचे चित्रण हे त्या संवादकाव्यापुरते सीमित न राहता शेतकरी जीवनातील आईचे प्रातिनिधिक चित्रण होऊन जाते. शेतकऱ्याच्या नशिबी असणारे दारिद्र्य कष्ट सगळे काही या भागातून येताना दिसते. तर ही परिस्थिती बदलावयाची असेल तर शिक्षण हाच एकमेव पर्याय आहे. असे बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचे चिंतन आईच्या संवादातून अभिव्यक्त होते आहे. कोंडूबाई, द्रुपदा, चंद्रभागा, भीम, आबा इत्यादी व्यक्तिरेखांच्या माध्यमातून कथाकाव्याची कथानक विकसित होत जाते. खेडे शेतकरी जीवनातील जीवन जगण्याची धडपड आनंद यादव यांच्या या काव्यातून अभिव्यक्त होते. याविषयी कैलास सार्वेकर म्हणतात,''अविरत श्रम करणारा गरीब

अर्धपोटी शेतकरी आणि त्याचे कौटुंबिक जीवन हा यादवांच्या कवितेचा केंद्रबिंदू आहे. असे शेतकरी व त्याच्या कुटुंबाबरोबर त्याचा व्यवसाय निसर्गप्रेम सांपत्तिक स्थिती इत्यादी गोष्टीही अनुषंगाने या कवितेत येतात.'' आनंद यादवांच्या एकूण साहित्याचा विषयच ग्रामीण माणूस शेतकरी निसर्ग होईल त्यामुळे सार्वेकरांचे मत पटण्यासारखे आहे.

**संदर्भ ग्रंथ**

१) मायलेकरं, यादव आनंद, मेहता प्रकाशन, पुणे, प्र. आवृत्ती 1991
२) ग्रामीण साहित्य : चिंतन आणि चर्चा, मुलाटे वासुदेव (डॉ.), स्वरूप प्रकाशन, औरंगाबाद, प्र. आ. डिसेंबर 2005
३)ग्रामीण साहित्य : स्वरूप आणि शोध, कोतापल्ले नागनाथ, स्वरूप प्रकाशन, औरंगाबाद,
४)मराठी ग्रामीण कवितेचा इतिहास, सार्वेकर कैलास, मेहता पब्लिकेशन, पुणे, प्रथमावृत्ती 1999
५)काही मराठी कवी जाणिवा आणि शैली, रसाळ सुधीर, प्रतिमा प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती 1996
६)कविता आणि प्रतिमा, रसाळ सुधीर, मौज प्रकाशन, मुंबई, प्रथमावृत्ती 1982
७)कविता भाषा व परिसर, पाटील शिवाजी, रजत प्रकाशन, औरंगाबाद, प्रथमावृत्ती 2008

'Journal of Research & Development' A Multidisciplinary International Level Referred and Peer Reviewed Journal, Impact Factor-7.265, ISSN: 2230-9578, 30 October2021, Volume-12, Issue-15
Agriculture and Rural Development: Strategic Issues and Reform Options

# कवी मनातील शेतकरी : विशेष संदर्भ 'कुणब्याच्या पोरा'

**प्रा.डॉ. डिगोळे बालाजी विठ्ठलराव**

मराठी विभाग प्रमुख, शिवजागृती महाविद्यालय, नळेगाव ता. चाकूर जि. लातूर

ईमेल – bdigole007@gmail.com

शेती आणि शेतकरी हा ग्रामीण संस्कृतीतील खूप महत्वाचा घटक आहे. खेडयातील नव्वद टक्के लोकांचे पोट प्रत्यक्ष शेतीवर अवलंबून आहे. उरलेले दहा टक्के अप्रत्यक्षपणे म्हणजे शेती आणि शेतीसाठी आवश्यक असलेली भुसंपदा, अवजारे ही शेतक-यांची महत्वाची साधने आहेत. शेतीवरच पोटाची खळगी भरणा-या शेतीनिष्ठ माणसांची एक स्वत:ची संस्कृती आहे. तिलाच कृषीसंस्कृती म्हणून ओळखले जाते. ही संस्कृतीच आपल्या देशाच्या उत्पन्नाची खरी नाडी आहे. हे आपल्याला कोरोना महामारीच्या आणि टाळेबंदीच्या काळात खरी किंमत कुणब्याची कळाली. हा कुणबी, बळीराजा जागाचा पोशिंदा ठरला आहे. म्हणजे ही फक्त कृषीसंस्कृती नव्हे, तर 'विश्वसंस्कृती' ठरली आहे. जगण्याचे सर्व रस्ते बंद झाले की, सर्वच घटकांना माझा शेतकरी बाप आठवतो. हाच खरा जगाचा बाप आहे. कारण आपल्या रक्ताचा घाम करून अहोरात्र, थंडी-ऊन, पाऊस, सगळे नक्षत्र, ऋतू कष्ट करतो आणि काळया मातीतून पीक वाढवून अन्न-धान्य निर्माण करतो. तोच या विश्वाचा तारणहार ठरतो. शेतक-यांच्या कष्टाशिवाय किंवा त्याच्या क्रियाशीलतेशिवाय जगातल्या कोणत्याच ज्ञान-विज्ञान-तंत्रज्ञान अथवा भौतिक सुखसंपन्नतेला किंमत उरणार नाही. म्हणजे शेतकरी बापाच्या घामातूनच संस्कृतीचा, इतर घटकांचा विकास झालेला आहे हे कोणताही पट्ट्या नाकारू शकत नाही. परंतु सध्या शेती कसणे खूप कठीण झाले आहे. शासकीय धोरणे, शेतकरी संघटना, साखरकारखाने, शिक्षणसंस्थांचे विकेंद्रीकरण, पर्यावरणातील बदल, नवी बी-बियाणे, रासायनिक खते, अस्मानी-सुल्तानी संकटं, फसवी औषधं, शेतक-याच्या मालाला हमी भाव न मिळणं, शासकीय-निमशासकीय घटकांकडून शोषण, सावकारी, बँकाचे कर्ज, ग्रामीण भागात शिक्षणाचे झालेले बाजारीकरण, गाजरगवताचा वाढता प्रभाव या बाबींमुळे शेतकरी चिंताग्रस्त झाला आहे. सध्या शेतकरी उपेक्षित आहे. तर शेती हातबट्टयाचा, जुगाराचा धंदा झाला आहे. आज शेतक-याविषयी कोणालाही आदर, आत्मियता राहिलेली नाही. सरकारकडून आज काही प्रमाणात तुटपुंजी मदतही मिळत आहे. कर्जुमुक्ती, दुष्काळ, गारपीटग्रस्तांना, अतिवृष्टी झालेल्या भागात स्वस्त दरात धान्य, पिकविमा किंवा इतर काही सवलती दिल्या जात आहेत. या चांगल्या गोष्टींची नोंदही होणे आवश्यक आहे. याचाही कळत-नकळत प्रभाव या काळातील कवितेवरही पडलेला दिसतो. या पार्श्वभूमीवर एकविसाव्या शतकातील कविता समजून घ्यावी लागेल. दोन हजार नंतरचा काळ हा मागील दशकापेक्षा खूप मोठया झपाटयाने बदलला. सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक, आर्थिक कोरोना, महामारी इत्यादी स्वरूपाच्या घडामोडींचाही अभ्यास करावा लागेल. हे जग दोन संस्कृतीचे बनले आहे. एक पूर्वापार चालत आलेली ग्रामसंस्कृती आणि दुसरी प्रचंड झगमगाट असलेली महानगरीय संस्कृती. शहरी संस्कृतीची ग्रामसंस्कृतीवर झालेली कुरघोडी अतिशय जीवघेणी आहे. जागतिकीकरणाचा रेटा वाढल्यामुळे ग्रामसंस्कृतीच्या पारंपारिक जीवनात मोठे परिवर्तन झाल्याचे चित्र आहे. शिक्षण, औद्योगिकीकरण, नवनवीन सामाजिक सुधारणा, सुखोपभोगाची साधने, दळणवळणाच्या सुखसोयी राजकारणाचे बदलते स्वरूप, शेतक-यांवर गाडया घालून त्यांना चिरडून टाकणे, संगणक, यंत्र, प्लॅस्टिक मोबाईल यामुळे खेडयांचा चेहरामोहरा झपाटयाने बदलत चालला आहे. त्यामुळे शेतक-यांना नव-नव्या समस्यांना तोंड द्यावे लागत आहे. या सा-या कटकटीत विसाव्या शतकाच्या पूर्वार्धातच रूजलेली ग्रामीण कविता आज एकविसाव्या शतकाच्या पूर्वार्धात एक महत्वाचा प्रवाह म्हणून नवनिर्मिती ठरली आहे. ग्रामीण माणसाचे त्याच्या भल्याबु-या वृत्ती-प्रवृत्तींसह चित्रण करून समग्र ग्रामीण जीवनवास्तवाचा वेध आजच्या ग्रामीण कवितेतून घेतला जात आहे. सामान्यत: निसर्गसन्मुख जीवन जगणारा, गुंतागुंतीचा ग्रामीण माणूस त्याच्या जीवनप्रेरणा, त्याचा गाव, त्याची शेती, पांढरी, त्या गावची गुंतागुंतीची परस्परावलंबी व्यवस्था गावमाणसांचे अंतर्गत जीवनव्यवहार गावशिवार, त्या गावशिवारातील सजीवनिर्जीव घटक इत्यादिंना शब्दरूप देणा-या साहित्याला ग्रामीण साहित्य म्हणून ओळखले जाते. शेतीकेंद्री जीवनव्यवस्थेचे चित्रण करणा-या साहित्याला ग्रामीण साहित्य म्हटले जाते. नागनाथ कोतापल्ले यांनी, ''ग्रामीण

जीवनातून फुलणारे ग्रामीण वास्तवातून साकार होणारे साहित्य ते ग्रामीण साहित्य". अशी व्याख्या केली आहे. अर्थात, गामीण साहित्य म्हणजे ग्रामीण जीवनाचे, ग्रामीण संवेदनशीलतेने नि सामाजिक, सांस्कृतिक व भाषिक संदर्भासह केलेले चित्रण होय. प्रा. विश्वास, प्रा. जहागिरदार म्हणतात, ''ग्रामीण कविता म्हणजे ग्रामीण संवेदनशीलतेने घडविलेली कविता म्हणजे अनुभव घेण्याची त्याची पध्दती. बाहयवास्तव, सभोवताली घडणा-या घटनांच्याबद्दल प्रतिक्रिया देणारी संवेदनशीलता अनुभवाबद्दल विशिष्ट जाणिवा निर्माण करत असते आणि त्या कवितेच्या बुडाशी असतात. ग्रामीण कवितेमध्ये बाहय वास्तव हे खेडे, निसर्ग आणि पारंपारिक मूल्ये यातून घडलेले ग्रामजीवन आहे आणि त्यात आकाररूपाला आलेली संवेदनशीलता त्या जीवनातील अनुभवाविषयीच्या प्रतिक्रया देत असते. अशा कवितेच्या निर्मितीच्या बुडाशी असलेली संवेदनशीलता ही ग्रामीण संवेदनशीलता आहे आणि अशी कविता ग्रामीण आहे. असे स्थूलमानाने म्हणता येईल. हे एकदा निश्चित झाले की, केवळ बोलीभाषेत लिहिलेली कविता ग्रामीण कविता नव्हे किंवा केवळ निसर्गविषयक जाणिवा व्यक्त करणारी कविता म्हणजे ही ग्रामीण कविता नव्हे हे वेगळे स्पष्ट करण्याची आवश्यकता नसावी.''

एकविसाव्या शतकाच्या पूर्वार्धात काव्यलेखन करणा-या कवींना ग्रामीण समाजव्यवस्थेतील प्रश्नांची, जीवनसंघर्षाची, कृषीसंस्कृतीची एक भक्कम पार्श्वभूमी आहे. उत्तम केळगावकर, नारायण कुलकर्णी, कवठेकर, भास्कर बडे, जगदीश कदम, केशव देशमुख, पी. विठ्ठल, सुधाकर गायधनी, फ.म. शहाजिंदे, रवीचंद्र हडसनकर, प्रतिमा इंगोले, नारायण सुमंत, ना. धो. महानोर, विलास पाटील, विलास सिंदगीकर, इंद्रजीत भालेराव, राजा मुकूंद, बालाजी इंगळे, राजन गवस, सदानंद देशमुख, एकनाथ पाटील, सुधाकर गायधनी, कल्पना दुधाळ, राजेसाहेब कदम, शिवाजी जवळगेकर, राजकुमार मस्के, आनंद इंजेगावकर, एहतेशाम देशमुख, शेख अयुब, डी. के. शेख, सय्यद अल्लाऊद्दीन, डॉ. इक्बाल शेख मिन्ने, पृथ्वीराज तौर, डॉ. वसंत बिरादार, शंकर वाडेवाले, रामदास केदार, आणि डॉ. मारोती कच्छवे इत्यादी कवींनी शेतकरीजीवनाचे यथार्थ चित्रण केले आहे. कष्टाचे संदर्भ असलेले आपले आत्मवृत्तच त्यांनी कवितेतून साकारलेले आहे.

कवी मारोती कच्छवे यांचा जन्म कोकणगा, ता. अहमदपूर, जि. लातूर येथे झाला आहे. बोली विशेष म्हणजे मराठवाडी लातूर आणि परभणी जिल्हयातील बोलीभाषेतून काव्यलेखन केले आहे. पेशाने शिक्षक, अस्सल ग्रामीण जीवनाची अस्मिता जपणारा कवी नव्या पिढीतील प्रगल्भ जाणिवेतून मोजकेच पण लक्षणीय लेखन ग्रामीण जाणिवेतून शब्दालय आणि अर्थालय यांचे भान ठेवून काव्यलेखन. त्यांची कविता भोवतालच्या रहाटगाडग्यातून, परिसरातून नांगराच्या फाळाला जशी धार असते. त्याप्रमाणे प्रतिमांची समर्थ सृष्टी उभी करून ढेकूळ विघरावा त्या प्रमाणे उभी राहते. ''कुणब्याच्या पोरा'' या पहिल्याच कवितासंग्रहाने त्यांनी मराठी ग्रामीण कवितेत आपली छाप उमटवली आहे. गाव तेथील व्यवहार माणसामाणसांचे नातेसंबंध, पीक, पाऊस, शेतकरी, कुणब्याचे पोर, माय, पीक आणि तेथील निसर्ग, सुख दुःख, रूढी, परंपरा, कृषीजीवनातील सण, उत्सव, अशा सगळयाच गोष्टी अगदी मातीतून पेरलेले पीक टारारून वर यावे त्याप्रमाणे अगदी बारकाव्यासह समर्थपणे कवी मारोती कच्छव यांनी आपल्या कवितेततून त्यांच्या शेतकरी बाप, त्याच्या व्यथा, खास मराठवाडी बोलीतील शब्दांचा वापर केल्यामुळे भाषिकदृष्टयाही कच्छवे यांची कविता आगळी वेगळी ठरली आहे. गावरान ठसका, देशी परंपरेशी गाठ बांधलेली आहे. वर्तमान काळातल्या राजकीय जीवनाचे त्यांनी केलेले उपरोधिक चित्रण महत्त्वाचे आहे. ग्रामीण समाजाच्या जगण्याशी नाळ जोडून ठेवणारी आणि आधुनिक जगण्याचा पेच मांडणारी कविता कुणबी बापाचे दुःख मांडते. त्यांचा हा शेतकरी बाप संबंध कृषी संस्कृतीचा एक प्रतिनिधी ठरतो. शेतकऱ्यांच्या धडपडीवरही त्यांची कविता बोलते. ग्रामीण संवेदनशीलतेचा अविष्कार करणारी कविता आहे. त्यांच्या कवितेला मातीचा, गाव-शिवेचा, माळरानाचा, मातीच्या सर्जनाविषयीचा आणि सर्गाच्या होणा-या –हासाचा आहे. हा जीवनानुभव बेंबीच्या देठापासून 'स्व'चा आहे. त्यांच्या कष्टाचे संदर्भ असलेले आत्मवृत्तच त्यांनी कवितेतून साकारले आहे. आत्मनिष्ठा, आत्मचिंतनाची जोड त्यांच्या कवितेला असल्यामुळे कविता अत्यंत औचित्यपूर्ण अशा प्रभावी ठरल्या आहेत. कवी मारुती कच्छवे यांनी आपल्या काव्यातून निसर्ग आणि कृषी विषयक जीवनाचा आलेख चितारला आहे. काळया मातीत मातीत नांगर

चालला..., पड पड रे पावसा, बळीराजा, पाऊस, शेतकऱ्याची जात हाय न्यारी, आत्महत्या, बाप माझा, आरं ए पावसा, आम्ही जातीचे कुणबी, कृत्रिम पाऊस, लक्ष्मी, गारपीट, कुणबी, भूमी, कुणब्याच्या पोरा, तरवटयाची भाजी, शेतकरी, थांब जरा बळी दादा मरू नको रे, बळी, पीक-पाणी, बईल, जगाचा पोशिंदा, व्यथा मेघराजा, गोदामाय, धो धो पाऊस पडला, असा कसा हा पाऊस, शेती करणे सोडू नको इत्यादी कवितेतून कवीने कृषीजीवन आणि निसर्गदर्शन घडविले आहे. त्यांच्या काव्यातून शेती व शेतकऱ्यांच्या जिव्हाळयाचे नाते चित्रित केले जाते. काळया आईवर अफाट प्रेम करणारी मारुती कच्छवे यांची कविता महाराष्ट्राच्या कृषीजीवनाचा एक चल चित्रपटच रेखाटते. 'काळया मातीत मातीत नांगर चालला....' या कवितेतून रसोत्कट कृषीवर्णन नि भावोत्कट कृषक दर्शन घडते. कृषी कृषकांप्रमाणे कच्छवे यांची कविता सर्जनशील आहे. शेतातील मातीतून नांगर चालतो, तेंव्हाच्या निसर्गाची, पहाटेच्या वातावरणाचे, नांगर चालविणाऱ्या शेतकरी युगलाचे, हलधराचे, त्याच्या मनातील भाव-भावनांचे यथातथ्य चित्रण आले आहे. निसर्गातील नाद, गती, गंध, स्पर्श, प्रतिमा मनात रुतून राहते. ''तांबड फुटायला बाप निघाला, शेताला, गोळयातून सोडून बैलाला, लागला शेताच्या वाटला, फाळ लावूनी नांगराला, बईल जुंपली जुवाला नाव घेऊन बैलाचं नांगर हाकारला'' (कुणब्याच्या पोरा पृष्ठ क्रमांक 05) तांबड फुटायला हा उल्लेख रमणीय वाटतो. सर्जनाची सूचक सूचना देऊन जातो परंतु शेतकरी बापाला झोपसुद्धा येत नाही. कारण सूर्य निघेपर्यंत झोपले, तर नांगर धरायला ऊन होईल बैलांनाही उन्हाचा त्रास होईल. म्हणून भल्या पहाटे कामाच्या ओढीने शिरावाळाच्या वेळी, थंडीच्या वेळी रान ओसरत असते. या आशेने हा शेतकरी आपल्या शेतात जाऊन नांगर हाकारतो. बैलांना राजा, सर्जा, हिऱ्या, पाऱ्या, सोम्या, शुक-या, गुण्या, ढवळया अशी बैलांची नावे घेऊन पहाटेच्या वेळी नांगर हाकारतो जसा जसा नांगराचा फाळ जमिनीत घुसू लागला की, ढेकुळ पायाला लागतो.

ढवलावर ढवल पडू लागतात. नांगराचे तास दोरीप्रमाणे एका सरळ रेषेत काढू लागला. यालासुद्धा तंत्रज्ञान लागते. कोणालाही नांगराचे तास सरळ काढता येत नाहीत. दसकटं वेचायला येतात. उन्हाळयाचे दिवस असल्याने सूर्य आकाशात तळपत आहे. शेताची उन्हाळयात मशागत केली तरच शेती पिकत असते. त्याच्या कष्टाला तरच फळ येते. शेतकरी उन्हाळयात झोपला की, शेती पिकत नसते. म्हणून ऊन्हाची, घामाची तमा न बाळगता एवढे कष्ट करावे लागतात. पारग्या झाल्या की, औरत शेतकरी सोडतो. ''भविष्याच्या आशेनं वावर नांगरला, कष्टाच्या फळाची आशा व्हती त्याला, दिस माथ्यावर आला, दुपारच्या वेळेस नांगर सोडला.'' रानाची मशागत करूनच भविष्यातील हिरवी स्वप्नं उराशी बाळगतो. तांबड फुटल्यापासून जुंपलेला नांगर दिवस डोक्यावर आल्यावर आणि आपली सावली पायात आल्यानंतरच सोडला. शेतकरी दे रे हरी पलंगावरी कधीच म्हणत नसतो. कष्ट करूनच फळाची अपेक्षा करतो. नांगराची जुंपलेली बैलजोडी हाकणाऱ्या शेतकरी बापाची सश्रद्धा विलोभनीय आहे. नांगराचा फाळ जमिनीत गेला की निघणारे ढेकूळ पायाला मुलायम वाटतो. त्याच्या मनाला भुरळ पाडते. काहीही झाले तरी हे ढेकूळ लोण्यासारखे भासतात. नांगर हाकणारा शेतकरी काळया शेतात भविष्यातील हिर्व स्वप्न पाहताना डोक्यावर लागणाऱ्या उन्हाची त्याला काहीच चिंता वाटत नाही. अशी शेतकऱ्याच्या भावभावनांची चित्रे चपखलपणे चितारणारी कविता आहे. जगावर कितीही उत्पात झाले, संकटे आली तरी हा हलधर आपलं नवनिर्माणाचं कार्य थांबवत नाही. धनधान्याने जगाला सुंदर बनविणाऱ्या ईश्वराचे नांगर हे प्रतीक आहे. हा बळीराजा नांगराचा पहिला फाळ हाकरताना फाळ जमिनीत गेला की, गण्या गणपती मंगलमूर्ती असे म्हणून आपल्या बैलांना हाकारात असतो. अर्थातच कवीलाही त्या हलधराविषयी नितांत आदर आहे. कृषीसंस्कृतीचे प्रतीक, सामर्थ्य या नांगरात आहे. नांगराची रूपे बदलत गेली पण तो जुना लाकडी नांगर त्याचे श्रद्धाशील सौंदर्य या कवितेने जतन केलेले आहे. कृषी जीवनातील दुःख, दारिद्र्य, वेदना, समस्या, सावकारी फास यांचे वास्तव व जिवंत चित्र 'बळीराजा' या कवितेतून चित्रित केले आहे. पूर्वापार चालत आलेल्या कष्ट परंपरेचा बळीराजा हा पाईक आहे. आज ग्रामीण भाग बदलत आहे. बारा बलुतेदारी व अठरा अलुतेदार इ. जातीपातीवरील कडक निर्बंध, शिक्षणाच्या अपुऱ्या सोयी, शहराशी संपर्क साधणारी दळणवळणाची साधने, वाढल्यामुळे निर्माण होणाऱ्या समस्या, खेड्यात वीज, पाणी, रस्ते, दळणवळणाची साधने, शाळा, सहकारी सोसायट्या, लहान-मोठे उद्योग यामुळे एक नवे विश्व निर्माण झालेले आहे. स्वतःच्या अस्तित्वाचा, जगण्याच्या

प्रयोजनाचे नवं भान येऊ लागलेले आहे. वृत्तपत्रे, आकाशवाणी, दूरदर्शन, मोबाईलमुळे विश्वात घडणाऱ्या प्रत्येक घटनेची चाहूल लागू लागली आहे. बायोगॅस, विहिरीवरील पंप, सूर्यचूल, शेतीची नवीन अवजारे यांनी खेड्यातील जुने रूप बदलून गेले जागोजागी नवी धरणे, नव्या सुविधांमुळे दैववादी असणारा शेतकरी हळूहळू प्रयत्नवादाकडे झुकू लागला. शेतीचे नवे तंत्र, नवे ज्ञान या आधुनिक शोधानं हरितक्रांती झाली असे गोंडस बोलले जात आहे. परंतु शेतकरी मात्र दारिद्रयात खितपत पडला आहे. दारिद्रय हे त्याच्या पाचवीला पुजले आहे. पेरणीची वेळ म्हणजे जीवन-मरणाची वेळ असते. संत तुकारामांनी मढे झाकुनिया करिते पेरणी असे म्हटले आहे. म्हणून शेतकरी पेरणीच्या वेळी चौकूनच गांजला जातो. त्याला आपले शेत गहाण टाकूण माय माऊलीची ओटी भरावी लागते. पेरणीच्या वक्ताला त्याच्या घरी, खत, बी-बीयाणे राहत नाही. उपाशी राहून, धोतराला, लुगडयाला सतरा गाठी मारून जीवन जगावे लागते. त्याचा जीव काळया मातीत पेरताना गुंतला आहे. कारण पेरणी चांगली झाली, पाऊस वेळेवर पडला तर पीक जोमाने येऊन उत्पादन वाढेल ही अपेक्षा असते. कणसामध्ये दाणे भरली की पाखरं गोळा होतात. या कणसातील दाण्यांची राखण करण्यासाठी गोफण फिरवीत आटोळयावर उभा राहून कणसांची राखण भोळा बळीराजा करतो. खळं करून आत कणसं, टाकून मेढला बैलाची मळण लावून, बैलांच्या खुरानं कणसं तुडवून, तुडवून, खळयात मदन पडले. लक्ष्मी पुजन्या अगोदर लगेच सावकाराचा सांगावा येतो. एकदा सगळीच रक्कम परतावा करा असा तगादा येतो. लक्ष्मीपूजन वावडी खळयात लावून वा-याच्या झुळकीनं उधळायला सुरूवात करतो. त्याची कारभारीन खाली हातनी करते. मोत्यासारख्या धान्यावरून शेतकरी नजर टाकत पोत्यात रास भरतो. आणि सावकाराच्या दारात भरलेल्या मालाची गाडी उभा करतो फक्त त्याच्या नशिबी दसकटं, माती, राबणे एवढेच शिल्लक राहते त्याच्या कष्टावर विरजन पडते. माल शेतात पिकूनही घरात धान्याची पोती जात नाहीत. ती धान्याची पोती सावकाराच्या घरात, घशात जातात. म्हणून तर अशा सावकारी फासामुळे शेतकरी आत्महत्या करत आहेत. महागाई, सावकारशाहीने त्याचा गळा गच्च आवळून धरलाय. असेच कित्येक वर्ष गेले तरी रक्त, घाम गाळूनही अंगाला धडुतं मिळेना, कष्टाचं फळ मिळत नाही सारे कष्ट, स्वप्नं मातीमोल होत आहेत. टीचभर पोटाला भाकरही मिळत नाही म्हणून कवी मारोती कच्छवे लिहितात, "शेतक-याची जात हाय न्यारी, रात्रंदिवस काम करी, माय समजून काळी माती, बईल असती त्याच्या सोबती, हायीत जन्मोजनमीची नाती सकाळपासून औत हाकारी, अंगात घालुनी फाटकी बनी नांगर हानीत गाणं म्हणी तहान लागताच पेई पाणी इकडून तिकडे चकरा मारी." (कुणब्याच्या पोरा पृ. क्र. १२) शेत कसण्याची त्याची धडपड पाहून आपल्या अंत:करणात कारूण्य निर्माण होते. पेरणीच्या आशेने बेभान होऊन सोसण्याची तयारीच सुचित होते. असं शेतक-याचे चित्र जेंव्हा मारोती कच्छवे यांच्या कवितेतून उभे राहते. तेंव्हा त्यांच्या यातनांची वेदना किंवा कळा काळजापर्यंत केंव्हाच गेलेल्या असतात. आपल्या शेताची निगा करण्यासाठी, कुटूंबाचं रक्षण करण्यासाठी ऊन, पाऊस, थंडी वा-यात रात्रंदिवस काम करत. काळंभोर रान करून पाऊस पडताच पेरणी करून सगळया जगाला अन्न पुरवितो आणि स्वत:चे उभे आयुष्य सुळावर काढतो. स्वत: उघडा, वाघडा, अंग उललेला, पोटात भुकेचा आगडोंब पाणीच पिऊन शांत करतो. कॉंग्रेस, जनता दल, राष्ट्रवादी, भाजप, शिवसेना कोणत्याही पक्षाचं सरकार आलं काय गेलं काय कुणब्याच्या हातातातलं रूमणं, खांद्यावरचं एठण अनेक पिढया मातीत गेल्या तरी जाणार नाही, असे कवी कच्छवे 'आत्महत्या' या कवितेत म्हणतात. दररोज तांबडं फुटायला उठणं बईल शेताला घेऊन जाणं, दिवसभर शेतात काम करणं, काळया मातीला माय समजून, डोंगरावरील शेतं करतो, माळरानालाच नंदनवन करतो. त्यांच्यासोबत कामाला त्याची पत्नीही असते. उदयाची स्वप्ने फक्त धोतराच्या सोग्यात आणि कारभारणीच्या लुगडयाच्या ओटीत घेऊन जगतो. वर्षानुवर्ष शेतीत राबणे निसर्गावर अवलंबून राहणे, आणि निसर्ग कोपला की, हिरवळ डोळयादेखत करपून जाते. त्याच्या समोर आत्महत्येशिवाय दुसरा पर्यायच उरत नाही. सरकार कोणतेही असो मुठभर धनदांडग्याचं, कल्याण करत असते. बळीचे राज्य वामन अवतारापासून आणखी अनेक पिढया गेल्या तरी आले नाही. कुठे येतायेता टायर पंक्चर झाले की, काय. शेतक-याच्या मढयावरचे लोणी खायला तेवढे सरकार तयार असते. कुठे गेले अच्छे दिन. आपल्या शेतकरी जीवनातील अनुभवांशी इमान राखणारी, जिवंत अनुभवांचे आकार घेऊन रसरशीतपणे समोर आलेली ही स्वयंभू

कविता म्हणजे रानातली कविता आहे. त्यांच्या कवितेत वास्तवता, भावगर्भ जाणीव यांच्या रसायनातून एक अर्थपूर्ण प्रतिमासृष्टी निर्माण होते. या भरीव प्रतिमांतून जीवनाचे एक सुजाण, समंजस आणि प्रगल्भ रूप समोर येते. त्यांच्या कवितेचा वैचारिकता हा महत्वाचं विशेष लक्षात येतो. त्यांच्या कवितेच्या अंतरंगातील कारूण्याला एक वेगळेच परिणाम मिळालेले आहे. कृषी जीवनाचे अंतरंग व बाहय तपशील अत्यंत सूक्ष्मरीतीने दिले आहेत. पण त्याचबरोबर त्या त्या वेळी त्यांच्या स-हदय संवेदनशील आणि विचारी मनाने आपल्या साक्षेपी नेटक्या प्रतिक्रियाही नोंदविलेल्या आहेत. कोकणगा हे गाव तिथलं ग्रामजीवन, तिथली शेती-माती, मातीची वत्सलता, शेतक-यांचे रोजचं जीवन, सांस्कृतिक दर्शन आणि हे सर्व समोर मांडताना त्यांच्या मनाने भोगलेले भोग यातून घडणारे श्रध्दाशील प्रसन्न आणि तृप्त दर्शन या कवितेच्या पदन्यासाबरोबर घडते. आपल्या मातीतल्या व्यक्तीमधील वल्लीपण त्यांनी शोधले आहे.

अशा प्रकारे 'कुणब्याच्या पोरा' या कवितासंग्रहातील कवितेत ग्रामीण बोली भाषेचा अलौकिक ठेवा आहे. मराठवाडी प्रदेशाची खास वैशिष्ट्ये दिसून येतात. परभणी आणि लातूर जिल्ह्यातील बोलीभाषेचे अलौकिक दर्शन घडते. येथील निसर्ग बोलीभाषा जनजीवनातील सण, उत्सव, परंपरा, राहणीमान व गावकीच्या कामाचे दर्शन घडत जाते. तसेच ग्रामीण भाषा, ग्रामीण संवेदनशीलता, मानसिकता, अनुभव सृष्टी यांचा प्रत्यय देणारी, ग्रामीण बोलीच्या प्रत्ययाचा अंगीकार करून ग्रामीण कविता प्रकटते. शहरी आणि ग्रामीण अशी सरमिसळ त्यात जाणवते. शहरात बसूनही कवी कच्छवे यांनी ग्रामीण अनुभव चितारताना भाषेचा मूळ स्वभाव, ढब न सोडता व ग्रामीण अभिव्यक्तीचा आव आणताना भाषेचा सरमिसळपणा आणला आहे.

उदा - कुणब्याच्या हातातलं, रूमनं जाणार नाय, दररोजच तांबड फुटायला उठणं, काळया मातीला समजतो माय, उद्याच्या आशेने जगतच हाय, आत्महत्येशिवाय दुसरा पर्यायिच नाय, माय बापाने महय रानी बी टोवलं यातील जिवंतपणा, चैतन्यशीलता अनुभवाचा अस्सलपणा केवळ बोली मुळेच प्रकट झाला आहे. ग्रामीण जीवनाची संवेदनशीलता वास्तववादी स्वरूपात अभिव्यक्त करण्यासाठी लोकभाषेचाच उपयोग केला आहे. हे कवितेतील बोलीभाषेच्या आविष्कारातून दृग्गोचर होते. त्यामुळे ग्रामीण वास्तवाचा जिवंतपणा साकार झाला आहे. ग्रामीण सूर, ताल, लय, ढंग याचे वैविध्य चितारण्यासाठी ग्रामीण बोलीचा उपयोग पडलेली आहे. त्यांच्या कवितेतील बोलीभाषेत संयम, शालीनता, आदर, मुलायमपणा पोटतिडकीने जाणवतो. उग्रता, भडकपणा, उरबडवेपणा, उसनवारी किंवा उंटावर बसून शेळया हाकलेल्या नाहीत किंवा कल्पनेचे पंख लावून आकाशात भरारी घेतली नाही. जमिनीवर पाय ठेवून वास्तव जीवन जे उघड्या डोळयांनी पाहिले, भोगले, अनुभवले तेच रेखाटले आहेत. हाताला घट्टे, पायाच्या टाचेला भेगा, काटे पायात मोडलेली, आराटी बोराटीची काटे, अंगाला चिकटलेले शेण, चिखलात हात भरलेले, पायाच्या बोटाला चिखल्या पडलेले, रक्ताचा घाम करून जमीन ओली केलेले, पायाच्या बोटांना ठेचा लावून, घोटे सडकून केलेले कष्ट अशी जिवंत अहमदपूर तालुक्यातील खास अशी ठसठशीत, झणझणीत हायब्रीड हिरव्या मिरच्यांचा ठेचाची कोकणगाव या खेड्यातील बोली भाषा वापरून जिवंत चित्रण केलेले आहे. या ग्रामीण बोलीभाषेतून चैतन्य निर्माण होते. अस्सल ग्रामीण प्रतिमाही जातिवंत पिंड घडवितात. बहिणाबाई चौधरी, आनंद यादव, विठ्ठल वाघ, इंद्रजित भालेराव, ना. धो. महानोर यांच्या कवितांचा प्रभाव त्यांच्या कवितावर जाणवतो. त्यांच्या गावाकडील निसर्गाचं हुबेहूब शब्दचित्र दृग्गोचर होतं. त्यांना गावाकडील निसर्गाचे, शेतीचे, मातीचे प्रचंड वेड आहे. आजही या आठवणी त्यांच्या मनाला भुरळ घालतात आणि त्याच कविता त्यांच्या ओठातून, लेखणीतून एका लयीत बाहेर पडतात. त्यांच्या कवितेत गंध, स्पर्श, स्वाद आहे. पंचज्ञानेंद्रियांनी कवितांचा आस्वाद घेऊ शकतो. त्यांची शब्दकळा सौंदर्यवादी कवितेची नाते सांगणारी आहे. मन आपले अनुभवविश्व समर्थपणे साकार करतात. त्यांची कविता खेड्याची म्हणण्यापेक्षा शेतातली, मातीतील कविता म्हणणे हे सर्वार्थाने युक्त आहे. शेतातल्या रंग, रूप, लावण्याच्या छटा, रानाची श्वास उच्छवास शेतावरून घरंगळून जाणारे प्रहर रानावरचे वर्षाव, रान वाऱ्याचा, रान झ-याचा, नदी चा नाद, रानफुलांचा गंध अशा अनेकविध संवेदना जाणवतात. माती म्हणजे शेती आणि जलधारा यांचा वर्षाव करणारे आभाळ यातून सुख दुःखांचा सूचक सर्जनात्मक संबंधाचा परिमल सहजपणाने घमघमतो. मेघराजांच्या विशाल फलकावरील जिते जागते सौंदर्य आणि धरतीवर पहुडलेली चैतन्यमयता याचे एक

सौंदर्यपूर्ण कलाविश्व, कुणब्याचे सोसणे अनुभवता येते. ज्वारी, बाजरी, गहू, बैलाची सोबती यांच्या कवितेतून अभिव्यक्त होतात. प्रादेशिक शब्द आणि सौंदर्यपूर्ण शहरी शब्द यांचे एक अनुपमेय रसायन या 'कुणब्याच्या पोरा' कवितासंग्रहातील कवितांमधून एकविसाव्या शतकातील शेती कसणाऱ्या कुणब्याला शेती विश्वाला सामर्थ्य देते.

**संदर्भग्रंथ :-**

१) मारोती कच्छवे, 'कुणब्याच्या पोरा' न्यूमॅन पब्लिकेशन्स, परभणी, प्रथमावृत्ती २०१२

२) नागनाथ कोतापल्ले व दत्ता भगत, 'जागतिकीकरणानंतरचे मराठी साहित्य' (प्रा. प्रल्हाद लुलेकर गौरव ग्रंथ) सायन पब्लिकेशन्स, पुणे, प्रथमावृत्ती, २०१७

३) रामचंद्र काळुंखे, 'ग्रामीण वाङ्मयाचा इतिहास', कैलाश पब्लिकेशन्स, औरंगाबाद, प्रथमावृत्ती, २०१६

४) पी. विठ्ठल, 'मराठी कविता समकालीन परिदृश्य', कैलाश पब्लिकेशन्स, औरंगाबाद, प्रथमावृत्ती, २०१९

# भाऊराव पाटील यांचे शेतीविषयक विचार व कार्य

**प्रा. विजयश्री गवळी**
श्री शिवाजी महाविद्यालय, बार्शी
vijayashrigawali@gmail.com

**प्रस्तावना :-**

कर्मवीर भाऊराव पाटील हे थोर व्यवहारी शिक्षणतज्ञ, क्रियाशील ज्ञानमहर्षी आहेत. ऋषिमुनींचा द्रष्टेपणा त्यांच्याकडे होता म्हणूनच शिक्षणप्रसाराने अहिंसक क्रांती कशी होईल आणि सामाजिक समता कशी प्रस्थापित होईल हे स्वप्न त्यांनी पाहिले. पन्नास वर्षानंतर त्यांच्या प्रयत्नाला यश मिळालेले होते. परंतु आज त्यांचे स्वप्न साकार झालेले पहावयास मिळते आहे. व्यावहारिक दृष्टी असणारे ते कर्मयोगी असून भारतातील लोकोत्तर असे महापुरुष आहेत. त्यांनी आपले कार्य करताना सरकारवर विसंबून न राहता सर्वसामान्य माणसाच्या मदतीने, त्यांना आपल्या कार्यात सामील करुन घेऊन हे कार्य पुढे नेले. शेतकऱ्यांच्या मुलांच्या हातात खडू देऊन, लेखणी देऊन औत आणि दौत यांचा संगम साधून शेती आणि गती यांचा मिलाफ घडविला.

बहुजन समाजातील मुलांना शिक्षणाबरोबरच कष्टाने, स्वावलंबी घडविले, स्वाभिमानी बनवले. त्यामुळे रयतशिक्षण संस्थेतील त्यांचे विदयार्थी आज विविध उच्चस्थ पदावर असून कर्मवीरांच्या विचारांचा वारसा जपताहेत.

**आजोबांकडून शेतीचा वारसा :-**

भाऊराव हे प्रथम शेतीतज्ञ व नंतर शिक्षणतज्ञ म्हणून ग्रामीण जनतेच्या गळयातील ताईत झालेले होते. कर्मवीरांना आजोबांकडून शेतीचा वारसा मिळाला होता. आजोबांनी स्वत:ची अर्धा एकर जमीन भावाला देऊन त्यांच्याकडून दीड एकर माळरान घेऊन त्याचे सुपीक जमीनीत रुपांतर केले होते. हे भाऊरावांनी पाहिले होते. पुढे हाच वारसा रयत शिक्षण संस्थेच्या 'कमवा शिका' योजनेत विदयार्थ्यांना कष्ट करुन स्वावलंबी बनविण्यासाठी त्यांनी वापरला. सातारा येथे चार भिंतीच्या पायथ्याशी डोंगर फोडून सपाट करुन, कातळावर गाळ पसरुन दृष्ट लागेल अशी केळीची बाग फुलविली. रयत-शिक्षण संस्थेत विविध ठिकाणी शिक्षण घेणाऱ्या लाखो मुलांच्या ओसाड जीवनात भाऊरावांनी नंदनवन फुलवले.

**शेतीचे प्रयोग-**

कर्मवीर अण्णा प्रथम हाडाचे शेतकरी होते हे त्यांनी केलेल्या शेतीच्या प्रयोगावरुन व शेतीत घेतल्या जाणाऱ्या उत्पादनावरुन लक्षात येते. त्यामुळे अनंत कृषी पदव्या त्यांच्यासमोर काहीच नाहीत हे सिध्द होते. जेंव्हा शेतीबद्दल काहीच गाजावाजा नव्हता तेंव्हा अण्णांनी शिक्षणाबरोबर शेती सुधारण्याचे कार्य हाती घेतले होते. संस्थेच्या शेतीत छोटे बंधारे निर्माण करुन त्याखाली विहीर खोदण्याचे तंत्र अवलंबिले, पाण्याचे महत्व पटवून बागायती शेतीची महतीही सांगितली. तेंव्हा लोकांनी माहित नसलेली कोबी, नवलकोल, कॉलीफ्लॉवर, टोमॅटो ही पिके धणिनिच्या बागेत घेण्याचा पायंडा पाडला. तेथेच ऊसाचे विक्रमी पीक घेऊन (एकरी 110 क्विंटल) उत्पादन वाढविले. बोर्डिंगच्या शेतात बोरे, चिंचा, शेवगा, पपई लावून त्याची चव काय असते, आहारात त्यांचे महत्व काय असते हे विदयार्थ्यांना समजावून सांगितले. अण्णांना उपजतच शेतीची आवड असल्याने धणिनीच्या बागेत विदयार्थ्यांच्या सहकार्याने शेतीचे विविध प्रयोग करुन दाखवले. नारळ, केळी यांची लागवड चार भिंतीच्या डोंगर उतारणीवर करुन शेतीप्रदर्शनात पारितोषिक मिळवले. विदयार्थ्यांसाठी कॅम्प म्युनिसिपालिटीकडून शेती मिळविली. फलटन लॉज भोवतालच्या चढउताराच्या जमीनीवर भाजीपाला पिकवला. पुढे संस्थेसाठी म्हणून ज्या जमिनी (अष्टे, कुसूर, रुकडी, अहमदनगर जिल्ह्यातील वडाळा) मिळाल्या तेथेही विदयार्थ्याकडून शेती करवून घेतली. देवापूरला 100 एकर शेती कसण्यासाठी मिळविली. देवापूर व आसपासच्या शेतकऱ्यांसाठी 'सहकारी पतपेढया' स्थापिल्या. म्हसवडजवळील राजेवाडी तलावातील गाळाच्या जमिनीत 'सामुदायिक शेती' कसण्यासाठी शेतकऱ्यांना प्रोत्साहन दिले.

टाटा ट्रस्टच्या आर्थिक मदतीमुळे त्या भागातील शेतकऱ्यांचा सर्वांगीण विकास घडवून आणण्यासाठी प्रयोग केला. नगर मधील विठ्ठलराव विखे, कोपरगावचे गणपतराव औताडे, शंकरराव काळे या नेत्यांशी भेट झाल्यावर सहकाराच्या माध्यमातून सहकारी कारखाने उभारुन सहकाराचे तत्व प्रत्यक्ष कृतीत आणले कर्मवीरांच्या द्रष्टेपणामुळेच नगर जिल्ह्याचा शैक्षणिक व आर्थिक विकास झाला.[1]

प्रत्येक विदयार्थ्याला स्वाभिमानी, स्वावलंबी, नागरिक घडविण्याचे एक तंत्र धणिनीच्या बागेत अवलंबिले. 'गाव तेथे शाळा व शाळा तेथे वसतिगृह, वसतिगृह तेथे शेती, शेती तेथे विहीर. मुलांनी शिकायचे व वसतिगृहात

राहायचे. सर्वांनी मिळून शेतीत धान्य पिकवायचे ते वसतिगृहामध्ये स्वत: शिजवून खायचे. स्वावलंबनाने शिक्षण घ्यायचे व स्वामिमानी बनायचे'[2] अशी अण्णांची कृतीशिलता होती.

1927 साली धणिनीची बाग व काकडे बाग खंडाने कसायला घेऊन विविध प्रकारचा भाजीपाला, केळी, ऊस यांचे भरघोस उत्पादन घेतले. धनिणीची बाग हे एक शेती संशोधन केंद्र बनले. आंब्याची झाडे, फणस, चिंच, नारळी, रताळ अशी फळे, कंदमुळे मोठया प्रमाणावर घेतली जात. दोन्ही बागा शेतीच्या प्रयोगासाठी, शिक्षणासाठी ट्रेनिंग कॉलेजकडे दिल्या. तेथे शेतीप्रदर्शने भरवून शेतकऱ्यांना शास्त्रोक्त माहिती दिली जाई.

**शेतीविषयक विचार व कार्य –**

जमीन सपाट करा, बांध घालून पावसाचे पाणी आडवा. जमीनीत मुरवा, पावसाच्या पाण्यावर शेती पिकवा, जमीन मशागतीला योग्य अशी सपाट करा. नांगरुन, मेहनत करुन जमिनीचा पोत सुधारा, पेरणीसाठी उत्तम प्रतीचे बी-बियाणे वापरा. शेतात भरपूर शेणखत घाला, जनावरांसाठी उत्तम प्रतीच्या गवताची लागवड करा. मुरमाड जमीनीत खड्डे खोदून गाळमाती, खताने भरुन फुलझाडे लावा, स्वावंलंबन व श्रमदानाने विहीर खोदून पिकाना पाण्याची सोय करा. रोग, कीड, तणे यांचा नायनाट करा. पडिक जमिनी ठेवू नका, योग्य वेळी मशागतीची कामे करा' असे भाऊराव शेतकऱ्यांना सांगत व मार्गदर्शन करत. शेतकरी प्रदर्शनामध्ये आपले अनुभवाचे विचार मांडत.[3]

भाऊराव पाटील यांनी सहकारी सामुदायिक शेती सोसायटी स्थापनेचा अभिनव प्रयत्न केलेला आहे. सातारा जिल्ह्यातील माण तालुक्यातील दुष्काळी भागातील शेतकऱ्यांवर होणाऱ्या अन्यायकारक व गरीब शेतकऱ्यांचे शोषण करणाऱ्या पध्दतींवर, पुढाकार घेऊन त्यांच्या जमिनी शासनाकडून त्यांना मिळवून दिल्या. इतकेच नाहीतर एक प्रकारे भूमिहीनांना जमिनी मिळण्यासाठी देखील पुढाकार घेतला. भूमिहीनांना जमीन मिळवून देण्यासाठी भाऊरावांनी जमीनदारांच्या, मोठया शेतकऱ्यां विरोधात पाऊल उचलले होते. परिणामी त्यांचा लढा हा फक्त सामाजिक, शैक्षणिक क्षेत्रापुरता मर्यादीत राहत नाही, तर आर्थिक क्षेत्रदेखील व्यापून घेत असताना दिसून येतो.[4]

पळसावडे येथे सामुदायिक शेती सहकारी संस्था स्थापन करुन सहकार तत्वावर शेती करण्याचे प्रयोग केले गेले. तत्कालीन सहकारी संस्थांना जमिनी वहिवाटीस मिळण्याकरीता शेतकऱ्यांना व तत्कालीन कलेक्टर भाऊसाहेब हिरे यांना भेटून, आपले म्हणने पटवून सांगून सहकारी शेती सोसायटयांना शंभर टक्के न्याय मिळवून दिला.

**सहकारी सोसायटयांची स्थापना :-**

देवापूर भागातील राजेवाडी तलावातील गाळपेर जमिनी शेतकऱ्यांना मिळाव्या म्हणून शासनाकडे प्रयत्न करुन सहकारी सोसायटया स्थापन केल्या. भाऊरावांनी केवळ वंचित, मागसलेल्या, गरीब असलेल्या समाजातील वर्गाला शिक्षण देण्यापुरते रयत शिक्षण संस्थेची व्याप्ती मर्यादीत ठेवली नाही तर शिक्षणक्षेत्राची चौकट ओलांडून शेतकऱ्यांचे हित जपण्यासाठी त्यांनी सामुदायिकरित्या प्रयत्न केला. या प्रयत्नांना यश मिळत नाही हे लक्षात आल्यानंतर त्यांनी राजकीय क्षेत्राचा पाठिंबा त्यासाठी मिळविला. रयत शिक्षण संस्थेत शिक्षण घेतलेल्या परंतु राजकीय सभेमध्ये असणाऱ्या त्यांच्या विदयार्थ्यामार्फत त्यांनी हा प्रश्न, राजकीय क्षेत्राच्या मुख्य रणमैदानात मांडला व तो मंजूर करुन घेतला.

भारतातील पहिला सहकारी साखर कारखाना प्रवरानगर (जि. अहमदनगर) येथे विठ्ठलराव विखे पाटील यांनी सुरु केला. तेंव्हा तेथील शेतकरी सधन होते. त्यांच्या मुलांना शिक्षण मिळावे हे भाऊरावांना तळमळीने वाटत होते. तेंव्हा त्यांनी आपले विचार मांडले ते असे की, 'आपण सहकारी तत्वावर कारखाना काढून या परिसरातील जनतेचे जीवनमान उंचावण्याचा प्रयत्न करीत आहात, ही बाब स्तुत्य आहे. परंतु ही जनता सधन झाल्यानंतर त्यांच्या मुलाबाळांना योग्य असे शिक्षण दिले नाही, तर ही मुले चैनी व व्यसनी बनतील. तेव्हा यांच्या मुलाबाळांना योग्य शिक्षण दिले पाहिजे म्हणजे या कारखान्यास लागणारे नोकर, तंत्रज्ञ इत्यादी माणसे या भागातूनच तयार होतील. यासाठी मी येथे हायस्कूल सुरु करणार आहे याचा खर्च कारखान्यावर पडू नये. परंतु सर्व ऊस उत्पादन करणाऱ्या शेतकऱ्यांनी थोडी झीज सोसावी, या कारखान्यात ज्यांचा ऊस येईल, त्या प्रत्येक टन ऊसापाठीमागे 25 पैसे शिक्षणफंड त्यांनी स्वच्छेने द्यावा.[5] हे मान्य होऊन या भागातील प्रत्येकाच्या घरात लक्ष्मीबरोबर सरस्वतीचाही प्रवेश झाला व सर्वसामान्य जनता सुखावह झाली.

'स्वावलंबी शिक्षण हेच आमचे ब्रिद' (सेल्फ हेल्प इज अवर मॉटो) हे ध्येय ठरवून शासनाकडे, शेतकऱ्यांकडे आम्हांस पडीक जमीन (वेस्ट लँड) दया, आम्ही तिचे सुपीक (बेस्ट लँड) जमिनीत श्रमाने रुपांतर करु' असे भाऊराव जाहीरपणे सांगत. ही मागणी करताना जनताच शिक्षणाभिमुख करुन शेतीच्या बाबतीत त्यांच्यामध्ये शास्त्रीय दृष्टिकोन रुजविण्याचा हेतू होता.

**समारोप -**

कर्मवीर भाऊरावांनी पडीक जमिनीचे सुपीक जमिनीत रुपांतर करुन बहुजन समाज व विद्यार्थी यांच्यापुढे आदर्श ठेवला. या कार्याचा व शेतीविषयक विचारांचा वारसा आज रयत शिक्षणसंस्था जपत असताना दिसते.

**निष्कर्ष:-**

1) तत्कालीन शेतकऱ्यांच्या मुलांना ज्ञानार्जनाबरोबर आर्थिक संपन्नतेतून स्वावलंबी बनवले.
2) पडीक, खडकाळ जमीनीचे सुपीक जमीनीत रुपांतर केले.
3) शेतकऱ्यांसाठी सहकारी सोसायटीची स्थापना करुन आर्थिक दृष्टया निर्भर बनवले.

**संदर्भ ग्रंथ :-**

1) काटकर मा.भि, महाराष्ट्राचा महामानव कर्मवीर भाऊराव पाटील, प्रकाशक सौ. सरोजनी मा. काटकर, द्वितीयावृत्ती, 2007, पृष्ठ - 145.
2) भोसले द.ता, कुमारांचे कर्मवीर, स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे, द्वितीयावृत्ती, 22 सष्टेंबर 2011, पृष्ठ -84
3) यादव मा.के, कर्मवीर भाऊराव पाटील एक सम्यक आकलन, गिरिजा केदार प्रकाशन, प्रथम आवृत्ती: कर्मवीर पुण्यतिथी, 9 मे 2017, पृष्ठ - 254
4) राशिनकर नंदा अशोक, कर्मवीर भाऊराव पाटील आणि रयत शिक्षण संस्था, स्नेहवर्धन प्रकाशन, प्रथमावृत्ती, 4 आक्टोंबर 2020, पुणे, पृष्ठ -87
5) काटकर मा. भि, महाराष्ट्राचा महामानव कर्मवीर भाऊराव पाटील, प्रकाशक सौ. सरोजनी मा. काटकर, द्वितीयाआवृत्ती, 2007, पृष्ठ-97

**Chief Editor**
Dr. R. V. Bhole
'Ravichandram' Survey No-101/1, Plot, No-23,
Mundada Nagar, Jalgaon (M.S.) 425102

| **Guest Editor**<br>**Dr. R K Pardeshi**.<br>Principal<br>Sant Ramdas Arts, Commerce and Science College, Ghansawangi Dist. Jalna | **Guest Editor**<br>**Dr. Y. M. Chavan**<br>I/CPrincipal<br>Sahakarbhushan S. K. Patil College, Kurundwad. |
| --- | --- |
| Executive Editors<br>Dr. Tathe S.V.<br>Dr. A. D. Jadhav | |

Editorial Board

| Prof. R. S. Kadam | Mr. K.D. Dhaygude | Prof. R.D. Shinge |
| --- | --- | --- |
| Dr. Dhaye R.S | Dr. B. S. Devkar | Mrs. S. V. Patil |
| Dr. Mrs. S.V. Kothavale | Dr. V.S.Moon | Dr. S. S. Shinde |
| Prof.P.P.Kamble | Dr. S.D. Chavan | Prof. Dr. D.V. Suryawanshi |
| Dr. V.V.Minchekar | Dr. M.S. Dabade | Prof. Dr. S.A. Tambade |

**Address**
'Ravichandram' Survey No-101/1, Plot, No-23,
Mundada Nagar, Jalgaon (M.S.) 425102